**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : आज लोकमान्य टिळक यांची जयंती असल्यामुळे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यासाठी आपण सर्वजण जाणार आहोत. त्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी महकूब करीत आहे. सभागृहाची बैठक 10 वाजून 40 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 10 वाजून 30 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी**

**पृ.शी.**: पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश

**मु.शी.**: पर्यावरणावर दुष्परिणाम घडविणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्यास शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, केशवराव मानकर, पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, श्री. नागो पुंडलिक गाणार यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे चालू)

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची जागा बदलली. नरिमन पॉइन्ट ते माननीय राज्यपालांचा बंगला या भागामध्ये चौपाटीच्या समोर जी जागा आहे त्या ठिकाणी पुतळा उभारला तर त्यामध्ये नेव्हीची काय अडचण आहे हे मला कळत नाही. नरिमन पॉइन्ट ते माननीय राज्यपालांच्या बंगल्याचे टोक म्हणजे आरमाराचे सरसेनापती कान्होजी आंग्रे यांचा जेथे जुना बंगला होता त्या भागामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला तर काय अडचण येणार आहे ? त्या ठिकाणी पुतळ्यामुळे कोणतीही अडचण येईल अशी परिस्थिती नाही. माझा जो आक्षेप असा आहे त्या बाबतीत मी गेल्या आठवड्यामध्ये सुध्दा बोललो होतो की, अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावयाची आणि नंतर पर्यावरणाच्या आणि इतर कारणांमुळे भूसंपादन होत नाही या कारणास्तव ती तरतूद इतरत्र पाहिजे त्यांना द्यावयाची असे जे अर्थ खात्याचे धोरण आहे ते थांबले पाहिजे. आपण 300 कोटी रुपयांची तरतूद केली परंतु प्रत्यक्षात 1 रुपया सुध्दा खर्च झाला नाही. मार्च अखेर ही तरतूद फिरविण्याचे

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

काम केले जाते. अर्थसंकल्पामध्ये अनेक बाबींसाठी अशी तरतूद केली जाते. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या संदर्भात 5 कोटी रुपयांची तरतूद केली इतर ठिकाणी सुध्दा 50 कोटी रुपयांची तरतूद केली. या चर्चेच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, पर्यावरण विभागाची परवानगी असल्याशिवाय अर्थसंकल्पामध्ये तरतूद करु नये असे धोरण राज्य शासनाने ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगेन की, माननीय मंत्री महोदयांनी पर्यावरण विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांच्याकडे असलेली टीम मला बरी वाटली. मी 10-11 वर्षानंतर पहिल्यांदा पर्यावरण विभागामध्ये गेलो होतो. आता तेथील अधिकारी सकारात्मक बोलतात. या पध्दतीचे धोरण स्वीकारले तर वेगळ्या तऱ्हेचे वातावरण निर्माण होईल. या चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, आपण गुजरातला जाऊ या. आम्ही आमच्या खर्चाने गुजरातला येऊ. आपणही आपली टीम सोबत घ्यावी. आपले अधिकारी आणि सचिव यांना सोबत घ्यावे. गुजरात सरकार पर्यावरणाच्या संदर्भातील धोरण कसे ठरविते हे आपल्याला बघावे लागेल. आम्ही आमच्या खर्चाने त्या ठिकाणी येऊ. आपण आपल्या अधिकाऱ्यांना बरोबर घ्यावे. आपण गुजरातमध्ये जाऊ. त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात, नगरपालिकांच्या संदर्भातील जे प्रकल्प आहेत त्या बाबतीत कशा प्रकारचे धोरण आहे आणि त्या ठिकाणच्या फाईल्स जलदगतीने कशा हलतात हे बघावे लागेल. तसे केले तर चांगले होईल.

आता आपल्या नागरिकांच्या जीवनामध्ये चांगले आयुर्मान वाढवावयाचे असेल तर आपल्याला प्रामुख्याने पर्यावरणाकडे बघावे लागेल. मी परदेशातील अनेक देशांमध्ये गेलो. ऑस्ट्रेलियामध्ये समुद्रात जवळजवळ 20 किलोमीटरवर ड्रेनेज सोडलेले मी पाहिलेले आहे. आपल्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी पाठवावे. युरोपमध्ये सुध्दा तशाच पध्दतीने लांब अंतरावर ड्रेनेज सोडले जाते. आपण मुंबईतील ड्रेनेज नरिमन पॉइन्टच्या समोर सोडतो. मी त्या ठिकाणी राहतो. आपण त्या ठिकाणी समोरच ड्रेनेज सोडतो. या बाबतीत काही तरी धोरण ठरवावे लागेल.

आज नगरपालिकांमध्ये जी ड्रेनेजची कामे चालू आहेत त्या संदर्भात केवळ एनओसी देऊन चालणार नाही. त्या ठिकाणी कश प्रकारचे काम होते, ते काम पर्यावरणाच्या दृष्टीने बरोबर आहे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D

श्री. जयंत प्र. पाटील .....

की नाही हे बघण्यासाठी आपल्याकडे तांत्रिक अधिकारी आहेत की नाही हे मला माहीत नाही. जर आपल्याकडे तांत्रिक अधिकारी नसतील तर ती व्यवस्था करावयास पाहिजे. अलिबाग नगरपालिकेसाठी मी 20 कोटी रुपयांची ड्रेनेजची योजना केंद्र शासनाकडून मंजूर करुन आणली. परंतु आज त्या ठिकाणी नगरपालिकेकडे आणि शासनाकडे तांत्रिक स्टाफ नाही. त्यामुळे ते पैसे पडून आहेत. त्या ठिकाणी समुद्र सपाटीपासून आमची गावे उंचावर आहेत. मालवण आणि अलिबाग ही दोन गावे समुद्रासपाटीपासून उंचावर आहेत. त्या ठिकाणी समुद्र खाली आहे आणि गाव वर आहे. त्यामुळे ड्रेनेजचे काम बरोबर होत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

म्हणून या सगळ्या गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. पर्यावरण विभागाचा निधी त्या त्या कामावरच खर्च होण्यासाठी दक्ष असलेले अधिकारी या खात्यामध्ये पाहिजेत. मी मंत्री महोदयांबरोबर अनेक वर्षे काम केलेले आहे. त्यामुळे त्यांनी या प्रश्नाकडे जातीने लक्ष दिले पाहिजे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मला या प्रस्तावावर 5 मिनिटे विचार मांडण्यास सांगितले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनीही मुंबईच्या आमदारांची एक बैठक घेऊन चर्चा केली होती.

मुंबईतील फोर्ट एरिया आणि बाकीचा विकसित भाग पाहिला तर या भागात ड्रेनेजचा प्रश्न कधीच उद्‌भवत नाही. या भागात ब्रिटिशांनी ड्रेनेज लाईन टाकलेली आहे. त्यामुळे फोर्ट ते महालक्ष्मी पर्यंत पावसाळ्यात कधीही पाणी तुंबत नाही किंवा ड्रेनेजचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यासंबंधी जुनी कागदपत्रे असतील तर त्याची पाहणी करुन त्यातील चांगल्या गोष्टी स्वीकारल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबईतील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. ही वाहतूक प्रदूषण मुक्त असावयास पाहिजे. मी अलिबागहून मुंबईला बोटीने येतो. मंत्री महोदयांनी पोर्टच्या भागाला भेट द्यावी. तेथे एकाच जागेवर सिमेंट, धान्य, लोखंड उतरविले जाते. त्यासाठी नियोजन केल्याचे आढळून येत नाही. गुजरात राज्यात पर्यावरण खात्याकडून विविध प्रकल्पांना परवानगी तातडीने मिळते आणि ती मिळणार नसेल तर तेही तातडीने संबंधितांना कळविले जाते. गुजरात सरकारकडून माहिती घेण्यासाठी मंत्री महोदयांची तयारी असेल तर त्यांचाही खर्च मी करण्यास तयार आहे. गुजरात सरकारचे धोरण आपल्या राज्यातही राबविण्यात यावे अशी विनंती करतो आणि मी माझे भाषण संपवितो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहासमोर नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी केवळ एकच सूचना मांडण्यासाठी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, ग्रामपंचायतीपासून ते महानगरपालिकेच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजना राबविल्या जातात. मोठ्या महानगरपालिकांचे जलशुध्दीकरण प्रकल्प असतात. परंतु छोट्या नगरपालिकांना इ.टी.पी.बसविणे बंधनकारक केले पाहिजे. त्याच प्रमाणे नद्यांमध्ये घन कचरा टाकला जाऊ नये यासाठी निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे. तरच दूषित पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकेल. एवढेच बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे ( पर्यावरण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये पर्यावरण या विषयासंबंधी प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत, काही सन्माननीय सदस्यांनी तक्रारी केल्या आहेत आणि पर्यावरण विभागाचे पुढील धोरण काय आहे, या विभागाकडून कोणती कार्यवाही सुरु आहे ते जाणून घेण्याची जिज्ञासा व्यक्त केली आहे. या सर्व सन्माननीय सदस्यांचा मी आभारी आहे.

पर्यावरण हा व्यापक विषय आहे. जैविक घटकात मानव, प्राणी, वनस्पती, वने यांचा संबंध येतो आणि अजैविक घटकात डोंगर, समुद्र, नदी यांचा संबंध येतो असे सर्वसाधारणपणे आपण समजतो. समृध्द घटकांचा आपापसातील समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. भारत स्वतंत्र झ ाल्यानंतर विकसनशील दृष्टीकोनातून केंद्रीय सरकारने व त्या अनुषंगाने राज्याने पंचवार्षिक योजना राबविण्याची सुरुवात केली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे....

या कार्यक्रमाची अंमलबजावणी आज सुरु असलेली आपण पाहत आहोत. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर आपण प्रगतीचा मोठा टप्पा आजवर गाठलेला आहे. ही प्रगती साध्य करताना तंत्रज्ञानाचा मोठा फायदा झालेला आहे. नवनवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपण अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. जेथे विकास होत असतो तेथे नवनवीन समस्या देखील निर्माण होत असतात. शास्वत मानव विकासासाठी नैसर्गिक स्त्रोतांचे जतन आणि संरक्षण करणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण संतुलन व संवर्धन यामध्ये सुवर्णमध्ये साधणे अत्यंत आवश्यक आहे. ते न केल्यास पर्यावरणाचे संतुलन बिघडून विविध समस्यांना आपणाला सामोरे जावे लागेल ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी प्रामुख्याने राज्याचा पर्यावरण विभाग व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ हे कार्यरत आहेत. 1 मे 1985 रोजी स्वतंत्र पर्यावरण विभागाची निर्मिती करण्यात आली. पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन, जतन आणि शाश्वत विकास करणे हे या विभागाचे ध्येय आहे. यासाठी पर्यावरण संरक्षण कायदा 1986, जल कायदा 1974 व हवा कायदा 1981 यांची प्रभावी अंमलबजावणी राज्य स्तरावर करण्यात येत आहे. यानुषंगाने सन्माननीय सदस्यांनी काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी पश्चिम घाटच्या संदर्भात नेमलेल्या प्रा. गाडगीळ समितीचा उल्लेख केला. महाराष्ट्रातील 13 जिल्ह्यामध्ये पर्यावरणाचा कार्यक्रम राबविण्याची शिफारस या समितीने केलेली आहे. या समितीने केन्द्र शासनाला अहवाल दिलला आहे. त्याबाबत राज्य शासनाने वन विभागामार्फत आपले मत जानेवारी 2000मध्ये केन्द्राला कळविलेले आहे. हा अहवाल सर्वांसाठी खुला झालेला आहे. या अहवालाच्या संदर्भात केन्द्र शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी असा उल्लेख केला की, पर्यावरण विभागाने महाराष्ट्र व्हॅलीला परवानगी दिलेली आहे. मी सांगू इच्छितो की, पर्यावरण विभागाकडून महाराष्ट्र व्हॅलीला परवानगी देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी लवासाच्या संदर्भात नेमलेल्या समितीच्या अहवालासंबंधी उल्लेख केला. लवासाच्या संदर्भात केन्द्रीय पर्यावरण मंत्रालयाने महाराष्ट्र प्रदूषण

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ D/ 10:50

श्री. संजय देवतळे...

नियंत्रण मंडळाने लवासा कार्पोरेशन पुणे येथे मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्यामार्फत फौजदारी खटला दाखल केलेला असून तो न्यायप्रविष्ट आहे. त्यामधील सर्व आरोपी विरुध्द फौजदारी प्रक्रिया चालू करण्यात आलेली आहे. या संदर्भात सर्व संचालक आरोपींनी पुनर्विलोकन अर्ज माननीय उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालयात दाखल केलेला आहे.

सभापती महोदय, आपणास माहीत आहे की, आताच युनेस्कोने जुलै 2012मध्ये पश्चिम घाटातील 39 ठिकाणांचा जागतिक वारश्यामध्ये समावेश केलेला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील कासचे पठार,कोयना अभयारण्य, चांदोली अभयारण्य, राधानगरी अभयारण्य आणि कोल्हापूर या चार ठिकाणांचा समावेश केलेला असून ही महाराष्ट्राच्या दृष्टीने निश्चित अभिनंदनीय बाब आहे. हा प्रा. गाडगीळ समितीचा अहवाल केन्द्राने स्वीकारल्यानंतर केन्द्र शासनाच्या सूचनेप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिकीकरणाला चालना मिळालेली आहे, त्याला वेग आलेला आहे. आजमितीस राज्यात 75 हजार लहान मोठे उद्योग कार्यरत आहेत. या उद्योगांमुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे नैसर्गिक स्त्रोतांवर होणारा परिणाम कमी करण्यासाठी पर्यावरण विभागाद्वारे विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. विविध कारखान्यातून जे सांडपाणी सोडले जाते त्यावर प्रक्रिया करण्यासाठी इटीपी बसविणे बंधनकारक केलेले आहेत. तसेच या छोट्या-मोठ्या उद्योगातून निघणारे सांडपाणी एकत्र करुन 26 सामूहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आपल्या राज्यामध्ये कार्यरत आहेत. काही वेळा अपघात होतात आणि पाईप लाईनमधून गळती होते अशावेळी त्याबाबतीत त्वरित उपाययोजना केली जाते. सामूहिक सांडपाणी प्रक्रिया राबवित असताना त्यामध्ये एमआयडीसी आणि पर्यावरण विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेवला जातो.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे..

राज्यामध्ये 5 हजार 652 उद्योगांमधून 40 हजार 232 मेट्रीक टन प्रति महिना निर्माण होणाऱ्या घातक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी राज्यात तळोजा, टीटीपी, नवी मुंबई, राजंणगाव, बुटीबोरी, शेंद्रे, महाड या ठिकाणी घातक घन कचरा प्रक्रिया विल्हेवाट केंद्रे उभारण्यात आली आहेत. ज्या भागांमध्ये औद्योगिकीकरण झाल्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून तेथे काही अडचणी निर्माण झ ााल्या असतील तर पर्यावरण विभागाच्या माध्यमातून या व्यवस्था निर्माण करण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी जो उल्लेख केला त्याबाबत सांगू इच्छितो की, आपल्याकडे शहरीकरण मोठ्या प्रमाणावर होत आहे. आपल्याकडे जवळपास 48 टक्के नागरिकरणाचा वेग आहे. त्यामुळे नागरी घन कचरा आणि नागरी सांडपाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपल्याकडे 22 महानगरपालिका आणि 222 नगरपरिषदा आहेत. आपल्याकडे जवळपास 5 लाख 7 हजार 332 मेट्रीक टन नागरी घन कचऱ्याची निर्मिती होते. त्यापैकी 3 लाख 74 हजार 474 मेट्रीक टन कचऱ्यावर प्राथमिक स्वरुपाची प्रक्रिया करण्यात येत आहे. त्यासाठी एकूण 132 प्रक्रिया केंद्रे उभारण्यात आली आहेत. परंतु ज्या प्रमाणात प्रक्रिया करावयास पाहिजे त्या प्रमाणात ती होत नाही. तेव्हा आपण नगरोत्थान योजना किंवा जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत राष्ट्रीय नदी कृती आराखडा करण्याचे जे काम घेतलेले आहे. हे काम त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी करणे आवश्यक आहे. नगरपरिषदांचा जास्त कल हा रस्त्यांच्या कामावर असतो. परंतु पर्यावरणाच्या दृष्टीने हानीकारक असलेल्या गोष्टींकडे त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे आपल्याकडे म्हणावी तशी घन कचऱ्यांवर प्रक्रिया करणारी केंद्रे उपलब्ध नाहीत.

सभापती महोदय, जवळपास 30 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पाणी जलस्त्रोतामध्ये सोडले जाते. 222 नगरपालिकांमधून प्रतिदिन 840 दशलक्ष सांडपाण्याची निर्मिती होते. त्यापैकी फक्त 15 टक्के सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येते ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा मी अगोदर सांगितल्या प्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची व्यवस्था करणे खूप महत्वाचे आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते पाणी नदीत सोडल्यामुळे नदी प्रदूषित होते. त्यामुळे नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते. आपणास माहीत असेल काही दिवसांपूर्वी कोल्हापूर आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे..

इचलकरंजी येथे काविळीची साथ मोठ्या प्रमाणावर पसरली होती. तेव्हा नगरोत्थान योजनांच्या माध्यमातून नद्यांतील प्रदूषण कमी करण्याचा आमचा निश्चितपण प्रयत्न राहील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला की, नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी उत्तर प्रदेश राज्याने केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन घेतलेला आहे. मी त्या बाबत सांगू इच्छितो की, त्या राज्यामध्ये गंगा प्राधिकरण योजना होती. ही योजना सर्वप्रथम केंद्र सरकारने तेथे राबविली. या योजनेतून तेथे मोठ्या प्रमाणावर काम झालेले आहे. त्यानंतर केंद्राने राष्ट्रीय नदी संवर्धन योजना सर्व राज्यांमध्ये लागू केली. या योजनेंतर्गत राज्याने कराड, त्र्यंबकेश्वर, नाशिक आणि नांदेड या चार शहरांमधील नद्यांची नदी प्रदूषण निवारण्याची कामे पूर्ण केलेली आहेत त्यासाठी 94 कोटी रुपये खर्च झालेला आहे. त्याच बरोबर सांगली व कोल्हापूर या शहरांची 118 कोटी रुपयांची कामे प्रगतीपथावर आहेत. एवढेच नाही तर 7 शहरांचे 115 कोटी रुपयांचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविले आहेत. त्यामध्ये पुणे शहराचा देखील समावेश आहे.

सभापती महोदय, एखाद्या नगरपरिषदेने सांडपाण्यावर प्रक्रिया केली परंतु त्या नगरपरिषदेमध्ये काही ग्रामपंचायती असतील किंवा शहरे असतील तेथील सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते पाणी नदीमध्ये सोडल्यास नदी प्रदूषित होणार. तेव्हा आता आपण नदी खोरेनिहाय प्रकल्पाचे काम हाती घेतलेले आहे. त्यामध्ये मोठी गावे, महानगरपालिका, नगरपलिका जी नदीकाठी वसलेली आहेत त्यांचा समावेश आहे. भीमा नदी खोरे, पंचगंगा नदी खोरे, गोदावरी नदी खोरे इत्यादींचे आराखडे तयार केले असून हे सविस्तर अहवाल देण्याचे काम एमजीपीकडे दिलेले आहे. त्यांच्याकडून सविस्तर अहवाल आल्यानंतर तो अहवाल केंद्र सरकारकडे पाठविणार आहोत. त्यानुसार नगरपरिषद, नगरपालिका नदी खोरे निहाय प्रदूषित नद्या निवारण्याचे काम करणार आहोत. या योजनेमुळे नद्या प्रदूषित होणार नाहीत.

सभापती महोदय, घातक घन कचऱ्या बरोबर जैविक घन कचऱ्याचा देखील प्रश्न आहे. 38 हजार 251 आरोग्य केंद्रामधून 44 हजार 765 किलो जैविक घन कचरा महिन्याला तयार होतो. या जैविक घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी 135 ठिकाणी जैविक घन कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्यात आली आहेत.

यानंतर श्री.गिते..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवळे...

त्या माध्यमातून आपण जैविक कचऱ्यावर नियंत्रण मिळवितो आहोत. सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, पर्यावरण संरक्षण कायदा, 1986 च्या अंतर्गत भारत सरकारने पर्यावरण व वने मंत्रालयाने दिनांक 20 जुलै 1998 रोजी जैविक वैद्यकीय कचरा व्यवस्थापन अधिसूचना काढलेली आहे. या नियमांतर्गत जैविक कचऱ्याचे वर्गीकरण केलेले असून, वर्गीकरणानुसार शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्यासाठी मानके ठरविलेली आहेत. या मानकांत भस्मीकरण यंत्रणा, ऑक्टोप्ले, शेडर, शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे या पध्दतीचा समोवश आहे. सामूहिक विल्हेवाट केंद्रांमध्ये भस्मीकरण यंत्राणा आहे. उर्वरित सहा केंद्रे भूभरण पध्दतीची असून ती सध्य:स्थितीत ते केंद्रे कार्यरत आहेत. सदर सामूहिक केंद्रामध्ये नियमानुसार जैविक वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येते. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, इच्छितो की, या पध्दतीचे यावर नियंत्रण ठेवण्याचे काम करण्यात येत आहे.

सभापती महोदय, गर्भपातानंतर अर्भकाच्या अवयवांची विल्हेवाट कशा पध्दतीने लावावयाची यासंबंधी आपल्या राज्यात कोणत्याही प्रकारचा कायदा नाही अशा प्रकारचा मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केला आहे. या गोष्टीशी आरोग्य विभागाचाही संबंध येतो, संदर्भात काय धोरण ठरविता येईल या बाबतीत त्यांच्याशी निश्चितपणे चर्चा करुन योग्य तो निर्णय घेण्याचा आमच्या विभागाचा निश्चितपणे प्रयत्न राहील.

सभापती महोदय, बकऱ्या, कोंबड्या यांच्या कत्तलखान्यातून निघणारा कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. ते या कचऱ्याची विल्हेवाट लावत असतात. शासनाकडून मंजुरी घेतलेल्या कत्तलखान्यांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाहीत. त्या कत्तलखान्यातून निधणाऱ्या कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासंदर्भातील व्यवस्था करण्यात आलेल्या आहेत. लहान नगरपरिषद, नगरपालिका असोत त्यांना पर्यावरण विभागाकडून परवानगी दिली जात नाही, या संस्थांच्या कार्यक्षेत्रातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचे काम तेच करीत असतात. यासंस्था जर त्यांच्या कार्यक्षेत्रातील कचऱ्याची विल्हेवाट व्यवस्थितपणे करीत नसतील तशा प्रकारच्या शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्यातर संबंधित संस्थांना निश्चितपणे सूचना देण्यात येतील. मोठे कत्तलखाने आहेत, त्यांना पर्यावरण विभागाने परवानगी दिलेली आहे, त्यांच्या माध्यमातून जो





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे...

कचरा निघतो, त्यावर प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावण्याचे काम अतिशय जागरुकतेने होते. नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील कचऱ्यांची विल्हेवाट लावत नसतील व तशा तक्रारी पर्यावरण विभागास प्राप्त झाल्या तर निश्चितपणे त्याकडे लक्ष दिले जाईल.

सभापती महोदय, ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी चागल्या प्रकारची व्यवस्था नाही, या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. त्या बाबतीत मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, ई-कचरा शास्त्रोक्त पध्दतीने हाताळण्यासाठी वने व पर्यावरण विभाग, भारत सरकारने 15.5.2011 रोजी तो अधिनियम पारीत केला आहे व दिनांक 1.5.2012 पासून लागू झाला आहे. या नियमांतर्गत ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आलेली आहे. या कच-यांची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था राज्य शासनाकडून होत आहे. महाराष्ट्र प्रदुषण मंडळ व मान्यता प्राप्त 7 संस्था या संस्थांमार्फत घनकचरा गोळा करुन त्याची घनकचरा व्यवस्थापनामार्फत करण्यात येत आहे.

सभापती महोदय, ग्लोबल वार्मिंगच्या संदर्भात आपण नेहमीच चर्चा करीत असतो. आज हवामानामध्ये मोठया प्रमाणात बदल होत असतो, कधी अनियमित पाऊस पडत असतो, कधी कधी खूप अतिवृष्टी होते, या दृष्टीकोनातून शासनाने मार्च, 2010 रोजी एनर्जी ॲन्ड रिसर्च इन्स्टीटयूट डेअरी यांच्यासमवेत या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. येत्या 2 वर्षात, 30 वर्षात आणि 2050 व 2079 या लाँग टर्म कालावधीत वातावरणामध्ये काय बदल असतील, त्या अनुषंगाने काय उपाययोजना केली पाहिजे, यात कृषि, जलस्त्रोत, तटीय क्षेत्र, आरोग्य या बाबतचा अभ्यास करण्याचे काम त्यांना दिलेले आहे.

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे.....

काही डाटा न मिळाल्यामळे त्यांनी मुदतवाढ मागितली आहे. मार्च 2012 पर्यंत अहवाल द्यावयाचा होता परंतु डाटाबेस न मिळाल्यामुळे अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली आहे. मला विश्वास आहे की, त्यांच्याकडून लवकरच सविस्तर अहवाल येईल. अहवाल आल्यावर राज्याला याबाबतीत धोरण स्वीकारुन उपाययोजना करण्यासाठी अहवाल उपयोगी पडणार आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याबाबतचा उल्लेख केला. तत्कालीन केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांच्यासोबत माननीय मुख्यमंत्र्यांनी 15.4.11 रोजी याविषयाबाबत चर्चा केली होती आणि या स्मारकाला तत्वत: मंजुरी देण्याबाबत विनंती केली होती. त्यानंतर 2 मे 2012 रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्री श्रीमती जयंती नटराजन यांना या प्रकल्पाला तत्वत: मंजुरी देण्याबाबत विनंती केलेली आहे. शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रात करण्याबाबत पत्रव्यवहार चालू आहे. यासंदर्भातील सविस्तर प्रकल्प अहवाल सार्वजनिक बांधकाम आणि सामान्य प्रशासन विभागाकडून करण्याचे काम सुरु आहे. 13 जुलै 2012 रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक मुद्याच्या संदर्भात समितीची बैठक घेण्यात आली. स्मारक उभारण्यासाठी 34 प्रकारचे सर्वेक्षण करावे लागणार आहे. पर्यावरण विभागाच्या मान्यतेसाठी कोणत्या प्रकारचे सर्वेक्षण करावे लागणार आहे त्यासाठी अग्रक्रम दिलेला आहे. प्रकल्प अहवाल पूर्णपणे आल्यानंतर कार्यवाही होईल. त्याअगोदर या स्मारकाला तत्वत: मंजुरी देण्यासाठी आणि अंतिम मंजुरी देण्यासाठी शासनाचा प्रयत्न राहणार आहे. शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या जागेमध्ये कोणताही बदल झालेला नाही. आहे त्या जागेवरच स्मारकाच्या उभारणीसाठी शासन कटीबध्द आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील याबाबत भूमिका स्पष्ट केलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाकडे महाराष्ट्रातील जनता एका वेगळया अस्मितेने पहात आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांचे भव्य असे स्मारक अरबी समुद्रात होण्यासाठी शासन निश्चितपणाने लक्ष घालून प्रयत्न करणार आहे.

.....2

SSK/ ST/ D/ पूर्वी श्री.गिते 11:05

श्री. संजय देवतळे....

याठिकाणी शिवाजी पार्कवरील ध्वनीप्रदूषण रोखण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला केंद्रीय पर्यावरण विभागाचा ध्वनी प्रदूषण अधिनियम 2000 प्रकाशित झाला आहे. तो राज्यभरामध्ये लागू आहे. दवाखाने,शिक्षण संस्था, शाळा याठिकाणी 100 मिटरच्या परिसरात शांतता क्षेत्र घोषित केलेले आहे. यामध्ये शिवाजी पार्कचा सुध्दा समावेश आहे. परंतु या अटीमध्ये शिथिलता देण्यासाठी आणि सुधारणा करण्यासाठी सप्टेंबर 2011 आणि मार्च 2012 च्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती केलेली आहे. शिक्षण संस्था, दवाखाने यासाठी सरसकट 100 मिटरची अट आहे. यामध्ये सुधारणा करण्यासाठी विनंती केली आहे. शाळा असेल आणि त्यात 500 विद्यार्थी असतील तर शाळेच्या दिवशी सभोवताली 100 मिटरपर्यंत आवाजाची बंदी ठेवावी. कामकाजाच्या दिवशी न्यायालयाच्या भोवती 100 मिटरपर्यंत आवाजाची बंदी ठेवावी. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये 100 बेडची रुग्णालये आहेत त्याठिकाणी 100 मिटरपर्यंत तसेच उर्वरित महाराष्ट्रासाठी 25 किंवा अधिक बेडची रुग्णालये आहेत तेथे 100 मिटरपर्यंत आवाजाची अट ठेवावी. मोठी धार्मिक स्थळे आहेत त्याठिकाणी 100 मिटरची अट ठेवावी. सध्या सरसकट अट घालण्यात आलेली आहे. छोटे दवाखाने, मंदिरे यामध्ये 100 मिटरची अट आहे त्यात सुधारणा करण्यात यावी असे कळविले आहे. परंतु केंद्राकडून मंजुरी मिळाली तर शिवाजी पार्क वरील सभेच्या बाबतीत आणि इतर संस्थांच्या बाबतीत मदत करता येईल.

समुद्रकिनाऱ्याची धूप होऊ नये म्हणून संरक्षण करणे, जलचर प्राण्यांचे संरक्षण करणे याकरिता कांदळवनाचे महत्व आहे. त्यानुसार शासनाने 2007-8 च्या परिपत्रकानुसार मुंबई वन विभाग क्षेत्रातील 5500 हेक्टर क्षेत्र कांदळवन संरक्षित वन म्हणून घोषित केलेले आहे. त्यादृष्टिकोनातून कांदळवनाच्या संरक्षणासाठी विभागीय आयुक्त कोकण यांची जबाबदार अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याच्या हस्तांतरणाची जबाबदारी जिल्हाधिकारी व पोलीस विभागावर सोपविण्यात आली आहे.

यानंतर श्री. भोगले

अशुध्दित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे........

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, प्लास्टिक हा मानवनिर्मित पदार्थ आहे. या पदार्थाचे विघटन होत नाही. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्या राज्याने 50 मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर तसेच 8 ते 12 इंच लहान प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणली आहे. परंतु या संदर्भातील कायद्याची अंमलबजावणी करण्याचे काम महानगरपालिकांचे आयुक्त आणि नगरपालिका व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांच्यामार्फत केले जाते. उर्वरित क्षेत्रात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अंमलबजावणीचे काम केले जाते. या संदर्भातील तरतुदीची पूर्णपणे अंमलबजावणी होत नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, दापोली येथे गावातील लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यात आली. अधिकारी, सर्वसामान्य जनता आणि स्वयंसेवी संस्था यांनी या जनजागृतीच्या कार्यामध्ये सहभाग घेतला आणि दापोली येथे फक्त 50 मायक्रॉन नव्हे तर सर्व प्रकारच्या प्लास्टिक पिशव्यांवर लोकांनी स्वत:हून बंदी घातली आहे. पर्यावरणाच्या संदर्भातील कायदा कितीही कडक असला तरी लोकांचा व त्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचा या बाबतीत सहभाग असणे आणि भरीव जनजागृतीचे काम झाले तर प्रदूषणावर मोठया प्रमाणात आळा घालता येऊ शकतो. त्या दृष्टीने सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने उद्योगाबाबत आर.आर.झेड. पॉलिसी जाहीर केली आहे. त्या पॉलिसीनुसार नद्यांच्या पात्रातील पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक 15 जुलै, 2000 अन्वये राज्यातील नद्यांचे अ 1 ते 4 असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्या नुसार अ 1 वर्गातील नद्याच्या दोन्ही तटापासून 8 कि.मी.अंतरापर्यंत प्रदूषित उद्योगांवर बंदी घालण्यात आली आहे. अ 2 वर्गातील नद्याच्या दोन्ही तटापासून 2 कि.मी. अंतरापर्यंत प्रदूषित उद्योगांवर बंदी घालण्यात आली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी दोडामार्ग येथील खाणींमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी असेही म्हटले की, केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अनुमतीने तेथे खाणीमधून उत्खनन करण्यास अनुमती देण्यात आली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, खाणीच्या संदर्भात काही नद्या नोटिफाईड केलेल्या आहेत. शासनाने जी आर.आर.झेड.पॉलिसी तयार केली आहे, त्या पॉलिसीनुसार नद्यांकरिता नियम केलेले आहेत. नद्या नोटिफाईड नसतील तर त्यांचा समावेश होत नाही. तरी देखील माननीय सदस्यांनी

श्री.संजय देवतळे.........

उपस्थित केलेल्या मुद्यानुसार काही गैर पध्दतीचे काम झाले असेल तर निश्चितपणे चौकशी केली जाईल आणि काही चुकीचे आढळले तर कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कर्नाटकातील इश्यू उपस्थित केला होता. तेथे प्रदुषणाला कारणीभूत ठरल्याबद्दल तलाठ्यांवर कारवाई झाल्याचे सांगितले. अवैध उत्खनन होते याची पूर्ण चौकशी करण्याकरिता आयुक्त, महसूल विभाग यांनी एक समिती केली आहे. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये डायरेक्टर, जिऑलॉजी ॲंड माईन्स व आर.डी.सी.यांचा समावेश आहे. या प्रकरणाची चौकशी करुन आठ दिवसात अहवाल येईल. त्यामध्ये जे काही दोष असतील त्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, पयार्वरण विभागाचे सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पर्यावरण विभागामध्ये कर्मचाऱ्यांची पदे कमी असल्याचा मुद्दा मांडला आहे. शासनाला ही बाब मान्य आहे. या विभागाचे सक्षमीकरण करुन पर्यावरण विषयक कामाला गती देण्याच्या दृष्टीकोनातून सध्या विभागीय स्तरावर पर्यावरण विभागाचे कोणतेही कार्यालय नाही. यापुढे विभागीय स्तरावर व जिल्हा स्तरावर पर्यावरण विभागाचे कार्यालय निर्माण प्रयत्न करणार आहोत. ज्या माध्यमातून पर्यावरणाच्या रक्षणाकरिता चांगल्या पध्दतीने उपाययोजना करता येतील. प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी स्तरावर एक सल्लागार समिती असून त्या समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक होणे अभिप्रेत आहे. परंतु त्या समितीची ठरल्याप्रमाणे बैठक होत नाही. त्या समितीचे काम जर व्यवस्थितपणे चालले तर पुष्कळसे निर्बंध घालता येतील. त्या दृष्टीकोनातून शासन प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयात जिल्हा पर्यावरण माहिती केंद्र स्थापन करणे शासनाच्या विचाराधीन आहे. जेणेकरुन स्थानिक पातळीवर पर्यावरण विषयक परवानगी, योजना इत्यादीची माहिती उपलब्ध होऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

नंतर श्री.खर्चे....

PFK/ D/ ST/ पूर्वी श्री. भोगले..... 11:15

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहापुढील विशेष बैठकीच्या कामकाजाची वेळ 11.15 वाजेपर्यंत होती. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. संजय देवतळे : महोदय, प्रत्येक जिल्ह्यासाठी पर्यावरण कृती आराखडा तयार करण्याचे काम चालू आहे. त्यानंतर जिल्हा स्तरावर जी पर्यावरण समिती आहे त्या समितीच्या मार्फत माहिती केंद्राच्या माध्यमातून कार्यवाही करुन या कामाला गती देता येईल. त्याचप्रमाणे महानगर पालिका, नगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र पर्यावरण क्षेत्रांची निर्मिती करावी अशा सूचनाही नगरविकास विभागाला दिल्या आहेत. याचे कारण असे की, मोठ्या प्रमाणात पर्यावरणाकडे दुर्लक्ष होते म्हणून अशा प्रकारच्या उपाययोजना केल्या तर निश्चितपणे पर्यावरणाच्या बाबतीत स्थानिक पातळीवरुन निश्चितपणे लक्ष घालता येईल. तसेच मी असेही सांगू इच्छितो की, आपण यासंदर्भात आणखी वेगवेगळ्या योजना सुरु केल्या त्यामुळे नवीन पिढीमध्ये पर्यावरणाची जाणीव व्हावी म्हणून एक पर्यावरण सेवा योजना सुरु केली. त्यानुसार राज्यातील सहा महसुली विभागात दोन दोन प्रदूषित जिल्हे निवडून त्या जिल्ह्यांमधील 50 शाळांचा समावेश करण्यात येईल. त्यानंतर पुढील पाच वर्षात 100 शाळांचा समावेश या योजनेत करण्यात येईल. त्यातून स्थानिक पातळीवर पर्यावरणाच्या समस्या सोडविण्यासाठी पर्यावरण जन जागृती निर्माण होऊ शकेल. आपण सांगितले की, पर्यावरण विभागाने कन्सेंट दिले पाहिजे यादृष्टीनेही मी सांगू इच्छितो की, लोक सहभाग आणि ई-गव्हर्नन्सचा वापर करुन कन्सेंट टू ऑपरेट अँड कन्सेंट टू एस्टॅब्लिश अशी प्रणाली ऑन लाईन कार्यान्वित करण्यात येईल. या माध्यमातून पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यासाठी होणारा त्रास दूर होईल.

महोदय, मुंबई, पुणे अथवा इतर भागात 20 हजार चौरस मीटरच्या वर जे प्रकल्प हाती घेतले जातात त्यांना परवानगी देण्यासाठी जी एसईझेडची समिती असते त्यामार्फत मिळते पण या प्रक्रियेत बरीच प्रकरणे अडून राहतात, त्यासाठी वर्षभराच्या वर कालावधी लागतो. आम्ही यादृष्टीने केंद्रीय पर्यावरण विभागाला विनंती केली आहे की, मुंबई व एमएमआरडीए परिसरासाठी स्वतंत्र समितीची स्थापना केली व दुसरी समिती उर्वरित महाराष्ट्रासाठी असावी. अशा प्रकारे पर्यावरणाच्या मान्यतेसाठी जो कालावधी लागतो तो कमी होईल. तसेच उद्योगांसाठी एक स्वतंत्र

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे ........

समिती असावी अशी परवानगी आम्ही केंद्राकडे मागण्याचा प्रयत्न करीत आहोत. जणेकरुन यामध्ये आणखी पारदर्शकता येईल व या सर्व उद्योग अथवा प्रकल्पांना गती मिळेल.

विधानसभा तसेच विधान परिषदेत बऱ्याच वेळा पर्यावरणावर चर्चा होते. त्यावेळेस एखाद्या उद्योगामुळे पाणी प्रदूषित होते व त्याची तक्रार केली तरी दखल घेतली जात नाही. त्यासाठी न्यायालयात जाऊन न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरच अशा कंपन्यांवर कारवाई होतो, असाही मुद्दा उपस्थित होतो. या अनुषंगाने मला सांगावयाचे आहे की, या अनुषंगाने आम्ही कडक धोरण स्वीकारले आहे की फिल्ड ऑफिसरने दर महिन्याला अशा कंपनीत जाऊन पाण्याचे नमुने घ्यावयाचे असतात पण तक्रार केल्यानंतर देखील एखाद्या फिल्ड ऑफिसरने त्यात हयगय केली अथवा लक्षात येऊनही कारवाई केली नसेल तर अशा दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे धोरण शासन स्वीकारत आहे, त्यामुळे यात जास्त पारदर्शकता येईल. त्यासाठी अशा गोष्टींवर अगोदरच नियंत्रण आणण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

महोदय, राज्यातील महानगर पालिकांच्या बाबतीत पुढील 20 वर्षांनी होणारी लोकसंख्या वाढ लक्षात घेऊन स्वतंत्र पर्यावरण कृती आराखडा तयार करुन अंमलबजावणी करण्यात येईल, जेणेकरुन भावी काळात ही समस्या राहू नये असेही शासनाचे प्रयत्न राहतील. त्याचबरोबर रस्त्यांच्या रुंदीकरणाच्या वेळेस सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होते, निकषानुसार त्यापेक्षा जास्त झाडे त्यांना लावावयाची असतात पण प्रत्यक्षात तसे होत नाही. त्यासाठी पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग असो अथवा एमएमआरडीए सारखे प्राधिकरण असो त्यांनी पर्यावरणाच्या नियमानुसार काम केले नसेल तर त्यांच्यावरही कारवाई करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी पर्यावरणाचे उल्लंघन होण्याचे प्रकार नेहमीच होत असतात. म्हणून पंढरपूर वारीच्या मार्गातून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत झाडे लावण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे ...

सभापती महोदय, वारी निघून गेल्यावर वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी अतिशय अस्वच्छता असते. त्यामुळे वारीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुध्दा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासन विचार करीत आहे.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी बांधकाम केले जाते, प्रकल्प उभे केले जातात त्या ठिकाणच्या 30 टक्के मोकळया जागेवर वृक्ष लागवड करणे अभिप्रेत आहे. परंतु 30 टक्के मोकळया जागेवर वृक्षांची लागवड केली जात नाही असे दिसून आलेले आहे. परंतु यापुढे 30 टक्के मोकळया जागेवर वक्ष लागवड करणे बंधनकारक केले जाणार आहे.

सभापती महोदय, केंद्रीय वन व पर्यावरण मंत्रालयामार्फत प्रायोगिक तत्वावर प्रदूषण व्यवहार प्रकल्प 3 राज्यांमध्ये राबविण्यात येत असून या योजनेमध्ये आपल्या राज्याचाही समावेश करण्यात आलेला आहे. जे प्रमुख प्रकल्प आहेत त्यांनी अद्ययावत सनियंत्रण यंत्रणा बसविणे अभिप्रेत आहे. अशी यंत्रणा बसविल्यामुळे उद्योगातून उत्सर्जित होणाऱ्या प्रदूषणाची माहिती पर्यावरण मंडळाकडे प्राप्त होईल व ती माहिती जनसामान्यांपर्यतही दिली जाऊ शकेल. तसेच प्रदूषण कमी करणाऱ्या उद्योगांना आर्थिक लाभ दिला जाणार असून प्रदूषण कमी करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे निश्चितपणे प्रदूषण कमी होण्यास चालना मिळणार आहे.

सभापती महोदय, पर्यावरणाचा विषय व्यापक आहे. पर्यावरणाचा विषय सर्व विभागाशी संबंधित आहे. जेव्हा प्रदूषणाचा विषय निर्माण होतो त्यावेळेस आम्हाला त्या त्या विभागाशी कन्सर्ट करावे लागत असते. पर्यावरणामध्ये लोकांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे. प्रदूषणाच्या बाबतीत लोकांमध्ये अवेअरनेस निर्माण झाला तर प्रदूषणामध्ये निश्तिचपणे घट होऊ शकेल. प्रदूषण कमी करण्यासाठी सामाजिक संस्थाचे सहकार्य घेण्यात येईल तसेच यासंदर्भात सन्माननीय लोकप्रतिनिधींचे सहकार्य व मार्गदर्शन घेऊन प्रदूषण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. अगोदर प्रदूषणासारख्या महत्वाच्या विषयाकडे दुर्लक्ष झाले होते परंतु या चर्चेच्या निमित्ताने प्रदूषणाचा विषय सभागृहासमोर आणला त्याबद्दल मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे आभार मानतो व पुढील काळात प्रदूषण कमी करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जातील अशी ग्वाही देतो.

धन्यवाद.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही जे प्रश्न उपस्थित केलेले होते, ज्या प्रश्नाच्या संदर्भात राज्यापालांकडे तक्रारी केल्या होत्या त्या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदय एक शब्द सुध्दा माहिती देत नाहीत. मी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात कारवाई करण्यात यावी असा अहवाल आलेला असतांना सुध्दा त्यासंदर्भात काहीही माहिती दिली जात नाही याचे दुःख आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय पर्यावरण मंत्री महोदयांनी पर्यावरण प्रदूषणाच्या संदर्भात विभागाकडून कठोर कारवाई केली जाईल यासंदर्भातील माहिती सदनात दिलेली आहे. लहान शहरात जी कत्तलखाने आहेत त्यांच्याकडे सांडपाणी वाहून नेण्यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसते. लहान शहराच्या मध्यभागी कत्तलखाने सुरु असून त्याचे सांडपाणी नाल्यामधून किंवा ड्रेनेजमधून नेले जात असल्यामुळे लहान शहरात या कारणाने मोठया प्रमाणात प्रदूषण होत असते. त्यामुळे अशा ठिकाणच्या नगर पालिकांवर सांडपाणी वाहून नेण्याची बंधने घालणे आवश्यक आहे. लांब अंतरावर अशा प्रकारचे सांडपाणी वाहून न्यावयाचे असेल तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय उपयोग होणार नाही. त्यामुळे कत्तलखान्यातील सांडपाणी वाहून नेण्याची प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टिकोनातून संबंधित नगरपालिकांना राज्यशासन पत्र पाठविणार आहे काय ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, जे मोठे कत्तलखाने आहेत, जसे देवनार किंवा इतर जे मोठे कत्तलखाने आहेत त्यांना पर्यावरण विभागाची मंजुरी लागत असते व त्या प्रमाणे मोठया कत्तलखान्यांमध्ये प्रदूषणाच्या संदर्भात नियंत्रण ठेवले जात असते. छोटया कत्तखान्यांच्या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था व्यवस्था ठेवण्याचे काम करीत असते. परंतु ते जर अशा पध्दतीने व्यवस्था करीत नसतील, सांडपाणी अशाच प्रकारे उघडयावर येत असेल तर त्यासंदर्भात व्यवस्था करण्यासाठी, नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या जातील.

**तालिका सभापती ( श्री. मोहन जोशी )** : सभागृहाची वेळ 11 वाजून 35 मिनिटांपर्यत वाढविण्यात येत आहे.

यानंतर श्री. भारवि....

अग्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाचा विषय सभागृहामध्ये चर्चिला गेला. सुरूवातीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना ही केवळ पाण्याचा प्रश्नासंबंधी होती. जसजसा काळ बदलत गेला तसतसे अनेक विषय या बोर्डाकडे आलेत. या मंडळाला प्रदूषण नियंत्रण मंडळ असे नाव न देता त्याच्या नावाचा विस्तार करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी या बोर्डाची पुनर्रचना होण्याची आवश्यकता आहे. यातील काही भाग हे विभागलेले आहेत. विशेषत: ध्वनी नियंत्रण प्रदूषणाची जबाबदारी आपण गृह विभागाकडे सोपविलेली आहे. यात गृह विभाग आणि आपल्या विभागाचा समन्वय होणे आवश्यक आहे. पण तसे होताना दिसत नाही. त्यामुळे ध्वनि प्रदूषण नियंत्रणाच्या बाबतीत जितकी परिणामकारकता यायला पाहिजे ती आज पर्यंत आलेली नाही. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रात एक पर्यावरण अधिकारी असावा अशा प्रकारची रचना करता आली तर त्या दृष्टीने विचार करावा. प्रदूषण नियंत्रण बोर्डाच्या रचनेमध्ये महानगरपालिकांचे प्रतिनिधी, उद्योग विभागाचे प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने त्याची पुनर्रचना करण्याकडे शासन लक्ष देणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, आता विभागीय स्तरावर देखील कार्यालये करून पुढे जिल्हा स्तरावर कार्यालये स्ट्रेंग्थनींग करण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसे केले तर निश्चितपणे गती येईल, असे मला वाटते.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कळणे खाणीतून जादा उत्खनन झालेले आहे. उप संचालक आणि संचालकांच्या अहवालात तसे नमूद करण्यात आले आहे. सुमारे 9 लाख 99 हजार 434 क्यूबिक मीटर जादा उत्खनन झाले आहे. तसेच, लगतच्या सर्व्हेमध्ये, परवानगी नसलेल्या सर्व्हेमध्ये उत्खनन केल्याचे देखील अहवात नमूद केलेले आहे. तो अहवाल शासनास सादर झाला असल्यामुळे याबाबत कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? असा प्रश्न मी विचारला आहे. तथापि, आपल्या उत्तराच्या भाषणात याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही. उलट, आपण या खाण मालकांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात काय असा माझा सवाल आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, या खाणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी दिली आहे. त्याचा परवाना दिनांक 31.3.2014 पर्यंत वैध आहे. या प्रकरणी चौकशी करण्यात येईल व त्यात दोषी आढळून येणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी देखील यापूर्वीच सांगितले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या खाण प्रकल्पाबाबत राज्य शासनाकडे दोन अहवाल आले आहेत. आपल्या पक्षाच्या नेत्याची खाण असल्यामुळे त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे काय ? गेल्या पाच अधिवेशनापासून हा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. असे असताना आपण कसली माहिती गोळा करीत आहात ? हे सगळे माजी मंत्र्याच्या मुलाला वाचविण्याकरिता करत आहात असा माझा आरोप आहे. हे बरोबर नाही. आपल्याला जर नाव पाहिजे असेल तर ते देखील सांगण्यास तयार आहे. माजी मंत्र्यांच्या मुलाने व्यवसाय करण्याबद्दल आमची काहीही तक्रार नाही. पण ते बेकायदेशीर उत्खनन करीत आहेत. त्यासंबंधीचा अहवाल देखील आपल्याकडे आलेला आहे. त्याबाबत आपण काहीच कारवाई करीत नाही.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, खाणीसाठी परवानगी देण्यात आली आहे. उत्खननाचा संबंध पर्यावरण, खनिकर्म आणि महसूल विभागाशी येतो. सन्माननीय सदस्यांनी येथे दिलेली माहिती सत्य समजून जो अहवाल देण्यात आलेला आहे त्याबाबत चौकशी करून कारवाई करण्यात येईल हे मी शासन म्हणून सांगत आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, गाडगीळ समितीच्या अहवालासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? या समितीने पूर्णपणे पूर्वग्रहदूषित पद्धतीने काम केले आहे. ही समिती फक्त दीड दिवस होती. श्रीमती वैशाली पाटील सारखे तथाकथित पर्यावरणवादी तेथे आले होते. त्या या समिती बरोबर फिरत होत्या. महाबळेश्वर, माथेरान येथे शेतकऱ्याला एक विहीर खोदायची असेल तर त्यासाठी 30 हजार रूपये भरावे लागतात. ....(अडथळा)..... सभापती महोदय, मी येथे मुद्दाम नाव घेतले आहे. पूर्वग्रहदूषित पद्धतीनेच काम केलेले आहे. जैतापूर येथे देखील असाच प्रकार केला आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, गाडगीळ समितीच्या अहवालासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे तसेच, छोट्या छोट्या मॅन्ग्रोव्ह संबंधी शासनाची भूमिका काय आहे ?

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली . . ..

मोठ्या प्रमाणात असेल तर माझे काही म्हणणे नाही. तुम्ही ते ताब्यात घेऊन फॉरेस्टच्या ताब्यात द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मांडवा येथे मॅन्ग्रोव्हच्या जमिनीची वाट लावली आहे, त्याबाबतीत तुम्ही काय करणार आहात ? मग या सभागृहाला अर्थ काय आहे ?

श्री:राजन तेली : सभापती महोदय, जेथे छोटे-छोटे मॅन्ग्रोव्ह उगवतात त्या खाजगी मालकीच्या जागा असतात. तेथे शासन म्हणून आपण कोणती भूमिका घेणार आहात ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, डॉ.गाडगीळ यांनी केंद्र शासनाला जो अहवाल सादर केलेला असून तो केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. त्याबाबत निर्णय झालेला नाही. तसेच हा अहवाल जनतेसाठी खुला करण्यात येईल आणि याबाबतीत लोकांची मते घेण्यात येतील. त्यानंतर केंद्र शासन जो निर्णय घेईल त्याप्रमाणे राज्य शासन पुढे कारवाही करील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, याठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे, त्यामध्ये अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक तयार करण्याबाबत विषय होता. याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, 2011 मध्ये त्यावेळचे तत्कालीन मंत्री .....

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, 2011 मध्ये त्यावेळच्या तत्कालीन मंत्री महोदयांनी यासाठी तत्वत: मान्यता दिली आणि आता 2012 मध्ये सुध्दा तत्वत: मंजुरी देण्याच्या प्रतिक्षेमध्ये आहेत. माझा प्रश्न असा आहे की, 15 वर्षानंतरही या स्मारकास तत्वत: मंजुरी देण्यासाठी माननीय मंत्री महोदय आणखी किती वेळ लागणार आहे? यासाठी जर एवढी वर्षे लागणार असतील तर शासन यापुढे शिवाजी महाराजांचे नाव घेणे बंद करणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, मी सांगितले की, दिनांक 15-4-2011 रोजी केंद्रीय पर्यावरण मंत्री माननीय श्री.जयरामजी रमेश यांची माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक उभारण्यासाठी तत्वत: मंजुरी देण्याबाबत विनंती केली होती. त्यानंतर 2 मे 2012 रोजी सुध्दा नवीन पर्यावरण मंत्री श्रीमती जयंती नटराजन् यांनाही सदरहू स्मारक ...

. . . .एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे . . . .

उभारण्याच्या बाबतीत तत्वत: मंजुरी देण्याबाबत विनंती केली. एकदा तत्वत: मंजुरी मिळाल्यानंतर आपल्याला पुढील कामाला वेग देता येईल. परंतु तत्वत: मान्यता मिळालेली नसल्याने राज्य शासनाच्या वतीने सामान्य प्रशासन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग याबाबतीत काम करीत आहेत आणि संपूर्ण प्रकल्पाचे स्वरुप तयार केल्यानंतर पर्यावरण विभागाकडे आल्यानंतर तो केंद्र शासनाकडे पाठविला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे प्रस्ताव देताना आमचा हेतू असा होता की, काही प्रश्नांच्या बाबतीत सरकारचे स्पेसिफीक धोरण स्पष्ट व्हावे. मला याठिकाणी नम्रतापूर्वक खेद व्यक्त करावयाचा आहे. कारण आमच्या प्रस्तावाला संपूर्णपणे गुगली देऊन फसविण्यासाठी माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत काय असा प्रश्न पडतो. तसेच मला अधिकाऱ्यांच्या बाबतीत विशेष वाटते की, त्यादिवशी माननीय राज्यमंत्र्यांनी सर्व नोटस् घेतल्या आहेत. भारतातील 28 नद्या जास्तीत जास्त प्रदूषित आहेत आणि आपण त्यापैकी केवळ 4 नद्यांच्या संबंधातील प्रस्ताव दिलेले आहेत.मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये आणखी चार नद्यांची नावे घेतली आहे.परंतु महाराष्ट्रातील उर्वरित ज्या 22 नद्या आहेत त्यामध्ये विदर्भातील, उत्तर महाराष्ट्रातील नद्या आहेत. अशा 22 नद्यांच्या बाबतीत आपण केव्हा प्रस्ताव देणार आहात असा माझा पहिला स्पेसिफीक प्रश्न असून त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही. तसेच मी अधिकाऱ्यांच्या बाबतीत देखील स्पष्टपणे नाराजी व्यक्त करते.कारण आम्ही विधान परिषदेमध्ये चर्चा उपस्थित केल्यानंतर आम्हाला मूर्ख बनविण्यासाठी ते उत्तरे देत आहात काय? याठिकाणी विभागाचे जे नेहमीचे धोरण आहे ते येथे सांगण्यात येत आहे. मात्र उरलेल्या 22 नद्यांच्या प्रदूषणाबाबत काय करणार आहात असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, पश्चिम घाटाबद्दल आम्ही तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जे मुद्दे मांडले त्या अनुषंगाने लोकांना जगविण्यासाठी पश्चिम घाटाबद्दल जे निर्बंध घातले जाणार आहेत ते युनेस्कोपर्यंत मांडण्यासाठी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे? त्याबाबत विचारुच दिलेले नाही.माननीय मंत्री महोदयांनी संबंधितांचे फक्त स्वागत केले.परंतु यासंदर्भात स्थानिक लोकांचे काय म्हणणे ते मांडूच दिलेले नाही. माझा तिसरा प्रश्न आहे की,माथेरानला महा मान्सून रॅली घेण्यात आली. त्यावेळी श्रीमती नीता अंबानी यांनी त्याचे उद्घाटन केले आहे.परंतु वन विभागामध्ये

. . . .एल-3



APR 11.30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पर्यावरण नष्ट करुन जर अशा प्रकारच्या रॅली होणार असतील तर याबाबतीत त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात याबाबत उत्तर आलेले नाही.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 28 नद्यांच्या बाबतीत उल्लेख केला आहे. त्याबाबत मी सांगितले की, चार नद्यांची कामे झालेली आहेत आणि त्यासोबतच इतरही कामे सुरु आहेत. तसेच शहरांच्या बाबतीतील 1115 कोटी रुपयांचे जे प्रस्ताव आहेत, ते आपण पाठविलेले आहेत. दुसरी बाब म्हणजे भीमा खोरे, गोदावरी खोरे आहे अशा प्रकारे खोरेवाईज नद्या आहेत त्याबाबतीत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी एम.जी.पी.कडे काम दिलेले आहे आणि यासंदर्भातील प्रकल्पाची माहिती आल्यानंतर ते केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत आणि त्यामध्ये सर्वच नद्या येणार आहेत.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक 11 वाजून 45 मिनिटांनी पुन्हा सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 34 मिनिटांनी, 11 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थागितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**आंबोली (ता.सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग) घाटात पावसाळयात कोसळणाऱ्या दरडीवर उपाययोजना करण्याबाबत**

**(१) * ३०७१४ श्री.परशुराम उपरकर , श्री.दिवाकर रावते , श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक २६५०० ला दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली (ता.सावंतवाडी,जि.सिंधुदुर्ग) घाटात पावसाळयात कोसळणाऱ्या दरडीवर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(२) असल्यास, या संदर्भात या घाटाचा भूगर्भतज्ज्ञांमार्फत अभ्यास करण्याचा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार तज्ज्ञांकडून पाहणी करुन तसा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, या अहवालात कोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(५) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता :** (१) व (२) होय.

प्रश्नांकित घाटामध्ये पावसाळ्यात दरडी कोसळू नये यासाठी संरक्षक भिंतीचे तसेच संरक्षक कठड्याचे बांधकाम करण्यात आले आहे. घाटाच्या डोंगराकडील बाजूचे छोट्या आकाराचे सुटे दगड काढण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच दरडी कोसळण्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या निर्देशानुसार भूगर्भ शास्त्रज्ञांकडून आंबोली घाटाचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(३) सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : आंबोली घाट गेल्या तीन वर्षात सातत्याने कोसळत आहे. त्या संदर्भात शासनाने कायमस्वरुपी काय उपाययोजना केली आहे ? त्यावर गेल्या तीन वर्षात आतापर्यंत शासनाने किती रुपये खर्च केले आणि किती रुपये वाया गेले ? तज्ज्ञांचा अहवाल कधी येणार आहे ? जो पर्यायी मार्ग सुचविलेला आहे त्यासाठी शासन काय आणि कधी उपाययोजना करणार आहे ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

ता. प्र. क्र. 30714 .....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आंबोली घाटामध्ये 2005 पर्यंत कॅच-ड्रेनची कामे बांधकाम विभाग दरवर्षी करीत होते. त्या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला जी जागा आहे ती वन विभागाची आहे. 2005 पासून वन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला वन विभागाच्या जागेमध्ये जाऊन काम करण्यास बंधन घातले होते. 30.7.2010 ते सप्टेंबर, 2011 या कालावधीमध्ये लॅन्ड स्लाईडच्या तीन घटना झाल्या. मागच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर माननीय मंत्री महोदय आणि मी तसेच सन्माननीय वने मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या बरोबर एक संयुक्त बैठक झाली. त्यामध्ये वन विभागाने आम्हाला कॅच-ड्रेनची कामे करण्यास परवानगी दिली होती. त्या वर्षी जवळपास 7 किलोमीटर लांबीमध्ये कॅच-ड्रेनचे काम केलेले आहे. आतापर्यंत जवळपास 2100 मि.मि. पाऊस पडल्यानंतर सुध्दा यावेळी त्या ठिकाणी एकदा काही दगड पडले होते. लॅन्ड स्लाईड झाले नाही. जे काही दगड पडले होते ते 15-20 मिनिटांमध्ये क्लिअर केले. त्या शिवाय आम्ही स्वित्झरलँडच्या एका कंपनीशी संपर्क केला आहे. त्यांनी सर्व्हे सुध्दा केलेला आहे. रॉक फॉल बॅरियर्स तसेच स्पायडर वेब म्हणून एक जाळी असते आणि आत ड्रील करुन त्यावर पकडून ठेवण्यासाठी नेट लावतात, त्याचा प्रस्ताव आहे. स्वित्झर्लंडच्या
कंपनीने सर्व्हे केलेला आहे. ते केल्यानंतर लॅन्ड स्लाईड झाले तरी दगड तिकडेच राहणार, ते खाली पडणार नाहीत. यासाठी हा प्रस्ताव आहे. त्याचा सर्व्हे झालेला आहे. त्यांचा प्रस्ताव आमच्यापर्यंत यावयाचा आहे. तो प्रस्ताव आल्यानंतर त्याची अंमलबजावणी निश्चितपणे करणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जीएसआयच्या सर्व्हेचा अहवाल केव्हा येणार असा दुसरा प्रश्न विचारला. आताच जूनअखेर तो अहवाल आलेला आहे. त्यामध्ये दीर्घकालीन आणि अल्पकालीन सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांची निश्चितपणे अंमलबजावणी करणार आहोत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आंबोली घाट आणि तो परिसर तसेच सर्व पश्चिम घाटाचा विषय निघालेला आहे. आंबोली घाटाच्या बाबतीत जी काही माहिती घ्यावयाची असेल ती शासनाने घ्यावी. ती माहिती घ्यावीच लागेल परंतु यावेळी सुध्दा कोकणामध्ये बऱ्यापैकी पाऊस

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30714 ..... श्री. भाई जगताप ....

पडलेला असला तरी कोकणात नेहमी जेवढा पाऊस पडतो तेवढा पडलेला नसताना सुध्दा त्या ठिकाणी दोन वेळा घाट बंद होता, ही वस्तुस्थिती आहे. हा प्रश्न नुसता तात्कालीक नाही. यामध्ये आपल्याला कायमस्वरुपी मार्ग काढावयास पाहिजे. कारण तो घाट दोन जिल्ह्यांना जोडणारा आणि दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. स्वित्झर्लंडचे इंजिनिअर्स असतील किंवा आणखी कोठले इंजिनिअर्स असतील पण आपल्या इंजिनिअर्सना येथील गोष्टी कळत नाहीत का ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30714.... श्री.भाई जगताप....

किंवा आपल्या लोकांचे टेक्निकल नॉलेज कमी दर्जाचे आहे काय ? कोकण रेल्वे हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यात आला, परंतु त्यामध्ये वारंवार अडचणी निर्माण होत आहेत. परंतु त्याच्यावरही मात केली जात आहे. या आंबोली घाटामध्ये वारंवार दरडी कोसळतात. या घाटाच्या रस्त्याला दरडी कोसळण्याच्या घटनांपासून कायमचे मुक्त करण्यासाठी शासनाकडे योजना आहे काय आणि स्वित्झर्लंडच्या कंपनीच्या अहवालावर कालबध्दरितीने अंमलबजावणी केली जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कोकण रेल्वे प्रकल्पासाठी स्पायडर वेबचा उपयोग केलेला आहे. त्या प्रमाणे या घाटात अनेक ठिकाणी स्पायडर वेब लावलेले आहेत. स्वित्झर्लंडच्या कंपनीचा सर्व्हे पूर्ण झालेला आहे, परंतु त्या कंपनीने शासनाला अहवाल सादर केलेला नाही. (अडथळा) त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर त्याची तातडीने कालबध्दरितीने अंमलबजावणी केली जाईल.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या मागे बसलेल्या सन्माननीय सदस्यांच्या कॉमेंटस्‌ला आपण उत्तर देऊ नये.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जोपर्यंत त्या कंपनीकडून सर्व्हेचा रिपोर्ट व या रस्त्याच्या कामाचे एस्टिमेट शासनाला सादर होत नाही येत नाही तोपर्यंत बजेटमध्ये तरतूद करता येत नाही. आंबोली घाटामध्ये हा एकमेव रस्ता आहे. या घाटातील पर्यायी रस्त्यासाठी भूसंपादन करावे लागेल. परंतु ती जागा वन विभागाच्या अंतर्गत येते. वन विभागाच्या अखत्यारितील भूसंपादनासाठी बराच अवधी लागणार आहे. या आंबोली घाटातील रस्त्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या कंपनीकडून अहवाल आल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी निश्चितपणे तरतूद केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी गेल्या अधिवेशनामध्ये रेडी-आंबोली, रेडी-कोल्हापूर व रेडी-बेळगांव या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याचे काम विचाराधीन आहे असे सांगितले होते. या रस्त्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30714...

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे. या प्रश्नाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा वेगळा प्रश्न नाही. या रस्त्याच्या कामाला मर्यादा आहेत. आंबोली घाटामध्ये कितीही वेळा काम केले तरी रस्त्यात दरडी कोसळतात. ते थांबणार नाही. कोकण रेल्वेच्या प्रकल्पात हा प्रयोग फेल गेलेला आहे. रेडी व जयगड ही बंदरे विकसित होत आहेत. त्या दृष्टीकोनातून या रस्त्याचे काम खाजगीकरणातून करण्याचे प्रस्तावित केले जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : रेडी-आंबोली या रस्त्याचे काम एमएसआरडीसीला दिलेले आहे. ते काम प्रगतीपथावर आहे. या रस्त्याचा सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतच्या प्रस्तावावर विचार केला जाणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : आंबोली हे ठिकाण पर्यटकांच्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे. या रस्त्याच्या कामाला आणखी विलंब होणार आहे. शासनाचा सर्वच कारभार राम भरोसे चालू शकत नाही. या रस्त्याला पर्यायी रस्ता तयार करण्यासाठी किती दिवसात शासन पावले उचलणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : स्वित्झर्लंडच्या कंपनीचे फक्त सर्व्हेचे काम पूर्ण झालेले आहे. त्यांच्याकडून शासनाला अहवाल सादर झालेला नाही. त्या कंपनीला एस्टिमेट सादर करावे लागणार आहे. या रस्त्याचे काम प्राधान्याने करण्याचे ठरलेले आहे. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर या रस्त्याचे काम तातडीने पूर्ण केले जाणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ 11:55

ता.प्र.क्र.30714....

श्री. राजन तेली : माननीय राज्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात एक बैठक लावली त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. विजयदुर्ग आणि रेडी ही दोन मोठी बंदरे कोकणामध्ये आहेत.सिंधुदुर्ग-कर्नाटक किंवा सिंधुदुर्ग-कोल्हापूर या मार्गावर तीन-चार घाट आहेत. कोकणातील या दोन बंदरामुळे या रस्त्यावरुन प्रचंड वाहतूक होणार आहे. तेव्हा हे घाटरस्ते चौपदरी नाही पण निदान दुपदरी करण्यासाठी राज्य शासन पावले उचलणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : या प्रश्नाच्या संदर्भात मी मागे देखील एक बैठक लावली होती. त्यामध्ये पर्यायी मार्ग काय काढता येईल यासंबंधी चर्चा झाली होती. या मार्गावरील बरीचशी जागा ही वनक्षेत्रामध्ये येते. वनाची जागा असेल तर त्यासाठी दिल्लीला पाठपुरावा करावा लागतो. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात पुन्हा एकदा बैठक लावलेली असून त्या बैठकीला वन विभागाच्या आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांना बोलावलेले आहे. या बैठकीत चर्चा करुन निश्चितच मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : आंबोली घाट हे पर्यटन स्थळ असले तरी कर्नाटक, गोवा आणि महाराष्ट्र अशा तीन राज्यांना जोडणारा हा घाटमार्ग आहे. या रस्त्यावरुन अवजड वाहनांची वाहतूकही मोठ्या प्रमाणावर होत असते, पर्यटन रहदारी देखील मोठ्या प्रमाणावर होत असते. घाटामध्ये दरडी कोसळत असल्यामुळे या घाटातून अवजड वाहनांची होणारी वाहतूक थांबविण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : गोवा आणि कर्नाटक राज्यांमध्ये जाणारा हा एकमेव रस्ता आहे. अवजड वाहनांसाठी हा रस्ता बंद केला तर ती वाहने त्या राज्यामध्ये कोठून जाणार असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा अवजड वाहनांसाठी पर्यायी मार्ग आहे का हे पाहून तसा तो असेल तर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चाळीसगाव येथील अवैध वाळू वाहतूक प्रतिबंधक पथकातील तहसीलदाराच्या वाहनाला वाळूमाफियांनी लावलेली आग**

**(२) * ३०३८१ श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.मोहन जोशी :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव येथील अवैध वाळू वाहतूक प्रतिबंधक पथकातील तहसीलदाराच्या वाहनाला वाळूमाफियांनी आग लावून त्यांच्यावर हल्ला केल्याची घटना दिनांक ३ मे, २०१२ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने आत्तापर्यंत या घटनेतील किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) अंशत: खरे आहे. वाहन जळाले आहे. मात्र ते कोणी जाळले याबाबत तपास लागलेला नाही. कोणालाही मारहाण करण्यात आलेली नाही. वाहनात झोपलेल्या वाहनचालकाच्या शर्टाला आगीचा झळ लागल्याने त्याच्या एका हातास व दुसऱ्या हाताच्या बोटांना भाजले आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर घटनेबाबत अज्ञात आरोपीविरूद्ध भाग-५, गु.र.क्र.५३/२०१२, भादंविक ३०७, ४४०, ३५३, ३३२ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा कलम ३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

श्री. जयप्रकाश छाजेड : मला वाटते सरकारला या प्रश्नाचे गांभीर्य समजलेले नाही. वस्तुस्थिती अशी आहे की या वाळू माफियांना सरकारी अधिकारी अडविण्यासाठी गेल्यानंतर त्यांच्या वाहनाला आग लावण्यात आलेली आहे. एखादा छोटा-मोठा गुन्हा झाला असेल, एखाद्याचा कुठे हात भाजला असेल तर अशा प्रकारचे छोट प्रश्न विचारण्यासाठी हे सभागृह नाही याची मला जाणीव आहे. सरकारी अधिका-यांच्या गाडीला मे महिन्यामध्ये आग लावण्यात आली, त्यामध्ये ड्रायव्हरचा हात भाजला. अद्याप पोलीस यंत्रणेला गुन्हेगार सापडलेला नाही. याचा अर्थ वाळू माफिया, महसूल विभाग आणि पोलीस हे एकत्रपणे काम करीत आहेत अशा प्रकारचा संदेश जनतेमध्ये जात आहे. मे महिन्यामध्ये घटना घडूनही अद्याप गुन्हेगार का सापडला नाही, तो कधी सापडेल, वाळू माफियांवर आतापर्यंत किती गुन्हे दाखल झालेले आहेत, त्यापैकी किती जणांवर कारवाई झालेली आहे, अवैध वाळू उत्खननासंबंधात आणि या वाळू माफियांवर नियंत्रण ठेवण्याच्या यसंदर्भात शासन नव्याने कडक कायदा करणार आहे काय ?

.... नंतर श्री. अजित....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30381...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलिसांनी ही घटना गांभीर्याने घेतलेली आहे. सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारला की, किती वाळू माफियांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सन 2011 मध्ये पोलीस आणि महसूल विभागाने 1088 छापे घातले त्यामध्ये 2315 जणांना अटक करुन त्यांच्याकडून 25 कोटी 84 लाख रुपयांचा माल जप्त केलेला आला. या वर्षी मे अखेरपर्यंत 318 ठिकाणी छापे टाकण्यात आले, त्यामध्ये 637 जणांना अटक करण्यात येऊन त्यांच्याकडून 3 कोटी 30 लाख रुपयांचा माल जप्त केलेला आला. सन 2008 मध्ये 189, 2009 मध्ये 371, 2010 मध्ये 759, 2011 मध्ये 1088 आणि 2012 मध्ये आतापर्यंत 318 छापे टाकण्यात आले. या आकडेवारी वरुन स्पष्ट होते की, पोलिसांना माहिती मिळाल्यावरुन त्यांनी छापे टाकले आहेत.

सभापती महोदय, या घटनेमध्ये तहसीलदारांची गाडी पेटविण्यात आली. मी आपणास या घटनेचा क्रम सांगतो. गस्त घालण्यासाठी एक पथक तयार करण्यात आले होते त्यामध्ये सर्कल अधिकारी आणि एक तलाठी आणि ड्रायव्हर यांचा समावेश आहे. सर्कल अधिकारी आणि तलाठी यांची गस्त झाल्यानंतर ते ग्रामपंचायतीमध्ये येऊन झोपले तर वाहनचालक वाहनामध्ये झोपला होता. बऱ्याच वेळा माणसे कंटाळून झोपी जातात त्यामुळे आग कशामुळे लागली ते कळू शकले नाही. वाहनचालकाने पहिला जबाब दिला त्यामध्ये "मी झोपेत असताना आग लागली, ही आग कशामुळे लागली हे सांगता येणार नाही, माझा कोणावरही संशय नाही." त्यानंतर तहसीलदारांची गाडी वाळूमाफियांनी जाळली अशा प्रकारच्या बातम्या आल्या व तशी चर्चाही झाली. त्यानंतर वाहनचालकाने दुसरा जबाब दिला की, "वाळू माफियाने गाडी जाळली." तेव्हा ही आग कशामुळे लागली याचा प्रथम तपास करणे आवश्यक आहे. या घटनेची चौकशी वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. आरोपीला तातडीने पकडण्यात येईल.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, राज्यामध्ये दुसऱ्यांदा अशा पध्दतीची घटना घडलेली आहे. यापूर्वी मालेगावच्या अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना जीवंत जाळल्याची घटना घडली आहे. माझा प्रश्न आहे की, अधिकारी अशा कारवाईसाठी जातात त्यावेळी त्यांना पोलीस संरक्षण देण्यात येईल काय, तसेच राज्यात अशाप्रकारच्या घटना घडू नयेत या दृष्टीने कारवाई करण्यात येईल काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30381...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, यापूर्वीच पोलिसांना तशा स्वरुपाच्या सूचना दिलेल्या आहेत. जर अधिकाऱ्यांना कुठे धाडी टाकायच्या असतील तर त्या बाबत पोलिसांना कळविल्यास त्यांना आवश्यक तो बंदोबस्त देण्यात येईल. त्या हद्दीतील पोलिसांना माहिती दिल्यामुळे माहिती लीक होते आणि धाडी अयशस्वी होतात अशी संबंधित विभागाला शंका असेल तर त्यांनी दुसऱ्या जिल्ह्यातील बंदोबस्त मागितला तर तसा बंदोबस्त देण्याच्या सूचना आहेत आणि तसा बंदोबस्त देण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, "वाहनचालक झोपलेला होता त्यामुळे आग कशी लागली हे त्याला सुध्दा माहीत नाही. वाहनचालकाच्या कोणावरही संशय नाही अशा प्रकारचा पहिला जबाब त्याने नोंदविला होता." मुळातच हा प्रकार संशयास्पद आहे. तहसीलदार धाडी घालायला गेले परंतु नंतर ते गाडीमध्ये नव्हते. तेव्हा प्रश्न असा उपस्थित होतो की, ते वाहन कोठे उभे करण्यात आले होते, ते वाहन जर सरकारी कंपाऊन्डमध्ये उभे करण्यात आले असेल तर तेथे बाहेरुन कोणी येऊन वाहनास आग लावेल काय ? ही घटना कशा पध्दतीने झाली, त्या संबंधातील कोणते परिस्थतीजन्य पुरावे गोळा करण्यात आले ? वाहनामध्ये तहसीलदार आहेत असे समजून वाळू माफियांनी वाहनास आग लावली असेल तर ते प्रकरण भयंकर आहे. तेव्हा आता ज्या पध्दतीने चौकशी सुरु आहे त्या पध्दतीमध्ये बदल करुन तसेच स्थानिक लोकांकडून माहिती घेऊन हा तपास अधिक परिपूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन पावले उचलण्यात येतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आग कशामुळे लागली, त्यामध्ये वाळू माफियांचा समावेश होता काय, तसेच या घटनेतील आरोपी कोण आहेत हे शोधण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तेव्हा या घटनेतील सत्य परिस्थिती आम्ही लवकर बाहेर आणू.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सदर घटनेची चौकशी करण्यात येईल काय या प्रश्नाचे उत्तर "होय"असे दिलेले आहे. माझा प्रश्न आहे की, या चौकशीत काय आढळून आले ? पुढे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "गुन्ह्याचा तपास सुरु आहे" माझा प्रश्न आहे की, या गुन्ह्याचा तपास किती दिवस सुरु राहणार आहे ? ..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ D/ पूर्वी श्री.शिगम.. 12:00

ता.प्र.क्र. 30381..

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, गाडी बाहेरुन नव्हे तर आतून पेटली होती असे चौकशीत आढळून आले. यामध्ये वाहनचालक भाजलेला आहे. सर्कल अधिकारी आणि तलाठी ग्रामपंचायतीमध्ये झोपले होते तर वाहनचालक वाहनामध्ये झोपला होता. ग्रामपंचायतीच्या बाहेर वाहन उभे करण्यात आले होते. सुरुवातीला वाहनचालकाने सांगितले की, त्याची कोणा विरुध्द तक्रार नाही. कोणावरही संशय नाही. त्यानंतर वाहनचालकाने दुसऱ्या जबाबामध्ये वाळू माफियावर संशय व्यक्त केलेला आहे. त्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये 2011 मध्ये फक्त दोन गुन्ह्यांची नोंद आहे. तेथे कोणालाही वाळू उपसण्याचा ठेका दिलेला नाही. तेव्हा या घटनेची चौकशी डिटेलमध्ये जाऊन करणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30181...

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, त्या गाडीला आग बाहेरुन लागली, आतून लागली ही बाब महत्वाची नाही. ती आग कोणामुळे व कशासाठी लावली हा यातील खरा महत्वाचा प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही या अनुषंगाने 25 कोटी रुपये वसूल केले. वाळू वाहतुकीचे काम सर्रासपणे चालू आहे. ही बाब स्थानिक पोलिसांनापूर्णपणे माहिती आहे. पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन संबधितांवर दंडात्मक करावाई सुध्दा केलेली आहे. याचा दुसरा अर्थ असा निघतो की, अशा प्रकारच्या अनेक घटना या राज्यात घडत आहेत. यापूर्वी जाळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यातून आपण अजूनपर्यंत कोणत्याही प्रकारचा बोध घेतलेला नाही असे स्पष्टपणे दिसून येते. या प्रकरणी स्थानिक पातळीवर चौकशी चालू आहे, परंतु त्या चौकशीतून काही बाहेर येत नसेल ही या घटनेची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल काय ? या घटने बाबत जे दोषी आढळून येतील त्यांना नॉन बेलेबल कलम लावण्याची कारवाई केली जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : हे प्रकरण एल.बी.सी.कडे देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या घटनेचा अतिशय गांभीर्याने तपास करण्यात येईल.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शिक्षण सेवक व ग्रामसेवक यांच्या प्रमाणेच कृषी सेवकांच्या**

**मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३) * ३१३४० डॉ.सुधीर तांबे , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कंत्राटी शिक्षण सेवक व ग्रामसेवकांच्या मानधनात दुपटीने वाढ केली असून त्याचप्रमाणे कृषी सेवकांच्या मानधनात वाढ झाली नसल्याने कृषी सेवकांमध्ये तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण सेवक व ग्रामसेवक यांच्या प्रमाणेच कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शिक्षण सेवक व ग्रामसेवक यांच्या प्रमाणेच कृषी सेवकांचे मानधन रु.२५००/- वरुन रु.६०००/- करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय दि. १९/०३/२०१२ रोजी निर्गमित केला आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कृषी सेवकांच्या मानधात वाढ करण्याबाबतच्या प्रश्नाबाबत माझा थोडासा सहभाग आहे. शिक्षण सेवकांच्या अशा विषयाच्या बाबतीत अडचणी निर्माण झाल्या होत्या, त्यावेळी शिक्षक सेवकांचे डेलिगेशन आले होते त्याच्या समवेत मी देखील उपलब्ध होतो. त्यानंतर शिक्षण सेवकांचा निर्णय शासनाने घेतला. तसे चांगला आणि ऐतिहासिक निर्णय झालेला आहे. ग्रामसेवक आणि शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ झाली, त्याबद्दल शासनाचे मोठया प्रमाणात अभिनंदन झाले. परंतु कृषी सेवकांच्या मानधात वाढ झाली नसल्यामुळे त्यांच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. उत्तरात म्हटले आहे की, "अशा प्रकारचे आदेश शासनाने निर्गमित केलेले आहत." त्यांच्या मानधनात वाढ झाली आहे यासंबंधी जे आदेश कधी निर्गमित केले आहेत, तसेच त्यांना मानधन कधी पासून लागू करण्यात आले आहे?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मंत्री मंडळाने दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे.

२...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : निर्णयाची अंमलबजावणी कधी करण्यात येणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, दिनांक १९.३.२०१२ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामुळे या बाबतची कार्यवाही सुरु झालेली आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शिक्षण सेवक व ग्रामसेवक यांना मानधन वाढविण्याचा निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी देखील सुरु झालेली आहे. शिक्षण सेवक आणि ग्रामसेवक यांना जेव्हापासून मानधन वाढ लागू केली आहे, तेव्हा पासून या कृषी सेवकांना मानधन वाढ देण्याबाबतचा निर्णय शासनाकडून घेतला जाईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : शिक्षक आणि ग्रामसेवक यांचा मानधन वाढीचा प्रस्ताव सुरुवातीपासूनचा होता. कृषी सेवकांचा प्रस्ताव मार्चमध्ये आला होता. दरम्यानच्या काळामध्ये ग्रामसेवक आणि शिक्षकांचा प्रस्ताव आला होता व त्यास मत्रिमंडळाने मान्यता दिली. त्यानंतर ताबडतोबीने कृषी सहाय्यकांचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत आला. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सदरहू बैठकीत दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून मानधन वाढीचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 12:10

ता.प्र.क्र. 31340.....

श्री. गुलाबराव देवकर...

सभापती महोदय, शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. ग्रामसेवक आणि शिक्षण सेवक यांना अगोदर का दिले आणि कृषी सहाय्यकांना का दिले नाही असे धोरणच नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय झाला त्याप्रमाणे 1 एप्रिल 2012 पासून कृषी सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय झाला आणि त्याप्रमाणे तो लागू केलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा असा निर्णय कृषी खात्याने घेतला त्याबद्दल मी प्रथमत: कृषीमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. अनेक संघटनांचे प्रश्न प्रलंबित आहेत त्यांचे निर्णय होत नाहीत. परंतु कृषी मंत्रालयाने अत्यंत धाडसी निर्णय घेऊन कृषी सेवकांना न्याय दिलेला आहे. 1 एप्रिल, 2012 पासून मानधनात वाढ करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत असे मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, प्रत्यक्षात कृषी सेवकांना ही मानधनाची रक्कम केव्हापासून मिळणार आहे ? वित्त विभागाची मान्यता आल्यानंतर अंमलबजावणी सुरु होईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, ग्रामसेवक आणि शिक्षण सेवक यांच्याप्रमाणेच कृषी सेवकांचे मानधन वाढवावे अशी सातत्याने होणारी मागणी लक्षात घेऊन अतिशय विचारपूर्वक निर्णय घेऊन 1 एप्रिल 2012 पासून निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर आदेश निर्गमित केले आणि प्रत्यक्षात मानधन देण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झालेली आहे. कार्यवाहीला सुरुवात झालेली आहे.मानधनाची रक्कम मिळाली नाही असे माननीय सदस्यांनी सांगितले तो त्यांचा गैरसमज आहे. कार्यवाही सुरु झालेली आहे. मंत्रिमंडळामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याबाबतही चर्चा झाली. परंतु याबाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता होती तो घेतलेला आहे. आता कृषी सेवकांच्या संघटनेचाही आक्षेप राहिलेला नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, कृषी सेवकांच्या संघटनेचा आक्षेप आहे. आक्षेप नाही असे म्हणून चालणार नाही.शिक्षण सेवकांना 1जानेवारी 2012 पासून निर्णय लागू केला. कृषी सेवकांच्या संघटनेची देखील मागणी 1 जानेवारी 2012 पासून मानधनात वाढ करावी अशी होती.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 31340....

श्री. भाई जगताप....

याबाबतीत निर्णय घेतला आहे याचे मी स्वागत करतो. परंतु निर्णय होऊन सुध्दा त्याची अंमलबजावणी झालेली नाही हे मी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. माझा उपप्रश्न असा आहे की, निर्णय कोणत्या तारखेपासून लागू करणार ? वित्त विभागाकडून मान्यता आल्यानंतर ज्या तारखेपासून निर्णय झाला त्या तारखेपासूनच्या थकबाकीसहित रक्कम कृषी सेवकांना देणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, निर्णय लागू केलेला आहे. अंमलबजावणीस सुरुवात झालेली आहे. 1 एप्रिल 2012 पासून मानधनात वाढ करण्याचा निर्णय झालेला आहे. शासनाने सर्वंकष विचार करुनच निर्णय घेतलेला आहे. अनेक दिवसापासून निर्णय घेण्याबाबतची शासनाची भूमिका होती ती शासनाने पूर्ण केलेली आहे. माननीय सदस्य श्री. फुंडकर आणि श्री. भाई जगताप यांनी शासनाचे अभिनंदन देखील केलेले आहे. आता निर्णयाच्या अंमलबजावणीस देखील सुरुवात झालेली आहे.

--------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 12:10

**कात्रज (जि.पुणे) येथील राजीव गांधी सर्पोद्यानासमोर उभ्या असलेल्या ट्रकमधून भेसळयुक्त गुटखा पकडल्याबाबत**

**(४) * ३०४८३ श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्रीमती दिप्ती चवधरी , डॉ.सुधीर तांबे , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.जयवंतराव जाधव , ॲड. उषाताई दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज (जि.पुणे) येथील राजीव गांधी सर्पोद्यानासमोर उभ्या असलेल्या ट्रकमधून गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने दिनांक २० एप्रिल, २०१२ रोजी सुमारे २५ लाख किंमतीचा भेसळयुक्त गुटखा जप्त केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय, तथापि सदर प्रकरणात १५,०५,४००/- रु. किंमतीचा भेसळयुक्त गुटखा पकडण्यात आला आहे.
(२) व (३) दि.१९/०४/२०१२ रोजी कात्रज सर्पोद्यानाचे समोर ट्रक क्रमांक एमएच-११, एम-३९८० मध्ये मानवी जीवितास अपायकारक व भेसळयुक्त असलेला १५,०५,४००/- रुपये किंमतीचा 'यात्री व राज कोल्हापूरी' गुटखा मिळून आला याबाबत ट्रक चालक, राजधानी फ्रुड प्रा.लि.वलेवडे, ता.करवीर, जि.कोल्हापूर' या कंपनीचे मालक व व्यवस्थापक तसेच कृष्णा टोबॅको शिंदगाव जि.नाशिक यांचे मालक व व्यवस्थापक यांचेविरुध्द भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं.५९/२०१२, भा.दं.वि. कलम २७२, २७३, ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्ह्यामध्ये ट्रक चालक व इतर १ आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यात जप्त केलेले गुटख्याची पाकीटे तपासणीकरीता उप संचालक, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविली असता, त्यांनी सदरची गुटख्याची पाकीटे ही मानवी शरीरास अपायकारक असलेबाबत अहवाल दिलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यामध्ये गुटखाबंदीचा अतिशय महत्वाचा असा निर्णय घेण्यात आलेला आहे. साहजिकच आता यापुढील काळात पोलीस खात्याला या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी अधिक सक्षमतेने काम करण्याची गरज निर्माण होणार आहे. कारण गुटख्याचा बेकायदेशीर व्यवहार मोठया प्रमाणावर वाढणार आहे. हे विचारात घेता शासनाने गुटख्याचा बेकायदेशीर व्यवहार रोखण्यासाठी काही उपाययोजना केल्या आहेत काय ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री. भोगले

ता.प्र.क्र.30483.......

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गुटखा बंदीचा विषय अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अखत्यारितील आहे. राज्यामध्ये एखाद्या कायद्याचे उल्लंघन झाले किंवा काही अडचण निर्माण झाली तर गृह खात्याकडून मदतीची भूमिका घेतली जाते. गुटखा बंदी हा गृह खात्याच्या जबाबदारीचा प्रश्न नाही. अन्न व औषध प्रशासन विभागाने ही जबाबदारी स्वीकारली आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, जप्त केलेला गुटखा भेसळयुक्त होता हे सिध्द झाले आहे. भेसळयुक्त गुटखा निर्मिती् करणाऱ्या कंपनीला सील ठोकण्यात आले आहे काय? फक्त एकच ट्रक माल पकडण्यात आला आहे. या कंपनीकडून किती प्रमाणात बनावट गुटख्याची निर्मिती करण्यात आली व त्यापैकी किती मालाचे वितरण करण्यात आले? त्या संदर्भात शासनाने काही कारवाई केली आहे काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कुठेही गुटखा तयार करणारी कंपनी अस्तित्वात नाही. वितरणासाठी गुटखा आणून तो राज्यातील गोडावूनमध्ये ठेवण्यात येतो व आवश्यकतेनुसार त्याची विक्री केली जाते. या गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट असल्याचे सिध्द झाल्यामुळे तो साठा जप्त केला आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये लेखापरिक्षण अहवालात आढळून आलेला भ्रष्टाचार**

**(५) * ३०१८६ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नुकत्याच झालेल्या सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये बाजार समितीने अनेक प्रकरणामध्ये अनियमितता केल्याचे माहे मे, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही लोकांचे हितसंबंध जपण्यासाठी बाजार समितीचे लाखो रुपयांचे नुकसान केले असल्याबाबतचा आरोप लेखापरिक्षकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपांवर तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : (१) व (२) होय.
(३) व (४) बाजार समितीचे तत्कालीन सचिव दिनांक ३० जून, २०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले असून बाजार समितीने याच कारणावरून त्यांचे सेवानिवृत्तीविषयक लाभाची प्रदाने त्यांना केलेली नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये शासनाने म्हटले आहे की, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करता येत नाही. याच सचिवांच्या कारकीर्दीमध्ये मयूर ॲग्रो प्रॉडक्ट या कंपनीने कृषी उत्पन्न बाजार समितीला बाजार फी संदर्भात धनादेश दिला होता, तो धनादेश कंपनीच्या खात्यात पैसे नसल्यामुळे वटला नाही हे खरे आहे काय? ही बाब समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या निदर्शनास न आणता किंवा कलम १०८ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल न करता धनादेश स्वत:जवळ ठेवून सचिव यांनी अनेक दिवसानंतर बाजार फी रोख स्वरुपात जमा करुन घेतली हे खरे आहे काय?

खामगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत १३ जिनिंग व प्रेसिंग संस्थांकडून सचिवांनी बाजार फी वसूल केली नाही, कारण त्या संस्था चालकांचे बाजार समितीच्या संचालकांशी संबंध जुळलेले होते. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे ऑडिट अहवालामध्ये नमूद केले आहे. ऑडिट अहवालामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात कोणकोणते दोष नमूद केले आहेत व बाजार समितीला आर्थिक तोटा झाल्याबद्दल कोणती कारवाई करण्यात आली?

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३०१८६.......

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : खामगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचा सन २०१०-११ चा विशेष लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध झाला आहे. त्यामध्ये सर्वसाधारण त्रुटी नमूद केलेल्या आहेत. रजिस्टर न ठेवणे, दप्तर तपासणीबाबत किरकोळ त्रुटी असणे या बाबी निदर्शनास आणल्या आहेत.

माननीय सदस्यांनी बाजार फी संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे. ऑडिट अहवालामध्ये बाजार समितीला ३.१९ लाख रुपये व्याजाच्या रक्कमेचे नुकसान सहन करावे लागल्याचा उल्लेख केला आहे. धनादेश बँकेत उशिरा भरणे, उशिराने बँकेत रोख रक्कम जमा करणे, त्यातून व्यापाऱ्यांना सवलत मिळणे असे प्रकार त्या सचिवांच्या स्तरावर झालेले आहेत. मुख्यत: प्रशासकीय अधिकारी म्हणून झालेल्या नुकसानीला सचिव जबाबदार आहेत. ते निवृत्त झालेले असले तरी कृषी उत्पन्न बाजार समितीकडून त्यांना जे आर्थिक लाभ द्यायचे आहेत ते थांबविण्यात आले आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30136........ श्री. राधाकृष्ण विखे-पाटील.......

त्यामुळे ही संपूर्ण रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव जरी निवृत्त झाले असले तरी ही वसुली करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार यात जी अनियमितता झालेली आहे तसे लेखा परीक्षण अहवालात दिसून येत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माझ्याकडे लेखा परीक्षणाची प्रत आहे. त्यात म्हटले आहे की, खरेदीदाराकडे थकित बाजार फी व सुपरव्हिजनच्या फीची वसुली करण्याची कारवाई न करणे, रेकॉर्ड सादर न करणे, नियमबाह्य बिलींग, बाजार फी थकीत असताना परवाने नूतनीकरण करणे असे काही आक्षेप आहेत. यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. हे सर्व आक्षेप लक्षात घेता या प्रकरणाची फेरचौकशी करुन दोषी असणाऱ्यावर कारवाई करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : शासनाची भूमिका कोणालाही पाठीशी घालण्याची नसून याबाबतचे कम्प्लायन्स रिपोर्ट आपण मागविलेले आहेत. ते प्राप्त झाल्यानंतर जर त्यात कोणी दोषी आढळून आले असल्याचे दिसून आले तर फेर चौकशी सुध्दा करण्यात येईल.

--------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले....... 12:20

**बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचे संचालक मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी केलेला गैरव्यवहार**

**(6) *30851श्रीमती अलका देसाई, श्री.एम.एम.शेख, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजन तेली, श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) मुंबईचे पोलीस आयुक्त पदसिद्ध अध्यक्ष असलेल्या बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचे संचालक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री.वंजारी यांनी पोलीस दलाबाहेरील लोकांना संस्थेचे सदस्य करून त्यांना प्रत्येकी 7 लाखापर्यंतची कर्जे मंजूर करून तसेच संस्थेच्या अनेक नियमांचे उल्लंघन करून गैरव्यवहार केल्याचे माहे मे, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

2) असल्यास, श्री.वंजारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागात गुन्हा दाखल असून संस्थेच्या विद्यमान पॅनलमधील अनेक सदस्यांवर गुन्हे दाखल केले आहे व काही निलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

3) तसेच उक्त पतसंस्था डबघाईला गेली आहे, हे ही खरे आहे काय,

4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्अनुषंगाने श्री.वंजारी व त्यांचे साथीदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उपरोक्त सहकारी संस्था बंद होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (1) नाही.

(2) अप्पर पोलीस आयुक्त, ॲन्टीकरप्शन ब्युरो मुंबई यांनी कळविल्याप्रमाणे बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचे संचालक मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी केलेला गैरव्यवहार संदर्भाने कोणताही गुन्हा दाखल नाही. संस्थेच्या विद्यमान समिती सदस्यांपैकी श्री.दिपक विठोबा घोसाळकर यांना एफ.आय.आर. क्रमांक 223/2007 मध्ये संस्थेतील गैरव्यवहार प्रकरणी अटक करण्यात आली आहे.

(3) नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भाई जगताप : महोदय, या प्रश्नाला शासनाने जे उत्तर दिले आहे त्याची पडताळणी मी स्वत: प्रत्यक्ष जाऊन व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून केलेली आहे व खात्री करुन घेतली आहे. म्हणून मी सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक असल्याने माझे समाधान झाले आहे. परंतु एक गोष्ट आहे की, ज्या एका सदस्याच्या बाबतीत एफआयआर दाखल झाला आहे त्याबाबतची माहिती मिळाली नाही. इतर बाबतीत मी स्वत: खात्री केली आहे.

--------

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गडचिरोली जिल्ह्यातील आत्मसमर्पित माओवाद्यांचे त्वरित पुनर्वसन करण्याबाबत**

**(7) *30633 श्री.दिवाकर रावते** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) गडचिरोली जिल्ह्यातील आत्मसमर्पित झालेल्या माओवाद्यांचे पुनर्वसन राज्य शासनाने न केल्यामुळे सुमारे 12 आत्मसमर्पित पुन्हा माओवादी चळवळीत परत जाण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, 2012 च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने आत्मसमर्पित माओवाद्यांचे त्वरित पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.
(2) दिनांक 29/08/2005 पासून आजतागायत 365 नक्षलवाद्यांनी आत्मसर्पण केले आहे. त्यापैकी 359 नक्षलवाद्यांना केंद्र व राज्य शासनाच्या निर्णयानुसार धनादेशाद्वारे बक्षिसांची रक्कम प्रदान करण्यात आली आहे. उर्वरित 6 सदस्यांना बक्षिसांची रक्कम देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आत्मसमर्पितांच्या घरासाठी भुखंड, घरकूल, स्वयंरोजगार मंजूरीबाबत 277 प्रकरणे प्रस्तावित असून त्यापैकी 148 प्रस्ताव मंजूर झाले आहेत. आत्मसमर्पित सदस्यांना सुरक्षेच्या दृष्टीने महसूल विभागाच्या वतीने गडचिरोली जिल्हा मुख्यालयाजवळ 5.53 हेक्टर जमीन घरकुलासाठी निश्चित करण्यात आली आहे. 22 सदस्यांना स्वयंरोजगारासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्रातून व खाजगी प्रशिक्षण केंद्रातून ड्रायव्हींग, टेलरिंग, इलेक्ट्रिशियन, गवंडी कामे व इतर मुद्यांवर प्रशिक्षण देण्यात आले आहे. 25 पेक्षा अधिक आत्मसमर्पितांना विशेष पोलीस अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. काही सदस्य शेती करीत आहेत.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा प्रश्न शासनाने अडवणूक करणे अथवा कोंडी करण्यासंबंधीचा देखील नाही. परंतु नक्षलवाद्यांबाबत सन्मान व सहानुभूती आणि त्यांच्या समर्पणाबाबत खात्री करुन विचारलेला आहे. एकूण 365 नक्षलवादी आत्मसमर्पित झाले व त्यानंतर त्यांचे फक्त 148 प्रस्तावच मंजूर झालेले आहेत. उर्वरित प्रस्ताव मंजूर करण्यासाठी दिरंगाई होत असते. दोन दोन महिने प्रस्ताव मंजूर झाले तर नक्षलवाद्यांनाही वाटेल की, आपले पुनर्वसन हे सरकार तत्काळ करीत आहे. परंतु शासकीय यंत्रणेच्या दिरंगाईच्या धोरणामुळे असेच दिरंगाईने प्रस्ताव मंजूर झाले तर नक्षलवादी पुन्हा माओवादी संघटनेत सामील होऊन नक्षलवाद कमी होण्याऐवजी पुन्हा बोकाळेल यात शंका नाही, म्हणून अशी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे. आतापर्यंत 259 माओवादी संघटनेच्या लोकांनी पोलिसांकडे आत्मसमर्पण केले असून

....4



PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले....... 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30633.......                                        श्री. दिवाकर रावते .........

त्यातील 200 लोकांचे पुनर्वसन अद्यापही झालेले नाही, हे खरे आहे काय ?  तसेच नक्षलवाद्यांचे पुनर्वसन दिलेल्या मुदतीत होत नसेल तर त्यांना पुन्हा मुदतवाढ दिली हे खरे आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, अमुक तारखेपर्यंत शरणांगती पत्करावी आणि मुख्य प्रवाहात सामील व्हावे यासाठी आपण मुदतवाढ देत असतो. पण त्याचबरोबर या नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करु नये म्हणून त्यांच्या संघटना सुध्दा दक्षता घेत असतात व त्यांनी इकडे येऊ नये यासाठी प्रयत्न करीत असतात.  त्यासाठी ही मुदतवाढ दिलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 30633** ......

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, नक्षलवादी शरण आल्यानंतर त्यांना दुसऱ्या बाजूने धोका निर्माण होत असतो ही वस्तुस्थिती असून त्यांचे जर आपण पुनर्वसन केले नाही तर त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होतो तसेच त्यांनी जगायचे कसे हे प्रश्न देखील निर्माण होत असतात. या प्रश्नाच्या संदर्भात मी सातत्याने आढावा घेत असतो. केंद्र सरकार व राज्य सरकार कडून त्यांना जी काही देय अनुदाने दिली जात असतात ती वेळेत दिली जात आहेत. परंतु घरकुल किंवा बाकीच्या गोष्टी देतांना थोडा विलंब होत असतो. घरकुलाच्या संदर्भात गडचिरोलीमध्ये जागेच्या अडचणी येत आहेत. या ठिकाणच्या बहुतेक जागा वन विभागाकडे असतात व वन विभागाकडून जागा ताब्यात घेण्यासाठी वेळ लागत असतो. त्यामुळे या लोकांची फक्त घराचीच समस्या वेळेत सोडविता येत नाही. परंतु त्यांना जी काही मदत दिली जात असते ती वेळेत दिली जात असते.

या लोकांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यासाठी ट्रेनिंग फॅसिलीटी निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या लोकांना ट्रेनिंग देऊन त्यांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त केले जात आहे. या दोन तीन महिन्यात जे 12 नक्षलवादी शरण आलेले आहेत त्यांना अजून सर्व मदत द्यावयाची राहिलेली आहे. परंतु या महिन्या भराच्या कालावधीत शरण आलेल्या नक्षलवाद्यांना सर्व मदत दिली जाईल व तीन महिन्याचा कालबध्द कार्यक्रम आखून या लोकांना राहण्यासाठी जी घरे द्यावयाची आहेत त्यासंदर्भातील प्रस्ताव बऱ्याच काळापासून प्रलंबित आहेत. त्या प्रस्तावांच्या संदर्भात सुध्दा तातडीने कार्यवाही केली जाईल. या शरण आलेल्या नक्षलवाद्यांना भूखंड तसेच ज्या काही देय बाबी आहेत त्या येत्या तीन महिन्याच्या कालबध्द कार्यक्रमात देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माओवाद्यांचे आत्म समर्पण हे नक्षलवाद्याच्या संदर्भात योग्य उत्तर आहे असे मला वाटते. बरेचसे नक्षलवादी, माओवादी हे डावे विचारसरणीचे असून ते हिंसक पध्दतीने आंदोलन करीत असतात व दिल्ली,जेएनयुएम,मुंबई विद्यापीठात शिकणारे उच्च विभूषीत लोक हैद्राबाद, बंगलोर अशा ठिकाणच्या केंद्रातून आंदोलने ऑपरेट करीत असतात. परंतु हे लोक जेव्हा हिंसक कारवाईतून बाहेर पडतात त्यावेळेला ते रिसर्चमध्ये काम करीत असतात ही वस्तुस्थिती आहे. बँक असल्याप्रमाणे नक्षलवाद्यांचा किंवा माओवाद्यांचा पुरवठा उच्च

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 30633** ......

श्री. आर.आर.पाटील ....

विभूषित केंद्रामधून पुरवला जात असतो. आमच्या माहिती प्रमाणे हैद्राबाद व आंध्रप्रदेशाच्या पोलिसांनी त्या ठिकाणच्या मोठया शहरांमध्ये गुप्तचर यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. आपल्या राज्याने देखील मोठया शहरांशी नेटवर्कींग करुन आत्मसमर्पणाला चालना देण्यासाठी उच्च विभूषित लोकांमध्ये काही लोक "फ्रेन्ड्स ऑफ पोलीस" म्हणून शांततामय मार्गाचा प्रचार करतील यासाठी शासन मोहीम हाती घेणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने अलीकडच्या काळात शहरी भागातील नक्षलसमर्थक सक्रीय लोकांना तसेच नेत्यांना अटक केलेली आहे. मी या विषयाच्या संदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, बंदुका घेऊन लढणारे स्थानिक लोक सैन्य म्हणून काम करीत असतात परंतु यांचे जे कोणी लिडर असतात ते जंगलात नाही तर शहरामध्ये चैनीचे जीवन जगत असतात. तोडया करण्याचे काम शहरात केले जाते. एकेकाळी त्या क्षेत्राचा विकास होत नाही म्हणून सुरु झालेली चळवळ आता तशी राहिलेली नाही. आज ही चळवळ सुध्दा धंदेवाईक बनली आहे ही वस्तुस्थिती आहे. नक्षलवाद्यांचे जे म्होरके शहरी भागात राहत आहेत त्यातील काही लोकांना पोलिसांनी अटक केलेली आहे. शहरी भागातील नक्षली समर्थकांवर पोलिसांचे अत्यंत बारकाईने लक्ष असून यासंदर्भात आपल्या यंत्रणा सतर्क आहेत एवढेच मी या प्रश्नाच्या संदर्भात सांगू इच्छितो.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणातील पर्यटन विकासासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत**

**(८) * ३०७७६ श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील पर्यटन विकासासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत व कृषी पर्यटनासाठी विशेष योजना आखण्यात यावी अशी मागणी कोकण भूमी प्रतिष्ठान यांनी मा.मंत्री पर्यटन यांच्याकडे माहे एप्रिल, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने कोकणातील पर्यटन विकासासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. छगन भुजबळ यांच्या करिता** : (१) कृषि ग्रामीण पर्यटनाबाबत निश्चित धोरण जाहिर करण्याबाबत कोकणभूमी कृषि पर्यटन सहकारी संस्था यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) कोकण रिव्हएरा सर्किट १ अंतर्गत विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व जयगड या किल्ल्यांना केंद्र शासनाने रु. ५.०२ कोटी मंजूर केले असून जेट्टी सुधारणा, निवास व्यवस्था, पोहोच रस्ते इ. कामे पूर्ण केली आहेत. कोकण रिव्हएरा सर्किट २ व ३ मध्ये रु. ११.३२ कोटी मंजूर केले असून यामधून धामापूर, उभादांडा, अक्षी-नागाव व दिवे आगार, येथे रॉयल ट्रेड, आंबोली येथे पर्यटक निवास इ. कामे करण्यात आली आहेत. तसेच मांडवी बंदर येथे पर्यटक सुविधा, गणपती-पुळे व वेळणेश्वर येथे कोकणी हट्स, तारकर्ली येथे बोट हाऊस इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच माथेरान येथे वारसा वास्तुचे जतन, भूरेखांकन इ. साठी ३.६१ कोटी महामंडळास केंद्र शासनकडून प्राप्त झाले आहेत. कोकण पॅकेज अंतर्गत ३.६० कोटी वितरित केले असून बोटींग सुविधा, जलक्रीडा, उपहारगृह इ. सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. सागरी किनारा विकासासाठी १२ व्या वित्त आयोगांतर्गत रु. २२५.०० कोटी मंजूर करण्यात आले असून कोकणात विविध ठिकाणी पर्यटकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. तसेच महाभ्रमण व न्याहारी निवास योजना कोकणात राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी एकच स्पेसिफिक प्रश्न विचारणार असून अर्धा मिनिट प्रश्न डेव्हलप करण्यासाठी घेणार आहे. प्रत्येक अधिवेशनात पर्यटनाच्या संदर्भात कोकणातील आमदार प्रश्न उपस्थित करीत असतात. पर्यटन विभागाने कोकण पर्यटनाच्या संदर्भात आमुलाग्र बदल केलेला आहे हे आमच्या लक्षात आलेले आहे. नुकतेच पर्यटन विभागाचे काही अधिकारी परदेशात गेले होते. त्यामध्ये पर्यटन सचिव, मॅनिजिंग डायरेक्टर, उप सचिव हे पर्यटन विभागाच्या माध्यमातून परदेशात गेले होते. त्यावेळी परदेशी पर्यटकांनी अशी ऑफर केली की, आम्ही ज्या वेळेस गोव्यामध्ये पर्यटनाला येऊ त्यावेळेस सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यटनासाठी निश्चितपणे येऊ.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ D/ KTG/ ST/ जुन्नरे.. 12:30

ता.प्र.क्र.30776

श्री.सुभाष चव्हाण...

15 हजार हेक्टरमध्ये सी-वर्ल्ड येत आहे. देशाचे नव्हे तर ते जगाचे स्वप्न आहे. सात महासागराची प्रतिकृती आहे. आपण काय काय आणत आहोत हे समजले पाहिजे. त्यामुळे माझा निधी संबंधी स्पेसिफिक प्रश्न आहे. शासन कोकण पर्यटन प्राधिकरणाची स्थापना करून पर्यटनाच्या सर्व कामासाठी स्वतंत्र पॅकेज देण्याची व्यवस्था करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेवर निश्चितपणे विचार करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोकणातील पर्यटन विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधीचा प्रश्न सभागृहात अनेक वेळा उपस्थित करण्यात आला आहे. शासनाने 5.02 कोटी रूपये मंजूर केले आहे असे आपण लेखी उत्तरात म्हटले आहे. सदर निधी वर्ग झाला आहे काय ? लेखी उत्तरामध्ये तारकर्लीचा उल्लेख करण्यात आला आहे. तेथे आपण गेला आहात किंवा नाही हे मला माहीत नाही. आपण जे काही नमूद केले आहे तशा प्रकारच्या गोष्टी तारकर्ली येथे उपलब्ध नाहीत, हे मला आवर्जून सांगावेसे वाटते. 3.61 कोटी रूपये महामंडळास केंद्र शासनाकडून प्राप्त झ ाले आहेत. याचा विनियोग योग्य प्रकारे होत आहे काय ? टप्प्याटप्प्याने पैसे येणार आहेत. ते येत आहेत काय व ते कामांवर खर्च होत आहेत काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, कोकण रिव्हेएर सर्किट 1 अंतर्गत रूपये 5 कोटी रूपये आले होते. ते खर्च झाले आहेत. रिव्हेएरा सर्किट 2 अंतर्गत रूपये 6.85 कोटी आले होते. त्यापैकी आता पर्यंत रूपये 5.5 कोटी खर्च झाले आहेत. रिव्हेएरा सर्किट 3 अंतर्गत रूपये 5.94 कोटी आले होते. त्यापैकी रूपये 5.58 लाख आता पर्यंत खर्च करण्यात आलेले आहेत. तारकर्ली येथे बाथरूम्स, पाणी पुरवठा व जेट्टी दुरूस्तीची कामे होती. जमीन उपलब्ध नसल्यामुळे काही कामे रद्द झालेली आहेत. फक्त बोट हाऊसचे काम झालेले आहे. बाराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून रूपये 225.00 कोटी रूपये मंजूर करण्यात आले असून 182 कोटी रूपये जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. जिल्हाधिकारी आपल्या स्तरावर काम करीत आहेत. 85 कामे आयडेंटीफाय केलेली आहेत. त्यापैकी 43 कामे प्रगतिपथावर आहेत. 3 कामे पूर्ण झालेली आहेत. 19 कामे सीआरझेडमध्ये येत असल्यामुळे, जमीन उपलब्ध नसल्यामुळे रखडलेली आहेत. ..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30776....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कोकणातील पर्यटनाचा विकास करण्यासंबंधी फार मोठी लिस्ट मंत्रिमहोदयांनी येथे सांगितली आहे. आपण एवढी प्रगती केली असेल तर पर्यटनामधून महाराष्ट्राच्या तिजोरीमध्ये फक्त कोकणाच्या माध्यमातून किती उत्पन्न मिळाले आहे, याची माहिती द्यावी. मालवण येथे आंग्रे बंदराच्या जवळपास बेट असल्या संबंधीची माहिती सारंग-कुलकर्णी यांनी दिली आहे. त्यासंबंधात योजना तयार करण्याबाबत शासनाने काही काम हाती घेतले आहे. त्याबाबत आपण कुठ पर्यंत पुढे गेलो आहोत. ही योजना आपण साकारणार आहात काय किंवा शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न हा मूळ प्रश्नाशी संबंधित नाही.

**सभापती** : माननीय राज्यमंत्री महोदय, आपल्या दृष्टीने वेगळा प्रश्न असू शकेल. त्यामुळे या संबंधातील माहिती आपणास पटलावर ठेवण्यास काहीही हरकत नाही.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनासंबंधी सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. अलीकडच्या काळात शासनाकडून पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्न होत आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30776 . . . .

श्री.राजन तेली . . ..

परंतु माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, आपण उत्तरामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथील किल्ल्यांच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. या सदनामध्ये गेल्या सहा वर्षापासून सिंधुदुर्ग किल्ला आणि विजयदूर्ग किल्ला याबाबत सातत्याने चर्चा होते यासाठी केंद्र शासनाकडून देण्यात येणारा निधी वर्ग झाला आहे. परंतु आपल्याला तेथे काम करण्यास मिळत नाही. राज्यामध्ये ऑर्कीऑलॉजी डिपार्टमेंट आहे. या जिल्ह्यातील किल्ले राज्य शासनाने ताब्यात घेऊन पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करील काय असा माझा पहिला प्रश्न आहे.तसेच सन्माननीय सदस्यांनी आंग्रे बंदराच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे.त्यावेळी आंग्रे बंदर शोधून काढून ते पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विकसित करावे म्हणून यासाठी पाच वर्षापूर्वी अर्थसंकल्पामध्ये पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे एकंदरीत पर्यटनाचा जो आराखडा आहे त्याबाबतीत ठोस उपाययोजना करणार आहात काय ?

सभापती महोदय, तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून गेल्या सहा वर्षा पासून आपल्याला निधी मिळतो. पण दुर्दैवाने आपण ते खर्च करु शकलो नाही. म्हणून 12 व्या वित्त आयोगाचे पैसे खर्च करण्यासाठी जे नियोजन करण्यात आलेले आहे ते सगळे पैसे किती दिवसामध्ये खर्च करण्यात येणार आहेत आणि त्या दृष्टीने काही उपाययोजना तयार केलेली आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, याठिकाणी पहिला प्रश्न किल्ल्यांच्या बाबतीत विचारण्यात आला होता आणि ही बाब आर्कीऑलॉजीकल डिपार्टमेंट ऑफ इंडिया यांच्या ताब्यात आहे.यापूर्वी देखील सदरहू विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, त्यावेळी आपण ए.एस.आय.ला विनंती केली होती की,राज्यातील काही किल्ले राज्य शासनाच्या ताब्यात देण्यात यावेत. जेणेकरुन त्यांची देखभाल, दुरुस्ती किंवा विकासाची जी कामे आहेत, ती आम्ही स्वत:करु.पण ए.एस.आय.ने ते अमान्य केले होते.त्यामुळे ते सदरहू किल्ले आपल्याकडे हस्तांतरीत करीत नाहीत.त्यामुळे त्यांच्या देखभाल, दुरुस्ती आणि विकासाची कामे करणे शक्य होत नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे, त्याबाबतीत मी माहिती घेऊन ती पटलावर ठेवतो.

. . . .डब्ल्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे मंदिर असून त्याठिकाणी देखभाल दुरुस्तीसाठी सभापती महोदयांनी देखील शासनाला निधी देण्याबाबत सातत्याने सांगितलेले आहे.मात्र त्यासाठी पुरातत्व विभाग मंजुरी देत नाही असे सांगण्यात येते. पण सिंधुदुर्ग किल्ला उत्सव समितीला किल्ल्याच्या तटाची दुरुस्ती करण्यासाठी पुरातत्व विभागाने परवानगी दिली. पुरातत्व विभाग एका संस्थेला परवानगी देऊ शकते आणि शासनाला मात्र दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देत नाही हा दुजाभाव आहे.त्या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे मंदिर आहे.या मंदिराची दुरुस्ती व डागडूजी करण्यासाठी आपण तातडीने उपाययोजना करणार आहात काय ? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, 9 व 10 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या ठिकाणी 40 लाख रुपये खर्च करुन तरंगती जे.टी.तयार केली होती. पण ती यावर्षी दिसत नाही, ती कुठे गेली याचा शोध घेणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी जो दुसरा प्रश्न विचारलेला आहे, त्यासंबंधात आता माझ्याकडे माहिती नाही. परंतु याबाबत माहिती घेऊन ती उद्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. माझ्याकडे सदरहू प्रश्नाचे स्पेसिफीक उत्तर आज नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महादेय, यासंबंधात पर्यावरणाचे कारण सांगून सरकारला परवानगी दिली जात नाही पण खाजगी संस्थांना परवानगी दिली जाते. याचा अर्थ सरकारचे पर्यावरण खाते याबाबतीत काही करणार नाही अशी त्यांना खात्री वाटते काय? हा गंभीर विषय आहे.

**सभापती** : याबाबतीत सन्माननीय राज्यमंत्री योग्य ती माहिती घेतील. ज्या संस्थेकडे किंवा ज्या विभागाकडे हा भाग आहे त्यांच्याकडेही या बाबत शासनाने चौकशी करावी. जर एखाद्या खाजगी संस्थेला परवानगी मिळत असेल आणि राज्य शासनाला मिळत नसेल तर ही गोष्ट बरोबर नाही. याबाबतीत माहिती घेण्यात यावी.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सविस्तर सांगितले आहे की, कोकण रिव्हएरा सर्कीट 1 अंतर्गत विजयदुर्ग, सिंधुदुर्ग व जयगड या किल्ल्यांना केंद्र शासनाने रु. 5.02 कोटी मंजूर केले आहेत. तसेच पुढे असे म्हटलेले आहे की,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण . . . .

सागरी किनारा विकासासाठी 12 व्या वित्त आयोगांतर्गत रु.225.00 कोटी मंजूर करण्यात आले असून कोकणात विविध ठिकाणी पर्यटकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत." माझा प्रश्न असा आहे की, मंजूर करण्यात आलेला निधी व प्रत्यक्षात मिळणाऱ्या सोयी-सुविधा यामध्ये नेहमीच खूप मोठी तफावत असते. तसेच जो निधी मंजूर करण्यात येतो, तो प्रत्यक्षात त्याठिकाणी सोयी-सुविधा देण्यासाठी कधीच खर्च केला जात नाही. त्यामुळे सदरहू निधीच्या बाबतीत कशा प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे आणि त्यातून कोणत्या सोयी-सुविधा मिळणार आहेत यादृष्टीने आपण कधीतरी याचा ताळमेळ घालणार आहोत काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, 12 व्या वित्त आयोगाच्या कामा मध्ये विलंब झालेला आहे. नंतर सन्माननीय पर्यटन मंत्री महोदयांनी या सगळ्या कामांचे अधिकार कलेक्टर यांच्याकडे दिले होते.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : खात्याचे जे कॅबिनेट मंत्री असतात त्यांच्या पातळीवर चर्चा होत असते.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय. जिल्हाधिकाऱ्यांना सर्व अधिकार दिले होते. त्यानंतर विलंब झाला म्हणून सन्माननीय मंत्री महोदयांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बोलविले आणि एक आराखडा तयार केला. 2010 तो आराखडा फायनल झाला. 2011 मध्ये सर्व कार्यादेश जारी झालेले आहेत. मी आधी सांगितल्याप्रमाणे 43 कामे प्रगतिपथावर आहेत. काही कामे पूर्ण झालेली आहेत. हे करीत असताना इन्फ्रास्ट्रक्चरवर जास्त भर देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांना असे आदेश दिले होते की, पर्यटकांच्या येण्याजाण्याची तसेच राहण्याची सोय व्हावयास पाहिजे. या दृष्टीने आराखडा तयार करुन कामे प्रस्तावित झालेली आहेत. एक वर्षाच्या आत सर्व कामे पूर्ण होणार आहेत.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील अर्थमंत्री असताना रायगडच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभारण्यात येईल आणि त्या करिता 5 कोटी रुपयांची तरतूद पर्यटन खात्याकडून करण्यात येईल अशी घोषणा अर्थसंकल्पात केलेली होती. अनेक वर्षे होऊनही त्या संदर्भात काहीही झालेले नाही. या अनुषंगाने शासन काय भूमिका घेणार आणि काय कार्यवाही करणार ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या बाबत माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, किती उप प्रश्नांच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय माहिती पटलावर ठेवणार आहेत ? हा प्रश्न व्यापक आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण एक निश्चित नियम ठरविला पाहिजे की, एखादा विशिष्ट प्रश्न असेल तर त्या प्रश्नाच्या मर्यादेतच उप प्रश्न विचारावेत. समजा सिंधुदुर्ग जिल्ह्याचा प्रश्न असेल तर त्या प्रश्नावर उप प्रश्न विचारताना महाराष्ट्रातील अनेक भागांबाबत प्रश्न विचारले तर मंत्री महोदयांवर अन्याय होतो. म्हणून मी माननीय मंत्री महोदयांना काही बाबतीत सांगितले की, सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी. अशा उप प्रश्नांच्या बाबतीत खरे उत्तर असे आहे की, एकतर ती माहिती पटलावर ठेवावी अन्यथा आपण अन्य मार्गाने प्रश्न विचारावा.

----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील खसखस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(९) * ३११५४ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.केशवराव मानकर , श्री.चंद्रकांत पाटील ,ॲड. उषा दराडे, श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खसखस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे मागे घेऊन ते रद्द करावेत व खसखस उत्पादनावर शुल्क आकारुन उत्पादनास परवानगी द्यावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश शेतकरी शेतमजुर संघटनेकडून लेखी निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या संदर्भात शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रदेश शेतकरी शेतमजूर संघटना यांनी दिनांक २३.४.२०१२ रोजी जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचेकडे निवेदन दिले ही बाब खरी आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितांकडून माहिती घेऊन व कायदेशीरदृष्ट्या तपासून उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांना शेती परवडत नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यापेक्षा खसखस हे पीक लावलेले आहे. देशातील काही राज्यांमध्ये खसखस हे पीक पेरण्यास परवानगी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी नेमका प्रश्न विचारावा. आपण सातत्याने जे स्पष्टीकरण करता ते या प्रश्नाच्या बाबतीत तरी करु नका.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, ऊसापासून अल्कोहोल तयार होते. द्राक्षापासून वाईन तयार होते. ज्वारी आणि तांदळापासून बिअर तयार होते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, आपल्याला उप प्रश्न विचारावयाचा नाही असे समजून मी प्रश्न संपला असे जाहीर करीन. आपल्याला उप प्रश्न विचारावयाचा असेल तर नेमका प्रश्न विचारावा.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारत आहे. ही पिके उत्पादित करणाऱ्यांना शिक्षा होत नाही मग खसखस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना शिक्षा कशासाठी ? 53 शेतकऱ्यांवर खटले दाखल झालेले आहेत. त्यांच्यावर खटले दाखल करण्यापेक्षा प्रत्येक सर्व्हे नंबरमध्ये काय पेरले आहे हे तलाठी बघत असतो आणि नोंद करीत असतो. तीन-तीन वर्षे हे होत असताना या सगळ्या सरकारी सिस्टिमला शिक्षा न देता शेतकऱ्यांनाच ही शिक्षा का ?

**सभापती** : यानंतर प्रश्न क्रमांक 30925 चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे .....

अप्रसिद्ध प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यात मत्स्यबीज उत्पादन केंद्र व मत्स्य संशोधन केंद्र सुरु करण्याबाबत**

**(10) * 30925 श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.अमरनाथ राजूरकर** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यात मत्स्यबीज उत्पादन केंद्र व मत्स्य संशोधन केंद्र उभारण्यासाठी 12 कोटी रुपये मंजूर करण्यात येऊन याचा पहिला टप्पा म्हणून दोन कोटी रुपये फिशरीज कॉलेज ऑफ रत्नागिरी या महाविद्यालयास वर्ग करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

2) असल्यास, कटला, रोहू, मांगूर व कोळंबी या गोड्या पाण्यातील माशांना राज्यात मोठ्याप्रमाणात मागणी असल्यामुळे हा प्रकल्प लवकरात लवकर सुरु होण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील** : (1) वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यात मत्स्यबीज उत्पादन केंद्र व मत्स्य संशोधन केंद्र उभारण्यासाठी 12 कोटी रूपये मंजूर करण्यात आलेले नाहीत. तसेच पहिला टप्पा म्हणून रू.2.00 कोटी इतका निधी फिशरीज कॉलेज ऑफ रत्नागिरी या महाविद्यालयास प्राप्त झालेला नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : मंत्री महोदयांनी "फिशरीज कॉलेज ऑफ रत्नागिरी या महाविद्यालयास प्रस्ताव प्राप्त झालेला नाही" असे उत्तर दिलेले आहे. शासनाने केंद्रीय मिठाजल जीवपालन अनुसंधान यांच्याकडे तसे प्रयत्न केले आहेत काय ? गोड्या पाण्यातील मत्स्य शेतीमध्ये चीन व हाँगकाँगने प्रगती केलेली आहे. सेसाचा रिपोर्ट सादर झालेला आहे. महाराष्ट्रात कटला, मांगूर व कोळंबी या माशांची वाढ होण्यासाठी भारतीय कृषी अनुसंधान, नवी दिल्ली आणि राष्ट्रीय मत्स्य विकास बोर्ड, हैद्राबाद यांच्याकडून मत्स्य उत्पादन वाढण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न झाले आहेत काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : फिशरीज डेव्हलपमेंट बोर्ड, हैद्राबाद यांच्याकडे शासनाने प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यांनी तो प्रस्ताव भारतीय कृषी अनुसंधान या संस्थेकडे पाठविला आहे. दापोली येथील कृषी विद्यापीठाला एक्सपिरीमेंटल लर्निंगसाठी 2 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत. रत्नागिरी, मुर्डे व पनवेल येथील बी.एस.सी.,फिशरीजच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या मुलांना प्रात्यक्षिकासाठी ॲक्वा फार्मिंगसाठी तसे मॉडेल विकसित करण्यात येत आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी, विसावी, एकविसावी व बाविसावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी, विसावी, एकविसावी व बाविसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी, पंधरावी, सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणिसावी, विसावी, एकविसावी व बाविसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात. )

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 च्या कलम 12 च्या पोट-कलम (5) अन्वये दिनांक 10 नोव्हेंबर, 2009, दिनांक 18 मे, 2011, दिनांक 30 नोव्हेंबर, 2011 व दिनांक 10 फेब्रुवारी, 2012 रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली यांचा सन 2009-2010 या वर्षाचा तेविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मंगळवार, दिनांक 17 एप्रिल, 2012 रोजी "आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुलाबा, मुंबई याबाबतच्या चौकशी आयोगापुढील विचारार्थ मुद्दा क्र.1 व .......

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अहवाल मांडण्यासंबंधी माझा आक्षेप आहे. या आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणातील चौकशीचे कामकाज कोठपर्यंत आले आहे ते कळत नाही. या सोसायटीच्या संदर्भात इतके दिवस आयोगासमोर जी चौकशी झालेली आहे त्याचा अहवाल आम्हाला मिळालेला नाही. त्या आयोगासमोर केवळ सारवा सारवीचे काम सुरु होते. त्या सोसायटीची जमीन शासनाची आहे की, संरक्षण खात्याची आहे हे सांगण्यामध्येच काही दिवस गेलेले आहेत....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी सभागृहात अहवाल मांडल्याशिवाय सन्माननीय सदस्यांना या अहवालात काय नमूद केले आहे ते कसे कळणार ?

श्री.दिवाकर रावते : या सोसायटीत काही बेनामी सभासद आहेत. त्याची यादी आम्हाला मिळणे आवश्यक आहे. ती यादी केव्हा दिली जाणार आहे, आदर्श सोसायटीच्या बाबतीत शासन लपवालपवी का करीत आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या प्रकरणी भ्रष्टाचार झालेला आहे असे एका बाजूला सरकार सांगत असताना दुस-या बाजूला या प्रकरणी लपवालपवी का केली जात आहे ? शासनाच्या या प्रवृत्तीचा आम्ही धिक्कार करतो. सभापती महोदय, "आदर्श" प्रकरणी झालेल्या भ्रष्टाचाराबाबत हे शासन लपवालपवी करीत असल्याच्या निषेधार्थ आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात व लगेच सभागृहामध्ये प्रवेश करतात.)

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदय हे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन 2010-2011 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व अन्य सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले. वास्तविक "आदर्श"च्या प्रकरणातील 1 आणि 2 क्रमांकाचे अहवाल सभागृहामध्ये मांडलेले आहेत. उर्वरित प्रकरणी चौकशी चालू आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदय "आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुलाबा, मुंबई" यासंबंधीच्या अहवालाची "मराठी भाषेतील प्रत" सभागृहासमोर ठेवत असताना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यास आक्षेप घेतला आणि त्यानंतर आम्ही बहिर्गमन केले.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मंगळवार, दिनांक 17 एप्रिल 2012 रोजी "आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुलाबा, मुंबई याबाबतच्या चौकशी आयोगापुढील विचारार्थ मुद्दा क्रमांक 1 व 2 वरील इंग्रजी भाषेतील अहवाल, तसेच सदर अहवालावरील शासनाच्या कार्यवाहीचा अहवाल", सभागृहाच्या पटलावर ठेवताना दिलेल्या आश्वासनानुसार, सदर अहवालाची "मराठी" भाषेतील प्रत" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

...झेड-1अ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा सन 2005-2006 या वर्षाचा एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री. पांडुरंग फुंडकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

## नियम 93च्या निवेदनाबाबत

**सभापती** : आज नियम 93ची 3 निवेदने चर्चेसाठी आलेली आहेत. त्यापैकी निवेदन क्रमांक 31 हे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम सभागृहामध्ये अनुपस्थित असल्यामुळे तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी दिलेल्या नियम 93च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 36 हे माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये अनुपस्थित असल्यामुळे मी प्रलंबित ठेवीत आहे.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : नायगांव बाजार तालुक्यातील (जि.नांदेड) शेतक-यांना
योग्य दरामध्ये खते व बियाणे न मिळणे याबाबत
श्री. जयंत प्र. पाटील,वि. प. स. यांनी दिलेली नियम
नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राधाकृष्ण विखेपाटील ( कृषि मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 45 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : नायगाव बाजार येथील विक्रेत्याने निर्धारित किंमतीपेक्षा जास्त दराने बियाण्याची विक्री केल्याबद्दल गुन्हा दाखल केलेला आहे. या विक्रेत्याने किती जास्त दराने बियाण्याची विक्री केली होती ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अशा प्रकारे विक्री करताना एकच विक्रेता सापडला. त्याच्या विरुध्द पोलीस केस दाखल झालेली आहे. एकूण वस्तुस्थिती पाहता अपवादात्मक परिस्थितीमध्ये अशी घटना घडलेली आहे. अन्य जिल्ह्यामध्ये बियाणे आणि खताची विक्री व्यवस्थितपणे सुरु आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : त्या विक्रेत्याचा परवाना रद्द करण्यात आलेला आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : होय.

----

....नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे एकूण चार औचित्याचे मुद्दे आलेले आहेत. आपण दर शुक्रवारी औचित्याचे मुद्दे घेतो. परंतु अलीकडच्या काळात औचित्याचे मुद्दे देण्याचे प्रमाण वाढले आहे. आपण जरी दर शुक्रवारी औचित्याचे मुद्दे घेत असलो तरी हे अधिवेशन बुधवार, दिनांक 25 रोजी संस्थगित होणार आहे. तेव्हा हे औचित्याचे मुद्दे बुधवार, दिनांक 25 जुलै 2012 रोजी घेण्यात येतील.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदना संदर्भात

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने पाच दिवसांच्या आत करण्यात यावीत अशी अपेक्षा माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी कामकाज सल्लागार समितीमध्ये व्यक्त केली होती आणि त्याप्रमाणे सूचना देखील देण्यात आल्या होत्या. असे असताना आतापर्यंत एकूण 65 निवेदनांपैकी फक्त 17 निवेदने येथे चर्चेला आली आहेत. अधिवेशन संपण्यास केवळ दोनच दिवस शिल्लक राहिले आहेत.

नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने उशिराने प्राप्त होतात यासंबंधी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विशेष हक्कभंगाची सूचना दिलेली आहे. तेव्हा मंत्री महोदयांनी उद्या आणि परवा या दोन दिवसांमध्ये जास्तीत जास्त निवेदने कशी करता येतील याची काळजी घ्यावी. अन्यथा कामकाज सल्लागार समितीमध्ये जी चर्चा झाली त्या नुसार तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्या अनुषंगाने विशेष हक्क भंगाची जी सूचना दिलेली आहे त्याचा गांभीर्याने विचार केल्याशिवाय पर्याय राहील असे मला वाटत नाही. माननीय मंत्री महोदयांनी याची नोंद घ्यावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल. या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील त्या बाबत गांभीर्याने चर्चा झाली. तथापि, नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने वेळेवर होत नाहीत म्हणून माननीय विरोधी पक्ष नेत्यांना दुसऱ्या संसदीय आयुधांचा वापर करावा लागला. आपण नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर निवेदन करण्यास सांगूनही ते वेळेत करण्यात येत नसेल तर ते योग्य नाही. तेव्हा आपण निदेश दिल्या प्रमाणे पुढील दोन दिवसांत सर्व निवेदने सादर करण्यात येतील.

--------

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचनांबाबत**

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर एकूण सात लक्षवेधी सूचना दाखविण्यात आल्या आहेत. त्यापैकी तीन लक्षवेधी सूचना मागील आहेत तर चार लक्षवेधी सूचना नव्याने आल्या आहेत. आपणा सर्वांना माहीत आहे की, आपण सभागृहाला अर्ध्या तासाची सुट्टी ठेवलेली आहे. आज ही सुट्टी दुपारी 2.00 ते 2.30 पर्यंत आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, दुपारी 1.00 ते 2.00 या वेळेत आपणास कामकाजपत्रिकेवरील सातही लक्षवेधी सूचनांवरील चर्चा पूर्ण करावयाची आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी त्या दृष्टीने सहकार्य करावे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी मघाशी नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील असे सांगितले. पहिले निवेदन सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या सूचनेवरील होते. मी त्यांचे नाव पुकारले, परंतु ते सभागृहात उपस्थित नव्हते म्हणून मी ते निवेदन राखून ठेवण्यात येईल असे सांगितले होते. परंतु आता सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित झाले आहेत आणि जलसंपदा विभागाचे माननीय राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत. तेव्हा आता नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील पहिले निवेदन चर्चेला घेण्यात येत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील नातूवाडी उजवा कालवा खेड ते आंबये या कालव्यातून पाण्याची होत असलेली गळती या बाबत श्री .रामदास कदम, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.रामदास कदम यांनी "रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील नातूवाडी उजवा कालवा खेड ते आंबये या कालव्यातून पाण्याची होत असलेली गळती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोकणातील खेड तालुक्यातील नातूवाडी उजवा कालवा खेड ते आंबये हा 20 कि.मी.चा कालवा पूर्णपणे नादुस्त असून त्यातील 95 टक्के पाण्याची गळती होत आहे. फक्त 5 टक्के पाणी कालव्यातून जात आहे. या कालव्याच्या दुस्तीसाठी निधी द्यावा अशी मागणी मी मागील पाच वर्षापासून करीत आहे. माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे हे फक्त सेंट्रल हॉलचे काम करतात. मी प्रत्येक अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या कालव्याच्या दुरुस्तीसाठी 14-15 कोटी रुपयांची आवश्यता आहे. एका बाजूला शासन पाणी उपलबध नाही असे सांगत आहे तर दुसऱ्या बाजूला या कालव्यातून 95 टक्के पाण्याची गळती होत असताना ती थांबविण्यासाठी कोणतीही पावले उचलत नाही.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ...

फक्त 5 टक्के पाणी शेतीला मिळते आहे. शासनाकडे 14-15 कोटी रुपयांची अंदाजपत्रके आलेली आहेत, ती तत्काळ मंजूर केली जातील काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, शासनाने दिनांक 19.9.2011 अन्वये पुनर्स्थापनेच्या 11 कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. कालव्याचे विमोचक दारे बदलणे तसेच कालव्यावरील मोडकळीस आलेले सीडी वर्क नव्याने करण्यासंदर्भात जेवढया निधीची आवश्यकता लागेल तेवढा निधी या आर्थिक वर्षात निश्चितपणे उपलब्ध करुन दिला जाईल.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलणे**

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी त्यांची लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी अशी विनंती केलेली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात आली असून सदरची लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

आता कार्यक्रम पत्रिकेतील 6 लक्षवेधी सूचनांवर आपल्याला चर्चा करावयाची आहे. या सर्व लक्षेवेधी सूचनांवरील चर्चा आपल्याला दुपारी 2.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात पूर्वी नियम समितीमध्ये जो निर्णय घेतला होता. त्या प्रमाणे दररोज दोन लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतात. सन्माननीय सदस्यांना जास्तीत जास्त न्याय मिळावा म्हणून 4 लक्षवेधी सूचना घेण्याचे ठरविले. आजच्या कार्यक्रम पत्रिकेत एकूण 7 लक्षवेधी सूचना दाखविण्यात आल्या आहेत. प्रत्येक लक्षवध्री सूचनेवर अर्धा तास चर्चा केली तर सभागृहाचा निम्मा पेक्षा जास्त वेळ यासाठी जाईल. माझे असे मत आहे की, या संदर्भात आपण निर्बंध घालू. प्रश्नोत्तराच्या तासासाठी एक तासाची वेळ निश्चित केलेली आहे. एका तासात जेवढे प्रश्न चर्चेसाठी येतात, तेवढया प्रश्नांवर आपण चर्चा करतो. लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत अशा पध्दतीचा एक नियम पक्का करावा. आपल्या सभागृहातील कामकाजाचा जो पहिला भाग आहे तो लक्षवेधी सूचनांपर्यंतचा आहे. आपल्याला दुपारी 1.00 ते 2.00 वाजेच्या आत सर्व लक्षवेधी सूचनेवरील चर्चा संपवावयाची आहे. एका लक्षवेधी सूचनेला मी तीन ते चार उप प्रश्न विचारण्यास परवानगी देणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज करण्याच्या दृष्टीने आणि सदस्यांच्या दृष्टीने आपण चांगला निर्णय दिलेला आहे. लववेधी सूचनेशी संबंधित मंत्र्यांनी उत्तर दिले तर लक्षवेधी सूचनेवरील चर्चा लांबणार नाही. त्यांनी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला स्पेसिफीक उत्तर दिले तर लक्षवेधी सूचनेवरील चर्चा लगेच संपेल. प्रश्नाचे गांभीर्य व प्रश्नाचा मतितार्थ लक्षात घेऊन सबंधित मंत्र्यांना उत्तर देण्याबाबत आपण सूचना करावी अशी माझी विनंती आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाला अचूक उत्तर देण्याचा प्रयत्न केला तर सदस्यांना अचूक उत्तर मिळेल व ती चर्चा लवकर संपेल. लोकसभेतील कामकाजाच्या संदर्भातील चर्चा नियम समितीमध्ये अनेक वेळा झालेली आहे. लोकसभेमध्ये अथवा राज्यसभेमध्ये लक्षवेधी सूचने संदर्भात दोन ते तीन उप प्रश्न विचारल्यानंतर ती चर्चा संपते. आता लक्षवेधी सूचना क्र.2 चर्चेला घेण्यात येत आहे.

------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षण सेवकास वाढीव मानधन न मिळणे

**मु. शी.** : आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षण सेवकास वाढीव मानधन न मिळणे यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

--------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : सेटची परीक्षा उत्तीर्ण होऊनही जमनालाल गोयंका दंत महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याने या शैक्षणिक वर्षात होणारे नुकसान

**मु. शी.** : सेटची परीक्षा उत्तीर्ण होऊनही जमनालाल गोयंका दंत महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याने या शैक्षणिक वर्षात होणारे नुकसान यासंबंधी श्री.वसंतराव खोटरे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" "असोसिएटची सेट (Associate CET) ची परीक्षा माहे मे, २०११ मध्ये देऊन असोसिएटने त्यांच्या वेब साइटवर दिनांक ६ सप्टेंबर, २०११ रोजी जमनलाल गोयंका दंत महाविद्यालय, अकोला येथे तिसऱ्या राऊंडमध्ये यादी घोषित करणे, दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ पर्यंत दिलेल्या अंतिम तारखेच्या यादीत ५ विद्यार्थ्यांचा मुदतीत प्रवेश निश्चित होणे, उर्वरित ३४ विद्यार्थ्यांनी ३० सप्टेबर, २०११ पर्यंत सर्व अटी पूर्ण करुन प्रवेश घेणे, दंत महाविद्यालयाच्या प्रवेशावर बंदी असूनही या संस्थेने याचिका क्रमांक ३९८२/२०११ दाखल करुन प्रवेश बंदीवर स्टे ऑर्डर घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे, विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन अभ्यासक्रम पुर्ण होणे, मे-जुन २०१२ मध्ये विद्यापीठाच्या परीक्षेला पात्र असून प्रविष्ट होण्यासाठी परीक्षेचे प्रवेशपत्र विद्यापिठाने पाठविलेले नसणे, त्यामुळे ३९ विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणे, त्यांचे वर्ष वाया जाणे, त्यांचे आर्थिक नुकसान होणे, याबाबत मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १ जून, २०१२ रोजी याबाबतचे एक निवेदन ३९ विद्यार्थ्यांच्या सह्यानिशी अकोला येथे सादर करणे, तसेच आरोग्य मंत्री, कुलगुरु महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनाही विद्यार्थ्यांच्या सह्यानिशीचे निवेदन दिनांक २५ एप्रिल, २०१२ व त्या दरम्यान सादर करणे, परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही शासनाकडून न होणे, याबाबत शासनविषयी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम व पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

६...

डॉ.विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

7

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, जमनालाज गोयंका दंत महाविद्यालय हे अकोला येथे गेल्या सात,आठ वर्षापासून सुरु आहे. मागच्या वर्षी असोसिएटची सेटची परीक्षा मे, 2011 रोजी झाली आणि जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय,अकोला यांनी त्यांच्या वेब साईटवर दिनांक 6 सप्टेंबर, 2011 रोजी तिसऱ्या राऊंडमध्ये प्रवेश यादी घोषित केली. दिनांक 12 सप्टेंबर, 2012 पर्यंत 5 विद्यार्थ्यांनी मुदतीत प्रवेश घेतला. उर्वरित 35 विद्यार्थिनींना 30 सप्टेंबर, 2011पर्यंत महाविद्यालयात प्रवेश दिला, त्यानंतर त्या विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या अटी पूर्ण केल्या. दंत महाविद्यालयाच्या प्रवेशावर बदी असूनही यासंस्थेने याचिका क्रमांक 3982/2011 दाखल करुन प्रवेश बंदीवर स्टे ऑर्डर घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली. या महाविद्यालयात 39 पैकी 34 विद्यार्थिनी आहेत व 5 विद्यार्थी आहेत. या 21.2.2012 रोजी उच्च न्यायालयाने महाराष्ट्र विज्ञान परिषद, भारतीय दंत परिषदेने तपासणी अहवालातील तथ्य पाहता उच्च अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया करु नये असे आदेश दिले असले तरी महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ,नाशिक यांचे प्रसारीत परिपत्रक क्रमांक 4/2012 संदर्भ क्रमांक एमयूएमच/एक्सपी/62/2012...

यानंतर श्री. कानडे...

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ D/ ST/ पूर्वी श्री.गिते 13:05

लक्षवेधी सूचना क्र.3....

**सभापती** : माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेवर नेमका प्रश्न विचारावा. वर्गात 45 मिनिटांचा तास घेणे ही वेगळी बाब आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाणार आहे, पैसा वाया जाणार आहे आणि पालकांची मन:स्थिती देखील यामुळे बिघडली आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या विद्यार्थ्यांना परीक्षा घेऊन दुसऱ्या कॉलेजमध्ये प्रवेश दिला जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, माननीय सदस्यांना हे सांगितले पाहिजे की, विद्यापीठाने वेबसाईटवर 2011-12 मध्ये या कॉलेजला ॲफीलेशन नाही म्हणून विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये असे कळविले असताना सुध्दा म्हणजे ॲफीलेशन नसताना सुध्दा 39 मुला-मुलींना प्रवेश दिला. त्यानंतर मुले आणि मुली कोर्टात गेले. कोर्टाने इंटरिम रिलीफ देऊन प्रवेश दिला. ॲफीलेशन नसले तरी ॲडमिशन द्या असे सांगितले. ॲफीलेशन नसल्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिले नाही. त्यानंतर विद्यार्थी कोर्टात गेले असता कोर्टाने निकाल दिला की, सदर संस्थेला डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता नाही आणि विद्यापीठाचीही मान्यता नाही त्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देता येणार नाही. कोर्टाने असेही सांगितले की, 2 महिन्याच्या आत डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाने निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानंतर या संस्थेला सुनावणीसाठी बोलाविले. 29 मे रोजी सुनावणी झाली. डायरेक्टर ऑफ डेंटल कॉलेज, हेल्थ सेक्रेटरी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ आणि राज्य शासनाचे प्रतिनिधी तसेच डेंटल कौन्सिल ऑफ इंडिया बरोबर सुनावणी झाली. 29 जूनला सुनावणी झाल्यानंतर असा निर्णय झाला की, 2010-11 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे त्यांना दुसऱ्या कॉलेजमध्ये सामावून घ्या. ॲफीलेशन नसल्यामुळे प्रवेश दाखविता येणार नाही. अशा पध्दतीने कोर्टाने निदेश दिल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू देता येणार नाही.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे :सभापती महोदय, प्रथम वर्षाचे विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारले असले तरी परीक्षाकेंद्र कसे घोषित करण्यात आले ? 22 मे 2012 रोजी का कळविले नाही ? आरोग्य विज्ञान विद्यापीठाची चूक असेल तर त्याला विद्यार्थी काय करणार ? शासन विद्यार्थ्यांचे नुकसान करणार आहे काय ? 34 मुली आणि 5 विद्यार्थी यांचे नुकसान होऊ नये आणि त्यांचे भवितव्य लक्षात घेता विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना अन्य कॉलेजमध्ये प्रवेश दिला जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे प्रथा आहे की ज्या कॉलेजमधील विद्यार्थी आहेत त्यांना तात्पुरता दिलासा देऊन ॲडमिशन दिली जाते. डेंटल कौन्सिल ऑफ इंडियाने परवानगी दिलेली नाही. जुने विद्यार्थी त्यात असल्यामुळे त्यासाठी परीक्षाकेंद्र घोषित केलेले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत.........

त्यामुळे केवळ केंद्र घोषित केले म्हणजे त्यांना परीक्षेला बसू दिले पाहिजे असा त्याचा अर्थ होत नाही. डी.सी.आय.ने त्यांना परवानगी नाकारल्यामुळे प्रवेश देऊन विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू द्यायची त्यांच्याकडे ॲथॉरिटी नाही.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अमरावती जिल्हयामध्ये वीज वितरण कंपनीच्या जिवंत विद्युत तारा अंगावर पडून चार शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: अमरावती जिल्हयामध्ये वीज वितरण कंपनीच्या जिवंत विद्युत तारा अंगावर पडून चार शेतकऱ्यांचा झालेला मृत्यू यासंबंधी श्री.प्रवीण पोटे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.प्रवीण पोटे (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्ह्यातील भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर येथील आशिष बेलोकार, अचलपूर तालुक्यातील रासेगाव येथील अश्वीन रतवाल तसेच पथ्रोट येथील विश्वनाथ लवाडे या शेतकऱ्यांचा तुटलेल्या व लटकलेल्या जिवंत विद्युत प्रवाहाच्या तारेचा स्पर्श झाल्याने अकस्मात झालेला मृत्यू, वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचा बेजबाबदार व गलथान कारभार, वीज वितरण कंपनीचे काम करणाऱ्या कंत्राटदारांचा निष्काळजीपणा या शेतकऱ्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरणे, त्यावर शासनाने कोणतेही कठोर पाऊल न उचलणे, यामुळे शेतकरी व जनतेत वीज वितरण कंपनी विरुध्द पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या अधिकारी व कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांनी आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4............

श्री.प्रवीण पोटे : सभापती महोदय, अमरावती जिल्हयामध्ये मागील मे महिन्यात वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे जिवंत विद्युत तारा अंगावर पडून एका महिलेसह चार व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले. या संदर्भात अद्याप कोणत्याही अधिकाऱ्यांवर कारवाई केली गेली नाही. लोकांचे प्राण हिरावून घेण्याचा शासनाने वीज वितरण कंपनीला मक्ता दिला आहे काय? गेल्या वर्षभरात अमरावती जिल्हयात अशा 30 ते 35 घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे आणि प्रत्येक मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना 20 लाख रुपये नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. या मागणीच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दिनांक 6 जून, 2012 रोजी अमरावती जिल्हयात जी घटना घडली त्या घटनेमध्ये वाठोडा येथील आशिष बेलोकार या व्यक्तीचा मृत्यू झाला होता. 11 केव्हीए लाईनच्या सिंगल पोलच्या जम्परवर पक्षी बसल्यामुळे दुर्घटना घडली. त्या विद्युत प्रवाहाच्या तारेमध्ये करन्ट सुरु होता आणि त्या तारेला आशिष बेलोकार या शेतकऱ्याने हात लावल्यामुळे त्याचा मृत्यू झाला. विभागाच्या माध्यमातून या घटनेची चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये सदर अपघातास महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीची सदोष वीज मांडणी कारणीभूत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सभापती महोदय, मृतांच्या नातेवाईकाना 20 हजार रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात आली असून वारसा प्रमाणपत्र सादर केल्याबरोबर 2 लाख रुपये आर्थिक मदत दिली जाईल. अशा प्रकारच्या तीन घटना अमरावती जिल्हयामध्ये घडल्या असून त्या घटनांमध्ये आशिष बेलोकार, अश्विन रतवाल यांच्यासह आणखी एका महिलेचाही मृत्यू झाला आहे. महिलेचा मृत्यू झाला त्या घटनेमध्ये वादळी वारे सुरु असताना ही मजूर महिला शेतामध्ये काम करीत होती आणि अचानक विद्युत तार तिच्या अंगावर कोसळली आणि त्यात तिचा मृत्यू झाला. मोबदल्याबाबत मी सांगू इच्छितो की, तातडीची मदत म्हणून 20 हजार रुपये दिलेले आहेत व वारसदार निश्चित होतील तेव्हा 2 लाख रुपये आर्थिक मदत दिली जाईल.

----------

नंतर श्री.खर्चे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बीड शहराच्या बाहेरुन जाणारा बाहय वळण रस्ता तत्काळ सुरु करणे.
**मु.शी.** : बीड शहराच्या बाहेरुन जाणारा बाहय वळण रस्ता तत्काळ सुरु करणे, यासंबंधी प्रा.सुरेश नवले, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री, एम.एम.शेख, राजन तेली,सुभाष चव्हाण, धनंजय मुंडे, विनायकराव मेटे, सतीश चव्हाण, वि.स.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड शहरामधून जाणारे दोन राष्ट्रीय महामार्ग असून त्यामुळे आंतरराज्यीय लहान मोठी जड वाहने शहराच्या मध्यभागातून जात असून बाहेरच्या या सर्व वाहनांमुळे शहरामध्ये रहदारीची कोंडी निर्माण होऊन गेल्या काही वर्षात या वाहनांच्या अपघातामुळे अनेक नागरिकांचे मृत्यू होणे, याबाबत संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करुनही वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, याकडे केले जात असलेले अक्षम्य दुर्लक्ष, स्थानिक जनतेत पसरलेले असंतोषाची संतप्त भावना, याबाबत त्वरित कारवाई करुन बीड शहराच्या बाहेरुन जाणारा बाह्यवळण रस्ता तत्काळ सुरु करण्यासाठी करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : महोदय, ही लक्षवेधी सूचना बीड शहराच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आणि महत्वाची आहे. बीड शहराला बाह्य वळण रस्ता प्रस्तावित केला असून तो फक्त पूर्वेच्या दिशेनेच आहे. आमची विनंती आहे की, पूर्ण शहराभोवती रिंग रोड स्वरुपाचा रस्ता करणे आवश्यक आहे. या कामासाठी एक वर्षापूर्वी 1 कोटी 62 लाख 39 हजार इतका निधी जिल्हाधिकारी कार्यालयात सार्वजनिक बांधकाम विभागाने जमा केला आहे. पण अजूनही या रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरु झालेली नाही. त्यात कलम 4, कलम 6 ची नोटीस किंवा ॲवॉर्ड अशी कोणतीच प्रक्रिया सुरु नाही. तसेच हा वळण रस्ता होऊ नये म्हणून दबाव निर्माण करणारी एक शक्ती सुध्दा बीड शहरात कार्यरत आहे. हा वळण रस्ता शहराभोवती झाला नाही तर उड्डाण पुलाचे काम हाती घेण्याची शक्यता दाट स्वरुपात आहे. खरे तर उड्डाण पुलाची आवश्यकता नसताना देखील तया आग्रह या शक्तींकडून धरला जात आहे. अशा प्रकारे हा वळण रस्ता बाजूला ठेवून उड्डाण पूल घेणे हे चुकीचे आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण यांनी बीड शहरात पुतळ्याचे भूमीपूजन केले ती कोनशिलाच नगरपालिकेने गायब केली आहे, ती नजरेच्या टप्प्यात येणार नाही याचीही दक्षता नगरपालिकेने घेतली आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण केले व ती कोनशिला सर्वांना दिसेल अशी ठेवण्यात आली आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांनी भूमीपूजन केलेली कोनशिला मात्र पाण्यात दडपून टाकली आहे, ही बाब योग्य नाही. पुढील दोन महिन्यात किमान या रस्त्यासाठी लागणाऱ्या जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सुरु करणार काय ? तसेच हा वळण रस्ता पूर्ण केल्यानंतर या उड्डाण पुलाची बीड शहराला आवश्यकता नाही हे स्पष्ट करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, जवळपास 225 किलोमीटरचा बीड ते औरंगाबाद हा महामार्ग एनएचएआय च्या माध्यमातून प्रस्तावित आहे. हे काम करताना यात बीड बायपासचा प्रस्ताव देखील समाविष्ट आहे. बीड शहराभोवतीच्या बायपासचा सर्व्हे झालेला आहे. त्यात एक इस्टर्न आणि एक वेस्टर्न असा दोन प्रकारचा सर्व्हे करण्यात आला आहे. बीड बायपास वेस्टर्न साईडच्या सर्व्हेमध्ये निदर्शनास आले की, या भागात डोंगरी भाग व दगड आहेत त्यामुळे तो रस्ता घेणे शक्य नाही त्यामुळे इस्टर्न साईडचा सर्व्हे होणे योग्य होईल. त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पब्लिक मिटींग घेतली होती आणि त्यांच्या मते बीड बायपास इस्टर्न साईडने घेण्याचा निर्णय झाला. या कामासाठी 3.80 कोटीची तरतूद भूसंपादनासाठी केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

यासंदर्भात 1.62 कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने उपलब्ध करुन दिलेले आहेत. या कामामध्ये सर्व्हे व सीमा निश्चित करण्याचे काम आवश्यक होते त्यामुळे सर्व्हे व सीमा निश्चित करण्याचे काम पूर्ण झालेले असून 1 महिन्याच्या आत सेक्शन 4 ची कारवाई सुरु होणार आहे. यामध्ये 60 हेक्टर जागा व 257 कास्तकाराच्या जमिनीचे संपादन होणार आहे. एक महिन्याच्या आत भूसंपादनाची प्रक्रिया सुरु होणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बीड बायपासचा केवळ सर्व्हेच झाला आहे असे नसून त्यासाठी पैसेही दिले गेले आहेत. त्यामुळे बीड येथील बायपासच्या विषयाचा मार्ग मोकळा झालेला आहे त्यामुळे येथील उड्डाण पुलाला स्थगिती देऊन हा उड्डाण रद्द केला जाणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, फ्लायओव्हर आणि बायपास हे दोन वेगळे प्रश्न आहेत. शहराच्या आतील भागात जाणारा हा फ्लायओव्हर ब्रीज आहे. औरंगाबादकडील ट्रॅफिक शहरात येऊ नये यासाठी ही ट्रॅफिक बायपासने शहराच्या बाहेरुन जावी यासाठी हा बायपास आहे. वाहतूक शहराच्या बाहेरुन जावी यासाठी सर्व राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीचे काम केले जात आहे. शहराच्या आतमध्ये हायवे जात असेल तर त्यासाठी बायपास बांधणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. बायपासच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतलेला असून त्या माध्यमातून या ठिकाणच्या बायपासचे काम होत आहे. उड्डाणपूलाची आम्हाला गरज नाही असा प्रस्ताव नगरपालिकेने दिला तर त्यासंदर्भात निश्चितपणे विचार केला जाईल परंतु या उड्डाणपूलाचे टेंडर झालेले आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बीड येथील हायवे शहरातून न जाता बाहेरुन जावा अशी मागणी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले करीत आहेत. सन्माननीय सदस्यांनी बीड येथील हायवे शहरातून न जाता बाहेरुन जावा अशी मागणी पुरवणी मागण्यांमध्ये देखील केली होती. बायपास रस्ता व्हावा व शहरात उड्डाणपूल पूल होऊ नये यासाठी शासन काही भूमिका घेणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, बायपासचे फंकशन वेगळे असते. या कामाचे ऑलरेडी टेंडर निघालेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांची जी भावना आहे त्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांच्या दालनात यासंदर्भात बैठक घेण्यात येईल. जर कामामध्ये ओव्हरलॅपींग होत असेल तर त्यातील एक काम निश्चितपणे रद्द करण्याचा प्रस्ताव दिला जाईल. यासंदर्भात अधिवेशन संपल्यानंतर तातडीने बैठक घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेची दोन निवेदने माझ्याकडे आलेली आहेत. बीड येथे अपघातामध्ये जास्त लोक मृत्यू पावले होते त्यामुळे या भागात अपघात होऊ नये यासाठी रिंग रोडचा प्रस्ताव आलेला आहे. या रिंग रोडच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असल्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. परंतु उर्वरित भूसंपादनाचे तसेच इतर कामे किती कालावधीत पूर्ण केले जाणार आहे ? रिंग रोडच्या मधून जुना रस्ता जात आहे त्या ठिकाणी पूल बनविण्याच्या कामाला सुरुवात झालेली आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा जुन्या पध्दतीचा सुंदर असा पुतळा बसविलेला असून हा पुतळा शहराचे भूषण आहे. जर ब्रीज झाला तर त्या ठिकाणावरुन पुतळा हटवावा लागेल. रिंग रोड झाला तर पुलाची गरज लागणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, दिवाकर रावते, प्रा.सुरेश नवले यांनी रिंग रोड लवकर केल्यामुळे अपघात कमी होणार आहेत तसेच या पुलाची गरज भासणार नाही असे सांगितले आहे. त्यामुळे शासन रिंगरोडचे काम आधी घेण्याचे जाहीर करणार आहे काय ? या पुलासाठी अनेकांचा विरोध आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मिनिट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अँड हायवेज यांनी सदर काम सन 2012-2013 च्या वार्षिक नियोजनात समाविष्ट केले आहे. औरंगाबाद येडशी हा 225 कि.मी.चा 1500 कोटीचा प्रकल्प आहे. यापुढील सर्व नॅशनल हायवेंची कामे BOT वर होणार आहेत. सध्या प्रस्तावाची छाननी सुरू आहे. एक महिन्यामध्ये त्यास ॲप्रुव्हल मिळण्याची शक्यता आहे. अद्यापपर्यंत त्यांना ॲप्रुव्हल मिळालेले नाही. टेंडर फायनल करण्यासाठी सहा महिने लागतील. मात्र, पुलाच्या कामाचे टेंडर फायनल झाले आहे. हा त्या जिल्ह्यातील प्रश्न आहे. त्यामुळे या कामासंबंधीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या जिल्ह्यातील सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांना घेऊन....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हौस भागविण्यासाठी शासन पूल बांधणार आहे काय ? शासनाने उगाचच लोकांचे करोडो रूपये खर्च करू नयेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विद्रूपीकरण करण्याचे काम आपण करू नये. त्यासाठी हे सगळे भांडण आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, आपण या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उत्तर देताना सांगितले की, बीड जिल्ह्यातील सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन निर्णय करू. या सभागृहात बीड जिल्ह्यातील जेवढे म्हणून सन्माननीय सदस्य आहेत त्यांनी तर एकमताने सांगितले आहे की, या पुलाची गरजच नाही. असे असताना केवळ ठेकेदाराची बेकारी हटविण्यासाठी हा पूल बांधला जाणार आहे काय, असा प्रश्न मी आपल्याला विचारत आहे. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी जी आग्रहाची मागणी केली आहे ती आपण मान्य करावी. त्या पुलाची खरोखरच गरज नसेल तर तो रद्द करावा.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, बीड जिल्ह्यील अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. ज्यांनी हा पूल मंजूर करून घेतला आहे ते बीड जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत व त्या भागाचे आमदार आहेत. मंजूर केलेले काम रद्द करणे हे बरोबर नाही. त्यामुळे माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांच्या दालनात सर्व सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांची भावना ऐकून घेतली जाईल.

**उप सभापती** : असे असेल तर माननीय मंत्री महोदय, आपण पुढची लक्षवेधी सूचना होई पर्यंत माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना सभागृहात बोलावून घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तो पर्यंत या पुलाच्या कामाला आपण स्थगिती द्यावी.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, बीड जिल्हयाच्या रिंग रोड संबंधी अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना येथे आली आहे. रिंग रोडसाठी भूसपांदन होत आहे. तसेच उड्डाण पुलाचे टेंडर निघाले आहे असे माननीय राज्यमंत्र्याच्या उत्तरातून ध्वनित होत आहे. या कामांबाबत कोंबडी आधी की, अंडे अशी जनमानसात प्रतिक्रिया उमटू लागली आहे. रिंगरोडचे भूसंपादन करून तो अगोदर पूर्ण झाला तर बीड शहरातील व परिसरातील जनतेला उड्डाणपुलाची आवश्यकता नाही. या उड्डाण पुलावरील बसमधून कोणी थुंकले की ते महाराजांच्या पुतळ्यावर येऊ शकते अशा प्रकारचे डिझाईन या पुलाचे झाले आहे. आहे. ती जागा अत्यंत कमी आहे. त्यामुळे तेथे उड्डाण पूल होणार कसा ?

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे . . . .

सभापती महोदय,माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे बीड शहरातून उड्डाण पूल करावयाचा आहे म्हणून बायपासचा प्रश्न, रींग रोडचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात आला आहे काय? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी बायपासचे काम होईपर्यंत सध्या त्या रस्त्यांवर अपघातांची मालिका सुरु आहे. आतापर्यंत त्या परिसरामध्ये जवळजवळ 439 जणांचा मृत्यू झालेला आहे. याबद्दल शासन तत्काळ काही कारवाई हाती घेणार आहे की नाही? बीड शहरातून उड्डाण पूल करावयाचा असल्यामुळे रिंग रोड बायपासचे काम थांबविले आहे की ते प्रलंबित ठेवले आहे असा प्रश्न आहे. हे काम होईपर्यंत सध्या तेथे जी अपघातांची शृंखला सुरु आहे. ती थांबविण्यासाठी तेथे गतीरोधक, पोलीस चौकी उभी करण्याचा प्रयत्न करणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, बायपास रस्ता आणि फ्लाय ओव्हरच्या कामाचा काही संबंध नाही. लॅण्ड ॲक्वीझिशनचा सर्व्हे करणे, त्याचे अलाइर्नमेंट घेणे आणि जागा ॲडेन्टीफाय करुन पब्लीक हिअरींग घेणे या सगळया प्रक्रियेसाठी सहा ते आठ महिने लागतात हे आपल्याला देखील माहिती आहे. त्यामुळे त्या कामाचा आणि या कामाचा एकमेकांशी काही संबंध नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर तुम्हाला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माननीय मंत्री महोदयांच्या दालनामध्ये बैठक घ्यावयाची नसेल तर माननीय उप सभापती महोदयांच्या दालनामध्ये एक बैठक घ्यावी आणि त्यावेळी बीड येथील जे सगळे लोक प्रतिनिधी आहेत, त्यांनाही बोलविण्यात यावे. तसेच ही बाब योग्य नाही. त्याची गरज नाही असे जर आपल्याला वाटत असेल तर सदरहू टेंडर रद्द करावे. मग त्याबाबत आम्ही निश्चितपणे विचार करु. जेव्हा कोणत्याही कामाचे टेंडर काढण्यात आले असेल तर ते रद्द करण्यासाठी काही जस्टीफीकेशन असावयास पाहिजे.सभापती महोदय, आपण आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी आणि त्याठिकाणी आपण निश्चितपणे विचार करु.विधान परिषदेप्रमाणे विधान सभेमध्ये देखील लोकप्रतिनिधी आहेत आणि या कामाच्या संबंधात त्यांच्याही काही भावना असतील, विचार असतील, त्यामुळे सर्व लोकप्रतिनिधींना बोलावून याबाबतीत निर्णय घेण्यात यावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे काय चालले आहे? येथे विषयांतर होत आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोरय, फक्त या सभागृहामध्ये . . . .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्यायालय शासनाची झाडते, तुमच्या निर्णयाची वाट लावते तेव्हा हे काय करतात? हे सभागृह न्यायालयापेक्षा मोठे आहे. माननीय मंत्री महोदय असे कसे बोलत आहेत ? या सभागृहामध्ये असे होणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी तसे बोललोच नाही. मी असे म्हटले आहे की, जसे या सदनातील सदस्य आहेत, त्याप्रमाणे विधानसभेतील सदस्य . . ..

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, विधान सभेचा काय संबंध आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. आता मी या लक्षवेधी सूचनेबाबत सुस्पष्टपणे निर्देश देतो. संबंधित उड्डाण पुलाला या सदनातील सन्माननीय सदस्यांनी विरोध दर्शविलेला आहे. त्या बाबत सर्व संबंधितांबरोबर बैठक घेण्यात यावी असे येथे ठरले आहे. या विषयावरील चर्चा अधिवेशन संपल्यानंतर माझ्या दालनामध्ये होईल. तोपर्यंत या उड्डाण पुलाच्या कामासंबंधात ताबडतोब संपूर्णपणे स्थगिती देण्यात यावी एवढे मी आपल्याला सांगतो.

----

. . . .2एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 6 बाबत**

**उप सभापती** :आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 6 सन्माननीय सदस्य श्री.किसनचंद तनवाणी, वि.प.स.यांनी दिलेली आहे. परंतु सदरहू लक्षवेधी सूचनेला उत्तर देणारे माननीय मंत्री महोदय विधान सभेमध्ये व्यस्त असल्याने ही लक्षवेधी सूचना उद्या किंवा परवा चर्चेसाठी घेण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत पाकिटातून दिल्या जाणाऱ्या आहाराचे महत्व व वापराबाबत माहिती देण्यात न येणे

**मु. शी.** : एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत पाकिटातून दिल्या जाणाऱ्या आहाराचे महत्व व वापराबाबत माहिती देण्यात न येणे यासंबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"कुपोषणाच्या समस्येला आळा घालण्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत राज्यातील अंगणवाड्यात न येणाऱ्या 6 महिने ते 3 वर्षापर्यंतच्या सुमारे एक लाख मुलांना बंद पाकिटातून शिरा, उपमा व सातू कणिक असा पूर्ण महिन्याचा आहार एकदा घरपोच दिला जाणे, मात्र घरपोच दिला जाणाऱ्या कणिकेचे आरोग्याच्या व वाढीच्या दृष्टीने महत्व काय तसेच त्याचा वापर कसा करावा याबाबत सरकारमार्फत काहीच माहिती दिली नसणे, त्यामुळे बंद पाकिटे पालकांकडून स्विकारली न जाणे, ही पाकिटे मुदत संपल्यानंतर कचराकुंडीत फेकली जाणे, चांगल्या उद्देशाने सुरु केलेली ही योजना योग्य नियोजनाअभावी उपयुक्त न ठरणे, पालकांमध्ये या सकस आहाराबाबत जागृती निर्माण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

प्रा. वर्षा गायकवाड ( महिला व बाल विकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कुपोषणाच्या समस्येला आळा घालण्यासाठी शासनाने एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत राज्यातील अंगणवाड्यात न येणाऱ्या 6 महिने ते 3 वर्षापर्यंतच्या सुमारे एक लाख मुलांना बंद पाकिटातून शिरा, उपमा व सातू कणीक असा पूर्ण महिन्याचा आहार एकदा घरपोच दिला जातो. मात्र घरपोच दिला जाणारा जो आहार आहे त्या कणकेचे आरोग्याच्या व वाढीच्या दृष्टीने काय महत्व आहे तसेच त्याचा वापर कसा करावा याची माहिती दिलेली नाही.

सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अंगणवाडी सेविका घरी जाऊन आहार कसा करावा, शिरा कसा बनवावा, जी सातू कणीक आहे त्याचे काय बनवावे याचे प्रात्यक्षिक करुन दाखविणार आहेत. या अंगणवाडी सेविकांना आपण खूप कमी मानधन देतो आणि त्यांच्यावर जबाबदाऱ्या खूप असतात. पाकिटातून जो आहार येतो तो मुंबई, पुणे, नागपूर अशा लांबच्या ठिकाणाहून येतो. त्यांची एक्स्पायरी डेट चार महिन्यानंतर संपलेली असते. ती पाकिटे मुंबई, पुण्यावरुन येतात. अंगवाड्यांमध्ये ती पाकिटे तशीच पडून राहतात. तीन चार महिने संपत आल्यानंतर त्याला बुरशी लागल्यानंतर ती पाकिटे लोकांना वाटली जातात आणि त्यांना सांगितले जाते की याचा शिरा करा किंवा सात्विक कणकेचा काही तरी आहार करा. त्या महिला एक तर अशिक्षित असतात, गरीब असतात. त्यांची मुले कुपोषित आहेत. अशा ठिकाणी त्यांना आपण प्रात्यक्षिक करुन दाखविणार आणि त्यानंतर त्या आहार तयार करणार. अनेक पाकिटे कचऱ्याच्या कुंडीत सापडलेली आहेत. अशा प्रकारे शासनाचे पैसे खर्च होत आहेत परंतु त्यामध्ये कुपोषणग्रस्त मुलांना तो आहार मिळावा असे शासनाचे जे चांगले उद्दिष्ट आहे ते उद्दिष्ट पूर्ण होत नाही. त्यासाठी शासनाने काही तरी वेगळी उपाययोजना केली पाहिजे.

पुणे, नागपूर येथून तो आहार येतो आणि त्याची मुदत चार महिन्यात संपते. त्यामुळे प्रत्येक घरात जाऊन तो आहार कसा बनवावा हे सांगण्यापेक्षा तालुका पातळीवर किंवा गाव पातळीवर प्रात्यक्षिक द्यावे. कारण शिरा आणि कणकेचे पदार्थ कसे करावयाचे हे गावातील महिलांना न कळण्यासारखे मोठे पदार्थ नाहीत. शासन या संदर्भात तेथल्या तेथे काही उपाययोजना करणार आहे का ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्यामध्ये त्यांनी सांगितले की, या संदर्भात सेविकाना सुध्दा माहिती असते. आपला जी.आर. सुस्पष्ट आहे. त्याची प्रत मी सन्माननीय सदस्यांना नंतर पाठवून देते. 24 ऑगस्ट, 2009 चा जो जी. आर. आहे त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, सेविकांनी या संदर्भातील माहिती मातांना द्यावी आणि तो आहार कसा बनवावा या संदर्भातील प्रशिक्षण सुध्दा द्यावे. या आहाराच्या बाबतीत काय काय रेसीपीज करता येतात या संदर्भात सुध्दा शासनाने परिपत्रक काढून पाठविलेले आहे. मी जो अनुभव घेतला त्यामध्ये नागपूर असेल, गोंदिया असेल, या ठिकाणी सेविकांच्या माध्यमातून, सुपरवायझर्सच्या माध्यमातून अशा प्रकारच्या टीएचआरच्या माध्यमातून काय विविध पदार्थ तयार करता येतात या संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले आहे. आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून आणि ज्या संस्था पुरवठा करतात त्यांच्या माध्यमातून सुध्दा यशदामध्ये प्रशिक्षण देण्यात आले. औरंगाबाद, नागपूर अशा ठिकाणी प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये मुख्य सेविका, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आणि सेविका यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मधल्या काळामध्ये ताज हॉटेलने पुढाकार घेऊन त्यांच्या माध्यमातून पदार्थ कसे बनविता येतील आणि त्यामध्ये न्युट्रिशन व्हॅल्यू कशी असेल या बाबतीत सुध्दा प्रशिक्षण दिले होते.

सन्माननीय सदस्यांनी जी एक गोष्ट सांगितली ती मान्य करावयास पाहिजे की, जोपर्यंत यामध्ये मातांचा सहभाग होत नाही आणि मातांना प्रशिक्षण मिळत नाही तोपर्यंत हे होणे शक्य नाही. सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली त्यामध्ये त्यांनी तालुका पातळीचा उल्लेख केला पण तालुका फार मोठा असतो म्हणून खरे तर बीट लेव्हललाच हे प्रशिक्षण द्यावयास पाहिजे आणि हे प्रशिक्षण सातत्याने द्यावयास पाहिजे. या दृष्टीकोनातून आम्ही प्रयत्न करीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न अनेकदा या सभागृहामध्ये आलेला आहे. टीएचआर ही संकल्पना जरी चांगली असली तरी ती शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही ही वस्तुस्थिती अमान्य करुन चालणार नाही. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, सबला योजनेअंतर्गत टीएचआर ही योजना काही जिल्ह्यांपुरती मर्यादित आहे. शासनाकडून सर्व महाराष्ट्रभर टीएचआर पुरविला जातो का ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, किशोरवयीन मुलींना सक्षम मातृत्व लाभावे यासाठी सबला योजना राबविली जाते. माता अशक्त असल्यामुळे कुपोषित बालके जन्माला येतात. त्या मुलींना माता होण्यापूर्वी सशक्त केले तर ते जास्त संयुक्तिक ठरेल. त्यादृष्टीने सबला आहार योजना राज्यातील सर्व किशोरवयीन मुलींना लागू केली जाईल काय आणि तिसरा प्रश्न असा आहे की, शासनाने कुपोषित बालकांच्या आकडेवारीत घट झाल्याचे नमूद केलेले आहे. ही घट तात्पुरती आहे की कायम स्वरुपी आहे ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, राजीव गांधी सबलीकरण योजना किशोरवयीन म्हणजे 11 ते 18 वर्षांच्या मुलींसाठी आहे. या योजनेद्वारे या मुलींना सकस आहार दिला जातो. ही योजना केंद्र सरकारची असून ती केवळ 11 जिल्ह्यांना लागू आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यातील ज्या मुली भविष्यात माता होणार आहेत त्यांच्यासाठी सुध्दा ही योजना लागू करावी असे केंद्र सरकारला शासनाने कळविलेले आहे. सध्या ज्या जिल्ह्यात सबला योजना चालू नाही तेथे किशोर शक्ती ही योजना सुरु आहे. त्या योजनेत सर्व मुली कव्हर होत नाहीत. म्हणून सबला योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांना लागू करण्याची केंद्र सरकारला शासनाने विनंती केलेली आहे. केंद्र सरकारने टी.एच.आर.च्या संदर्भात विभागाला मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने निर्देशही दिलेले आहेत. टी.एच.आर.योजनेची कार्यवाही कशाप्रकारे सुरु आहे आणि त्याचा फायदा कसा झाला आहे याची जिल्हानिहाय माहिती मी सभागृहाला देऊ शकते. जुलै, 2010 या महिन्याची माझ्याजवळ माहिती आहे. त्यानुसार गंभीर तीव्र कमी वजनाची मुले 4 टक्के होती, त्यात घट होऊन ते प्रमाण 1.98 इतके झालेले आहे. या योजनेचे काम चांगल्या प्रकारे सुरु आहे.

श्री.जयवंतराव जाधव : पोषण आहारासंबंधी अनेक तक्रारी आलेल्या आहेत. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात पोषण आहाराच्या पाकिटात एक पाल सापडली होती. अशा प्रकारच्या तक्रारी वारंवार केल्या जातात. त्याची दखल घेऊन शासन पोषण आहार योजनेत सुधारणा करणार आहे काय ? दिंडोरीत पोषण आहाराच्या पाकिटात पाल सापडल्यानंतर त्या आहाराची तपासणी कोणत्या प्रयोगशाळेत केली पाहिजे यासंबंधी अधिकाऱ्यांमध्ये कलगीतुरा रंगला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

होता. नाशिक जिल्हा परिषदेत श्री.इंगोले नावाचे अधिकारी आहेत. जिल्हा परिषदेने श्री.इंगाले यांना तत्काळ कार्यमुक्त करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे. त्या ठरावाची शासन अंमलबजावणी करणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगेन की, ही बाब तपासून पहावी लागेल. पहिल्या प्रश्नाबाबत मी सांगेन की, टी.एच.आर.चा आहार पावडर स्वरुपात असतो. ते पाकिट उघडल्यानंतर त्यात पाल गेली असावी. तरीही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे मानून याबाबत तपास करण्यात येईल. टी.एच.आर.मध्ये अगोदरच पाल होती की महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून तयार केलेल्या आहारात ती होती हे तपासून त्याबाबतची माहिती सन्माननीय सदस्यांना अवगत केली जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या टी.एच.आर.चे सेल्फ लाईफ 4 महिन्याचे असते ते वाढविणे शक्य आहे. त्यामुळे ते लवकर खराब होणार नाही. सध्या पॅकिंगच्या अनेक पध्दती सुरु झालेल्या आहेत त्यामुळे त्यातील पदार्थांचे सेल्फ लाईफ वाढविता येते.

त्याच प्रमाणे रेडी टू कूक असे पदार्थ बाजारात उपलब्ध आहेत. तो पदार्थ तयार करण्याची माहिती पाकिटावर छापलेली असते. तशा प्रकारे रेसिपीची माहिती टी.एच.आर.च्या पाकिटांवर दिलेली असेल तर संबंधितांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता नाही. तशी व्यवस्था टी.एच.आर.च्या पाकिटांवर दिलेली नसेल तर ती केली जाईल काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

प्रा. वर्षा गायकवाड : अंगणवाडी सेविकांच्या जागेमध्ये माल उतरविला जातो. त्यामुळे आपणाला त्यांच्याकडे जास्त माल देता येत नाही. त्यामुळे क्वॉर्टरली माल दिला जातो. एक्स्पायरी डेटच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्याप्रमाणे आपण व्यवस्था करु शकतो. तसेच पदार्थ तयार करण्याच्या संदर्भात पाकिटावर प्रत्येक वेळी 2 वेगवेगळया रेसिपी देण्याच्या बाबतीत सूचना देता येईल.

श्री. विद्या चव्हाण : मघाशी सन्माननीय सदस्यांनी पालीचा उल्लेख केला. ती पाल टीएचआरच्या पाकिटातूनच निघालेली आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सातू, पेज, शिरा ह्या गोष्टी करणे अवघड नाही. त्याला फार मोठे कौशल्यही लागत नाही. हे टीएचआर राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये जाणार आहेत. तेव्हा तालुकास्तरावरच ही पाकिटे तयार करुन त्यांचे वाटप केले तर ताजे अन्न मिळू शकेल आणि खर्चही वाचू शकेल. तेव्हा यादृष्टीने शासन काही विचार करणार आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : पालीच्या संदर्भात मी तपास करते असे सांगितलेले आहे. तसेच बीट लेव्हलला मी सांगितलेले आहे. टीएचआर पासून केवळ पेज, शिरा हेच पदार्थ नाही तर चकली, लाडू, चिवडा असे विविध पदार्थ बनविता येतात.

---

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : विज्ञान संस्था बंद पडण्याच्या मार्गावर असणे
याबाबत डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच▯ मांडतो.

"गेल्या 20-25 वर्षापासून आयआयटी/टीआयएफआर या सारख्या संस्थांची बरोबरी करणारी विज्ञान संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहे. शासनाने विकासासाठी निधी उपलब्ध केला. सर्वोत्तम दर्जाची उपकरणे खरेदी केली पण संशोधनाचा वेग वाढला नाही. पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नाही. 1980 च्या सुमारास पदवी शिक्षण बंद झाले आणि फक्त पदव्युत्तर पदवी देणारी संस्था राहिली. या संस्थेला संशोधनाची जोड दिली असली तरी या संस्थेला स्थिर शैक्षणिक धोरण देण्याच्या बाबतीत शासन अपयशी ठरलेले आहे. झुऑलॉजी, बॉटनी, केमिस्ट्री या पदासाठी प्राध्यापकांची संख्या 2 वरुन 1 वर आणली. पण निष्ठावंत प्राध्यापकांनी ही संस्था जिवंत ठेवली. 1994 मध्ये 14 पदासाठी जाहिरात देऊनही 2 पदे भरण्यात आली. त्यानंतर पुन्हा 12 पदांची जाहिरात दिल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग कोर्टात गेले आणि भरती प्रक्रिया थांबली. ही विज्ञानसंस्था महाराष्ट्राचे भूषण असून ती जगली पाहिजे, तेथे संशोधन झाले पाहिजे म्हणून या विशेष उल्लेखामार्फत ही विज्ञान संस्था जगवा, तिच्या मार्गातील अडथळे दूर करा अशी विनंती मी शासनास करीत आहे."

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : माथाडी मंडळावर कमी दराने मजुरी स्वीकारण्याबाबत टाकण्यात येणारा दबाव याबाबत ॲड. उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"दिनांक 19.4.2012 रोजी माननीय नामदार श्री. अनिल देशमुख यांच्याकडे हमालाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी माननीय श्री. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत झालेल्या निर्णयाचा भंग करुन 2011-2014 या कालावधीसाठी मजुरीचे आधारभूत दर कमी करणे, माथाडी मंडळाडे कार्यरत दरापेक्षा कमी दराने मजुरी स्वीकारण्याबाबत दबाव आणला जात असणे. सदर प्रकरण राज्य शासनाकडे मार्गदर्शनासाठी असताना स्थानिक संबंधित सर्व अधिकारी माथाडी मंडळावर दबाव आणत असणे, त्यामुळे हमालांमध्ये पसरलेली असंतोषाची भावना व त्यावर शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना."

---

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ KTG/ पूर्वी श्री.शिगम.. 13:50

**पृ.शी./मु.शी.**: संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हिंस्त्र प्राणी व बिबट्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी त्या परिसरात संरक्षण भिंत बांधणे या बाबत श्री.चरण सिंग सप्रा,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुलुंड (पश्चिम) येथील शंकर टेकडी, राहूल नगर, पंचशील नगर आणि हनुमानपाडा झोपडपट्टी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान जंगलाच्या पायथ्याशी आहे. या ठिकाणी संरक्षण भिंत नसल्यामुळे या परिसरात नेहमी बिबट्याचा वावर असतो. दिनांक 22 एप्रिल, 2012 रोजी सायप्रस येथील एन.ई.एस.शाळेत बिबट्या पूर्ण दिवस ठाण मांडून बसला होता. त्यानंतर पोलीस आणि वन विभागाच्या यंत्रणेने बिबट्यास पकडून जंगलात नेऊन सोडले. दिनांक 15 जुलै, 2012 रोजी रात्री 10.30 च्या सुमारास शंकर टेकडी झोपडपट्टीमधील श्री.ज्ञानेश्वर थोरात यांची सहा वर्षाची मुलगी संजना थोरात हिच्यावर बिबट्याने अचानक हल्ला करुन संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात उचलून नेले. रात्री उशिरापर्यंत मुलीचा शोध घेण्यात आला, परंतु ती सापडली नाही. दिनांक 16 जुलै, 2012 रोजी जंगलामध्ये दोन किलोमीटर अंतरावर एका झुडपात तिचे फक्त मुंडके सापडले. पूर्ण शरीर बिबट्याने खाऊन टाकले होते. त्यामुळे या परिसरात बिबट्याची दहशत निर्माण होऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री.ज्ञानेश्वर थोरात यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय बिकट असून ते हलाखीचे जीवन जगत आहेत. त्यांना शासनाकडून आपत्कालीन भरीव आर्थिक मदत देण्यात यावी. तसेच या परिसरातील रहिवाशांना संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हिंस्त्र प्राणी आणि बिबट्यापासून संरक्षण मिळावे यासाठी तेथे भिंत बांधण्यासाठी निधी देण्यात यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

--------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महाराष्ट्र शुश्रुषा परिषदेने ए.एन.एम व जी.एन.एम. या अभ्यासक्रमांच्या संस्था उघडण्यास अनिधकृतपणे परवानगी देणे या बाबत डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र शुश्रुषा परिषदेने सन 2005-2006 या शैक्षणिक वर्षापासून ते सन 2011-2012 च्या शैक्षणिक वर्षापर्यंत ए.एन.एम. व जी.एन.एम. या अभ्यासक्रमांच्या शेकडो संस्था उघडण्यास अनधिकृतपणे परवानगी दिली आहे. या अभ्यासक्रमांच्या जागा अनधिकृतपणे वाढविणे, अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क अनधिकृतपणे ठरविणे, त्यासाठी शेकडो संस्था चालकांकडून परिषदेचे अध्यक्ष व प्रबंधक यांनी कोट्यवधी रुपयांची लाच घेणे, तसेच अधिकार नसताना परवानगी देऊन संस्था चालकांची,गोरगरीब विद्यार्थ्यांची फसवणूक केलेली आहे. अनधिकृत संस्थांना परवानगी दिल्यामुळे अध्यक्ष व प्रबंधक हे गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती थांबविण्यास जबाबदार आहेत. अध्यक्षांनी एक वर्षापूर्वी पाठ्यनिर्देशक या पदाचा राजीनामा दिल्याने ते परिषदेचे सदस्यपद धारण करण्यास अपात्र आहेत. त्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र परिचारिका अधिनियम 1966 च्या कलम 40 (2) अंतर्गत शासनाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच कलम 40 (1) अंतर्गत परिषद विसर्जित करण्याची गरज आह. श्री. माळी व श्री. अंचन यांच्या विरुध्द भ्रष्टाचार व फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्या बाबत शासन टाळाटाळ करीत आहे. तेव्हा या बाबत शासनाने कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखद्वारे शासनास विनंती करीत आहे. .

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उजनी धरणासाठी संपादित करण्यात आलेल्या मंगळवेढा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी शासकीय दराने परत करणे या बाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, अंदाजे 20 वर्षापूर्वी उजनी धरणातील पाणी मिळणार म्हणून मंगळवेढा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी शासनाने काढून घेतल्या. पण अद्याप त्यांना पाणी मिळालेले नाही. त्या बदल्यात मूळ मालकांस कवडीमोल भावाने 2700 रुपये एकराने किंमत देऊ केली. 10-15 वर्षे न्यायालयात केस चालल्यानंतर 20 हजार एकर प्रमाणे दर देण्याचे ठरले. परंतु प्रकल्पग्रस्तांना ज्या जमिनी मिळाल्या त्यामध्ये जे 21 आदेश घातले होते त्या 21 आदेशांचा प्रकल्पग्रस्तांनी भंग केलेला आहे. या जमिनी विकता येत नसताना तेथील सरकारी अधिकाऱ्यांच्या सहाय्याने विकल्या जात आहेत. मूळ कारणाकरिता घेतलेल्या जमिनीचे मूळ कारण पूर्ण न झाल्यामुळे त्या मूळ मालकांना परत द्याव्यात अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आरेवाडी ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली या गावातील शेतकऱ्यांना कपंनीने कापसाची बनावट बियाणे दिल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान या बाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

आरेवाडी, ता.कवठेमहांकाळ जि.सांगली गावातील शेतकऱ्यांनी कापसाचे कृषीधन बीटी बियाणे वापरुन कापूस पिकाची पेरणी केली आहे. रोपटे चांगली आली आहेत. बोंडेसुध्दा चांगली आहेत, पण बोंडातून कापूस येत नाही. जिल्हा कृषी अधिकारी व पंचायत समिती अधिकाऱ्यांनी पाहणी केली असता कंपनीने बनावट बियाणे दिल्यामुळे पीक आले नाही असे सांगितले व बनावट बियाणे देणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांच्या निदर्शनास ही बाब आणणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. ठिबक सिंचन, शेणखत, रासायनिक खते, औषधी फवारणी यासाठी शेतकऱ्यांनी खर्च करुन पेरणी केली. शेतकऱ्यांना एकरी खर्च अंदाजे 50 हजार रुपये आला. बोंडातून कापूस येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न मिळण्याची शक्यता नाही. तेव्हा शेकडो एकर जमिनीवर लावलेल्या कापूस पिकांवर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांचे लाखो रुपयांची नुकसान झाले असून त्यांच्यात तीव्र संताप निर्माण झाला आहे. तेव्हा शेतकऱ्यांना कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

-------

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यातील जलतरणपटूंना पोषक वातावरण नसल्याने ते परराज्यात करीत असलेले स्थलांतर याबाबत डॉ.नीलम गो-हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात जलतरणासाठी पोषक वातावरण बिलकुल नसतांनाही राष्ट्रीय सब ज्युनिअर,ज्युनिअर जलतरण स्पर्धेत सांघिक जेतेपद राज्यातील मुले-मुली पटकावित असणे, महाराष्ट्र जलतरण संघटना, महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन आणि शासन हे उदासीन असणे, राज्यातील जलतरणपटुंना शेजारच्या कर्नाटकांचा आसरा घ्यावा लागणे, तसेच मुंबई ही भारताची राजधानी असूनही पुरेसे जलवातावरण तलाव नसावेत ही खेदजनक बाब असणे आणि जे जलतरण आहेत ते खाजगी, त्यांची फी सर्वसामान्य नागरिकांना न परवडणारी असणे आणि सरकारचाही मदतीचा हात नसणे, खे्ळाडूसाठी सराव शिबीर वा मार्गदर्शन नसणे, राज्यात वानवा आहे ती जलतरण तलावांची, ऑलिम्पिक साईज 50 मीटरचे जलतरण तलाव मुंबईत फारसे नाहीत. तसेच महापालिकेचे तलाव या ना त्या करणासाठी बहुतांश दिवस बंद असणे, या सर्व परिस्थितीमुळे राज्यातील खेळाडू परराज्यात जात असून त्यांना रोखण्यासाठी राज्य शासनाकडून कोणतेच प्रयत्न होत नसल्याचे दिसत आहे. तरी याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी तत्काळ निवेदन करावे, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी** : राज्यात दूषित पाणी साठयांची होत असलेली वाढ याबाबत प्रा.सुरेश नवले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्यात अतोनात उपसा करत भूगार्भातील पाणीपात सुरु असताना उपलब्ध पाण्यात दूषित घटकांची बांधा मोठया प्रमाणात पसरत असून राज्यातल्या तब्बल 9845 गावातील पाणीसाठी बाधित झाले असून यामध्ये जलस्वराज्य प्रकल्पातल्या 1075 गावांचे पाणी पिण्यास योग्य नसल्याची माहिती समोर आलेली आहे. राज्यातल्या औरंगाबाद, उस्मानाबाद, सातारा, सांगली, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, अकोला, जळगांव, रायगड, ठाणे, अहमदनगर, आणि बीड या जिल्हयात पाणीसाठे दूषित होण्याचे प्रमाण झपाटयाने वाढत आहे. अहमदनगर, उस्मानाबाद आणि बीड या जिल्हयातल्या पाण्यात क्षारांचे प्रमाण गुणाकार पध्दतीने वाढत असल्याने पाणीसाठी बाधीत होत आहे तर औरंगाबाद शहराच्या 2 किलोमीटर परिसरात एकाही विहिरीचे पाणी पिण्यास योग्य नसल्याचे आढळून आलेले आहे. राज्यातील एकत्रित पाणलोटापैकी दूषित पाण्याच्या संदर्भात 154 पाणलोट अतिदक्षतेचे बनले असून यापैकी 50 पाणलोट क्षेत्र पूर्णपणे दूषित झालेले आहेत. अशा या प्रकारामुळे वरील शासनाने सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करुन सदर भागात शुध्द पाणी पुरवठा होण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. या बाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधीत आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : शिक्षक समुपदेशकांना विशेष वेतन देणे याबाबत श्री. निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील शिक्षक समुपदेशकांच्या विशेष वेतन सुधारणा व चर्चा सत्रांवरील बंदी उठविण्याची मागणी सातत्याने होत आहे. समुपदेशकांना मिळणारे पाचव्या वेतन आयोगाचे विशेष वेतन रद्द करण्यात आले आहे. राज्यातील व्यवसाय मार्गदर्शन पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांना शिक्षक समुपदेशक म्हणून संबोधले जाते. त्यांनी दैनंदिन अध्यापनाचे काम करत शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांना दहावी व बारावी नंतर पुढे काय यासंबंधी मानशास्त्रीय कसोटीव्दारे मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात. या कामासाठी अशा शिक्षक समुपदेशकांना या पूर्वीच्या वेतन आयोगामध्ये सुचविलेल्या शिफारशीनुसार वेळोवेळी शासनाने विशेष वेतन दिले आहे. सदरचे विशेष वेतन सहाव्या वेतन आयोगात नाकारल्यामुळे समुपदेशनाच्या कामावर विपरित पणिाम होणार असून शासनाने हाती घेतलेल्या व्यवसाय मार्गदर्शन मोहिमेस खीळ बसणार आहे. तरी वेतना बरोबर दरमहा किमान रुपये 1,000/- इतके विशेष वेतन म्हणून मंजूर करण्यात यावे. या प्रकरणी शासनाने तातडीने उपाययोजना व कार्यवाही करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे मागणी करीत आहे.

------------------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : नागपूर विद्यापीठातील 298 महाविद्यालयात शिक्षक नसणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" राष्ट्रसंत तुकडोजी नागपूर विद्यापीठातील 298 महाविद्यालयात एकही नियमित शिक्षक नसून उधारीवर आणलेल्या शिक्षकांच्या भरवशावर महाविद्यालये सुरु आहेत. यापैकी मोठया संख्येने कला,वाणिज्य आणि विज्ञान शाखेची महाविद्यालये आहेत. यापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे 350 च्या वर महाविद्यालयात प्राचार्य देखील नाहीत. ही सगळी परिस्थिती अशी आहे की, या महाविद्यालयांना अनुदान मिळत नाही. उमेदवार उपलब्ध आहेत. नेटसेटची परीक्षा पास झालेले आहेत. पी.एच.डी. धारक आहेत तरी सुध्दा या खाजगी संस्था "सुटेबल कॅन्डीडेट नॉट फाऊंड"असा शेरा मारुन नियुक्त्या करीत नाहीत.त्यामुळे शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रामध्ये शिक्षकच नसल्यामुळे हा एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याकडे शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने तातडीने लक्ष घालून कारवाई करण्याची मी विनंती करीत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा गंभीर विषय आहे. आपल्या दालनात सर्व संबंधितांची एक बैठक घ्यावी अशी माझी विनंती आहे. उमेदवार आहेत आणि नॉट फाऊंड असे सांगतात हे बरोबर नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. यासाठी संबंधितांबरोबर बैठक घेऊ.

अनेक माननीय सदस्य आयत्यावेळी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी परवानगी मागत आहेत. एक-दोनच माननीय सदस्यांना अशी परवानगी देता येईल.

-------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : सोलापूर जिल्हयातील अंगणवाडी केंद्रांना इमारती न मिळणेबाबत श्री.दीपक साळुंखे-पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. दीपक साळुंखे-पाटील ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

" सभापती महोदय, सोलापूर जिल्हयासाठी मंजूर असलेल्या 3264 अंगणवाडयांपैकी फक्त 1858 अंगणवाडयांनाच स्वत:च्या इमारती आहेत. तर उर्वरित अंगणवाडया या मंदिर, समाजमंदिर, शाळा तर काही उघडयावर भरत आहेत. तसेच जिल्हयातील अंगणवाडयांपेक्षा मिनी अंगणवाडयांचे चित्र फारच विदारक असून जिल्हयात 911 मिनी अंगणवाडया सुरु असून त्यापैकी 6 मिनी अंगणवाडयांना इमारती आहेत तर इतर मिनी अंगणवाडया या जागा मिळेल त्याठिकाणी भरतात. तसेच सोलापूर जिल्हयासाठी मिनी अंगणवाडी सेविकांची 981 पदे मंजूर आहेत त्यापैकी 681 पदे भरलेली आहेत तर 300 पदे सध्या रिक्त आहेत. जिल्हयातील अंगणवाडयांसाठी मदतनिसची 3269 पदे मंजूर असून त्यापैकी फक्त 3004 पदे भरलेली आहेत. उर्वरित 265 पदे रिक्त आहेत. अंगणवाडी सेविकांची 3269 पदे मंजूर असून त्यापैकी 100 पदे रिक्त आहेत. सोलापूर जिल्हयात अंगणवाडया, मिनी अंगणवाडया इमारतींची अवस्था अत्यंत बिकट असून तेथील सेविका व मदतनीसची अवस्था त्याच प्रकारची आहे. वरील सर्व बाबींची शासनाने तातडीने चौकशी करुन वरील इमारतीची बांधकामे व तेथील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी, म्हणून मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे. कृपया तो स्वीकृत करावी ही विनंती.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :भंडारा जिल्हयातील शेतकऱ्यांना धानाचे पैसे मिळणे याबाबत श्री.केशवराव मानकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास अनुमती दिल्याबद्दल मी आभारी आहे. माननीय अन्न व नागरीपुरवठा मंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यामुळे या विषयाला तात्काळ न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

"भंडारा जिल्हयातील शेतकरी चिंताग्रस्त आहे. रब्बी धानाचे पीक आले होते ते शासकीय खरेदी केंद्रावर दिलेले असून मार्केटींग फेडरेशनने अजून पेमेंट दिलेले नाही. 10 कोटी रुपयांची थकबाकी आहे. सिओरा केंद्राचे 59 लक्ष 9 हजार 650 रुपये, तुमसर सेंटरचे 17 लाख 6 हजार 630 रुपये आणि अन्य सेंटरचे पेमेंट थांबलेले आहे. सध्या पावसाळ्याचा हंगाम असून शेतकऱ्याला पैशाची नितांत गरज आहे. म्हणून आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, 3 दिवसांच्या आत शेतकऱ्यांचे पेमेंट करावे.

श्री. अनिल देशमुख : ठीक आहे. कारवाई करण्यात येईल.

**उप सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता मी ठरवून दिलेल्या विशेष उल्लेखांव्यतिरिक्त आणखी 1/2 सन्माननीय सदस्यांनाच विशेष उल्लेख मांडण्याची परवानगी देईन. परंतु 4/5 सदस्यांनी अशी परवानगी मागितली तर माझी परिस्थिती काय होईल याचा विचार करावा. विशेष उल्लेखाच्या सूचना सदस्यांनी माननीय सभापतींच्या कार्यालयात योग्य वेळेत देणे आवश्यक आहे.

---

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: बुलढाणा जिल्हयात कापूस पिकावर अज्ञात रोगाचा झालेला दुष्परिणाम

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, विदर्भामध्ये आतापर्यंत पावसाने दडी मारली होती. परंतु मागील दोन दिवसापासून काही प्रमाणात पाऊस सुरु झाला आहे. आतापर्यंत कृषी पिकांवर आलेल्या रोगासंबंधी आपल्याला माहिती मिळत होती. बुलढाणा जिल्हयातील नांदूरा तालुक्यात कापूस पिकावर अज्ञात रोग पडल्यामुळे 2 हजार हेक्टर क्षेत्रातील पीक वाया गेले आहे. शास्त्रज्ञांनी पाहणी केल्यानंतरही त्यांना हा रोग कोणता आहे याचे निदान करता आले नाही. नांदूरा तालुक्यातील 113 गावांमधील वहिवाटीखालील जमिनीचे एकूण क्षेत्र 50364 हेक्टर इतके असून या हंगामात 47819 हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली असून त्यापैकी जवळपास 2 हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाचा पेरा आहे. या कापूस पिकावर जो रोग पडला आहे त्या रोगाचे अद्याप निदान झालेले नाही. 2 हजार हेक्टर क्षेत्रावरील कापूस जळून खाक झाला आहे. शेतकरी दुबार पेरणी करु शकत नाही. पाऊस झाल्याने पूर्ण पीक नष्ट झाले आहे. दुबार पेरणीसाठी बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अडचणीत असल्यामुळे आर्थिक मदत करु शकत नाही. शेतकऱ्यांना बँकेचे किंवा सावकाराचे कर्ज मिळत नाही म्हणून ते अडचणीत आले आहेत. शासनाने या विषयाची गांभीर्याने नोंद घ्यावी व हा रोग कोणता आहे याचा शोध घ्यावा. 2 हजार हेक्टर क्षेत्रावरील कापूस पीक नष्ट झाले आहे त्या संबंधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची शासनाने भूमिका स्वीकारावी अशी मी विनंती करतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांकडे अशैक्षणिक कामाची जबाबदारी दिली जात असल्याबाबत

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांकडे जनगणना व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीचे काम वगळता अन्य कामे देऊ नयेत असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अवहेलना करुन जिल्हाधिकारी, नागपूर व जिल्हाधिकारी, वर्धा यांनी मतदार यादींचे पुनर्निरीक्षण करण्याचे काम शिक्षकांना देणे, अन्य जिल्हयातही अशाच प्रकारची शिक्षकांना कामे दिली जाणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या डेक्कन ओडिसी या पर्यटनासाठी तयार केलेल्या ट्रेनमधून विधिमंडळ सदस्यांचा पर्यटन अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने डेक्कन ओडिसी ही ट्रेन परदेशी व भारतीय पर्यटकांच्या पर्यटनासाठी सुरु केलेली आहे. ही ट्रेन संपूर्ण महाराष्ट्रातून प्रवास करते. त्यामध्ये प्रामुख्याने कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयाचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने यापूर्वी सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा घोषित केलेला आहे. सद्य:स्थितीत डेक्कन ओडिसी ट्रेन बंद असून ती पूर्ववत सुरु करावी आणि त्यातून कोकण विभागातील विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा. विशेषत: कोकण विभागातील सदस्यांना पर्यटनाचा व पर्यटनाच्या विविध अंगांचा अभ्यास करण्यासाठी त्याचा नक्की फायदा होईल. म्हणून फक्त विधिमंडळ सदस्यांचा डेक्कन ओडिसी ट्रेनमधून तीन दिवसांचा मोफत अभ्यास दौरा आयोजित करण्याबाबत व त्यासंबंधी आवश्यक सूचना संग्रहित करुन त्यासंबंधीचा एक स्वतंत्र आराखडा तयार करावा अशा प्रकारची विशेष उल्लेखाची सूचना मी मांडतो.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर मंदिरातील मौल्यवान वस्तूंचा पंचनामा करणे व भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, उस्मानाबाद येथील तुळजाभवानी मंदिरातील मौल्यवान वस्तूंचा योग्य प्रकारे पंचनामा न होणे, मंदिराचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न होणे, दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना योग्य अशा सोयी सुविधा उपलब्ध नसणे, तुळजापूर येथे यात्रा महोत्सव असताना साफसफाई योग्य प्रकारे न ठेवल्याने येणाऱ्या भाविकांना अनेक रोगराईचा सामना करावा लागणे, तुळजापूर मंदिरासाठी भक्तांनी देऊ केलेल्या वस्तू, दागिने व देणग्या यांचा पंचनामा करुन लोकोपयोगी कामासाठी उपयोगात आणणे आणि भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

---------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचा मुद्दा**

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवलीहून सहा किलोमीटरवर महामार्गालगत असलेली वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँक दि. 2.1.2012 रोजी वा त्या सुमारास फोडून साडेचार लाखांची रोख रक्कम व गहाण ठेवलेले 151 तोळे दागिने मिळून सुमारे 50 लाखांचा ऐवज लंपास होणे, सदरहू प्रकरणी शाखा व्यवस्थापकांनी स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली आहे. अद्यापपर्यंत या प्रकरणी एकाही आरोपीला अटक न होणे, दि. 19.7.2012 रोजीच्या सुमारास रत्नागिरी करबुडे येथील याच बँकेची शाखा फोडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता, त्यानंतर रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती बँकेची भांबेड येथील शाखा फोडून सुमारे साडेतीन लाखांचा ऐवज लुटण्यात येणे, त्याचबरोबर 15 फ्लॅटमध्ये चोरी केली, अशा प्रकारे आणखी दोन तीन बँकांमध्ये चोरी झालेली आहे. या सर्व प्रकरणांचा तपास व या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी विशिष्ट उपाययोजना करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात वारंवार अशा घटना घडत असल्याने सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेले चिंतेचे वातावरण, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था दिवसेदिवस ढासळत चालली असून याबाबत शासनाने कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याने मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

-------

**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होऊन दुपारी 2.45 वाजता पुनः भरेल.

( दुपारी 2.11 ते 2.45 मध्यंतर )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडावयाची होती परंतु त्यांना अगोदर संधी न मिळाल्यामुळे त्यांना मी आता विशेष उल्लेखाचा एक सूचना मांडण्याची परवानगी देत आहे.

**पृ.शी./मु.शी.** : पुणे महानगर पालिकेमध्ये 15 गावांनी समाविष्ट होण्यास नकार देणे, डीपी रस्ता तयार झाला नसून तो तयार करण्या करिता अनियमित बांधकामे हटविण्याची आवश्यकता याबाबत श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "पुणे महापालिकेमध्ये 1997 मध्ये 38 गावे समाविष्ट करण्यात आली आहेत, 15 गावांनी महापालिकेत समाविष्ट होण्यास नकार दिल्यामुळे, यातील काही गावे महापालिकेत अंशत: समाविष्ट झाली होती, सन 2005 मध्ये समाविष्ट गावांचा विकास आराखडा मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला असता नुकताच तो मंजूर झला आहे, मागील पंधरा वर्षे या उपनगरांची हेळसांड झालेली असून, प्रथमत: पायाभूत सुविधा असलेले डी.पी. रस्ते बनविणे आवश्यक असूनही याकडे पुणे महापालिकेचे दुर्लक्ष झालेले आहे, विकास आराखडा मंजूर नाही हे कारणही आता मनपा प्रशासनाकडे नाही, निवडणुका जाहीर झालेल्या असतांनाच डी.पी. मंजूर झालेला असूनही विकास आराखडयाच्या अंमलबजावणीत मनपा दिरंगाई करत असल्यामुळे पुणे परिसरातील जनतेत नाराजीची भावना पसरलेली आहे, अशंत: समाविष्ट झालेल्या गावांचा त्यांच्याच भागाशी संपर्क तुटतो, महापालिकेच्या हद्दी पलीकडे ग्रामपचांयतीमध्ये अनिर्बंध अनियमित आणि बेकायदा बांधकामे झालेली आहेत परिणामी, वाढलेली प्रचंड लोकसंख्या यामुळे नवीन नगारी वस्त्यांना रस्ते अपघातांचा धोका वाढलेला आहे. किमान एक तरी डी.पी. रस्ता करण्याबाबत होत असलेली मागणी, सर्व डी.पी. रस्ते करतांना आडवी येत असलेली अनियमित बांधकामे हटवून रस्ते

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

रुंदीकरण करण्याची आवश्यकता, कोणाचेही लाड न करता विकास आराखडयातील 9 मीटर पासून 18 मीटर आणि पुढील रस्त्यांची कामे मनपाने करण्याची होत असलेली मागणी याकडे पुणे महापालिकेने केलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून पुणे शहरातील उपनगरातील सर्व डी.पी. रस्ते तत्काळ तयार करण्याचे आदेश पुणे महापालिकेला द्यावेत, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे."

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महानगरपालिका व नगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. XII OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : महोदय, सन 2012 चे वि.प.वि.क्र. 12 - मुंबई महानगर पालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगर पालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगर पालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्र. 12- महाराष्ट्र महानगर पालिका व नगर परिषदा (दुसरी सुधारणा) विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 46 अन्वये निवेदन**

**पृ.शी.**: वडाळा येथे मोनोरेलचा गर्डर कोसळल्यामुळे झालेला अपघात.
**मु.शी.**: वडाळा येथे मोनोरेलचा गर्डर कोसळल्यामुळे झालेल्या अपघातासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

दक्षिण मुंबईतील ऑरेंज द्वारपासून आणिक या पूर्व उप नगराकडे जाण्यासाठी पूर्व मुक्त मार्ग उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचे कंत्राटदार मे. सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. असून मे. कन्सल्टिंग इंजिनिअरिंग सर्विसेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आहेत. या प्रकल्पात 9.29 कि.मी. लांबीच्या उन्नत मार्गावर 4 मार्गिका असतील. जानेवारी, 2008 मध्ये सुरु झालेला हा प्रकल्प जानेवारी, 2013 पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पात एकूण 313 स्पॅन्स उभारावयाचे असून त्यापैकी 267 स्पॅन्स यशस्वीपणे पूर्ण करण्यात आलेले आहेत.

दिनांक 19 जुलै, 2012 रोजी रात्री 9.30 च्या सुमारास कस्टम एन्क्लेव्ह, शांतीनगर जवळ, स्पॅन क्रमांक 381-382 येथे अपघात घडला. सदर स्पॅन 35 मीटर लांबीचा असून त्यावर ठेवण्यात येणारे 13 सेगमेंटस निखळून पडले असे प्रथमदर्शनी दिसून आले.

या अपघातामध्ये एक कार, एक ट्रांझिट मिक्सर, एक टॅक्सी आणि एका टँकरचे नुकसान झाले. या अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला असून 7 जखमी कामगारांना सायन, केईएम आणि जसलोक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार चालू असून त्यावरील खर्च कंत्राटदारामार्फत करण्यात येत आहे.

मृत व्यक्तीच्या कुटुंबास रु. 5 लाख व जखमींना उपचार आणि जखमांचे स्वरुप लक्षात घेऊन भरपाई दिली जाणार आहे.

मे.सिम्प्लेक्स हे लालबाग उड्डाणपूल प्रकल्पामध्ये प्राधिकरणाचे कंत्राटदार होते. या उड्डाणपुलावर काम करतांना सुरक्षा नियम न पाळल्यामुळे मे.सिम्प्लेक्स यांच्यावर दोन वर्षे प्राधिकरणाचा कोणताही प्रकल्प राबविण्यापासून मनाई करण्याची कारवाई यापूर्वीच सुरु करण्यात आली आहे.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .....

अपघाताची कारणमीमांसा करण्यासाठी आणि त्याची जबाबदारी ठरविण्यासाठी चौकशी सुरु करण्यात आली आहे. या चौकशीच्या अहवालावर निर्णय देण्यासाठी स्वतंत्र तज्ज्ञांची तांत्रिक समिती नेमण्यात येत आहे.

क्षतिग्रस्त लॉंचिग गर्डर आणि सेगमेंट्स अपघाताच्या ठिकाणाहून हलविण्यासाठी 3 क्रेन्स् ,1 ब्रेकर, 2 जॉ ब्रेकर्स, 100 पेक्षा अधिक कामगार यांची तातडीने व्यवस्था करण्यात आली. वडाळा ट्रक टर्मिनस रस्त्यावरील वाहतूक दिनांक 23 जुलै, 2012 रोजी सकाळी पुन्हा सुरु करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात वडाळा पोलीस ठाणे येथे कंत्राटदाराविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेला आहे.

-----------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्पकालीन चर्चेवरील माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे वि.स.वि.क्रमांक 25 घेण्याबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर (बसून) : सभापती महोदय, सभागृहात माननीय सहकार मंत्री उपस्थित नाहीत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सहकार मंत्री सभागृहात येई पर्यंत आपण पाच मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

**उप सभापती** : विरोधी पक्षाच्या विनंती नुसार अल्पकालीन चर्चा आधी घेण्याचे ठरले आहे. तथापि, सभागृहात आता माननीय सहकार मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज माननीय मंत्री येई पर्यंत स्थगित न करता आपण वि.स.वि.क्रमांक 25 चर्चेला घेऊ या. मला असे वाटते की, सभागृहाचा वेळ वाया घालविण्यापेक्षा वि.स.वि.क्रमांक 25 वरील चर्चेला सुरूवात करू या. माननीय सहकार मंत्री आल्यानंतर सदर बिलावरील चर्चा आपण थांबवू या.

श्री.पांडुरंग फुंडकर : ठीक आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXV OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 25 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 25 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, प्रशासकीय विसंगती दूर करण्यासाठी व महसूल उपलब्ध होण्याच्या दृष्टीने हे विधेयक मांडण्यात आले आहे. शासकीय जमिनी काही कारणांसाठी निवासी, वाणिज्यिक व धर्मादाय कारणासाठी विविध संस्थांना/व्यक्तिंना दिलेल्या आहेत. अशा जमिनी महाराष्ट्रात दिलेल्या आहेत. तशाच जमिनी अमरावती व नागपूर विभागात मध्य प्रदेश सरकारच्या कालखंडात देण्यात आलेल्या आहेत. या जमिनींचा उल्लेख नझूल जमिनी असा होत असतो. हा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित होता. तो प्रश्न आपण सोडविला होता. पण त्यातील काही त्रुटी सोडविण्याचा प्रयत्न या बिलाच्या माध्यमातून होत आहे. विधान सभेमध्ये सुधारणा सुचविली गेली होती. ती आम्ही मान्य केली. महाराष्ट्रातील निवासी, धर्मादाय आणि सामाजिक प्रयोजनासाठी शासकीय जमिनी दिलेल्या आहेत व त्यांची विक्री करायची असेल तर त्यासाठी अनर्जित उत्पन्नातील हिस्सा वसूल करण्यासाठी तरतूद नव्हती. ती तरतूद या विधेयकाद्वारे करण्यात येत आहे. यामुळे महसूल मिळणार आहे. ही विसंगती दूर करण्यासाठी माननीय उच्च न्यायालयाने देखील सूचना केली होती. ती विसंगती आपण ह्या बिलाच्या माध्यमातून दूर करीत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी पुन्हा एकदा सभागृहाला अवगत करतो की, माननीय सहकारी मंत्री सभागृहात आल्यानंतर सदर बिलावरील चर्चा थांबविण्यात येईल व त्यानंतर अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 14:55

सभागृहातील कामकाजाबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना देखील बोलावयाचे आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी विधेयकावरील चर्चा सुरु केलेली आहे. जर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना चर्चा करावयाची असेल तर ते आल्यानंतर करता येईल. त्याकरता बिलावरील चर्चा थांबविणे बरोबर नाही.

**उप सभापती** : माननीय सभापतींनी असे सांगितले होते की, अगोदर अल्पकालीन चर्चा घेण्यात यावी आणि त्यानंतर विधेयके चर्चेसाठी घेण्यात यावीत. परंतु याठिकाणी माननीय सहकार मंत्री उपस्थित नव्हते म्हणून सभागृहाच्या परवानगीने विधेयके प्रथम चर्चेसाठी घ्यावीत असे सांगण्यात आले.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सदर बिलावरील चर्चा ऑन वेग ठेवावी. प्रथम या अल्पकालीन चर्चेसाठी किती वेळ देण्यात आला आहे ?

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा आपल्याला माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह एका तासामध्ये संपवावयाची आहे. आता पहिली अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल.

. . . .2 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सर्वोच्च न्यायालयामार्फत जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांना बँकींगचा परवाना अत्यावश्यक करण्याचे देण्यात आलेले आदेश्.

**मु.शी.**: सर्वोच्च न्यायालयामार्फत जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांना बँकींगचा परवाना अत्यावश्यक करण्याचे देण्यात आलेले आदेश याबाबत सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर,रामदास कदम,श्रीमती शोभाताई फडणवीस,डॉ.दीपक सावंत,श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर,सय्यद पाशा पटेल,परशुराम उपरकर, डॉ. रणजित पाटील, श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासह एक तासाचा वेळ दिलेला आहे. यानंतर प्रथम सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर सूचना वाचतील आणि मग भाषण सुरु करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांना बँकींगचा परवाना अत्यावश्यक करण्याचे आदेश मा.सर्वोच्च न्यायालयामार्फत देण्यात येणे व या आदेशान्वये आर.बी.आय.ने ज्या बँकेचे नेट वर्क किमान 1 लाख रुपये असेल अशा बॅकांनाच बॅकिंगचा परवाना देण्यात येण्याबाबत कलम 11 लागू करणे, नागपूर, वर्धा, बुलढाणा, उस्मानाबाद आणि धुळे-नंदूरबार या सहा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकांनी या कलमाचे पालन न केल्याने या बँकांना आर.बी.आय.ने कलम 35-अे लागू केल्यानंतर नवीन ठेवी स्विकारता न येणे, बँकांमधील आपल्या ठेवी लाखो ठेवीदारांकडून काढून घेण्यात येणे,उपरोक्त 6 जिल्हा केंद्रीय बँकांच्या संचालक मंडळाच्या चुकीच्या कर्ज वाटपामुळे व हलगर्जीपणामुळे बँका अडचणीत आल्याने बँकांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप न होणे, 6 बँकांमार्फत दरवर्षी सुमारे 4,561 कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप होत असणे, सदरहू वाटप न

झाल्याने सुमारे 5.50 लाख शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट होणे, राज्यातील पावसाचा लहरी पणा पाहता शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट असताना अशा परिस्थितीत कर्जाअभावी शेतकऱ्यांची होणारी कोंडी सोडविण्यासाठी नाबार्डला रि-फायनान्सिंग बाबत हमी देऊन शेतकऱ्यांना लवकरात लवकर कर्ज उपलब्ध करुन देण्याची गरज व जबाबदार संचालक मंडळावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सभापती महोदय, सदरहू विषयामधील चौथ्या ओळीतील "जालना" हा शब्द वगळण्यात यावा.

. . . .2 एस-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, राज्यातील साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा प्रश्न निर्माण झालेला आहे. राज्यात एकूण 31 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका असून, मिळालेल्या माहितीप्रमाणे आता पाच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तोट्यात आल्या आहेत.त्यांच्याकडे बँकींगचा परवाना नव्हता. आता त्यांना रिझर्व बँकेने एप्रिल 2011 पासून सेक्शन 35 लागू केला. सुरुवातीला सेक्शन-11 ची नोटीस दिली. बिगर शेती कर्जाच्या बाबतीत उदाहरण द्यावयाचे तर साखर कारखाने, सूत गिरण्या, बलुतेदार संस्था व अवसायानातील इतर संस्थांकडील थकबाकी राहिली. मोठ्या प्रमाणात एन.पी.ए. वाढल्यामुळे या बँका अडचणीमध्ये आल्या आहेत. यातच शासन धोरणाप्रमाणे पीक कर्ज वाटप करताना जिल्हा बँकांना एक ते सव्वा टक्के तोटा सहन करावा लागला. तसेच या तोट्यामुळे बँकेचे नेटवर्थ उणे झाले. नाबार्ड व रिझर्व बँक यांच्या आदेशाप्रमाणे बँकींग परवाना अप्राप्त बँकांना मिळविण्यासाठी किमान चार टक्के सीआरएआर राखणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. यासाठी दि.31-03-2012 पर्यंत मुदत देण्यात आली होती. पण त्यांनी या मुदतीमध्ये त्यांचे नेटवर्थचे काम पूर्ण केलेले नाही. म्हणून दिनांक 9-5-2012 रोजी अचानकपणे ती मुदत सप्टेंबरपर्यंत वाढविली.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

म्हणजे 31 मार्चपर्यंत जी मुदत होती ती सप्टेंबरपर्यंत वाढविली. पण अचानक दिनांक 9.5.2012 पासून सेक्शन 35(अे) लागू केला. त्यामुळे उर्वरित 5 जिल्हा बँका अडचणीत आल्या. त्या त्या जिल्ह्यात त्या त्या बँकांचा शेतकऱ्यांना शेती कर्जे, मध्यम मुदतीची कर्जे देण्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात वित्तीय सहयोग आहे. माझ्याकडे प्रत्येक बँकेची आकडेवारी आहे परंतु वेळेअभावी मी आकडेवारी वाचून दाखवित नाही. ही जी आकडेवारी आहे त्यावरुन असे दिसून येते की, सदर बँकांनी शेतकऱ्यांना एकूण 2008.28 कोटी रुपये एवढ्या मोठ्या प्रमाणात अल्प मुदतीचे आणि शेती पूरक मध्यम मुदतीच्या कर्जाचे वाटप केले आहे. प्रत्येक जिल्ह्यात एकूण शेती कर्ज वाटपामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा सहभाग 70 ते 80 टक्के आहे. याचा अर्थ प्रत्येक जिल्ह्यातील शेतकऱ्यांकरिता या जिल्हा बँकांचे महत्व अनन्यसाधारण आहे. या 5 जिल्हा बँकांची आकडेवारी पाहिली तर जिल्ह्यातील शेतकरी आणि ठेवीदार यानी 4185.29 कोटी रुपये एवढ्या मोठ्या प्रमाणात ठेवी गुंतविलेल्या आहेत. यावरुन या जिल्हा बँकांची जनमानसातील विश्वासार्हता अजूनही कायम आहे व जिल्ह्यातील शेतकरी तसेच सर्वसामान्य माणसांचे हितसंबंध सदर बँकांशी जुळलेले आहेत.

सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे या बॅकांचे नेट वर्थ उणे झाले. त्यांच्याकडे लायसन्स नव्हते त्या बॅकांचा एनपीए वाढला. कारण बिगरशेती कर्ज जास्त प्रमाणात वाढले. मी आपल्याला बुलढाणा बॅकेचे उदाहरण देईन. त्या जिल्हा बँकेकडून जवळजवळ 200 कोटी रुपयांचे कर्ज साखर कारखाने, सूतगिरण्या, बलुतेदार संस्था, लिफ्ट इरिगेशन संस्था यांना वाटले गेल्यामुळे 200 कोटी रुपयांचे कर्ज थकले आणि त्यामुळे ते आपला नेट वर्थ पूर्ण करु शकले नाहीत. ज्यावेळी त्यांना सेक्शन 11 ची नोटीस दिली त्यावेळी शासन स्तरावर माननीय मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला. नाबार्ड बरोबर एक बैठक घेऊन 31 तारखेपर्यंत जी मुदत होती ती सप्टेंबरपर्यंत लांबविली होती पण ज्यावेळी पेरणीच्या हंगामाच्या आधी तो पीक कर्ज पुरवठा बँकांकडून केला जातो त्या कर्ज पुरवठ्याचे वाटप मार्च महिन्यामध्ये सोसायट्यांच्या माध्यमातून सुरु झाले. हे वाटप सुरु असताना अचानकपणे 9.5.2012 ला सेक्शन 35(अे) लागू केला आणि

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

त्या बँकांचे सर्व व्यवहार थांबविले. राज्य सहकारी बँकेने हात वर केले. नाबार्डने त्यांना बंदी केली. रिझर्व्ह बँकेने त्यांना बंदी केली. राज्य सहकारी बँकेने हात वर केल्यामुळे या बँकांचा कर्ज पुरवठा थांबला. यामध्ये शेतकऱ्यांचा काय दोष आहे ? शेतकऱ्यांनी आपले पूर्ण कर्ज बँकेकडे भरले. ज्या लोकांनी पीक कर्ज मागितले होते त्यांनी आपले सर्व कर्ज फेडले. पुढच्या पेरणीसाठी आपल्याला पीक कर्ज मिळणार म्हणून त्यांनी आपल्या घरातील भांडी गहाण ठेऊन सोने गहाण ठेऊन सर्व कर्ज फेडले. पण अचानकपणे बँकेने हात वर केले. आधीच पाऊस नाही. त्याचा परिणाम असा झाला की, बँकेचे कर्ज थांबले. राष्ट्रीय बँका कर्ज देत नाही. अशा परिस्थितीमध्ये या पाचही जिल्ह्यांमध्ये हाहाकार निर्माण झाला. बुलढाणा जिल्ह्यात अजूनही जवळपास 50 हजार शेतकऱ्यांचे कर्ज वाटप बाकी आहे.

या पाचही जिल्ह्यांचा आढावा घेतला तर जवळपास साडेपाच लाख शेतकरी राहिलेले आहेत. या बँकांना राष्ट्रीयकृत बँका उभे करीत नाहीत. शासनाने कितीही आदेश दिले तरी काही होत नाही. शासनाने आदेश दिल्यानंतर राष्ट्रीयकृत बँकांनी किती कर्ज वाटप केले याची आकडेवारी दिली पाहिजे. सर्व शेतकरी जिल्हा सहकारी बँकांवर अवलंबून आहेत. आजही या पाच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांची परिस्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. त्यामुळे आता बँकेचे कर्ज मिळत नाही म्हणून पुन्हा काही लोकांची सावकारी सुरु झाली. जमिनी गहाण ठेवून शेतकऱ्यांनी कर्ज काढण्यात सुरुवात केली आहे. पुन्हा आता या पाच जिल्ह्यांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढणार आहेत. या बँकांच्या चुकीच्या वागण्यामुळे, एनपीए जास्त वाढल्यामुळे हे झालेले आहे. कर्ज पुरवठा चुकीचा होता की बरोबर होता याची चौकशी शासनाने करावी.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

बँकेचा एनपीए वाढला आणि सीआरएआर कमी झाला आहे. त्यामुळे बँकेला परवाना दिलेल नाही. त्यामुळे कर्ज वाटप बंद झाले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी वर्षा बंगल्यावर जिल्हा बँकांसंबंधी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीला मी आणि माननीय सहकार मंत्रीही उपस्थित होते. नाबार्ड व रिझर्व्ह बँकेने आम्हाला असे सांगितले होते की, शासनाने थकहमी दिली किंवा पत्र दिले तरी बँकेना पीक कर्ज वाटण्यास आम्ही परवानगी देतो. शासनाने असे पत्र देण्याचे कबूल केले होते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांनी रिझर्व्ह बँकेच्या व नाबार्डच्या अधिकाऱ्यांशी बोलणी केली आहेत. त्यांनी सुध्दा आम्हाला शासनाने साधे पत्र दिले तरी आम्ही फक्त पीक कर्जासाठी परवानगी देतो असे राज्य सहकारी बँकेला सांगू. त्या पत्राला का विलंब झाला ? त्यानंतर माननीय वित्त मंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांनी राजीनामा दिल्यानंतर ते राष्ट्रपतीपदाचे उमेदवार झाले. मला वाटते की, या संदर्भात तत्कालीन वित्त मंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांची माननीय पंतप्रधान यांच्या बरोबर या विषयावर चर्चा झालेली आहे. हे सर्व झाल्यानंतरही जिल्ह्यातील बँकांमधून पीक कर्ज वाटपाची कार्यवाही थांबलेली आहे. शासनाला या 5 बँकांना डुबवायचे आहे काय, या 5 बँकांचे भवितव्य काय राहणार आहे ?

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची अशीच स्थिती झाली होती. त्या बँकेला शासनाने 200 कोटी रुपयांचा निधी दिला होता. त्याचा जी.आर.माझ्याकडे आहे. शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य व्हावे म्हणून स्व.वसंतदादा पाटील, वैकुंठभाई मेहता यांनी सहकाराची चळवळ सुरु केली. सावकाराच्या दारातून शेतकऱ्यांना बाहेर काढून विविध कार्यकारी सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याची व्यवस्था केली. सावकाराच्या घशातून शेतकरी बाहेर पडला पाहिजे. त्यासाठी या राज्यात हजारो सहकारी सोसायट्या सुरु केल्या. जिल्हा सहकारी बँक, राज्य सहकारी बँक व विविध कार्यकारी सोसायट्या अशी थ्री टायर सिस्टिम सुरु केली. सावकाराच्या दावणीतून शेतकऱ्यांना सोडविण्याचे काम त्या काळापासून सुरु झाले. तेव्हापासून जिल्हा बँक व शेतकरी यांचे नाते घट्ट झाले. शेतकरी आश्वस्त रहात होते. आपले मायबाप आपल्याला मदत करणारी जिल्हा सहकारी बँक आहे असे त्यांना वाटत होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.पांडुरंग फुंडकर....

त्यावेळी या बँकांना चांगले दिवस होते. परंतु नंतरच्या काळात या बँकांच्या कारभारात चुका झ ाल्या. त्यासाठी शेतकऱ्यांना दोष देता येणार नाही. संचालक मंडळ कारभार करीत असताना शासनाने त्यांच्यावर कधी नियंत्रण ठेवले नाही. शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँक यांच्या कारभारावर लक्ष ठेवण्याची जबाबदारी शासनाची आहे. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना नीट पीक कर्ज पुरवठा झाला पाहिजे याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

आता या बँकांची स्थिती अशी झाली आहे की, या बँकांनी पैसा दिला आहे. बुलढाणा जिल्हा सहकारी बँकेला 100 कोटी रुपये दिले होते. त्या बँकेचे काय झाले ? त्या बँकेने राज्य सहकारी बँकेकडून आपल्याला क्रेडिट मिळेल असे गृहित धरुन स्वत:च्या फंडातील 125 कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना अगोदरच वाटून टाकले. नंतर राज्य सहकारी बँकेने हात वर केले. त्यामुळे त्या बँकेने जिल्ह्यातील शिक्षकांचे पगार, पेन्शन देणे बंद केले. सहकारी योजना बंद झाल्या. त्यामुळे शिक्षकांचे, पेन्शनर्सचे मोर्चे निघाले होते. त्यामुळे बँक आता कर्ज देत नाही, केवळ शिक्षकांचे पगार, पेन्शनर्सचे पैसेच देत आहे, ठेवीदारांची ठेवीची रक्कम देत आहे. त्यामुळे शासनाने ज्या उद्देशाने त्या बँकेला पैसा दिला तो उद्देश सफल होत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ ST/ D/ पूर्वी श्री. खंदारे 15:10

श्री. पांडुरंग फुंडकर....

या बँकांना जर आपल्याला वाचवायचे असेल, त्यांना संकटातून बाहेर काढायचे असेल तर त्यांना आज रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून मदत करण्याची गरज आहे. मी ही मागणी संचालक मंडळासाठी करीत नाही.

आज राज्यातील साडेपाच लाख शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांशी शेतक-यांची नाळ जुळलेली आहे. शेतक-यांच्या दृष्टीने हा अतिशय जिव्हाळयाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या बँकांना परवाना मिळण्यासाठी 4 टक्के सीआरएआर पूर्ण करावा लागणार आहे. या बँकनिहाय रकमेबाबतचा प्रस्ताव नाबार्डद्वारा आयुक्तांनी शासनाकडे पाठवला. सीआरएआरसाठी किती निधी लागणार आहे हे त्यांनी सांगितलेले आहे. 4 टक्के सीआरएआर प्रमाणे बँकाना किती रकमेची आवश्यकता आहे ते मी आपणास सांगतो. बुलढाणा जिल्हा केन्द्रीय बँकेला 122.20 कोटी रु., उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 53 कोटी रु., धुळे-नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 100 कोटी रु., वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 73 कोटी रु. आणि नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 140 कोटी रु. अशा एकूण 448 कोटी रुपयाची आज गरज आहे. साडेपाच लाख शेतक-यांना वाचवायचे असेल तर 448 कोटी रु. या बँकांना उपलब्ध करुन दिले पाहिजेत.

सभापती महोदय, जेव्हा राज्य सहकारी बँक बरखास्त केली. त्यावेळी परवाना मिळाला नसता तर राज्य सहकारी बँक देखील पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे खाली बसली असती. राज्य शासनाने सव्वातीनशे कोटी रुपये दिले. परंतु ते कुणाच्या प्रेशरमुळे दिले या विषयाची चर्चा मी या ठिकाणी करु इच्छित नाही. त्यावेळी आम्ही हे देखील सांगितले होते की, इतर राज्य सरकारांनी त्यांच्या राज्यातील जिल्हा सहकारी बँकांना मदत केलेली आहे. तामिळनाडू, पंजाब, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश या राज्यांच्या सरकारांनी त्यांच्या राज्यातील कमकुवत जिल्हा सहकारी बँकांना अर्थ सहाय्य करुन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करुन त्या राज्यातील शेतकरी व ठेवीदारांचे हित त्यांनी जोपासलेले आहे. महाराष्ट्र शासनाने यापूर्वी नांदेड मध्यवर्ती सहकारी बँकेला मदत केली. नांदेड मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये देखील भयानक गैरव्यवहार झालेले असताना त्या बँकेला परवाना मिळण्यास मदत करुन ती बँक शासनाने जिवंत ठेवली.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

या चर्चेच्या माध्यमातून माझा शासनाला एकच प्रश्न आहे की, या 5 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना हे शासन वाचविणार आहे की नाही ? या बँकांना वाचवायचे असेल, त्यांचा सीआरअेआर कायम ठेवायचा असेल तर त्यांना आर्थिक मदत केली पाहिजे. त्या शिवाय त्या बँकांना परवाना मिळणार नाही. सीआरअेआर मिळण्यासाठी या बँकांना 448 कोटी रु.ची गरज आहे. हे पैसे शासन देणार आहे काय ? हे पैसे दिले नाहीत तर बँका वाचणार नाहीत. शासन सांगेल की, राष्ट्रीयकृत बँकांना आदेश दिलेले आहेत. पण या राष्ट्रीयकृत बँका एकाही शेतक-याच्या कर्जाचे प्रकरण ऐकण्यास तयार नाही. मी 10 राष्ट्रीयकृत बँकांशी बोललो, त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, आम्हाला निधी देता येणार नाही, आमचा कोटा पूर्ण झालेला आहे. या राष्ट्रीयकृत बँका जिल्हाधिका-यांचे देखील ऐकत नाहीत. या शेतकऱ्यांना आपण वा-यावर सोडणार का असा प्रश्न निर्माण झालेला आहे. शासनाने या बाबतीत पुढाकार घेऊन रिझर्व्ह बँकेशी बोलावे. जर आपल्या सरकारला मदत करणे शक्य नसेल तर माननीय पंतप्रधानांशी बोलून या राज्यातील साडेपाच लाख शेतक-यांना वाचविण्यासाठी या बँकांना मदत करावी अशी या चर्चेच्या माध्यमातून मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

----

...नंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेसाठी एक तासाची वेळ दिलेली आहे. दुपारी 2 वाजून 55 मिनिटांनी ही चर्चा सुरु झाली आहे. दुपारी 3.55 पर्यंत माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह ही चर्चा आपल्याला पूर्ण करावयाची आहे. माननीय मंत्री महोदयांना उत्तरासाठी किती वेळ लागेल ?

श्री.हर्षवर्धन पाटील : मला या उत्तरासाठी अर्धा तास लागेल.

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ज्या सहा सहकारी बँका अडचणीत आल्या आहेत त्या आताच आलेल्या नाहीत. मागील तीन-चार वर्षा पूर्वी या बँकाना सेक्शन 11 लागलेले आहे. तेव्हा या बँकांवर राज्य शासनाने कोणती कारवाई केली ? खरे म्हणजे सहकार विभागाने त्या बँकांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता होती. या बँकांच्या संस्थाचालकांनी नॉन ॲग्रीकल्चरल फायनान्स आपल्याच संस्थांना मोठ्या प्रमाणात दिलेला आहे. नवीन कारखाना उभारावयाचा असल्यास त्यासाठी 40 कोटी रुपये खर्च येतो. असे असताना त्या कारखान्यांना 150 ते 200 कोटी रुपयांचे लोन देण्यात आले. तेव्हा या ठिकाणी फक्त संचालकांवर कारवाई करुन उपयोगाचे नाही तर सहकार विभागातील ज्या ज्या अधिकाऱ्यांनी कारखान्याला भेटी दिल्या, तेथील स्टापिंग पॅटर्न पाहिला नाही, कारखान्यांचे लोन पाहिले नाही त्या अधिकाऱ्यावंर देखील कारवाई केली पाहिजे. सर्व प्रकरणांमध्ये संचालक जबाबदार असतातच असे नाही. नाबार्डने जो स्टापिंग पॅर्टन ठरवून दिलेला आहे त्यापेक्षा कितीतरी जास्त स्टाफ या बँकांमध्ये आहे. तेव्हा या संदर्भातील माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरामध्ये दिली पाहिजे.

सभापती महोदय, राज्य सरकारने राज्य सहकारी बँक बरखास्त केली. मागील 20 वर्षापासून मी राज्य सहकारी बँकेवर आहे. आपण देखील शेवटच्या टप्प्यामध्ये आलात. त्यावेळी शासन आमच्याकडे येऊन सांगत की, "आपण फायनान्स केला नाही तर आम्ही आपल्यावर कारवाई करु. आपण एवढे पैसे दिलेच पाहिजे." युतीचे शासन असताना तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांच्यासह सर्वच मुख्यमंत्री महोदयांनी "या कंपनीला फायनान्स करा, या विद्युत कंपनीला फायनान्स करा" असे सांगितलेले आहे. आज राज्य बँकेचे प्रशासक राज्य सरकारचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

काही ऐकत नाही. राज्य सहकारी बँकेने या जिल्हा बँकांना पैसे द्यायला पाहिजेत परंतु ते देत नाहीत. प्रशासक सांगतात आमचा राजीनामा घ्यावा, आम्ही काही फाईलवर सही करणार नाही. तेव्हा या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला अवगत करावे.

सभापती महोदय, आज राज्य सहकारी बँकेमध्ये पैसे पडून आहेत. पण रिस्क घेण्यास कोणी तयार नाही. सहकार विभागाच्या आयुक्तांचे कोणी ऐकत नाही म्हणून अशी परिस्थिती आलेली आहे. राज्य सहकारी बँक शेतकऱ्यांना थेट पैसे देऊ शकते आणि तशी तरतूद आहे. ज्या ठिकाणी जिल्हा बँक नाही तेथे राज्य सहकारी बँकेने पैसे दिले पाहिजेत. नॉर्थ इंडिया, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये काही ठिकाणी मध्यवर्ती बँका नाहीत त्या ठिकाणी राज्य सहकारी बँक फायनान्स करते. जर राष्ट्रीयकृत बँक कर्ज देण्यास तयार नसेल तर माझी जिल्हा बँक बुलढाणा जिल्हा बँकेस कर्ज देण्यास तयार आहे. आमच्या बँकेला हमी द्यावी. तेव्हा सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या आपल्या सारख्या कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन यातून मार्ग काढला पाहिजे.

सभापती महोदय, या सहा बँका बुडल्याबरोबर आमची बँक सुध्दा बुडविण्याचा आपला विचार आहे काय ? विभागाने जे परिपत्रक काढले आहे त्यामध्ये नमूद केलेले आहे की,

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

"जिल्हा परिषदांनी जिल्हा मध्यवर्ती बँकेतून आपल्या ठेवी काढून घ्याव्यात." या राज्यात 10 बॅंका "ए-प्लस" दर्जा मिळालेला आहेत. मी रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा चेअरमन आहे. त्या बँकेस नाबार्ड कडून पहिल्यांदाच "एए-प्लस"दर्जा मिळालेला आहे. मला नाबार्डच्या चेअरमन यांनी दूरध्वनी करुन ही माहिती दिली. ज्या बँका चांगल्या प्रकारे चालल्या आहेत, त्या बुडविण्याचे काम शासन करणार आहे काय ? शासनाने त्या परिपत्रकात सुधारणा केली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील पगार देखील राष्ट्रीयीकृत बँकेच्या माध्यमातून करावेत असाही उल्ले्ख त्या परिपत्रकात केलेला आहे. 6 बँका सोडल्या तर इतर 10 बँका चागल्या पध्दतीने चालत आहेत, या शासनाने त्या बँकाची वाट लावण्यास सुरुवात केलेली आहे. राज्यात कोणत्या सहकारी बँका चांगल्या आहेत, त्याबाबतची माहिती रेकॉर्डवर आली पाहिजे. रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिधुदुर्ग, मुंबई, पुणे, अहमदनगर, चंद्रपूर आणि लातूर, या जिल्हा बँका चांगल्या आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, पुढील वर्षी आमचा फायनान्स बंद होईल. आमच्या बँकेतून 100-200 कोटी रुपये काढले गेले, तर आमच्या बँकेकडे देखील अशा पध्दतीने पाहिले जाईल. या बँका आम्ही चालवावयाच्या, शेतकऱ्यांना पीक कर्ज आमच्या बँकेच्या माध्यमातून द्यावयाचे, तसेच शासनाच्या विविध योजना आमच्या बँकेने राबवावयाच्या, शासकीय अधिकारी आमच्या बँकेतील पैसे राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये भरण्याचे काम करीत आहेत, ते काम कधी थांबविले जाणार आणि शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे, त्या परिपत्रकात दुरुस्ती करण्यात येईल काय याबाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात करावा, अशी विनंती आहे. धन्यवाद.

----------------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या अल्पकालीन सूचनेच्या माध्यमातून अतिशय चांगली चर्चा सभागृहात झालेली आहे, त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे दु:ख व्यक्त केले, तेच दु:ख माझे देखील आहे. सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीत या सभागृहात चर्चा झ ाली होती. त्या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्या उत्तराचा धागा पकडून सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांनी बँक संचालक मंडळ हे गुन्हेगार आहेत, अशी सर्व कलमे लावून शेतकऱ्यांना कर्जे कशी दिली, का दिली, या बँकेविरुध्द कारवाई का करु नये, अशी भूमिका घेतली होती. बँकाचे ऑडीट झालेच पाहिजे याबाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. सहकार क्षेत्रात ज्या बँका टिकून आहेत, त्या अतिशय चांगल्या प्रकारची कामे करीत आहेत, त्या बँकांचा आपण वेळोवेळी सत्कार करता, परंतु चांगल्या बँकाच्या बाबतीत सहकार विभागाचे अधिकारी आडकाठी आणण्याचा प्रयत्न करीत असतात, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या बँकेस जसा "एए-प्लस" दर्जा मिळालेला आहे, त्याप्रमाणे आमच्या सिधुदुर्ग बँकेसही "ए-प्लस" दर्जा मिळालेला आहे. मंत्रालयात बसून अधिकारीवर्ग फतवे काढत असतात. त्या फतव्यांमुळे बँकेच्या संचालक मंडळास अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. आम्ही ज्या तक्रारी करतो, त्या तक्रारींची दखल शासनाकडून घेतली जाणार आहे की नाही या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. राज्यातील या 6 बँका अचानकपणे दिवाळखोरीत निघालेल्या नाहीत.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेने आपला संपूर्ण निधी काढून घ्यावा व राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवावा. जिल्हा परिषदांनी बँकामधून पैसे काढून घेण्यासाठी रांगा लावलेल्या आहेत. अशा प्रकारचा जो निर्णय शासनाने घेतला आहे, त्या बाबतचा खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे, ज्या बँका चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत, त्यांना भविष्यात अडचण येणार नाही, याची देखील खबरदारी शासनाने घेतली पाहिजे अशी माझी शासनास विनंती आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा बँकेकडून खरीप पीक कर्ज पूर्वी 56 कोटी रुपयांचे दिले जात होते, यावेळी 54 कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. आमच्या बँकेची वसूली जवळ जवळ 97 टक्के आहे. आमच्या बँकेचा एनपीए शुन्य आहे. माननीय मुख्यमंत्री, सहकार मंत्री यांनी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना बोलावून सांगितले की, कोल्हापूर जिल्हा बँकेस कर्ज द्या, सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेस कर्ज द्या, राज्य सरकार हमी घेईल. काही जिल्हा बँकानी घेतलेल्या कर्जामुळे त्या बँका अडचणीमध्ये आलेल्या आहेत. शासनाने काही जिल्हा बँकांना कर्जे देण्यासाठी हमी दिलेली आहे, त्या बाबतीत शासन निश्चितपणे काय करणार आहे याचा खुलासा शासनाने केला पाहिजे. मला असे वाटते की, या बाबतीत शासनाने काही तरी धोरण ठरविले पाहिजे.

सभापती महोदय, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना आहे, त्या व्याजाची रक्कम बँकाना ॲडव्हान्स म्हणून दिली पाहिजे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

हे व्याज बँकांना नंतर मिळते. ते आगाऊ मिळाले पाहिजे. तर निश्चितपणाने बँकांना मदत होईल. नाबार्डकडून जे कर्जवाटप होते त्यात 45 टक्के नाबार्ड आणि 55 टक्के हे राज्य बँकेकडून घ्यावे लागते. नाबार्ड 4.5 टक्क्याने आणि राज्य बँक 8.5 टक्क्याने कर्ज देते. म्हणून अडचण निर्माण होते. यासाठी नाबार्डने 100 टक्के पैसे राज्य बँकेला दिले पाहिजेत. बँकेचा व्याजदर आहे त्याचा देखील फेरविचार होणे आवश्यक आहे. माझी शासनाला विनंती आहे की, जुन्या काळात राज्य शासनाने कारखान्यांना जी कर्जे देण्यास मध्यवर्ती बँकांना भाग पाडले आहे त्याबाबत काय कारवाई करणार ? अधिकारी चुकीच्या माहितीच्या आधारावर बँकांना नोटीसा पाठवीत आहेत त्याबाबत कोणी पावले उचलणार आहात ? निश्चित भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. चुकीचे होत असेल तर बँकेवर जरुर कारवाई करावी. आश्वासनपूर्ती करण्यासाठी जी पत्रे शासनाकडून जातात त्याबाबतीत विचार होणे आवश्यक आहे. एखादी जिल्हा बँक चांगले काम करीत असेल तर त्या बँकेला डिस्टर्ब करण्याचे काम अधिकाऱ्यांनी करु नये अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, यावर्षीच्या खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच सहाही जिल्हयामध्ये शेतकऱ्यांसमोर खूप मोठी अडचण निर्माण झ ाली होती. कर्जाच्या बाबतीत या 6 जिल्हा मध्यवर्ती बँका अडचणीत आल्या आणि कर्जाचे वितरण शेतकऱ्यांना होऊ शकले नाही. जे काही कर्ज वितरण झाले त्याची परतफेड राज्य सहकारी बँकेकडून झाली नव्हती. मी उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेचा आवर्जून याठिकाणी उल्लेख करणार आहे. उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेला 2002-03 साली काही होमट्रेडच्या माध्यमातून अडचणी निर्माण झाल्या आणि ही बँक प्रशासकाच्या ताब्यात होती. काही वर्षापूर्वी तेथे फॉर्मल बोर्डाची नियुक्ती झाली आणि गेल्या तीन वर्षापासून बोर्डाच्या माध्यमातून बँकेचा कारभार सुरु आहे. यावर्षी खूप मोठया प्रमाणात चलनतुटवडा निर्माण झाला आहे. माननीय सदस्य श्री. फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे रि-फायनान्स न मिळाल्यामुळे अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्याचबरोबर उस्मानाबाद जिल्हयाच्या मध्यवर्ती बँकेचे एम.डी. हे फिट ॲन्ड प्रॉपर क्रायटेरिया असलेली व्यक्ती नसल्यामुळे अनेक गोष्टी अगदीच नियमानुसार होतात असे नाही. अशा अडचणीच्या काळात नियमांचे काटेकोरपणे पालन केले गेले नाही तर अडचणी वाढतच जातील यात शंका नाही. माझी शासनाला विनंती आहे की, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेला शासनाच्या नियमाप्रमाणे एक योग्य फिट ॲन्ड प्रॉपर क्रायटेरियामध्ये बसणारा एम.डी.उपलब्ध करुन द्यावा. त्याचबरोबर चलनतुटवडयाचा विषय आहे त्याबाबत शासनाने मदत करावी. पीक कर्जाच्या हंगामाच्या सुरुवातीला एम.एस.सी. बँक मदत करण्यास तयार नव्हती. परंतु शासनाने पाठपुरावा केला आणि रिफायनान्स उपलब्ध होत आहे त्यासाठी मी शासनाचे आभार मानतो. सेक्शन-11 च्या क्रायटेरियातून बँकेला बाहेर काढावयाचे असेल तर निगेटीव्ह नेटवर्थ आणि सीआरएआर या गोष्टींच्या बाबतीत तोडगा काढायचा असेल तर काही कारखान्यांच्या बाबतीत सिक्युरटायझेशनची कारवाई करण्यात आलेली आहे त्याबाबत विचार करावा लागेल. माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, हे कारखाने सहकारी तत्वावरच चालावेत. परंतु लाँग टर्म लीजवर चालले पाहिजे. ही लीज रक्कम सुरुवातीला आपण घेऊ शकलो, 15 वर्षासाठी कारखाना चालवायला दिला आणि 15 वर्षाचे जे काही भाडे आहे ते जर आगाऊ उपलब्ध झाले तर जो निधी उपलब्ध होईल त्याचा उपयोग करुन ती बँक निगेटीव्ह नेटवर्थमधून बाहेर काढता येऊ शकेल. ....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याबाबतीत चर्चाही झाली होती. मुख्यमंत्री महोदयांनी विचार करु असे सांगितले होते. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीत या तीन विषयावर ठोस असे उत्तर द्यावे. पहिला मुद्दा म्हणजे फिट ॲन्ड प्रॉपर क्रायटेरियाचा एम.डी.नेमणे, दुसरा मुद्दा सेक्शन-11 मधून बँकेला बाहेर काढण्यासाठी शासनाकडून नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जाणार आहेत आणि तिसरा मुद्दा म्हणजे चलनतुटवडा निर्माण झाला आहे म्हणजे जवळजवळ 80-90 कोटी जि.प.चे खात्यावर आहेत परंतु उपलब्ध होत नाहीत , 9 हजार कर्मचाऱ्यांचा पगार होत नाही, 3 हजार पेन्शनर्स आहेत त्यांचा पगार होत नाही. अशी अतिशय गंभीर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मंत्रीमहोदयांनी या तीनही मुद्यांच्या बाबतीत खुलासा करावा अशी विनंती करतो.

धन्यवाद.

----

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी म.वि.प.नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सहा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या वतीने माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शासनाला विनंती केली की, नियम 35(अ) अंतर्गत ज्या बँकाचा समावेश झालेला आहे त्या बँकांना सवलत मिळावी आणि त्या अधिक सक्षमतेने चालाव्यात यासाठी शासनाकडून त्यांना आर्थिक मदत दिली जावी. मराठवाड्यातील ज्या मध्यवर्ती बँका नियम 35(अ) खाली आलेल्या आहेत परंतु त्यांना रिझर्व्ह बँकेने बँकिंग लायसन्स यापूर्वी दिलेले आहे अशा बँका या प्रस्तावातून वगळल्या आहेत, त्यात बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा समावेश आहे.

सभापती महोदय, एक वर्षापूर्वी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकंचे नाव वारंवार वृत्तपत्रात आणि दूरदर्शन वाहिन्यांवरुन झळकत होते. त्या बँकेतील आर्थिक घोटाळा या निमित्ताने राज्यासमोर उघडकीस आला होता. जे कोणी दोषी होते त्यांच्यावर कारवाई सुरु झाली. बँकेचे चेअरमन सध्या जेलमध्ये आहेत. बहुसंख्य संचालक मंडळी जेलची वारी करुन आले आहेत. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मागील वर्षापासून कर्ज मिळत नसल्यामुळे शेतकरी मात्र हवालदिल झाले आहेत. मराठवाड्यातील ज्या दोन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बँकिंग लायसन्स मिळाले आहे, त्यात बीड आणि लातूर या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा समावेश होतो.

सभापती महोदय, आर्थिक घोटाळ्यामुळे बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची मोठया प्रमाणात बदनामी झाली असली तरी ही बँक सुस्थितीत यावी अशी बीड जिल्हयातील सर्व लोकांची प्रामाणिक इच्छा आहे. मध्यंतरी शासनाने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी 200 कोटी रुपयांची आर्थिक मदत केली होती. त्यातून ती बँक पूर्वपदावर येण्याचा प्रयत्न करीत आहे. आज बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा विचार केला तर त्या बँकेचा एन.पी.ए.फक्त 17 टक्के आहे. त्यामुळे शासनाकडून त्या बँकेला आर्थिक मदत द्यायला काहीच हरकत नाही. त्या बँकेचे विनियोगक्षम भांडवल 101 कोटी रुपये इतके आहे. म्हणजे पॉझि ाटिव्ह नेटवर्थमध्ये सुध्दा बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा समावेश होतो. चालू वर्षाच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ D/ ST/ KTG/ 15:30

श्री.धनंजय मुंडे........

हंगामामध्ये बँकेचे कर्ज वसुलीचे प्रमाण 40 ते 50 टक्के इतके आहे. आज बँकेवर प्रशासक नियुक्त केलेले आहेत. मधल्या काळात आर्थिक घोटाळा झाला तेव्हा अर्बन बँकांनी आपल्या फायद्यासाठी मध्यवर्ती बँकेत डिपॉझिट म्हणून ठेवलेले 400 ते 500 कोटी रुपये काढून घेतले. त्यातून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक डबघाईला आली. अशाही परिस्थितीत शेतकरी आणि इतर संस्थांकडून जवळपास 1200 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेची बँकेला कर्ज वसुली करावयाची आहे. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला 843 कोटी रुपयांचे डिपॉझिट परत करावयाचे आहे. या वस्तुस्थितीचा विचार केला तर एका दृष्टीने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तोट्यात नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ........

या सर्व गोष्टींचा विचार केला आणि खरोखरच या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधार द्यावयाचा असेल तर नांदेड जिल्हा बँकेला ज्याप्रमाणे 200 कोटी रुपये दिले त्याच धर्तीवर बीड शहराला सुध्दा 200 कोटी रुपये किमान 100 कोटी रुपये तरी मदत करावी. त्यामुळे सीआरआर व एसआरआर ही 50 टक्क्याची तूट भरुन निघेल आणि बँकेच्या इतर शाखा चालू होतील. या शाखा चालू झाल्या तर शेतकऱ्यांना या काळात बँकेची मदत होईल व कर्ज पुरवठा होऊ शकेल अशी परिस्थिती आहे.

माझी या प्रस्तावाच्या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, नांदेडच्या धर्तीवर बीड जिल्ह्याला देखील मदत करावी. शासनाला यात मदत करणे शक्य नसेल तर किमान राज्य सहकारी बँक सुध्दा यात मदत करु शकते, कारण बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही राज्य सहकारी बँकेची थकबाकीदार नसल्याने राज्य सहकारी बँक सुध्दा मदत करु शकते, पण तसे आदेश आपण राज्य सहकारी बँकेला द्यावेत. बीड जिल्ह्यातील शेतकरी या परिस्थितीमुळे अडचणीत आला असून त्याला मदत व्हावी म्हणून शासनाने आमच्या जिल्हा बँकेला मदत करावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेसंबंधी मी माझे मत व्यक्त करण्याचा प्रयत्न करणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे बँकर असल्याने त्यांच्या पध्दतीने त्यांचे मुद्दे त्यांनी उपस्थित केले. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सुध्दा यावर आपले मत सांगितले. या निमित्ताने माझा असा प्रश्न आहे की, 96 टक्के रिकव्हरी असलेल्या बँकांवर देखील ही वेळ आणणे कितपत योग्य आहे. यासंबंधीच्या आकडेवारीत मी जाणार नाही तसेच प्रत्येक बँकेचा लेखाजोखा घेणे देखील याक्षणी कठीण आहे. विषय एवढाच आहे की, ही परिस्थिती कोणामुळे निर्माण झाली हा प्रश्न उद्‌भवत आहे आणि याचे आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील सभागृहात जोरजोरात म्हणाले की, चोरांना वाचविणाऱ्यांना कोणती शिक्षा करणार ? अर्थात हा शब्दप्रयोग मी माझ्या भाषेतून सांगितलेला आहे. लुच्च्या-लबाडांना वाचविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार आहात ? अर्थात अधिकाऱ्यांना राज्यकर्त्यांनी सांगितले की, काहीच बोलायचे नाही, त्यानंतर अधिकाऱ्यांची काय बिशाद आहे की ते बोलतील, म्हणून मी त्यांना दोष देणार नाही. पण संपूर्ण अधिवेशनात आम्ही सर्व सन्माननीय सदस्य अनेक वेगवेगळे प्रश्न घेऊन येतो व सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतो. पण या मंत्र्यांचे मनोधैर्य एवढे पक्के आहे की, ते एकाही अधिकाऱ्याला निलंबित करीत नाही. अगदीच सभागृह डोक्यावर घेऊन मागणी लावून धरली तर कुठे तरी एखाद्या छोट्या अधिकाऱ्यावर कारवाई केली जाते.

महोदय, परभणी जिल्ह्यात दोन साखर कारखाने होते. ते कसे लुटले आणि त्यात कोणी किती अधिकृतपणे घेतले हे सर्व मी सांगितले आहे. श्री. सुरेश वरपुडकर यांच्या साखर कारखान्याबाबत सांगू इच्छितो की, या कारखान्याला सरकारने 160 कोटीची मदत दिली होती. एवढी मदत करुनही या कारखान्यात एक ऊसाचे कांडे सुध्दा गेले नाही, मग हा पैसा कोठे गेला व कोणासाठी तो देण्यात आला होता याचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. कारखान्याला पैसे देण्याच्या बाबतीत आमची तक्रार नाही पण 160 कोटीची मदत होते आणि एक कांडे सुध्दा निघत नाही पण तोच कारखाना दांडेगावकरांना विकल्यानंतर मात्र 450 लाख टनाचे गाळप झाले व त्याची हमी शासनाने घेतली. आता तो कारखाना विकला अशी सर्व परिस्थिती आहे. अशा प्रकारे पैसे येत

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

असताना भराभर खाजगीत साखर कारखाने विकायला सुरुवात केली. घेणारे हेच, देणारे हेच आणि बुडविणारे सुध्दा हेच राज्यकर्ते आहेत, यांचे गणित कोण मांडणार हा प्रश्न आहे. मी या सर्व गोष्टींच्या खोलात जाणार नाही पण संपूर्ण राज्य भर हीच परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

बीड येथील बँक विरोधी पक्षाच्या ताब्यात असल्यामुळे त्यांना तुरुंगात टाकतात परंतु स्वकीयांना तुरुंगात टाकण्याची दानत दाखविणार आहात का ? हा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. बदला घ्यावयाचा म्हणून विरोधकांना तुरुंगात टाकावयाचे आणि स्वकीयांना वाचावयाचे ही तुमची रणनीती थांबवली जाणार आहे काय ?

या राज्याच्या मंत्री मंडळात सुखी मंत्री कोण असतील तर ते सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील आहेत. त्यांच्या खात्याची काहीच भानगड बाहेर येत नाही. त्यांच्या खात्याच्या विरुध्द कोणीही ओरडत नाही त्यामुळे प्रश्न निर्माण झालेला आहे. परंतु नागपूरच्या अधिवेशनात फक्त श्री.हर्षवर्धन पाटलांचाच विषय गाजणार आहे. आता सिंचनाचा विषय आघाडीवर आहे. शिक्षा करण्याचा विषय शासनाचा आहे. मघाशी होम ट्रेडच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा झालेली आहे. होम ट्रेडमध्ये यातील 4 बँकाचा समावेश आहे. होम ट्रेडच्या संदर्भात सभागृहात बरीच चर्चा झाली परंतु त्यातील कोणालाही अटक झाली नाही. पुढे त्यांना जामीन मिळाल्यानंतर त्या विषयाचे काय झाले काहीही माहिती बाहेर आली नाही. ते पैसे सहकाराच्या हमीचे होते, जनतेचे पैसे होते. जनतेच्या करातून हे पैसे आले होते. मग तो शेतकरी असो किंवा नसो. कराच्या पैशातून शासन हे पैसे देत आहे त्याबाबतीत आमची तक्रार नाही. सहकार क्षेत्राची महानता सांगत असतांना भूविकास बँक ही सामान्य शेतकऱ्यांच्या जवळची बँक आहे. भूविकास बँकेला फक्त 750 कोटी रुपये दिले असते तरी शेतकऱ्यांना भूविकास बँकेतून कर्ज मिळाले असते. भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन झाले असते तर शेतकऱ्याला त्याच्या बायकोचे मंगळसूत्र सावकाराकडे ठेवण्याची पाळी आली नसती. शासनाला भूविकास बँकेला 750 कोटी रुपये देता आले नाही. पीक कर्ज हा विषय वेगळा आहे. शेतकऱ्याला भूविकास बँक जवळची आहे व ही बँक शेतकऱ्यांना 16 टक्के व्याजाने पैसे देत असते. भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन का केले नाही याची मला माहिती नाही.

सभापती महोदय, अकोल्यातील पोरके कारखान्याला 140 कोटी रुपये दिले, धाराशीवला 350 कोटी, तुळजा भवानी साखर कारखान्याला 150 कोटी रुपये, चंदगड साखर कारखान्याला 200 कोटी रुपये, सातारा येथील प्रतापगड कारखान्याला 60 कोटी रुपये, रजनीताई पाटील यांच्या कारखान्याला 100 कोटी रुपये, वरपुडकरांच्या कारखान्याला 160 कोटी रुपये,कृषी उत्पन्न बाजार समितीला 150 कोटी रुपये व राज्यातील एकंदर सर्व सूत गिरण्यांना 350 ते 400 कोटी रुपये.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

पी.के. अण्णा पाटलांच्या बँक व सूत गिरण्यांना एकंदर 550 कोटी रुपये या शासनाने दिलेले आहेत. कारखान्याच्या 2210 कोटी रुपयांची हमी या शासनाने घेतलेली आहे. माझी आकडेवारी चुकीची असेल तर ती आपण सुधारु शकता.

शासनाने जे काही पैसे कारखान्यांना दिलेले आहेत ते सर्व पैसे बुडाले आहेत. राज्यातील पुढाऱ्यांनी जनतेचे पैसे बुडवले आहेत. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहे. या विषयावर मी जास्त काही बोलत नसतो. या विषयाच्या संदर्भात आता सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. साध्या हाऊसिंग सोसायटीच्या निवडणुकीमध्ये आता कोणी उभे राहत नाही. सहकारामध्ये जे निवडून जातील त्यांना आता बाँड लिहून द्यावा लागणार आहे. सहकारामध्ये जर काही घोटाळा झाला तर प्रापर्टी विकून ते पैसे आता भरावे लागणार असल्यामुळे या निवडणुकीला कोणी उभे राहत नाही. केवळ कारखाने फुंकण्याचेच काम सुरु आहे. 200 कोटी रुपयांचा कारखाना 25 कोटी रुपयांना, 400 कोटीं रुपयांचा कारखाना 76 कोटीला विकला जात आहे. हेच लोक विकलेले कारखाने खाजगीमध्ये घेत आहेत. त्यामुळे यामध्ये जे काही पैसे गेले त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ?

कालच्या लोकमत वर्तमानपत्रात एकट्या बुलढाणा बँकेत 900 कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे सोने गहाण पडलेले आहे अशी माहिती छापून आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

हे सोने आपण तोलून मापून घेतले आहे. त्यावर कर्ज दिले आहे. हे आपण हमी मधून दिले आहे. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी राज्य सहकारी बँकेला आदेश दिले होते की, ताबडतोब पैसे द्यावेत. पण राज्य सहकारी बँकेने ऐकले नाही. त्यावेळी आम्ही कारवाई करू असे सांगितले. राज्य सहकारी बँकेवर आज प्रशासक आहे म्हणून आपण अशी भाषा वापरत असाल तर ते चुकीचे आहे. प्रश्न असा आहे की, आपण पूर्वी बेकायदेशीरपणे पैसे दिले आहेत. कायद्याच्या बाहेर जाऊन पैसे दिले आहेत. हे पैसे चांगल्या भावनेने दिले होते. पण ते बुडाले. म्हणूनच राज्य सहकारी बँकेवर ही परिस्थिती आलेली आहे. आपल्याकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नसताना देखील बँक चालविली आहे. त्या बँकेने पैसे दिले नाहीत म्हणून आमचे मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री हंबरडा फोडत आहेत. ती बँक नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेची परवानगी आल्याशिवाय पैसे देऊच शकत नाही. राज्य व केंद्र शासनाचे मंत्री हे नेहमीच आपापल्या कामात असतात. त्यामुळे आपल्या विभागाच्या सचिवांनी वर पर्यंत जाऊन राज्यातील शेतकऱ्यांवर दुष्काळामुळे ओढवलेली परिस्थिती लक्षात आणून खास बाब म्हणून परवानगी घेतली. शेतकरी जगला पाहिले म्हणून त्यांनी असा प्रयत्न केला. नांदेड करिता प्रयत्न केले होते. पण त्यात यश आले नाही. त्यामुळे तेथील सर्व शेतकऱ्यांचे सर्व पैसे गेले. शासनाने सहकारी बँका वाचविण्यासाठी पैसे दिले आहेत. तेव्हा या बँका वाचविण्याकरिता खास परवानगी आणली असती तर आज शेतकऱ्यांची ओढाताण झाली नसती. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले की, राष्ट्रीयकृत बँकाना शेतकऱ्याला कर्ज देण्यासंबंधी आदेश दिले आहेत. राष्ट्रीयकृत बँका आपल्याला विचारात नाहीत. आपण राज्याचे मुख्यमंत्री असाल पण आमच्या बँकेचे व्यवहार आमच्या पद्धतीने चालविणार असे राष्ट्रीयकृत बँक म्हणते. राष्ट्रीयकृत बँकांचे म्हणणे आहे की, आम्ही आरबीआयच्या धोरणानुसार आणि नियमाप्रमाणे बँक चालविणार. आज राष्ट्रीयकृत बँकांना सांगण्याची आपल्यात हिंमतच राहिलेली नाही. त्यामुळेच आमच्या बँका आज बुडित जात आहेत. त्या कशा वाचवायच्या हा प्रश्न आहे. या चर्चेतून कोणाला फासावर चढवणार, कोणाला लटकवणार, कोणाची वाट लावणार यापेक्षा शेतकऱ्यांना कसे वाचविणार याबाबत उत्तर दिले तर बरे होईल. आपण गेल्या दहा वर्षापासून सहकार मंत्री आहात. या प्रश्नाबाबत आपण योग्य निर्णय घेतला तर आपल्या देदिप्यमान कामगिरीला आणखी उजाळा मिळेल एवढीच मी विनंती करतो. धन्यवाद.

....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. राज्यातील पाच ते सहा बँकांवर 36 (ए) नुसार कारवाई करण्यात आली आहे. येथे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न मांडलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी राज्यातील अनेक बँकांचा उल्लेख करताना चांगल्या बँकांची देखील नावे घेतली आहेत. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्यात आणि देशात चांगल्या प्रकारे काम करीत आहे. काही बँका अडचणीत येण्यास संचालक मंडळ जबाबदार आहे असे बोलले जाते. पण काही ठिकाणी शासकीय धोरण अडचणीचे ठरत आहे याचा मला येथे विशेषत्वाने उल्लेख करावासा वाटतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सहकारी सोसायट्यांना 4 टक्के व्याज दराने कर्ज देतात. नाबार्ड रि-फायनान्सचा व्याजदर 5 टक्के आहे. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सरळ सरळ एक टक्के व्याजाचा तोटा सहन करावा लागतो. सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांना 600 कोटी रूपयांचे कर्ज वाटप केले आहे. पण नाबार्डने रि-फायनान्सच्या माध्यमातून फक्त 220 कोटी रू.पतपुरवठा केला आहे म्हणजे बँकेला स्वत:च्या कॅपिटल मधून उर्वरित रक्कम उभी करावी लागत आहे. स्पर्धेच्या युगात बँकांना साडे नऊ टक्के व्याज दराने ठेवी स्वीकाराव्या लागतात. मुख्य फरक यामुळे पडतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आता सहकारी सोसायट्यांना 4 टक्के व्याज दराने कर्ज देतात. नाबार्ड रि-फायनान्स 5 टक्के दराने कर्ज देत आहे. येथे एक टक्याचा तोटा होत आहे. सहकारी सोसायटीने स्वत:हून कर्ज दिले तर पावणे दोन टक्के तोटा होत आहे. हे धोरण शासनाने घेतले असल्यामुळे शासनाने याचा फेरविचार केला पाहिजे. शासनाने 6 व्याजदर निश्चित निश्चित केल्यामुळे त्याचा फटका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बसत आहे. शासनाने एक लाखा पर्यंतच्या पीक कर्जावर शून्य टक्के व्याज निश्चित केले आहे. सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक 3 लाख रूपया पर्यंतचे कर्ज शून्य टक्क्याने देते. तसेच, 13 टक्के व्याजाचे मध्यम मुदतीचे कर्ज आहे, जो सभासद वेळेत कर्ज भरत आहे त्याला आपल्या नफ्यातून बँक दहा टक्के परतावा देत आहे. अशा प्रकारे चांगल्या योजना राबवित असताना केवळ शासकीय धोरणामुळे बँकांना तोटा होत आहे याचा प्रामुख्याने विचार करणे गरजेचे आहे. नाबार्ड रि-फायनान्सच्या माध्यमातून एक टक्का आणि स्वत:च्या फायनान्स मधून पावणे दोन टक्के व्याजदराचा तोटा बँकांना होत आहे याचा प्रामुख्याने शासनाने विचार करावा असे माझे मत आहे. धन्यवाद.

====





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील म्हणाले की, चंद्रपूर बँक चांगली आहे. त्या चंद्रपूर बँकेबद्दलच मी बोलणार आहे. या बँकेचे एनपीए 35 टक्क्याच्या आसपास आलेला आहे हे मी आपल्या माहितीकरिता सांगत आहे. संचालकांच्या भ्रष्टाचारामुळे चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक देखील अडचणीत आलेली आहे. यामुळे लाखो शेतकरी अडचणीत येणार आहेत. मी येथे एक उदाहरण देणार आहे. बँकेचे सरव्यवस्थापक व तत्कालीन अध्यक्ष यांनी दिनांक 13 मार्च 2012 रोजी कर्ज समितीच्या टिप्पणीमध्ये 35 लाख रूपयाचे कर्ज मंजूर करण्याच्या व्यवहारात गैरव्यवहार केला आहे. सदर गैरव्यवहार कर्ज समितीतील उपाध्यक्ष, सचिव व सदस्य यांना अंधारात ठेवून करण्यात आला आहे. या प्रकरणी विभागीय अधिकाऱ्याने चौकशी केली आहे. त्याने अहवाल दिला असून असे सांगितले आहे की, कर्ज प्रकरण मंजूर करताना प्राथमिक चौकशी व पाहणी देखील व्यवस्थित करण्यात आलेली नाही. आता उप व्यवस्थापकपदी असलेले श्री.बरबटकर यांनी टिप्पणीच्या शेवटी असलेले पान बदलून मंजुरी प्रदान केलेली आहे. पहिल्यांदा मंजूर झालेली टिप्पणी 27 प्रकरणांची होती. त्यानंतरची बोगस टिप्पणी ही 28 प्रकरणांची होती. त्यातील हे प्रकरण 28 वे होते. या टिपणीवर श्री.अनील मोरे नावाच्या अधिकाऱ्याची सही होती. त्यानंतर 28 प्रकरणाची टिप्पणी तयार करण्यात आली. त्यावर बँकेच्या अध्यक्षांची सही आहे. तरी मूळ दस्तावेजात बदल केल्या प्रकरणी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, सरव्यवस्थापक व जे कोणी संबंधित अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई करावी अशी माझी विनंती आहे. कारण बाकीच्या बँकांना जी अडचण उद्भवली आहे ती परत चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेला उद्भवू नये म्हणून काळजी घ्यावी.

====

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 97 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी राज्यातील 6 जिल्हा मध्यवर्ती बँकांसंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नासबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे. वेळ कमी असल्यामुळे अगदी थोडक्यात मी माझे उत्तर देणार आहे.

या चर्चेच्या माध्यमातून तीन विषय आपणा समोर आले आहेत. सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे राज्यातील शेतकऱ्यांसाठी पीक कर्जा बाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ? माझ्या दृष्टीने सर्वात प्राधान्याचे हे काम असले पाहिजे असे माझे स्वतःचे मत आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील . ...

सभापती महोदय, थोडक्यात याची पार्श्र्वभूमी या सदनाला, राज्याला माहिती होणे आवश्यक आहे. नेमकी 35-अे च्या संदर्भातील नोटीस याच बँकांना का आली? तसेच सेक्शन-11च्या संदर्भातील नोटीसेस याच राज्यातील काही बँकांना कशामुळे आल्या? या सगळया विषयांच्या खोलामध्ये जावयाचे म्हटले तर तेवढा वेळ या सदनामध्ये उपलब्ध नाही आणि मला त्या खोलामध्ये जाण्याची सुध्दा आवश्यकता वाटत नाही. पण एक गोष्ट निश्चितपणे खरी आहे की, जेव्हा एप्रिल महिन्यामध्ये आर.बी.आय.चे पत्र सदरहू 6 जिल्हा मध्यवर्ती बँकांना प्राप्त झाले आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने विशेषत: या 6 जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या बाबतीत प्रामुख्याने हा प्रश्न पुढे आला.सुरुवातीच्या काळामध्ये राज्य सहकारी बँकेने बुलढाणा डीसीसी बँकेला क्रेडीट लिमिट मंजूर केले. तसेच इतर बँकानाही पीक कर्जासाठी मंजूर केले. मात्र त्यानंतर ही नोटीस आल्यावर कर्जाच्या वाटपाची सर्व प्रकरणे थांबविण्यात आली.

सभापती महोदय, त्यानंतर तातडीने माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर बैठका घेण्यात आल्या तसेच माझ्या स्तरावर बैठका घेण्यात आल्या. माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत देखील बैठका झाल्या. रिझर्व बँकेच्या डेप्युटी गर्व्हनर यांच्याकडे मी स्वत: जिल्हा बँकेचे चेअरमन, एम.डी.यांना घेऊन गेलो. माननीय केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरदचंद्र पवार साहेबांकडे बैठक झाली, माननीय वित्त मंत्र्यांबरोबर बैठक झाली. अशा प्रकारे याबाबतीत सर्व बाजूने प्रयत्न केला. अशा प्रकारे याबाबतीत शासनाने कमी प्रयत्न केले अशातला भाग नाही. परंतु रिझर्व बँकेची भूमिका स्पष्ट होती की, आम्ही तुम्हाला डिपॉझिट घेण्यासाठी बॅन केले आहे आणि ज्यादिवशी डिपॉझिट घेण्यासाठी बॅन करण्यात आले त्यादिवशी ठेवीदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आणि त्यांना असे वाटले की, आता या बँका अस्तित्वात रहात नाहीत, त्यामुळे आपले पैसेही सुरक्षित रहाणार नाहीत. त्यातून डिपॉझिट रन-ऑफ होण्याच्या संदर्भातील विषय पुढे आला.

सभापती महोदय, मी वर्तमानपत्राच्या माध्यमातून, इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमतून स्टेटमेंट दिले आणि त्यातून काही प्रमाणात का होईना पण ठेवी विड्रॉ करण्याच्या संबंधातील प्रक्रिया थांबली. खरे म्हणजे केवळ रिझर्व बँकेच्या परिपत्रकामुळे अचानकपणे हा विषय राज्यापुढे निश्चित आला. यामध्ये कोणी काही जाणूनबुजून काही केले किंवा शेतकऱ्यांनी अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे अशी काही वस्तुस्थिती नाही.याबाबतीत प्रयत्न झाले. त्यावेळी आपणही बैठकीसाठी उपस्थित होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

त्यानंतर ज्यावेळी डेप्युटी गव्हर्नरकडे गेलो त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमची फक्त एकच मागणी आहे की, या बँकेचा प्रॉफीट 1 लाख रुपयांपर्यत जरी आला तरी सर्व निर्बंध काढण्यास आम्ही तयार आहोत. सी.आर., ए.आर. 4 टक्केच्या पुढे गेला पाहिजे. तुमचा ग्रॉस एनपीए, नेट एनपीए सुध्दा नॉर्म्स प्रमाणे बदलला गेला पाहिजे. या सगळ्या उपाययोजना करण्याकरिता आम्ही या बँकांना एक वर्षाची नव्हे तर तीन वर्षाची मुदत दिली होती. 2008-2009 मध्ये, 2009-2010 मध्ये, 2010-2011 मध्ये तसेच 2011-2012 मध्ये 31 मार्च, 2012 पर्यंत मुदत दिली होती. लायसन्स घेण्याकरिता रिझर्व्ह बँकेने 2009 साली परिपत्रक काढले होते. हे परिपत्रक त्यांनी अचानकपणे काढलेले नाही. यामध्ये केवळ चुकीच्या पध्दतीचे कर्ज वाटप, वसुली व्यवस्थित न करणे त्याचबरोबर कर्ज देत असताना जे तारण घ्यावयास पाहिजे ते मोठ्या प्रमाणावर होऊ शकले नाही त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, असा एक विषय पुढे आला की, मंत्रालयातून स्थगिती दिली जाते. विधानसभेमध्ये माननीय अध्यक्षांनी निदेश दिले की, सर्व स्टे व्हॅकेट करा. मी आणि माननीय राज्यमंत्री दोघेही सभागृहामध्ये उपस्थित आहोत. वसुलीच्या बाबतीत आम्ही कोणीही स्थगिती दिलेली नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : टेक्स्टाईल कमिशनरने स्थगिती दिलेली आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आज या सहा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या बाबतीत जो विषय पुढे आलेला आहे यामध्ये प्रामुख्याने सीएसएफआयच्या वतीने जी राकेश मोहन समिती गठीत झाली होती त्या समितीने जो रिपोर्ट दिलेला आहे त्या रिपोर्टच्या माध्यमातून या देशातील 45 बँकांना अशा प्रकारच्या कारवाईच्या नोटिसेस देण्यात आल्या. त्यामध्ये आपल्या महाराष्ट्रातील 6 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. आपण हेही पाहिले असेल की, सन 2011-2012 मध्ये निकष पूर्ण करणाऱ्या ज्या जिल्हा बँकांना परवानगी दिली त्यामध्ये नांदेड, परभणी, औरंगाबाद, अमरावती, जालना या बँकांना रिझर्व्ह बँकेने लायसन्स दिलेले आहे. केवळ त्यांचा 31 मार्चचा परफॉर्मन्स योग्य असल्यामुळे त्यांना परवानगी देण्यात आली. निकष पूर्ण न

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्याबद्दल 31 डिसेंबरला नागपूर, वर्धा, बुलढाणा, जालना, उस्मानाबाद, धुळे-नंदुरबार या सहा जिल्हा मध्यवर्ती बॅकांना मात्र रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली नाही आणि त्यांनी सांगितले की, आम्ही वारंवार तुम्हाला मुदत दिलेली आहे परंतु या बाबतीत सुधारणा होऊ शकली नाही. बीडचा विषय वेगळा आहे. त्याबाबतीत मी बोलणार आहे पण या सहा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या बाबतीत आम्ही पुन्हा एकदा विनंती केली की, त्याना पुन्हा एक वर्षभराची मुदत द्यावी. एक वर्षाच्या आत जर या बँकांनी आपला परफार्मन्स डेव्हलप केला नाही तर मग मात्र तुम्हाला नियमाप्रमाणे काय कारवाई करावयाची असेल ती करा असे पत्र आमच्या आयुक्तांनी नाबार्डला, रिझर्व्ह बँकेला लिहिले आहे. यामध्ये बँकेची कारवाई हा वेगळा भाग आहे पण त्या जिल्ह्यातील शेतकरी आपल्या दृष्टीने खूप महत्वाचा आहे. म्हणून त्यांनी 30 सप्टेंबरपर्यंत मुदत दिलेली आहे.

सभापती महोदय, मला या सदनाला हेही सांगितले पाहिजे की, या सहा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नेट वर्थ मागच्या आठवड्यात प्लसमध्ये आलेले आहे. म्हणजे ती बँक आता यातून बाहेर येईल अशा प्रकारची परिस्थिती आहे. वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत होम ट्रेडींग मधील 48 कोटी रुपयांच्या रिकव्हरीच्या बाबतीत कोर्टामध्ये पैसे जमा आहेत. त्या संदर्भातील एक पिटीशन सुप्रीम कोर्टामध्ये दाखल झाली. कदाचित त्याचा निर्णय आपल्या बाजूने होईल. ते 48 कोटी रुपये जर मिळाले तर वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुध्दा सेक्शन 11 आणि सेक्शन 35(अे) च्या नोटीसमधून बाहेर येऊ शकणार आहे.

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मघाशी आकडेवारी सांगितली. माझ्याकडे अद्ययावत आकडेवारी आहे. त्यानुसार त्या बँकेमध्ये 28 कोटी रुपये नेट निगेटिव्ह राहात आहेत. त्या 28 कोटी रुपयांच्या बाबतीत आता त्यांनी वसुलीचा प्लॅन दिलेला आहे. माझ्या महितीप्रमाणे एक महिन्यात किंवा दीड महिन्यामध्ये साधारणपणे 50 ते 60 कोटी रुपयांच्या आसपास रकमा वसूल होतील आणि कदाचित 30 सप्टेंबरच्या आत उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुध्दा या सेक्शनमधून बाहेर निघेल अशी या बँकेची परिस्थिती आहे. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत 122

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

ते 125 कोटी रुपयांचा नेट लॉस आहे. त्या बँकेकडून जे प्रपोजल आमच्याकडे प्राप्त झालेले आहे त्यामध्ये त्यांनी आम्हाला ही वसुली 30 सप्टेंबरपर्यंत करु असे सांगितले आहे. त्या बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकांना मी बोलवून घेतले होते. त्यांनी तशा प्रकारचा एक प्रस्ताव आमच्याकडे, नाबार्डकडे आणि रिझर्व्ह बँकेकडे दिलेला आहे. त्या बँकेच्या बाबतीत सुध्दा मार्ग निघेल असे मला स्वत:ला वाटते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

धुळे, नंदुरबार व नागपूर या जिल्हा बँकांपैकी नागपूर जिल्हा सहकारी बँकेने एक योजना आखलेली आहे. या बँकेच्या मालकीची शहराच्या मध्यभागी एक जागा आहे. त्या जागेची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन पारदर्शक पध्दतीने व्यवहार करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्या संदर्भात मी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. त्या जागेच्या माध्यमातून बँकेला अंदाजे 90 ते 100 कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. लिलावाद्वारे कदाचित ती रक्कम वाढण्याची शक्यता आहे. ती रक्कम सरळ बँकेच्या खात्यात जमा केली तर नेटवर्थ पॉझि ाटिव्हमध्ये आणण्यासाठी मदत होईल.

धुळे व नंदुरबार जिल्ह्यांच्या बँका आदिवासी भागात आहेत. उपसा सिंचन योजनेसाठी वन टाईम सेटलमेंट झाले होते. नाशिक येथे झालेल्या मंत्रिमंडळात निर्णय घेण्यात आला होता. त्या निर्णयानुसार 128 कोटी रुपयांचे व्याज संचालक मंडळाने पूर्णपणे माफ केले आणि वन टाईम सेटलमेंटच्या माध्यमातून 225 कोटी रुपयांचे कर्ज बार करुन घेतली. त्याची रिव्हर्स एन्ट्री झ ााल्यामुळे तो तोटा बँकेच्या डोक्यावर आला. त्यामुळे त्या बँकेची अडचण झालेली आहे. त्यांनीही सुधारित प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे. शेवटी बँक टिकली पाहिजे, संचालक मंडळ हा वेगळा विषय आहे. जिल्हा बँक असो किंवा राज्य सहकारी बँक असो या बँकांच्या माध्यमातून सहकाराचे जाळे तयार केलेले आहे. त्याला तडा जाता कामा नये अशी भूमिका सहकार विभागाच्या माध्यमातून घेतलेली आहे.

सभापती महोदय, पीक कर्जाच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला की, राज्य सहकारी बँक शासनाचे ऐकत नाही. मला असे वाटते की, जिल्हा सहकारी बँक असो की, राज्य सहकारी बँक असो या सगळयांच्या वर राज्य सरकार आहे. राज्य सरकारने आदेश काढल्यानंतर त्याचा बँकेने अवमान केला असे होत नाही. त्या संदर्भात 1-2 वर्तमानपत्रात बातम्या आल्या असतील. सहकार कायद्याच्या कलम 79 नुसार मी राज्य सहकारी बँकेला सूचना दिल्या आहेत की, या 6 जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक कर्ज द्यावे लागेल. त्यांनी सांगितले आहे की, राज्य शासनाच्या आदेशाचे आम्ही पालन करु. मात्र हे कर्ज थेट जिल्हा बँकेला द्यावयाचे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

की पॅक्सला द्यावयाचे असा विषय समोर आला. काही लोकांचे असे म्हणणे होते की, जिल्हा बँकेला बायपास करुन पॅक्सला कर्ज द्यावे. काही लोकांचे असे म्हणणे होते की, जिल्हा बँकेमार्फत हे कर्ज शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. या संदर्भात राज्य सहकारी बँकेने स्पष्टीकरण मागितले होते. मी त्याबाबतच्या फाईलवर जिल्हा बँक/पॅक्स अशा प्रकारचा शेरा लिहिल्यानंतर तशा प्रकारचे आदेश काढण्यात आले. ज्या ज्या ठिकाणी पॅक्स थेट कर्ज घेण्यास तयार असेल तर विभागाची ना नाही. कारण नाबार्डच्या निकषात ते बसत आहे. परंतु पीक कर्जासाठी कोणतीही अडचण येऊ नये.

त्यानंतर राज्य सहकारी बँकेने या सहा बँकांना 578 कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी नागपूर जिल्हा सहकारी बँकेला 75 कोटी रुपये, बुलढाणा जिल्हा सहकारी बँकेला 63 कोटी रुपये, वर्धा जिल्हा सहकारी बँकेला 44 कोटी रुपये, जालना जिल्हा सहकारी बँकेला 48 कोटी रुपये, उस्मानाबाद जिल्हा बँकेचा 160 कोटीचा प्रस्ताव राज्य सहकारी बँकेने मान्य केलेला आहे. धुळे व नंदुरबार जिल्हा बँकेचा 114 कोटी रुपयांचा प्रस्ताव राज्य सहकारी बँकेने मान्य केलेला आहे. निर्बंध येण्यापूर्वी 843 कोटी रुपयांचे पीक कर्जाचे वाटप झालेले आहे. उर्वरित 741 कोटी रुपयांचे वाटप होऊ शकले नाही. त्यामुळे 5.50 लाख ते 6 लाख शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळू शकले नाही. ही गोष्ट खरी आहे. सहकार कायद्याच्या कलम 35-ए ची नोटीस आल्यानंतर हे घडलेले आहे. हे 578 कोटी रुपये रिलीज झाले असून प्रत्यक्षात या रकमेचे वाटप सुरु झालेले आहे. मी या संदर्भात विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर व जिल्हा बँकांच्या अध्यक्षांबरोबर चर्चा केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी बुलढाणा जिल्हा बँकेत विचारणा करावी. या रकमा त्या त्या बँकांना उपलब्ध झालेल्या आहेत. परंतु दुर्दैवाने काही भागात पाऊस उशिरा सुरु झाल्यामुळे शेतकऱ्यांनी पीक कर्जाची मागणी केलेली नाही. काही लोकांनी अगोदर पीक कर्ज घेतलेले आहे. त्या शेतकऱ्यांची खरीप हंगामातील पिके जळून गेली आहेत. त्यामुळे काही भागातून दुबार पेरणीसाठी कर्जाची मागणी होत आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

सभापती महोदय, राष्ट्रीयकृत बँका कर्जे देत नाहीत असाही मुद्दा मांडण्यात आला होता. मी या निमित्ताने सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, 68 हजार शेतक-यांचे अर्ज विभागाच्या वतीने राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून 6 जिल्ह्यांच्या बँकांमध्ये प्राप्त करुन घेतलेले आहेत. त्यापैकी 24,611 शेतकऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकांमार्फत 138 कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे. या शेतकऱ्यांची गावनिहाय माहिती उद्या सकाळपर्यंत उपलब्ध करुन देण्याची माझी तयारी आहे. हा आकडा त्या त्या जिल्ह्याच्या लिड बँकेकडून प्राप्त झालेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 16:05

श्री. हर्षवर्धन पाटील...

या ठिकाणी मी कोणत्याही प्रकारची चुकीची आकडेवारी देत नाही. हे 138 कोटी रु. आणि राज्य सहकारी बँकेने दिलेले 578 कोटी रु. असे एकूण 750 कोटी रु. पीक कर्जासाठी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केलेला आहे. आणखी पीक कर्ज लागले तर राज्य शासन पुढकार घेऊन या 6 जिल्ह्यातील शेतक-यांना पीक कर्ज देण्याच्या बाबतीत मागेपुढे पाहणार नाही.

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, शेतक-यांना पीक कर्ज उपलब्ध करुन दिले जात नाही. सन 2011-12 या आर्थिक वर्षामध्ये 19788 कोटी रु.चे पीक कर्ज शेतक-यांना वाटलेले आहे. गेल्या 10 वर्षातील सरासरी पाहिली तर कधी 8 हजार कोटीच्या वर पीक कर्ज वाटले गेले नव्हते. सन 2010-11 या वर्षामध्ये 19788 कोटी रु. पीक कर्ज वाटले. सन 2012-2013मध्ये 65 लाख शेतक-यांना 24700 कोटी रु.चे पीक कर्ज वाटण्याचे उद्दिष्ट आम्ही मान्य केलेले आहे. त्यापैकी 53-54टक्के पीक कर्ज राष्ट्रीयकृत बँकामार्फत आणि 47-48 टक्के पीक कर्ज सहकारी बँकामार्फत वाटण्याचे ठरविलेले आहे. 1 लाख रु. पर्यंत शून्य टक्के, 3 लाख रु.पर्यन्त 2 टक्के व्याजाची आकारणी करुन पीक कर्जाच्या संबंधातील कार्यक्रम राबविण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. पुढच्या दोन वर्षामध्ये हा आकडा 30 हजार कोटी पर्यंत कसे जाईल या दृष्टीने माझ्या या विभागाचा प्रयत्न राहाणार आहे. पीक कर्ज हे एका वर्षापुरते नाही. पीक कर्ज हे खरीप हंगामासाठी लागते, रब्बी हंगामासाठी लागते, उन्हाळी हंगामासाठी लागते. काढलेले कर्ज वेळेवर फेडणा-या शेतक-याला जर कर्जामध्ये सवलत दिली तर काढलेले कर्ज परत फेडण्याची प्रवृत्ती शेतक-यांमध्ये निर्माण होईल. अशा प्रकारची सवय शेतक-यांना लावण्याची गरज आहे.

बँकेमध्ये असलेले डिपॉझिटचे पैसे हे तुमचे आमचे नाहीत ते सामान्य माणसांचे पैसे आहेत. असे बोलले जाते की, ही माझी बँक आहे. त्या बँकेत तीन हजार कोटीची ठेव आहे. ही ठेव या राज्यातील सामान्य लोकांची ठेव आहे. हा पब्लिक मनी आहे. आपण 1 रुपया ठेव घेतल्यानंतर, 1 आणि रुपया कर्ज वाटल्यानंतर मिळणारे ठेवीवरचे व्याज आणि मिळणारे कर्जावरचे व्याज यामधील फरक लोकांसमोर आणला पाहिजे. हा शेवटी पब्लिक मनी आहे. मघाशी कुणी तरी असा उल्लेख केला की राज्य सहकारी बँकेकडे 8 हजार कोटी रुपये शिल्लक आहेत. ही

..2..

श्री. हर्षवर्धन पाटील...

गोष्ट खरी आहे की,राज्य सहकारी बँकेकडे 10 हजार कोटी रुपये शिल्लक आहेत. पैसे शिल्लक आहेत म्हणून वाटायला सुरुवात केली तर आपण असे म्हणाल की, सहकार खाते काय करते ? हा प्रश्न पुढे येणारच आहे. मला असे वाटते की, येथून पुढच्या काळामध्ये या बँका व्यवसाय म्हणून चालविणे आवश्यक आहे. कर्ज देताना ते योग्य व्यक्तीला दिले जात आहे की नाही हे देखील पहाणे आावश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये या राज्यातील शेतकरी पीक कर्जाच्या बाबतीत वंचित राहाणार नाही याची खबरदारी शासनाने घेतलेली आहे. या व्यतिरिक्त कोणतीही अडचण आली तरी कोणीही आमच्या विभागाशी केव्हाही संपर्क साधू शकतो. आपणा सर्वांची बांधिलकी ही शेवटी शेतक-याशी आहे. या प्रश्नाच्या संदर्भात उद्‌भवणा-या कोणत्याही अडचणीवर सरकारची मात करण्याची तयारी आहे.

सभापती महोदय, सीआरआरचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, केन्द्रीय वित्त मंत्र्यांना उशिरा पत्र गेले. जून महिन्याच्या 12 तारखेला रात्री साडेआठ वाजता वर्षा बंगल्यावर बैठक झाली. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर हे देखील त्या बैठकीला उपस्थित होते. 13 जूनला मंत्रिमंडळाची बैठक होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करुन पत्र पाठविण्यात येईल असे आश्वासन त्या बैठकीत देण्यात आले होते. 13 जूनला माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने केन्द्रीय वित्तमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांना पत्र पाठविण्यात आले. त्या पत्राची प्रत माझ्या जवळ आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, रिझर्व्ह बँक आणि नाबार्डने कर्ज पुरवठा करावा. आवश्यकता पडली तर या कर्जाच्या संदर्भातील जबाबदारी घेण्याची भूमिका राज्य सरकार स्पष्ट करील. दुस-या दिवशी सकाळी 11.00 वाजता कॅबिनेटची मिटींग चालू असताना माननीय मुख्यमंत्र्यांची सही घेऊन हे पत्र दिल्लीला पाठविले. आम्ही प्रयत्न करण्यामध्ये कुठे कमी पडलो असे नाही. 35ए ची नोटीस असली तरी राज्य सहकारी बँकेला असे आदेश दिलेले आहेत की, आपण कर्ज घ्या, ती कर्जफेड करण्याकरिता सरकार प्रयत्न करील.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

त्यातून कर्ज फेडण्यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या तर त्याची जबाबदारी सरकार घेण्यास तयार आहे अशी भूमिका आम्ही त्या पत्रामध्ये स्पष्ट केलेली आहे. तेव्हा आमच्याकडून प्रयत्न झाले नाहीत अशातला काही भाग नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी मुद्दा उपस्थित केला की, ज्या बँका चांगल्या चालल्या आहेत त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात आली. ही बाब तपासून घेण्यात येईल. ज्या सहकारी संस्था उत्तम पध्दतीने सुरु असतात त्यांना सरकारचे पूर्ण सहकार्य असते. हा या गटाचा तो त्या गटाचा याचा आम्ही कधी विचार केला नाही आणि तसा विचार करण्याचे काही कारण नाही. परंतु अशा काही तक्रारी असतील तर त्यामध्ये जरुर लक्ष घालून त्यातून मार्ग काढण्याचा विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राणा जगजितसिंह पाटील यांनी प्रोफेशनल वर्कीगचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. आम्ही आता एक नवीन नियमावली तयार करीत आहोत. जिल्हा मध्यवर्ती बँक असो, राज्य सहकारी बँक असो त्या ठिकाणी प्रोफेशनल क्वालिफिकेशन आणि एक सिस्टीम ठेवणार आहोत. हा माणूस माझ्या जवळचा, तो माझ्या ओळखीचा असे पाहायला लागलो तर बँक प्रोफेशनली चालू शकणार नाही. कारण बँक ही प्रोफेशनली चालली पाहिजे. आज राज्यात जवळपास 4 कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. या सर्व ठेवी सामान्य जनतेच्या आहेत. आपल्यावर सामान्यांचा विश्वास आहे म्हणून त्यांनी या ठेवी ठेवलेल्या आहेत. बँकेबद्दल काहीही ऐकले तरी जनतेने पहिले प्राधान्य को.ऑप.बँकेमध्ये ठेवी ठेवण्याला दिलेले आहे. या बँकेमध्ये ठेवलेल्या ठेवी लगेच मिळतात. गरज पडल्यास ठेवी परत दिल्या जातात किंवा ठेवीवर कर्ज दिले जाते. आपण अशी विश्वासाची भूमिका निर्माण केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राणा जगजितसिंह यांनी लिक्वीडेशनच्या बाबतीत काही मुद्दे उपस्थित केले त्याबाबत जरुर विचार केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला. खरीप हंगामासाठी 690 कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले होते त्यापैकी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

571 कोटी रुपयांचे वाटप दिनांक 20.7.2012 पर्यंत झाले आहे. यामध्ये काही अडचणी आहेत. संचालक मंडळाने काही चुकीचे व्यवहार केले म्हणून त्यांच्यावर कारवाई सुरु आहे. बँक बरखास्त झालेली आहे. आजच त्या बँकेची मिटींग माझ्या दालनात बोलावली आहे. मी आणि माननीय राज्यमंत्री या प्रश्नामध्ये लक्ष घालून जे काही चुकले असेल त्याची दुरुस्ती कशी करता येईल, संबंधितांवर कारवाई कशी करता येईल हे पाहणार आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, आपण हे सर्व करीत असताना अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करणार ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणाले की, "अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही. मला सहकार विभागाबद्दल बोलायचे आहे." आपण सहकार विभागावर केव्हाही चर्चा उपस्थित करावी त्याला माझी काही हरकत नाही.

सभापती महोदय, अलिबाग येथील पेण अर्बन को.ऑप. बँकेला आमच्या ऑडीटरने सलग सहा वर्षे "अ" वर्ग शेरा दिला. हे कशामुळे झाले ? मध्यंतरी आपण कायद्यामध्ये बदल केला. को.ऑप.बँकांचे म्हणणे होते की, आमच्यावर सरकारचे नियंत्रण नको, आम्हाला खाजगी ऑडीट करुन घ्यायचे आहे, आपण ते मान्य केले. सहकार क्षेत्रातील ऑडीटर काही चांगले काम करीत नाहीत. खाजगी ऑडीटर चांगले काम करतात. सरकारने त्यास मान्यता दिली. संचालकांनी ठराव केला. आज पेण अर्बन को.ऑप. बँक 776 कोटी रुपयांनी तोट्यात गेली. ज्यावेळी एफ.आर.आय.दाखल करण्याची वेळ आली. त्यावेळी मी आयुक्तांना सांगितले की, ज्या सी.ए.ने बँकेला सलग पाच वर्षे "अ" वर्ग शेरा दिलेला आहे त्याला सह आरोपी करण्यात यावे. तो सी.ए.दोन महिने सहा दिवस तुरुंगात होता.

सभापती महोदय, मध्यंतरी सेक्शन 11 खाली जिल्हा मध्यवर्ती बँका गेल्या त्यावेळी आपण डी.डी.आर.ला निलंबित करुन त्यांना सह आरोपी केले होते. कारण जिल्हा उपनिबंधक आणि जॉईन्ट रजिस्ट्रार हे बँकेच्या बोर्डावर असतात. त्यांची देखील जबाबदारी असते. जर चुकीच्या पध्दतीने ठराव होत असतील, चुकीच्या पध्दतीने वाटप होत असतील, ऐनवेळी उपस्थित होणाऱ्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

विषयांमध्ये 100 विषय उपस्थित होत असतील आणि त्यास विभागाचे अधिकारी मान्यता देत असतील तर ते योग्य नाही. तेव्हा अशा प्रकारची जबाबदारी डी.डी.आर.आणि जॉईन्ट रजिस्ट्रावर देण्याची भूमिका घेतलेली आहे. हे सर्व करीत असताना काही प्रेशर येणार आहेत, काही अडचणी येणार आहेत. काही जण नाराज होणार आहेत. आपणास प्रथम सामान्य ठेवीदारांचे हित पाहायचे आहे म्हणून आपण ही भूमिका घेतलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मितेश भांगडिया यांनी काही मुद्दे उपस्थित केले. आता त्यांच्या ताब्यात बँक गेल्यामुळे आम्हाला अडचण वाटण्याचे काही कारण नाही. आपण जर त्या बँकेत पैसे टाकले तर त्या बँकेचा सीआरएआर अधिक होईल. इकडे तिकडे पैसे ठेवण्यापेक्षा त्या बँकेत पैसे ठेवले तर ती बँक अधिक चांगल्या रितीने चालेल.

यानंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री.हर्षवर्धन पाटील....

सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्या अनुषंगाने तपासणी केली जाईल.

सन्माननीय सदस्य श्री.घार्गे यांनी व्याजासंबंधी मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबद्दल शासन नवीन धोरण करण्याचा विचार करीत आहे. एक विषय भविष्यात पुढे येणार आहे. 1 लाख रुपयांपर्यत शून्य टक्के व्याज आणि 3 लाख रुपयांपर्यत 2 टक्के व्याज याचा परिणाम विकास सोसायटया, जिल्हा बँक आणि राज्य सहकारी बँकेच्या आर्थिक क्रियाशक्तीवर झालेला आहे, ही गोष्ट खरी आहे. सहकारी बँका सांगता आहेत की, सदर धोरण हे शासनाने स्वीकारले आहे. आम्ही डिपॉझिटरला 10.50 टक्के व्याज द्यावयाचे आणि सरकार सांगते आहे की, शून्य टक्के व्याजाने कर्ज द्या. याबाबतीत सर्वांना विश्वासात घेऊन एक वेगळे धोरण लवकरच ठरविणार आहोत. सर्व्हीस चार्ज, विकास निधी असा काही तरी मार्ग काढणे आवश्यक आहे. 30-30 हजार रुपयांचा कॉंटम वाढत गेला, तर त्याचा परिणाम बँकाच्या अर्थकारणावर सुध्दा होईल याची मला पूर्ण जाणीव आहे. या बद्दलचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी काही मुद्दे उपस्थित केले. एम.एस.सी.बँक डायरेक्ट फायनान्स करु शकते काय, ही तर आपली जुनीच मागणी आहे. नाबार्ड म्हणते की, आम्ही फक्त राज्य सहकारी बँकेला रिफायनान्स करु. या वर्षी नाबार्डने 2800 कोटी रुपये रिफायनान्स करण्याचे मान्य केले. 4.50 टक्क्याने रिफायनान्स 2800 कोटी रुपयांचे येत असेल तर राहिलेल्या पीक कर्जाच्या बाबतीत काय करावयाचे, रिफायनान्सच्या बाबतीतही काही तरी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. जिल्हा मध्यवर्ती बॅकांची मुख्य बँक नाबार्ड आहे, त्यांनी सुध्दा त्यांच्या निकषांमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. पीक कर्जाच्या संदर्भात सुध्दा काही तरी मार्ग तुम्हाला आम्हाला काढणे गरजेचे आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी बरेच मुद्दे मांडले, परंतु मला सभागृहाचा जास्त वेळ घ्यावयाचा नाही. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, भविष्यात बँक चालविणे तुम्हाला आणि आम्हाला थोडेसे कठीण झालेले आहे.

सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेच्या रडारवर एखादी बँक आली तर या ठिकाणी सांगितले जाते की, सहकार मंत्र्यांनी आमची बँक बरखास्त केली. जिल्हा बँका आणि राज्य सहकारी बँकांवर कारवाई करण्याचा अधिकार राज्य शासनाच्या सहकार विभागाला नाही. त्याचे कारण असे आहे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

की, आपण वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारला. आपण कलम 110 ची अमेडमेंट स्वीकारली. कलम 110 च्या अमेडमेंटमध्ये निगोशिएबल इन्स्ट्रुमेंन्ट ॲक्टमध्ये हे संपूर्ण अधिकार नाबार्ड आणि रिझर्व्ह बँकेच्या कक्षेमध्ये गेलेले आहेत. दरम्यानच्या काळात कोल्हापूर,सांगली, धुळे, बीड, बँकांबर कारवाई झाली, या राज्यात चांगल्या बँका कार्यरत आहेत. रायगड, , सातारा, अहमदनगर, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँका अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. आपण या बँकेचे विश्वस्त म्हणून काम करतो आहोत अशी भूमिका घेऊन मॅनेजमेंटने काम केले तर निश्चितच बँकाचे कामकाज चालल्या प्रकारे चालू शकतात. प्रत्येक वेळेला संचालक मंडळ बरखास्त होणार, बँक तोटयात जाणार आणि बँकाकडून मागणी येते की, आम्हाला पैसे उपलब्ध करुन द्यावेत. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचा दाखला मी देऊ इच्छितो. त्या बँकेला मदत करुन ती बँक शासनाने अडचणीत बाहेर आणली आहे. शासन या बाबतीत गंभीर असून त्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहे. राज्यातील बऱ्याचशा बँका मार्गी लागल्या आहेत. राज्य सहकारी बँक बऱ्यापैकी मार्गावर आलेली आहे. फक्त चार ते पाच बँकांचाच प्रश्न शिल्लक राहिलेला आहे. त्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेऊन राज्य सरकार योग्य पावले टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. या ठिकाणी अतिशय चांगली चर्चा उपस्थित केलेली आहे. अशा प्रकारची चर्चा होणे आणि त्यातून राज्यातील शेतकऱ्यांना बॅकींग व्यवसायाची भूमिका, सरकारची भूमिका, राज्य शासनाची भूमिका जनतेला या माध्यमातून कळणे अत्यंत आवश्यक आहे, कर्ज पुरवठा करण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण नाही, मी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, कोणत्या तालुक्यात, कोणत्या जिल्हयात शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यामध्ये काही अडचण असेल आपण माझ्याशी केव्हाही संपर्क साधू शकता. या बाबतीत सहकार विभाग सकारात्मक दृष्टीकोन ठेवून शेतकऱ्यांना कर्ज देण्याच्या बाबतीत कोठेही कमी पडणार नाही एवढी ग्वाही देतो. भविष्यातही शेतकऱ्यांना जास्तीत जास्त न्याय देण्याचा आमचा विभागाचा निश्चितपणे प्रयत्न राहील असे पुन्हा या ठिकाणी सांगतो.

श्री. जयंत प्र.पाटील : राज्यात 10 बँका अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. तरी देखील त्या जिल्हयातील जिल्हा परिषदांचे अकाऊंट राष्ट्रीयीकृत बँकांकडे वर्ग करण्याचे काम जलदगतीने चालू आहे. शिक्षकांचे पगार जिल्हा परिषदेच्या अकाऊन्टमधून होतात. परंतु आता

3...



ABG/ D/ KTG/ प्रथम श्री.अजित 16:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील

त्यांना राष्ट्रीयीकृत बँकाकडून पगार घ्यावे लागणार आहेत. या बाबतीत रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेने राज्य शासनाला प्रपोजल दिलेले आहे, आम्ही आधी पगार करतो, नंतर तुम्ही आम्हाला पैसे द्यावेत. या अनुषंगाने शासनाने परिपत्रक काढलेले आहे. आज 10 बँका चांगल्या स्थितीत चालू आहेत, त्या बँकासाठी वेगळे परिपत्रक काढणार काय ?

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ D/ पूर्वी श्री.गिते 16:20

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील हे बऱ्याचवेळा सदनात निवडून आलेले आहेत त्यामुळे त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये मी जरुर लक्ष देईन. त्यांनी दुसरा प्रश्न परिपत्रकाच्या बाबतीत विचारला आहे. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, या परिपत्रकाचा फेरविचार करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी पाच जिल्हा मध्यवर्ती बँकांचा याठिकाणी उल्लेख केला. वर्धा, उस्मानाबाद, नागपूर या बँका कशा पध्दतीने कामाला लागलेल्या आहेत हे आपण सांगितले. भविष्यात कोर्टाच्या अडचणीमुळे वसुली झाली नाही तर शासन मदत करील काय ? एका केसमध्ये टेक्सटाईल कमिशनरने बँकेच्या वसुलीला स्थगिती दिली. बुलढाणा बँकेची वसुली होऊ शकली नाही. अशा प्रकारे भविष्यात स्टे दिला जाणार नाही याबाबत शासनाने खुलासा करावा. भविष्यात सीआरएआर पूर्ण होत नाही असे काही बँकांच्या बाबतीत निदर्शनास आले तर नांदेड बँकेला ज्याप्रमाणे मदत केली त्याप्रमाणे अडचणीत आलेल्या बँकांना वाचविण्याचा प्रयत्न करणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, टेक्सटाईल आयुक्तांनी स्टे दिलेला आहे त्यामध्ये लीगल अडचण निर्माण झाली होती. बँकेने प्रॉपर्टी विकायला काढल्यानंतर टेक्सटाईल आयुक्तांनी विचारले होते की आमच्या कर्जाचे काय करणार ? बुलढाणा जिल्हा बँकेच्या संदर्भात मी माननीय सदस्यांना विनंती करतो की, जी 27 कुटुंबांची वसूली राहिली आहे त्याबाबतीत त्यांनी मदत करावी. सर्वांनी जर प्रेशर आणले तर 27 कुटुंबांची वसुली करण्यात अडचण नाही. वसुली झाली तर सरकारला मदत देण्याची आवश्यकता राहणार नाही.

सभापती महोदय, यामध्ये राजकारणाचा विषय नाही. ही वसुली करण्याच्या बाबतीत कारवाई करु. त्यातूनही काही अडचण आली तर चर्चा करुन प्रश्न सोडवू.

**उप सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

------

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XXV OF 2012**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.)

( चर्चा पुढे सुरु....)

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी धर्मादाय संस्थांना आणि शैक्षणिक संस्थांना ज्या जागा दिलेल्या आहेत त्या जागा कमर्शिअल पर्पजसाठी वापरण्यात येतात त्या जागा घेतल्यानंतर त्या विकण्याचे काम होते.त्यासंदर्भात ज्या जागा सरकारकडून 1 रुपया या नाममात्र किंमतीमध्ये घेतल्या आहेत त्या जर विकल्या असतील तर त्याची बाजारभावानुसार या बिलाचा आधार घेऊन वसुली केली जाणार आहे काय ? हे शासनाने स्पष्ट करावे. विक्रीतून येणाऱ्या पैशापैकी काही हिस्सा या संस्थांनी शासनाला दिला पाहिजे. काही संस्थांनी सरकारकडून जागा घेतल्या आणि नंतर विकल्या आहेत त्याचे पैसे मिळाले पाहिजेत.

सभापती महोदय, बिलाच्या निमित्ताने महसूल खात्यातील एका विषयाकडे मी लक्ष वेधू इच्छितो. 1986 साली कोकणात मोठा पूर आला होता. त्यावेळी रायगड जिल्हयातील अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे गावातील काचळी, पिटकोरी आणि खातविरा या गावांच्या पुर्नवसनाचा निर्णय घेण्यातआला. परंतु त्यागावातील सर्व गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे विनंती केली की, आमचे पुर्नवसन नको आम्ही आहे तिथेच राहू. अशा प्रकारचा ठराव करुन ग्रामपंचायतीकडे शासनाने पाठविला. तत्कालीन महसूलमंत्री डॉ. कदम साहेब यांना मी भेटलो होतो. त्यांनी सांगितले की, पुनर्वसन रद्द झाले आहे. शासन या गावांचे पुनर्वसन करणार नाही. या पुनर्वसनासाठी ज्यांची जागा संपादित करणार होते त्यांच्या वतीने मी बोलत आहे. आता भूसंपादनाची गरजच राहिली नाही. या गावांचे पुनर्वसन करावयाचे नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

त्या गावातील शेतकऱ्यांनी लिहून दिले आहे की, आम्हाला पुनर्वसन नको आहे. उपरोक्त पुनर्वसनासाठी संपादित केलेली जागा पुनर्वसनासाठी दिल्यास तेथील शेतकरी भूमिहीन होणार आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत कुसुंबळे यांनी ठराव करुन जागा पुनर्वसनासाठी देण्यास विरोध केला आहे. पुनर्वसन करणाऱ्या महसुली गावांना सदर जागेमध्ये पुनर्वसन आवश्यक नसल्याने संबंधित गावांनी संपादित केलेल्या जागेत पुनर्वसनास विरोध दर्शविलेला आहे. त्यामुळे गावांचा विरोध लक्षात घेऊन कुसुंबळे गावातील पुनर्वसनासाठी संपादित केलेली जागा रद्द करुन शेतकऱ्यांना परत करण्यात यावी आणि 7/12 उताऱ्यावर 'पुनर्वसन' अशी केलेली नोंद रद्द करण्यात यावी. जेणेकरुन नाहक लोकांना गरज नसताना पुनर्वसनासाठी जागा संपादित करायची आणि नंतर ती जागा इतर कामासाठी वापरायची असा प्रकार यापुढे होऊ नये, अशी मी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळा किल्ला परिसरातील पन्हाळा नगरपरिषद ही खूप छोटी नगरपरिषद आहे. या नगरपरिषद हद्दीतील जवळपास 120 लोकांच्या मालमत्तेबाबत महसूल विभागाने चुकीच्या नोंदी केल्याने त्यांना मालमत्ता हस्तांतर करणे, विक्री करणे इत्यादी बाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. पन्हाळा किल्ल्याचा परिसर हा पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येतो. तेथील मालमत्तेबाबत महसुली रेकार्डमध्ये 'बी टिनर' अशी नोंद झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचण निर्माण झालेली आहे. संबंधित मालमत्ताधारकांनी स्वत: मालमत्ता खरेदी केली असताना केवळ बी टिनर अशी रेकॉर्डवर नोंद असल्याने त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ही अडचण दूर करण्याची मी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती करुन माझे पूर्ण करतो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, विदर्भातील नझूल जमिनी आणि सरकारी जमिनी यापूर्वी विविध कारणांकरिता घेतलेल्या आहेत. विशेषत: औद्योगिक, वाणिज्य, निवासी आणि धर्मादाय प्रयोजनाकरिता या जमिनी दिलेल्या आहेत. त्यातील औद्योगिक आणि वाणिज्य प्रयोजनाकरिता 50 टक्के अनर्जित रक्कम वसूल करण्याची सुविधा आहे. ज्या जमिनी निवासी आणि धर्मादाय प्रयोजनासाठी नव्हत्या, त्यांचा समावेश या विधेयकाच्या निमित्ताने होत आहे. या निमित्ताने मी सभागृहाला हे सांगू इच्छितो की, नाममात्र किंमतीला या जमिनी शैक्षणिक कारणासाठी दिलेल्या असल्या आणि त्या जमिनी पुन्हा विकण्याचा प्रयत्न होत असेल तर या संदर्भात अनर्जित रक्कम घेण्याचा प्रयत्न या तरतुदीतून होत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी रायगड जिल्हयातील जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात तपशील मिळाला तर ती बाब तपासून त्या संदर्भात कारवाई केली जाईल. पुनर्वसनाच्या जागेच्या संदर्भात आणि पन्हाळा येथील मालमत्तेच्या संदर्भातील जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्या संदर्भात संबंधित अधिकारी, सन्माननीय सदस्य यांची एक बैठक घेऊन या प्रश्नाबाबत चर्चा करण्यात येईल. हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात यावे, अशी मी सभागृहाला मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक आणि हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 25 संमत करण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक-25 संमत झाले आहे.

---------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 97 अन्वयेची चर्चा पुढे ढकलण्याबाबत

**उप सभापती** : कामकाज पत्रिकेवर नियम 97 अन्वये दाखविण्यात आलेली दुसरी अल्पकालीन चर्चा सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विनंतीनुसार पुढे ढकलण्यात येत आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** :आपणास कल्पना आहेच की, या सभागृहाचे 10 सन्माननीय सदस्य 27 जुलै, 2012 रोजी निवृत्त होणार आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करण्यात येते की, नेहमीच्या प्रथेप्रमाणे निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना भावपूर्ण निरोप देण्याच्या दृष्टीने आज विधान मंडळाच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळ एकत्रित छायाचित्र घेण्यात येईल व त्यानंतर विधान भवनाच्या प्रांगणात चहा-पानाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.

या सन्माननीय सदस्यांमध्ये सर्वश्री एस.क्यू.जमा, माणिकराव ठाकरे, राजन तेली, उल्हास पवार, अरुण गुजराथी, ॲड. उषा दराडे, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, केशवराव मानकर, परशुराम उपरकर आणि जयंत पाटील यांचा समावेश आहे. आता माननीय मुख्यमंत्री प्रथम निरोपाचे भावपूर्ण भाषण करतील.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्य मंत्री) : महोदय, आज विधान परिषदेचे सर्वश्री एस.क्यू.जमा, राजन तेली, उल्हास पवार, अरुण गुजराथी, ॲड. उषा दराडे, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, केशवराव मानकर, परशुराम उपरकर हे आठ सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत व सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व माणिकराव ठाकरे हे पुन्हा या सभागृहात निवडून आले आहेत, त्यांचे अभिनंदन अगोदर केलेलेच आहे पण आज पुन्हा त्यांचे अभिनंदन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय आणि सामाजिक जीवनात खूप लोकप्रियता कमावली, माणुसकीचे प्रदर्शन केले आणि राजकीय अनुभवामुळे विधान सभेच्या सन्माननीय सदस्यांनी यातील काहींना पुन्हा निवडून दिले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांची एका पेक्षा अधिक टर्म झाली होती. त्यांच्या ज्ञानामुळे शासनाला खूप लाभ झालेला आहे. विविध भागातून विधान परिषदेत आलेल्या सदस्यांनी सभागृहात हिरिरीने भाग घेऊन प्रश्न, दुष्काळ, धोरणात्मक मुद्दे, अशासकीय ठरावांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करुन सर्वसामान्य जनतेच्या दुःखांना वाचा फोडण्याचेही काम केलेले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी कायदा करण्याच्या प्रक्रियेमध्ये शासनाला व सभागृहाला मदत केलेली आहे. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी वरिष्ठ सन्माननीय सदस्यांनी हे सभागृह सुरळीत चालावे, सभागृहात कामकाज व्हावे यासाठी प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी केलेले काम कोणीही विसरु शकणार नाही म्हणून त्यांच्यासाठी कृतज्ञता व्यक्त करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा हे काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडून आले होते. त्यांनी गेली सहा वर्षे या सभागृहात विविध विषयावर आपली मते नोंदवली आहेत. त्यांच्या या सर्व कामातून त्यांची अभ्यासू प्रवृत्ती तसेच सामाजिक बांधिलकी आपल्या सर्वांना दिसून आलेली आहे. कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केलेले आहेत. कामगारांच्या प्रश्नासंदर्भात त्यांनी शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले होते. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगार परिषदांमध्ये उपस्थित राहून भारतीय कामगारांची व महाराष्ट्रातील कामगारांचे प्रश्न मांडले व त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा शासनाला निश्चितपणे झालेला आहे. त्यांच्या ज्ञानाचा फायदा तळागाळातील लोकांनाही झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी केलेले काम आपल्या सर्वांच्या निश्चितपणे लक्षात राहील.

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सामाजिक कार्यातून आपला एक विशिष्ट असा ठसा उमटवला होता. त्यांनी कोकणाच्या समस्यांकडे शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले होते. त्यांनी कोकणासारख्या मागास भागात अनेक शैक्षणिक उपक्रम सुरु केले होते. त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मदतही केली आहे. त्याच बरोबर त्यांनी विविध सहाकारी औद्योगिक संस्थाच्या माध्यमातून कायमस्वरुपी रोजगार मिळवण्यासाठी जे प्रयत्न केले ते प्रशंसनीय आहेत. शासनाने राबविलेल्या योजनांचा लाभ ग्रामपंचायतीपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांनी परिश्रम घेतल्यामुळेच सिंधुदुर्ग जिल्हयातील ग्रामंपचायतींना रस्ते, पाणी, आरोग्य विषयक सुविधेच्या अडचणी सोडविण्यामध्ये यश आले. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विधान परिषदेत केलेले काम आपल्या सर्वांच्या स्मरणात राहणारे आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार म्हणजे कायम उत्साहाचा ओसंडून वाहणारा झरा. त्यांना पक्षाचा तसेच सभागृहाचा प्रदीर्घ असा अनुभव आहे. विधी मंडळाच्या कोणत्याही कार्यक्रमात संयोजक म्हणून काम करतांना त्यांनी विशिष्ट अशी छाप टाकलेली होती. त्यांनी प्रत्येक विषयावर अधिकारवाणीने भाषणे केली असून त्यांची विशिष्ट शैलीत केलेली भाषणे आपल्या सर्वांच्या लक्षात राहतील. त्यांची भाषणे औचित्यपूर्ण तर असायचीच परंतु ते आपल्या भाषणात योग्य ते संदर्भ देत असत. इतिहासामध्ये काय काय घडले होते, कोणी काय म्हटले होते याची माहिती ते देत होते. त्यांची औचित्यपूर्ण रसाळ भाषेतील भाषणे ऐकणेही आम्हा सर्वांसाठी मेजवानीच असायची.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

त्यांचे भाषण अलंकार युक्त रसाळ असले तरी वेळप्रसंगी ते मार्मिक टीका करत. सभागृहाच्या कामकाजात ते नेहमी सक्रीय असायचे. महाराष्ट्रातील संत पंरपरा अबाधित रहावी, आध्यात्मिक स्थळांचे महत्त्व अबाधित रहावे, ते जतन करावे या साठी व त्याच्या विकासासाठी त्यांनी विधान मंडळाच्या माध्यमातून नेहमी प्रयत्न केले आहेत.

साहित्य असो, संस्कृती असो, कला असो अशा सर्व क्षेत्रांमध्ये दिलदारपणे वागणाऱ्या आणि मनमोकळया स्वभावामुळे सर्वांचे मित्र बनलेल्या श्री.उल्हासदादा पवार यांना निरोप देताना आम्हा सर्वांना निश्चितच दु:ख होत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी यांचे मराठी भाषेवरील प्रभुत्व पाहिले की, मला स्वत:लाच आश्चर्य वाटते. त्यांच्या जिभेवर जणू काही सरस्वती नांदते आहे असे वाटते. अशा ज्ञान संपन्न आणि अनुभवी सदस्याला आज आपण निरोप देत आहोत. त्यांनी अनुभवच्या शिदोरीवर प्रत्येक विषयावर दांडगा अभ्यास केला आहे. त्या आधाराने त्यांनी विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये काम केलेले आहे. त्यांनी आपल्या कर्तृत्त्वाने आणि वक्तृत्त्वाने सभागृहाला मंत्रमुग्ध केल्याचे अनेक वेळा पाहिले आहे. त्यांचा राज्यातील प्रत्येक प्रश्नावर दांडगा अभ्यास आहे. माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी ज्या ज्या क्षेत्रात वावरले त्यावर त्यांनी आपला एक विशिष्ट ठसा उमटविला आहे. विधान सभेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेली कामगिरी लक्षात राहण्या सारखी आहे. त्यांनी विधान सभेच्या कामकाजाला शिस्त लावण्याचा केलेला प्रयत्न आपणा सर्वांच्या लक्षात आहे. एवढेच नव्हे तर विविध खात्याचे मंत्री पद भूषविताना त्यांच्या अनुभवाचा उपयोग शासनाला झालेला आहे. त्यांना आज निरोप देताना त्यांची कमतरता सभागृहाला निश्चित जाणवल्या शिवाय राहणार नाही, अशा आम्हा सर्वांची भावना आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.........

सन्माननीय सदस्या ॲड्.उषाताई दराडे ह्या मराठवाड्यातून आल्या आहेत. त्यांनी मागासलेल्या मराठवाड्याचे प्रतिनिधीत्व केले आहे. सामाजिक आणि राजकीय कार्यातून त्यांनी आपली ओळख आम्हा सर्वांना करून दिली आहे. महिला बचत गट, महिला पत संस्था या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न केलेत. तसेच ज्या मुलांना शाळेत जाता आले नाही, अशा शाळा बाह्य विद्यार्थ्यांकरिता त्यांनी केलेले कार्य हे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांनी विधान परिषदेमध्ये केलेली भाषणे देखील सभागृहाला आणि शासनाला उपयोगी पडलेली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण राज्यातील शेती प्रश्नाकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये देखील सहभाग घेतला आहे. सभागृहात व सभागृहाच्या बाहेर ते शेतकऱ्यांचे प्रश्न नेहमी आवर्जून मांडतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणात्मक सूचना करून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर स्वत:ची अशी छाप टाकली आहे व स्वत:चा लौकिक तयार केला आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाबद्दल लोकजागृती करताना विधी मंडळामध्ये झालेल्या चर्चेत अतिशय महत्त्वाचे असे योगदान दिले आहे. तसेच महत्त्वाचे प्रश्न देखील मार्गी लावले आहेत. अभ्यास करून कुठल्याही प्रश्नाच्या तळाशी जाऊन प्रश्न सोडविण्याची त्यांची वृत्ती मी या सभागृहाच्या माध्यमातून पाहिली आहे. पोटतिडिकीने त्यांनी गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले आहेत. कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले आहेत. एवढेच नव्हे तर ते दिल्लीला शिष्ट मंडळ देखील घेऊन गेले आहेत. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतकऱ्यांचे प्रश्न इतर राज्यातील शेतकऱ्यांपेक्षा वेगळे आहेत हे दाखविण्याचे काम त्यांनी दिल्लीत केले आहेत. दिल्लीत 100 टक्के क्षेत्र बागायती आहे. त्यामुळे त्या चष्म्यातून देशातील सर्व शेतकऱ्यांकडे पाहता येणार नाही याची जाणीव दिल्लीत धोरण ठरविणाऱ्यांना करून दिली. त्यांना आपला लढाऊ बाणा पक्षाच्या कामासाठी वापरला आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी स्वत:चे एक वेगळे व्यक्तिमत्त्व निर्माण केले होते, हे सभागृहाच्या लक्षात निश्चितपणाने राहील.

सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी गोंदिया जिल्ह्यातून राजकारणाला सुरूवात केली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.ओटवणेकर . . . . 16:45

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

आपल्या अभ्यासपूर्ण वृत्तीने विधी मंडळाच्या चर्चेत नेहमीच महत्वपूर्ण सहभाग घेतलेला आहे. जिल्हा परिषदेपासून ते कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत, त्याचप्रमाणे पत संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक व राजकीय वाटचाल केली आहे. त्यांची विधी मंडळातील कारकीर्द ही महत्वपूर्ण ठरली असून त्यांनी विशेषत: कृषी व ग्रामविकास विभागाच्या बाबतीत वेळोवेळी चर्चा करुन आपली मते मांडलेली आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर कोकणाचे नेतृत्व करीत होते आणि कोकणातील प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने त्यांनी विधान परिषदेमध्ये आवाज उठविला आहे. कोकणातील ज्वलंत प्रश्नांच्या बाबतीत मग त्यामध्ये रोजगार असेल, शिक्षण असेल इत्यादी बाबत सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. तसेच विविध कामे, शिबिरे, कला आणि संस्कृती या माध्यमातून त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. त्यांचेही या विधीमंडळातील योगदान हे आपल्या सर्वांच्या निश्चितच लक्षात राहील.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे यापुढेही आपल्या सोबत आहेत. आज त्यांची टर्म संपली असली तरी त्यांना आपण निरोप देणार नाही.याठिकाणी निवृत्त होणाऱ्या आठही सन्माननीय सदस्यांच्या कामाची आठवण आम्हा सर्वांना राहील.तसेच त्यांचा सहवासही सर्वांच्या कायम स्मरणात रहाणार आहे. ते आज जरी या सदनातून निवृत्त होत असले तरी ते राजकारणातून, समाजकारणातून निवृत्त होणार नाहीत. त्यांना या ठिकाणी मिळालेला जो महत्वपूर्ण अनुभव आहे त्याचा त्यांना भावी जीवनामध्ये निश्चित उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाही आणि ते पुन्हा महत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळतील अशा प्रकारे त्यांच्या भावी आयुष्याला शुभेच्छा देऊन मी आपल्या सर्वांची रजा घेतो.

----

. . . .3 ओ- 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची होती की, आपल्या सभागृहातील तरुण सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसलेसाहेब यांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना देण्यासाठी एक अतिशय सुंदर चांगले स्मृती चिन्ह तयार केले आहे. यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या निरोप समारंभाबाबत नियम, प्रथा, परंपरा काय आहेत हे सभापती महोदय आपण सांगू शकाल. पण सदरहू स्मृतीचिन्ह जर आपण याठिकाणी सन्माननीय सदस्यांना देऊ शकलो तर ते चांगले होईल.

**सभापती** : याठिकाणी अशा प्रकारे स्मृतीचिन्ह देता येणार नाही. आपण ज्यावेळी लॉबीमध्ये चहापानासाठी उपस्थित रहाणार आहोत त्यावेळी सदरहू स्मृतीचिन्ह देण्याच्या बाबतीत मी विशेष परवानगी दिलेली आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री आणि आपण या दोघांच्या हस्ते निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना स्मृतीचिन्ह द्यावयाचे आहे आणि ते लॉबीमध्ये दिले तरी आम्हाला त्याचा आनंदच आहे.

**सभापती** : माननीय मुख्यमंत्री चहा-पानासाठी लॉबीमध्ये नक्की येणार आहेत आणि मी देखील आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, याठिकाणी गटनेत्यांशिवाय इतरही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे, आम्हालाही गहिवरुन आले आहे. त्यामुळे आम्हालाही आमचे शब्द व्यक्त करण्याची संधी देण्यात यावी.

**सभापती** : सभागृहाचे नेते, माननीय विरोधी पक्षनेते, गट नेते यांना आपण बोलण्याची परवानगी देतोच पण अपवाद म्हणून एखाद्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी जरुर दिली जाईल.

. . . . 3 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आपल्या सभागृहामध्ये दर दोन वर्षांनी येणारा हा अनुभव आहे. याठिकाणी आपले सहकारी सन्माननीय सदस्य निवृत्त होत असतात आणि नवीन सहकारी येथे येतात. मध्यंतरी या सदनामध्ये निवडून येणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे स्वागत करण्याची प्रथा सुरु झाली होती. परंतु भाषणांची संख्या वाढल्यामुळे ती बंद झ ााली.आपले सहकारी इतकी वर्षे आपल्या बरोबर असतात परंतु त्यांच्याविषयी मर्यादित सदस्यांनी म्हणजे गट नेत्यांनी बोलावयाचे असे ठरले आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला समर्थन देत असताना फार आनंद होत आहे असे म्हणता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा हे उभे राहिले की ते कामगार नेते आहेत असे त्यांच्याकडे पाहिल्यावर जाणवते. मात्र ते आज येथे उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

एका एका व्यक्तीचे व्यक्तिमत्व असते त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जमा उभे राहिले की कामगारांसाठी लढणारे व्यक्तिमत्व उभे राहिले असे वाटत असे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे. आपण कितीही चांगले बोलला, कितीही सुंदर बोलला तरी कोणाला काय वाटते, काय नाही यापेक्षा 'वाह क्या बात है' हा शब्द आता आम्हाला ऐकावयास मिळणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपले फार चांगले वर्णन केले. मी आपले एक भाषण ऐकण्यास मुकल्याचे मला आठवते. आपण थोर गायक पंडित भीमसेन जोशी यांना या सभागृहात आदरांजली वाहिली. त्यांच्या संदर्भातील आपले भाषण मला ऐकावयाचे होते. आपण माऊलीच्या किनाऱ्यावर त्यांना स्वत: घेऊन गेला होता आणि आपण त्यांच्या सहवासातील अनेक क्षण अनुभवले आहेत. ते मला ऐकावयाचे होते. पण तो क्षण आमच्या जीवनातून निसटला. साक्षात सरस्वती यमुनेमध्ये लुप्त झाली. अर्थात सरस्वती गुप्त असते पण ती कधी प्रगट होते हे माहीत नाही. त्याप्रमाणे आपले जे सारस्वत आहे ते आज तरी आमच्या सभागृहातून गुप्त होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या बद्दल काय बोलणार ? त्यांनी विधानसभेचे अध्यक्ष म्हणून जेवढे मार्गदर्शन केले त्यापेक्षाही त्यांच्या विद्वतेचे प्रगल्भ मार्गदर्शन या सभागृहात लाभले. मोजक्या शब्दामध्ये मोजका विषय ते मांडत असत. आपल्या सरकारला धक्का न लावता, न डिवचता, हे चुकले आहे असे सांगण्याची वेगळी लकब आणि कसब आम्ही त्यांच्याकडून अनुभवत होतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांचे खरे स्वरुप मी परवा पाहिले. स्त्री भ्रूणहत्येंच्या संदर्भात त्यांनी जे विचार मांडले ती त्यांची अत्युच्चता होती. आमच्या उषाताई म्हणजे एक चळवळ हे पटकन नजरेपुढे येणार.

सभापती महोदय, आमचे सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांना शिवसेनेने पुन्हा संघर्ष करण्याची संधी दिली आहे. कारण तावूनसुलाखून माणसाचे व्यक्तिमत्व मोठे होते. ती संधी पुन्हा त्यांना मिळत आहे. त्यांचे भविष्य नक्कीच उज्ज्वल राहील. कारण त्यांचा जीवनकाळच संघर्षमय असल्यामुळे तो संघर्ष त्यांना करावयाचा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर हे एक कमिटेड म्हणजे संघाची बांधिलकी स्वीकारलेले व्यक्तिमत्व आहे. त्यामुळे मी या सभागृहात आहे काय किंवा सभागृहातून जातो काय, हा विषय त्यांच्यासाठी महत्वाचा नाही. आपल्याला जे काम दिलेले आहे ते निष्ठेने पार पाडावयाचे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली निवृत्त होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, तसेच राजन तेली या सभागृहातून निवृत्त होत आहेत आणि माजी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी देखील सभागृहात नाहीत. या सभागृहात कोकण आणि खऱ्या अर्थाने सिंधुदुर्ग जिल्हा पोरका झालेला आहे. यापुढे आम्हाला कोकणात केरळी लोक घुसल्याचे ऐकावयास मिळणार नाही, हत्ती घुसल्याचे ऐकावयास मिळणार नाही. हे सदस्य एकमेकांना छेद देणारे परंतु प्रश्नातून छेद देणारे सदस्य आहेत. हे दोन्ही सदस्य एकाच जिल्ह्यातील आहेत. श्री. गुरुनाथ कुलकर्णी गेल्यानंतर त्यांची उणीव आपल्याला जाणवत होती पण आता आपण दोघे या सभागृहात नसणार. श्री. विनायक राऊत आणि ॲड. अनिल परब हे आमचे दुसरे दोन सदस्य जे निवडून आलेले आहेत. ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातीलच आहेत. पण त्या जिल्ह्यातील ग्रामीण प्रश्न त्यांच्याकडून येतील असे वाटत नाही. आपण जिल्हा परिषदेचा अनुभव घेऊन येथे प्रगल्भतेने ग्रामीण भागातील, खेडेगावातील प्रश्न मांडणारे सदस्य आहात.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल म्हणजे नक्की कोण ? माननीय मुख्यमंत्र्यांनी वर्णन केले की, पाशा पटेल म्हणजे नक्की कोण ? सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल स्वत:चे वर्णन कसे करतात ते मी आपल्याला सांगतो. त्यांनी इंग्रजीमध्ये ते वर्णन केले असल्यामुळे मी इंग्रजीमध्ये वाचून दाखवितो. त्यांना काय वाटते ते मी सांगतो. 'P' for Progressive, 'A' for Attractive, 'S' for Sagacious, 'H' for Hard-worker, 'A' for Ambitious, 'P' for Patriotic, 'A' for Agitator, 'T' for Talented, 'E' for Expert and 'L' for Lovely. अशी स्वत:ची जाहिरात सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल करतात.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यांनी जे काही कार्य उभे केले आहे त्याचे वर्णन मी करणार नाही. मला त्यांच्या बाबतीत एक गोष्ट आवडली की, त्यांनी आंतरराष्ट्रीय स्कूल काढले आहे परंतु त्यांनी त्या भागामध्ये त्या संदर्भातील हॅण्ड बिल पूर्ण मराठीमध्ये काढले आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या आंतरराष्ट्रीय शाळा आहेत त्यामध्ये लोकांना मराठीमध्ये दिलेले हे एकच हॅण्ड बिल आहे. आपण राज्यभाषेचा आदर करता म्हणून मी मनापासून आपले कौतुक करतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी गेल्या आठवड्यापासून एकटेच लॉबीत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरत असल्याचे पाहत होतो. या निमित्ताने मला एक गाणे आठवत आहे.

सुहाना सफर और ये मौसम हँसी
हमे डर है हम खो न जाए कही

अशी त्यांची अवस्था झालेली आहे. निवृत्त होणाऱ्या प्रत्येक सन्माननीय सदस्यांबद्दल मनापासून खूप बोलण्यासारखे आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे गेल्या आठ दिवसांपासून प्रत्येकाबद्दल त्यांच्या भावना काय होत्या ते आम्हाला सांगत होते. निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांच्या मनाची स्थिती कशी आहे ते मी या कवितेच्या माध्यमातून मांडू इच्छितो. या कवितेचे शीर्षक 'मागे वळू पाहताना' असे आहे.

"मागे वळून पाहताना
सिंहावलोकन करताना
पूर्वीचे क्षण-प्रसंग स्मरताना
आम्हा मन शांत बसू देईना.
आठवा ते क्षण-प्रसंग
विसरा त्यातील कटू, अपेक्षाभंग
त्याच्याशी नको आता संग
नका राहू त्यातच दंग.
आठवा ते क्षण-प्रसंग
ज्यात कर्तृत्वाचे भरलेले विविध रंग
निश्चयांचे तुम्ही बांधलेले चंग
संत, सज्जन, विद्वानांचे संग.
आठवा ते क्षण-प्रसंग
जेथे लाभला-दिधला मदतीचा तो संग अंग
नव्हते तेथे काही वरपांग

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

जपून ती ठेवा सुखद अनुभवांची रांग.
मागे वळून पाहताना
पुढे आयुष्य जगताना
विसरु नका मागील गोड प्रसंगांना
स्वत:सह सर्वांना बघा आनंदी जगताना."

प्रत्येकाला असे वाटत असते की, मला माझ्या पक्षाने पुन्हा संधी का दिली नाही, माझे काय चुकले होते, त्या संदर्भात 'आशा' नावाची एक कविता वाचून दाखवू इच्छितो.

"आशा एक दिलासा
दिलासा अगदी इवलासा
इवलासा जरासा
जरासा इतकासा
इतकासा खुलासा
खुलासा बराचसा
बराचसा आधारसा
आधारसा आपलासा
आपलासा हवाहवासा.
आशा एक दिशा
आशा प्रश्नमंजुषा
आशा एक वेडी नशा
आशा मृदू भाषा
आशा एक दरी
खोल खोल कितीतरी
उडी उंचावरुन मारली जरी
तरी आशेची दोरी हात धरी
आशा ज्याच्या अंतरी

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तसे त्याचे कर कर्म करी
यश उभे हात जोडूनी त्याच्या अगदी समोरी"

अशी ही आशा असते. आपण दोरी फक्त पकडून ठेवावयाची असते. मी मघाशी उल्लेख केल्या प्रमाणे काही सन्माननीय सदस्य निवृत्त होणार आहात. तेव्हा आपण आम्हाला विसरु नका. यानंतर मी एक शेवटची कविता वाचून मी माझ्या भाषणाचा समारोप करणार आहे.

"प्राप्त झाले ते गिळून घ्यावे,
निसटून गेले ते सोडून द्यावे
फायद्याचे झाले ते स्मरणात ठेवावे
नशिबाने नेले ते विसरुनी जावे"

आपल्या विधिमंडळात श्री.सुभाषचंद्र उर्फ भाई मयेकर नावाचे अधिकारी आहेत. त्यांनी लिहिलेले हे काव्य आहे. हे काम माझे नाही. तुमच्या आमच्याबद्दल त्यांच्या ज्या भावना आहेत त्या मी येथे व्यक्त केलेल्या आहेत. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात दर दोन वर्षांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याचा प्रसंग येतो. मी गेले 10 वर्षे या प्रसंगाचा साक्षीदार आहे. हे वरिष्ठ सदस्यांचे सभागृह आहे. या सभागृहामध्ये येणारा माणूस हा विविध क्षेत्रामध्ये काम करुन, विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवून येत असतो. अशा सदस्यांनी या सभागृहात वर्षानुवर्षे काम केल्यानंतर त्यांना निरोप देण्याची वेळ येते त्यावेळी वाईट वाटत असते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्यासारखे काही अपवाद असू शकतील. या दोघांना निरोप देण्याची आज तरी वेळ आलेली नाही. ते या सभागृहात पुन्हा निवडून आले असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदनच करीन.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांबद्दल यथोचित उद्गार काढलेले आहेत. मी प्रथम सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार यांच्यापासून बोलण्यास सुरुवात करणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:00

श्री. पांडुरंग फुंडकर...

सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना मी गेली 10 वर्षे या सभागृहामध्ये पाहत आलो आहे. त्यांच्या पासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. संघटनेमध्ये त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविलेला आहे. मी या सदनामध्ये अनेक गोष्टी शिकलो. या सभागृहामध्ये काम करीत असताना सभागृहातील प्रत्येक व्यक्तिमत्व कशा पदतीने काम करते याचा देखील मी अभ्यास करतो. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा यांच्या बाबतीत आवर्जून सांगावेसे वाटते की, त्यांनी राजकारणाला अध्यात्माची, संस्कृतीची आणि साहित्याची जोड दिली. खरे तर हा त्रिवेणी संगम फार कमी लोकांच्या व्यक्तिमत्वामध्ये आढळतो. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या अंगातील हे गुण मला अनेक वेळा पहावयास मिळाले. त्यांची साहित्य, संकृती आणि अध्यात्म या क्षेत्राशी असलेली बांधिलकी केवळ नावापुरती नाही. राज्यामध्ये अध्यात्म, संकृती आणि साहित्य यांचे जतन आणि संवर्धन व्हावे यासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतमालिकेच्या परंपरांचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. राजकारण करीत असताना अध्यात्म, साहित्य आणि संकृती या विषयांचा अभ्यास श्री. उल्हासदादांनी कधी आणि केव्हा केला असेल असा देखील प्रश्न आमच्या सारख्यांना पडतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांचा भावणारा आणखी एक गुण म्हणजे त्यांचे खळाळणारे हास्य. ते हास्य आता आम्हाला या सभागृहात पहावयास मिळणार नाही. काही प्रसंगी या ठिकाणी एकमेकांवर कुणी रागावले असले, मोठा ताणतणावाचा प्रसंग निर्माण झालेला असला तरी सभागृह स्थगित झाल्यानंतर लॉबीमध्ये सर्वजण एकत्र येतात. ही या सभागृहाची एक परंपरा आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना मी एकदिवस आधी भेटून विचारले होते की, काम झाले का ? ते म्हणाले की, बघू. त्यांच्या चेह-यावर नाराजीचा कुठे लवलेशही दिसला नाही. पुन्हा सभागृहामध्ये येण्याची संधी मिळेल की नाही याबद्दलची चिंता त्यांच्या चेह-यावर दिसली नाही. जो कार्यकर्ता संघटनेमध्ये तयार होतो तोच कार्यकर्ता असे वागू शकतो. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांचा सहवास या पुढे या सभागृहामध्ये लाभणार नाही. परंतु एका ठिकाणी मात्र त्यांचा सहवास मला अवश्य लाभत राहाणार आहे. गेली 20 वर्षे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आम्ही पंढरीच्या वारीला भेटत आलो आहोत आणि या पुढेही भेटत राहाणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या अनुभवाचा फायदा या सदनातील नवीन सन्माननीय सदस्यांना होत राहाणार आहे.

सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे या देखील निवृत्त होत आहेत. त्या चळवळीतील कार्यकत्या आहेत. शालेय जीवनापासून त्या चळवळीमध्ये कार्यरत होत्या. सभापती महोदय, चळवळीतील कार्यकर्ता हा ताबडतोब ओळखता येतो. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे ह्या आमदार नसताना ब-याच वेळा लॉबीमध्ये येत होत्या त्यावेळी त्यांची आणि माझी चर्चा होत होती. त्यावेळी वाटत होते की, अशा प्रकारची कार्यकर्ती या सभागृहामध्ये असली पाहिजे. त्यांना या सभागृहामध्ये येण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचे त्यांनी सोने केले. मी या ठिकाणी स्त्रीभ्रूण हत्येच्या चर्चेची पुनरावृत्ती करणार नाही. परंतु त्यांचे स्त्रीभ्रूण हत्येवरील भाषण असो की अन्य कोणत्याही विषयावरील भाषण असो, त्या वकील असल्यामुळे त्यांची भाषणे नेहमीच अभ्यासपूर्ण झ ालेली आहेत. त्यांचे भाषण अतिशय वेगात पण ओघवत्या भाषेत असायचे. भाषण करताना त्या कधी थांबल्या नाहीत किंवा कधी अडखळल्या नाहीत.

सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा 50 टक्के सहभाग आहे. मात्र या सभागृहामधील एकेक महिला कमी कमी होत आहेत.

...नंतर श्री. अजित...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे आता निवृत्त होणार असल्यामुळे सभागृहातील एक महिला कमी होणार आहे. सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे या संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्या आहेत. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या त्या महिला अध्यक्षा होत्या. त्यांना पुन्हा तिकिट मिळाले नाही याची त्यांना खंत वाटली नाही. दुःख वाटले नाही. चळवळीतून आल्यामुळे पुन्हा चळवळीमध्ये काम करु अशी त्यांची भावना आहे. अशी माणसे भेटतात तेव्हा त्यांच्यापासून बरेच काही शिकायला मिळते.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेब यांच्या बद्दल आम्ही काय बोलावे ? त्यांनी विधानसभेमध्ये चार वेळा प्रतिनिधीत्व केले. त्यापैकी तीनवेळा मंत्रीपद भूषविताना त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. दोन दिवसांपूर्वी श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत त्यांची भेट झाली त्यावेळी श्री.गोपीनाथ मुंडे दोनच वाक्य बोलले. ती मी येथे सांगत नाही. ते एक गुपित आहे.

श्री.अरुण गुजराथी हे अत्यंत पक्षनिष्ठ आहेत. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सभागृहात कोणत्याही विषयावर बोलताना टू दी पॉईंट बोलणार. विषय सोडून बोलणार नाही अशी त्यांची ख्याती आहे. दोन दिवसांपूर्वी पर्यावरणाच्या विषयावर झालेल्या चर्चेची वेळी मी त्यांचे भाषण ऐकले. त्यांनी मूळ विषयाला बगल न देता अत्यंत चांगले भाषण केले. कोणाला न दुखावता, कोणाला वाईट वाटणार नाही अशा पध्दतीचे वक्तव्य करुन त्यांनी आपले विचार सभागृहात मांडले आहेत. यापुढे आम्हाला असे विचार ऐकायला मिळणार नाहीत याची खंत वाटते. आपला हसरा चेहरा आम्हास पुन्हा पहावयास मिळणार नाही. आपण या सभागृहातून निवृत्त होत असला तरी आपल्या पक्षाचे प्रमुख आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा उपयोग करुन घेतल्या शिवाय राहणार नाहीत याची मला खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे संघर्षातून आलेले कार्यकर्ते आहेत. शिवसेने सारख्या आक्रमक पक्षातून त्यांनी कामाला सुरुवात केली. आपल्या जिल्ह्यातील प्रश्न सोडविण्यासाठी सर्व आयुधांचा वापर करुन त्यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

आहे. ते या सभागृहातून निवृत्त होत आहेत. त्यांचे वय जास्त नाही. राजकीय जीवनामध्ये असे चढ उतार येत असतात. आपण ज्या संघटनेमध्ये काम करतो त्या संघटनेत चालत रहा. चरेवैती चरेवैती म्हणजे् सतत चालत रहा. आपण कोणत्या मुक्कामावर जायचे हे नियती ठरवित असते. आपण संघटनेत चांगले काम कराल अशी मला अपेक्षा आहे. परंतु आम्हाला आता पाठीमागून सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आवाज ऐकू येणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे पुन्हा विधानपरिषदेवर येतील अशी आम्हाला अपेक्षा होती. का होती, कशासाठी होती हे सांगता येत नाही परंतु आपण विधानपरिषदेवर पुन्हा याल असे वाटले होते.

श्री.राजन तेली दिनांक 27 जुलै पासून या सभागृहाचे सदस्य म्हणून राहणार नाहीत. एक आक्रमक कार्यकर्ता, ज्यांनी सहकार क्षेत्रात तसेच शिक्षण क्षेत्रात काम केलेले आहे अशा सदस्यांचा सहवास लाभणार नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन सन्माननीय सदस्यांचा सहवास आता आपणास लाभणार नाही. एक सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर आणि दुसरे सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आवाज येथे ऐकायला मिळेल की नाही ? परंतु त्या जिल्ह्यातील नवीन सदस्य येत आहेत तेव्हा सिंधुदुर्ग जिल्ह्याचा आवाज पुन: सभागृहात येईल असे वाटते. परंतु आपण ज्या तडफेने सिंधुदुर्ग जिल्ह्याचे प्रश्न मांडले ते आम्हाला पुन्हा ऐकायला मिळणार नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा हे कामगार चळवळीतील कार्यकर्ते आहेत. ते आमच्या विदर्भातील आहेत. कामगार चळवळीतून त्यांनी कामगारांना सतत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा सभागृहात येतात.)

सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा आपणास 100 वर्षे आयुष्य आहे.

यानंतर श्री.गिते..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ 17:10

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, ज्या प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांच्या बाबतीत आम्हाला वाटले होते तसे सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा साहेब यांच्या बद्दलही वाटले होते. राजकारणाची काही गणिते असतात, या सभागृहात एक मुस्लीम कार्यकर्ता पुन्हा येणार असे वाटले होते. सन्माननीय सदस्य श्री.जमा हे पुन्हा या सभागृहात सदस्य म्हणून येतील असे मला वाटले होते. श्री.जमा हे कामगार चळवळीचे नेते असताना विदर्भाच्या प्रश्नावर देखील सतत आक्रमक भूमिका या सभागृहात घेत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर देखील ते वारंवार बोलत होते. त्यांचा अनुभवाचा फायदा निश्चितपणे या सभागृहाला झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जमा हे देखील दिनांक 27 जुलै, 2012 रोजी निवृत्त होत आहेत, त्यामुळे त्यांचा सहवास आपल्याला लाभणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.जमा यांना मी सांगू इच्छितो की, आपण चळवळीतून आलेला आहात, चळवळीतून आलेला कार्यकर्ता हा कधीच शांत बसत नाही. आपण भविष्यातही चळवळीत रहाल अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, श्री. केशवराव मानकर हे राजकारणी घरातच जन्माला आले. ते राष्ट्रीय स्वयंसंघाच्या मुशीत तयार झाले आहेत. त्यांनी विद्यार्थी परिषदेचे काम अतिशय उत्तमपणे केलेले आहे. त्यांचे वडील खासदार होते. त्याच्या पाऊलावर पाऊल टाकून त्यांनी विद्यार्थी परिषदेचे काम केले. त्यांच्या वडिलांनी संपूर्ण आयुष्य संघटनेसाठी घालविले. पूर्वी भंडारा हा एकच जिल्हा होता, त्यानंतर त्याचे विभाजन होऊन गोंदिया आणि भंडारा असे दोन जिल्हे झाले. गोंदिया जिल्हयात मानकरांचे नाव माहिती नाही अशी एकही व्यक्ती असू शकत नाही. एवढे मोठे कामाचे नेटवर्क मानकर कुटुंबीयांनी गोंदिया जिल्हयात निर्माण केलेले आहे. त्यांनी पक्षाकडे कधीच काही मागितले नाही. मी या संघटनेत गेल्या 35 वर्षापासून काम करीत आहे. मी प्रदेशाच्या कोअर कमिटीमध्ये काम करतो. राजकारणामध्ये पदांची मागणी होत असते. परंतु श्री. केशवराव मानकर यांनी तिकिटासाठी मागणी केली ही गोष्ट मी कधी ऐकली नाही. पक्षाने विचार केला आणि मागच्या वेळेला त्यांना विधान परिषदेचे तिकिट दिले. त्यावेळी ते जिल्हा परिषदेमध्ये विरोधी पक्ष नेते म्हणून काम करीत होते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, चांगली शिक्षण संस्था कशी असावी याची शिकवण त्यांच्याकडून घेतली पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे येथील सहकारी संघ व इतर क्षेत्रात त्यांची आपले स्थान निर्माण केलेले आहे.

सभापती महोदय, या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर बोलले नाही असे कधीच झाले नाही. ज्या ज्या वेळी बोलण्याची संधी मिळाली त्या त्या वेळी त्यांनी विषय उपस्थित करुन त्या विषयास न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. मी त्यांना सहज विचारले की, आता तुमचा नंबर नाही असे मला दिसू लागले आहे. त्यांनी मला सांगितले की, " भाऊ, अपनेको क्या फर्क पडता हैं?" पक्ष सांगेल ते काम करणार आहे. त्यांना क्षणभर काहीही वाटले नाही. कोणी काहीही म्हटले तरी या सभागृहातून निवृत्त होताना वेदना होत असतात. परंतु मला त्यांनी सांगितले की, भाऊसाहेब, माझ्यावर काही परिणाम होणार नाही. पक्ष जी कामे सोपवील ती कामे मी करणार आहे आणि सहजपणे ते या सभागृहातून निवृत्ती स्वीकारीत आहे. श्री. मानकर हे घरी बसणारे कार्यकर्ते नाहीत. वडिलांचा वारसा चालवित असताना त्यांनी सांगितले की, संघटनेचे काम करण्यासाठी मी मोकळा झालो. गोंदिया आणि भंडारा जिल्हयात संघटनेसाठी पूर्णवेळ मी काम करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल हे माझे मित्र आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांच्या सारखे बोलणार नाही. श्री. सय्यद पाशा पटेल आणि माझी फार पूर्वीपासून ओळख आहे. आम्ही दोघे शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते आहोत. मी विदर्भात काम करतो आणि ते मराठवाडयात काम करतो. त्यामुळे आमची ओळख होती. मलाही कधी कधी असे वाटावयाचे की, शेतकरी संघटनेतून श्री.सय्यद पाशा हे आपल्या पक्षात आले पाहिजे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

पण ते जुळले नाही. मी प्रदेशाध्यक्ष झाल्यानंतर मुंडे साहेबांना सांगितले की, मराठवाडयातील पाशा पटेल यांना आपल्या पक्षात आणण्यासाठी गळ टाका. त्यानंतर पाशा पटेल आमच्या पक्षाच्या गळाला लागले. पाशा पटेल यांचे कर्तृत्व मला माहीत होते. हातावर भाकरी घेऊन, पायाला भिंगरी बांधून शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी महाराष्ट्रभर फिरणारा एक लढाऊ कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी कशाची चिंता केली नाही. प्रदेशाध्यक्ष असताना पाशा पटेल  हा कार्यकर्ता मला का आवडला याबाबतीत  दोन्ही गोष्टी मी सांगणार आहे. ते पक्षात येत आहेत म्हटल्यावर मी त्यांना उपाध्यक्ष केले आणि सांगितले की, पाशा पटेल आता भाजपसाठी महाराष्ट्रभर फिरा. ते म्हणाले, मी पक्षात येतो पण शेतकरी संघटनेचा बिल्ला काढणार नाही आणि त्यांनी 2/3 वर्षे तो बिल्ला काढला नाही. मी त्यांना रोखले नाही. बिल्ला लावा पण पक्षात या असे म्हटले.कारण पक्षासाठी आणि संघटनेसाठी त्यांचा मला उपयोग करुन घ्यावयाचा होता. आमच्या पक्षाला पांढरपेक्षा असे समजले जात होते म्हणून शेतकऱ्याचा पक्ष म्हणून सिध्द करुन देण्यासाठी मला एका शेतकरी नेत्याची साथ पाहिजे होती. म्हणून पटेल यांना महाराष्ट्रभर आम्ही फिरवले. त्यांनी पक्षसंघटनेत काम केले. पक्षाचे सरचिटणीस झाले. मराठवाडा,विदर्भ असो, राज्यातील एकही मतदारसंघ शिल्लक नव्हता की जेथे पाशा पटेल पोहोचले नाहीत. असा एक कर्तृत्ववान कार्यकर्ता आमच्या पक्षात आहे.

एका गोष्टीचे शल्य गेल्या 60 वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर आजही आमच्या मनात आहे. मुख्यमंत्री महोदयांनी देखील त्याचा उल्लेख केला. या देशातील शेतकऱ्याच्या शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान का मिळाले नाही आणि शेतकऱ्याला आपल्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार का मिळाला नाही हे ते शल्य आहे. आमच्या दोघांचे विचार सारखे होते. कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची किंमत जर कारखानदार ठरवीत असेल तर शेती हा सुध्दा एक कारखाना आहे. परंतु पाशा पटेल यांनी दुसऱ्या मार्गाने जाऊन शेतकऱ्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला. कृषी मूल्य आयोगावर त्यांनी काम केले. पार्लमेंटमध्ये गेल्यावर शेतकऱ्याच्या मालाचे भाव ठरविणारा कृषी मूल्य आयोग मी पहायला गेलो होतो.ते कुठे आहे, कसे आहे हे मी पाहिले आहे. पाशा पटेल यांनी कृषी मूल्य आयोगच आपल्या घरात आणला होता. हिंदुस्थानात कोणाच्या सांगण्यावरुन एखाद्या गावाला आयोगाने भेट दिल्याचे उदाहरण सापडणार नाही.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 17:15

श्री. पांडुरंग फुंडकर....

कृषी मूल्य आयोगाचे जे अध्यक्ष आहेत त्यांनी आमदाराच्या आमंत्रणावरुन ग्रामीण भागात जाऊन लोटग्याला जाऊन प्रश्न समजून घेतले. गुलाटी साहेब छोटयाशा गावात आले, शेतकऱ्यांची परिषद घेतली आणि त्यांनी प्रश्न समजून घेतले. पाशा पटेल मी तुम्हांला सर्व शेतकऱ्यांच्या माध्यमातून धन्यवाद देतो. यशस्वी प्रयत्न करण्यासाठी वर्षानुवर्षे लढा दिला. संघर्ष केला. छोटेसे स्वप्न तुम्ही पूर्ण केले. त्यामुळे आयोगाने शेतकऱ्यांच्या मालाचे भाव 25 टक्क्यापर्यंत वाढविले आहेत. गुलाटी साहेबांना पाशा पटेल यांनी पटवून दिले. आयोगाची शेतमालाचे भाव काढण्याची पध्दत कशी चुकीची आहे हे त्यांना समजावून सांगितले आणि पटवूनही दिले. त्यांना ते पटले आणि भाव वाढवून दिले. शेतकऱ्यांच्या पदरात चांगला भाव टाकण्याचे पुण्य पटेल यांनी केले आहे. विधानपरिषद असेल किंवा नसेल या राज्यातील शेतकऱ्यांसाठी ज्या कामाची इतिहास नोंद घेईल असे चांगले काम आपण केले आहे. कृषीमूल्य आयोगाची पुनर्रचना माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटून केली. धोरणात्मक लढयातील सेनानी असे त्यांचे काम होते. पक्षाने त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. अखिल भारतीय किसान मोर्चाचे उपाध्यक्षपद पाशा पटेल यांना दिले. महाराष्ट्र-कर्नाटकचे प्रभारी केले.

माणसाच्या जीवनात चढ-उतार येतच असतात.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

याचा अर्थ न्याय मिळणार नाही असा होत नाही. एक दिवस माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे खूप डिस्टर्ब झालेले दिसले. ते मला म्हणाले, जाऊ तो जाऊ कहाँ? मी त्यांना म्हटले, कही जाना नहीं. शेवटी या सभागृहातून निवृत्त होत असताना प्रत्येक व्यक्तीला वेदना होत असतात. परंतु माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी एखाद्या प्रस्तावावर सभागृहात भाषण करण्याची इच्छा व्यक्त केली तर विरोधी पक्षाकडूनच नव्हे तर सत्ताधारी पक्षाकडून सुध्दा त्यांना बोलू द्या म्हणून आग्रह होत असे. ह्दयाला छेदून जाणारे असे त्यांचे भाषण असायचे. अत्यंत प्रॅक्टिकल, सर्वसामान्य माणसांच्या वेदना त्यांच्या मुखातून व्यक्त व्हायच्या. म्हणूनच त्यांना बोलू देण्याबाबत अपील होत असे. आता यापुढे त्यांचे भाषण ऐकण्याची संधी आम्हाला मिळणार नाही. मात्र आम्ही त्यांचे भाषण सभागृहाबाहेर जरुर ऐकू. माझी त्यांना एकच विनंती आहे की, या सभागृहातून निवृत्त होणार असलात तरी शेतकऱ्यांच्या सार्वजनिक जीवनातून निवृत्त होऊ नका.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचा दुसरा विषय यापुढे आम्ही सभागृहात लावून धरणार आहोत. त्यांची विषय मांडण्याची स्टाईल ही सर्वांनाच जमेल अशी नाही. त्यांनी एक नवीन विषय हाती घेतला होता. आणेवारीचा तो विषय होता. ते जर निवृत्त होणार नसते तर हा आणेवारीचा विषय सातत्याने सभागृहात मांडून त्यांनी माननीय सभापतींना हैराण केले असते. आणेवारीच्या विषयावर सभागृहात दीड ते दोन तासाची चर्चा या विषयावर उपस्थित करण्याची संधी मागितली असती. वर्षानुवर्षे चालत आलेली आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे ही त्यांची प्रमुख मागणी होती. आम्ही हा विषय यापुढे आमच्या स्टाईलने लावून धरु आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याची भूमिका घेऊ. खांद्याला खांदा लावून शेतकऱ्यांसाठी लढणारा एक सहकारी यापुढे आमच्यासोबत असणार नाही. त्यांची आम्हाला सभागृहात कमतरता जाणवणार आहे. परंतु सभागृहाबाहेर निश्चितपणे शेतकऱ्यांमध्ये तुम्ही आम्ही मिसळून जाऊ आणि एकत्रपणे चालत राहू.

सभापती महोदय, आमच्या पक्षाने कार्यकर्त्यांना मंत्र दिला आहे. चरे वैती, चालत रहा. तो मंत्र लक्षात घेऊन आम्ही कामाला लागू एवढेच सांगतो. सभापती महोदय, मी गेली दहा वर्षे या सभागृहात काम करीत आहे. जे माननीय सदस्य आज निवृत्त होत आहेत त्यापैकी कोणाशीही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

कधी कटुता स्वीकारण्याची वेळ माझ्यावर आली नाही.  या सभागृहाच्या आखाड्यात जे काही घडते ते सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर विसरुन जाऊन चांगल्या भावनेने सर्वजण वागतात हे एक चांगले दृश्य इतर ठिकाणी पहावयास मिळत नाही.  निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना निरोप देत असताना दु:ख जरुर वाटत आहे.  निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांनी पुन्हा एकदा या सभागृहात येऊन आपल्या अनुभवाचा लाभ येथील सदस्यांना द्यावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माझ्या गेल्या 12 वर्षाच्या कारकिर्दीत सभागृहातील निरोप समारंभाला मी कधीच हजर राहिलो नव्हतो. माझ्या सहकारी मित्रांना या सभागृहात निरोप देत असताना मला वाईट वाटत असे, म्हणून मी हजर रहायचो नाही.

सभापती महोदय, 7 जुलै रोजी माझा वाढदिवस होता. या वाढदिवसाच्या निमित्ताने मी जे कार्यकर्त्यांसमोर भाषण केले त्या भाषणामध्ये यापुढे मी निवडणूक लढविणार नाही अशी इच्छा व्यक्त केली होती. ज्या उच्च सभागृहात मी गेली 12 वर्षे काम करीत आहे त्या सभागृहाची उंची कमी होत आहे की काय? असे मी विचार मांडले होते. त्यानंतर अनेक कार्यकर्ते मला प्रत्यक्ष येऊन भेटले. माझे विचार कसे चुकीचे आहेत हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माननीय विधानसभा सदस्य श्री.विवेक पाटील यांनी माझ्या या विचाराबद्दल अत्यंत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. या सभागृहात काम करीत असताना संपूर्ण महाराष्ट्र मी पालथा घातला. चांद्यापासून बांद्यापर्यंत प्रत्यक्ष फिरुन अनेक प्रश्न समजून घेण्याची मला संधी लाभली. या सभागृहात चर्चा करीत असताना महाराष्ट्राचे प्रतिबिंब आपल्याला दिसते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.........

या सभागृहाचे अधिकार दिवसेदिवस कमी होतात की काय अशीही भीती कधी कधी मला वाटत असते. मी कधीच पीठासीन अधिकाऱ्यांचा अवमान केला असे आठवत नाही. या सभागृहात पहिल्यांदा सदस्य म्हणून आल्यानंतर पीठासीन अधिकारी माननीय श्री. फरांदे साहेब सभापती होते, त्यांनीच ही शिकवण मला दिली आहे, मी त्याबद्दल त्यांचा ऋणी आहे. सुदैवाने मी पुन्हा या सभागृहात सदस्य म्हणून आलो पण तरी मला दिवसेदिवस असेच वाटत असते की, या सभागृहाची उंची आपण वाढविली पाहिजे. या उंचीबाबत मी आताच बोलणार नाही, कारण हा प्रसंग ते बोलण्याचा नाही. तरीही थोडक्यात सांगू इच्छितो की, जिल्हा नियोजन मंडळाच्या बाबतीत असे प्रसंग निर्माण होत. पूर्वी मंत्री आपल्या गावात येत आहेत असे म्हटल्यानंतर त्यांची प्रतिष्ठा केवढी होती हे आपण पाहत होतो. एक दोन महिन्यापूर्वीच मंत्री येणार अशी बातमी आलेली असायची त्यांना बघायला येणारे लोक प्रचंड गर्दी करीत होते. पण आता जवळून मंत्री धक्का मारुन गेले तरी लोक त्यांना बघत सुध्दा नाही, याचा कुठे तरी विचार करणे आवश्यक आहे.

महोदय, मी खास करुन माननीय ज्येष्ठ सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी व उल्हासदादा पवार यांना निरोप देण्यासाठी आलो आहे, एरवी मी निरोप समारंभाला उपस्थित राहत नाही. मी काकांसोबत एकदा रस्त्याने जात होतो. तेव्हा माननीय श्री. अरुणभाई हे नगर विकास राज्यमंत्री होते. ते मंत्रालयाच्या समोरील बंगल्यात राहत होते. सकाळी स्वत:च हातात पिशवी घेऊन चालत कुलाब्याच्या मार्केटमध्ये भाजी आणण्यासाठी जात असताना आम्ही त्यांना पाहत होतो. तेव्हा काका श्री. दत्ताजी पाटील मला म्हणाले की, बघ, कसा मंत्री आहे, स्वत: हातात पिशवी घेतो आणि शिपाई वगैरे सोबत नसताना चालत भाजी आणण्यासाठी जातो. मला नेहमीच आश्चर्य वाटते की, अरुणभाई कसे काय एवढे शांत राहू शकतात. मला जर त्यांच्यासारखे भाग्य लाभले असते तर मी आणखी प्रगती केली असती. हेच अरुणभाई विधानसभेच्या निवडणुकीत पराभूत झाले तेव्हा राज्याचे गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील म्हणाले की, या सभागृहात अरुण गवळी येतो आणि अरुण गुजराथी मात्र निवडणुकीत पराभूत होतात ही काय लोकशाही आहे, काय राजकारण आहे अशी खंत त्यांनी व्यक्त केली होती. मी याच गोष्टीची आठवण त्यांना काल करुन दिली होती. मी मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांना म्हणालो की मी गॅलरीत बसून आपले भाषण ऐकत होतो तेव्हा

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील........

आपण असे वाक्य उच्चारले होते आणि आज मात्र श्री. अरुण गुजराथी यांच्या पाठी आपण राहिला नाहीत ही दुसरी खंत आहे. मी गेले महिनाभर श्री. अरुणभाई यांच्या पाठी लागलो व त्यांना सांगत आहे की, आपल्यासारख्या लोकांची खरी या सभागृहात गरज आहे पण कदाचित पक्षाच्या नेतृत्वाचा त्यांना दिल्लीला पाठवावयाचा विचार असेल अशीही अपेक्षा व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई हे एकदम स्वच्छ चारित्र्याचे, आयुष्यात कोणताही डाग त्यांनी स्वत:ला लागू दिला नाही. एक आदर्श लोक प्रतिनिधी म्हणूनच मी त्यांच्याकडे बघतो.

महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार हे सभागृहात ज्या पध्दतीने बोलतात ती एक वैशिष्ट्यपूर्ण लकब त्यांच्याकडे आहे. अभिनंदनाचा ठराव असो अथवा कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करावयाची असो किंवा श्रध्दांजली अर्पण करण्याचा प्रसंग असो त्यांना हे सभागृह कधीच विसरु शकणार नाही. तसेच कोणतेही संदर्भ असोत अथवा इतिहासाचे दाखले असोत ते सांगण्याची त्यांची ढब वेगळीच असायची.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ प्रथम श्री. खर्चे... 17:30

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा म्हणजे राजापूरची गंगा आहे त्यामुळे ते पुन्हा या सभागृहात येतील असा मला ठाम विश्वास आहे. प्रिंटिग प्रेस हा माझा पूर्वीपासूनचा व्यवसाय आहे. माझ्या व्यवसायाची सुरुवात मी प्रिंटिंग प्रेस पासूनच केली होती. मी वर्षाला बालभारतीचे 20-25 लाख पुस्तके छापत असे. कागद आणण्यासाठी मी जेव्हा बालभारतीमध्ये जात होतो तेव्हा त्या ठिकाणी माननीय उल्हासदादांची युनियन होती. त्या युनियनमध्ये दादांबद्दल कामगार व अधिकाऱ्यांमध्ये असलेला आदर मी लहानपणीच बघितलेला असल्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात वेगळेच आकर्षण आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे या डाव्या विचार सरणीच्या चळवळीतून येथे आलेल्या आहेत. त्यांच्या बोलण्यामध्ये, प्रश्न मांडण्यामध्ये डाव्या विचारसरणीचीच छाप दिसून येते. त्यांनी धरणग्रस्तांच्या प्रश्नावर आक्रमकतेने विचार मांडलेले आहेत व ते मी कधीही विसरणार नाही. त्या डाव्या विचारसरणीतून आलेल्या असतांनाही त्यांना काँग्रेस कधीच कळली नाही. काँग्रेस कशी आहे हे त्यांना आता कळले आहे. या सभागृहात जे चळवळीच्या माध्यमातून आलेले असतात त्यांची बोलण्याची छाप वेगळीच असते.

सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.ज़मा यांनी कामगारांच्या प्रश्नाबद्दल मांडलेले विचार न विसरता येण्यासारखे आहेत. गेल्या निवडणुकीत ते माझ्या विरुध्द उभे होते परंतु ते मतमोजणीला सुध्दा आले नव्हते. शेवटच्या क्षणाला त्यांचा फॉर्म भरला गेला होता. सभागृहामध्ये त्यांचे एक वेगळे वैशिष्टय आहे. त्यांची प्रत्येक विषयावर बोलण्याची पध्दत वेगळी होती. कोळसा कामगारांच्या चळवळीतून ते पुढे आलेले आहेत. सभागृहात जेव्हा कामगारांच्या संदर्भातील विधेयक चर्चेला येत असे तेव्हा त्यावरील त्यांचे विचार ऐकताना मला त्यांचा नेहमीच अभिमान वाटत असे.

सभापती महोदय, गेल्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली व मी एकमेकांविरुद्ध उभे होतो. कौन्टींगमध्ये सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली पहिल्यांदा निवडून आले व मी शेवटच्या कौन्टींगमध्ये निवडून आलो होतो. सभागृहात आल्यापासून आमची दोघांचीही मैत्री झाली व ती अखेरपर्यंत राहिली. मी आणि राजन तेली वेगळे नाहीत असे बाहेर लोक बोलत असतात. आमच्या दोस्तीची चर्चा कोकणातील वर्तमानपत्रात नेहमीच येत असते. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी या सभागृहात पुन्हा येण्यापेक्षा विधानसभेमध्ये निवडून यावे अशी मी त्यांना शुभेच्छा देतो.

....2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी पहिल्यांदा आणीबाणीमध्ये बघितले होते. आणीबाणीमध्ये भूमिगत राहून मी काम कलेले आहे. त्यावेळच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये कोणीही उभे राहण्यास तयार नव्हते. त्यावेळेस विरोधी पक्षाचे उमेदवार जबरदस्तीने उभे केले जात होते. त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे माननीय उध्दवराव दादांसाठी काम करीत होते. त्यांनी सुरुवातीला शेकापचे काम केले होते.

यानंतर श्री. भारवि....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

सुरुवातीला ते शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते होते. त्यावेळी त्यांनी जीवतोडून काम केल्याचे आम्ही आमच्या अभ्यास शिबिरात पाहिले होते. सकाळी 6.00 वाजता लोकसभा निवडणुकीचा निकाल लागला. श्री.उद्धवदादा पाटील निवडून आल्यामुळे या माणसाने आनंदाच्या भरात रेडियो फोडल्याचे देखील ऐकले आहे. तेव्हा पासूनच सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल हे कोणत्याही कामामध्ये स्वत:ला झोकून देत असल्याचे आम्ही पहात आलो आहोत. लातूर उस्मानाबादच्या साम्राज्यात श्री.उद्धवदादा पाटील निवडून येणार नाहीत असे वाटले होते. त्यावेळी सहा वाजता निकाल लागला होता. हे सर्व आम्हाला त्यावेळी श्री.उद्धवदादा पाटील यांनीच सांगितले होते. असे जरी असले तरी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांचे भवितव्य उज्ज्वल आहे. आपण शेतकऱ्यांसाठी लढत आहात. त्यामुळे आपला भविष्यकाळ उज्ज्वल असेल यात शंका नाही. हेच आपल्या पक्षाने आपल्याला पहिल्यांदा शिकविले आहे ते आपण विसरू नका.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर आणि आमची मैत्री जमली. त्यांचा फॉर्म राहील की नाही अशी शंका व्यक्त करण्यात आली होती. ते माझ्या घरी आले होते. मी त्यांना मागदर्शन केले. वकील दिला. तेव्हा पासून माझी आणि श्री.उपरकरांची सिंधुदुर्गामध्ये मैत्री कायम राहिली. राजकारण वेगळे असते. सिंधुदुर्गामध्ये सन्माननीय सदस्य श्री.उपरकर आणि सन्माननीय सदस्य श्री.तेली यांचे राजकारण वेगळे आहे. पण माझी मैत्री या दोघां बरोबर राहिली. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी येथे मांडलेले प्रश्न नेहमीच अभ्यासपूर्ण असायचे. कोकणातील प्रश्न चांगल्या पद्धतीने मांडणारा सदस्य आज निवृत्त होत आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना माझ्या कुटुंबाच्या वतीने, माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्मानननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे स्वागत करत असताना जे आठ सन्माननीय सदस्य निवृत्त होत आहेत त्यांना निरोप देण्यासाठी नव्हे तर शुभेच्छा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माझ्या पिढीने साने गुरुजींना पाहिले नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी पाहिले नाही. आम्ही दोघेही साने गुरूजींच्या चळवळीतून येथ पर्यंत आलो आहोत. माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी यांच्या सहवासात आलो तेव्हा साने गुरूजी भेटल्याचा आनंद झाला. हे मी त्यांना अनेक वेळा सार्वजनिकरित्या ऐकविले आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी यांचे जीवन साने गुरूजीं एवढेच निष्कलंक आणि निर्मळ आहे. साने गुरूजी ज्यांच्यासाठी लढत होते, त्यांच्यासाठीच श्री.अरूणभाई गुजराथी सातत्याने लढत आहेत. त्यांच्या आईकडून घेतलेली जाडीभरडी खादी ते आजही अंगावर मिरवतात आणि आपल्या हृदयात देखील तीच मूल्ये तितक्याच जाड्या भरड्या वृत्तीने वागवतात, हे अधिक महत्त्वाचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार म्हणजे सभागृहातील चालते बोलते संतपीठ आहे. मऊ मेणाहून आम्ही विष्णूदास या वृत्तीने ते सार्वजनिक जीवनात वावरतात. प्रसंगी व्रजाला भेदणारी शक्ती देखील मी त्यांच्यामध्ये पाहिली आहे. आपणही ती सभागृहात अनुभवली आहे. राजकारणामध्ये त्यांच्या सोबतीने आलेली अनेक माणसे पुढे गेली. पण त्याचे वैषम्य त्यांनी बाळगले नाही. खंत बाळगली नाही. उलट जे कर्तव्य आपल्या हाती आले आहे, ते संत वृत्तीने पार पाडण्याचे काम त्यांनी केलेले आहे. पंढरीची वारी असेल किंवा भीमसेन असतील महाराष्ट्रातील सगळे सांस्कृतिक संचित त्यांच्या वाणी मध्ये पदोपदी जाणवते. सभागृहात जेव्हा जेव्हा ते उभे राहिले तेव्हा तेव्हा तोच संतांचा कळवळा, तीच जनाईची हाक, तोच चोख्याचा हंबरडा त्यांच्या मुखातून अनेकदा सर्वांनी ऐकला आहे.

..3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे म्हणजे या सभागृहातील स्त्रित्वाचा हुंकार. मी खालच्या सभागृहात माननीय श्रीमती मृणालताई गोरे यांना ऐकले होते, पाहिले होते. पण या सभागृहात आल्यानंतर स्त्रित्वाचा एवढा लखलखीत उद्‌गार मी पहिल्यांदा पाहिला तो सन्माननीय सदस्या ॲड्.उषाताई दराडे यांच्या भाषणातून. परवाच त्यांचे स्त्री भ्रूण हत्येच्या विषयावरील भाषण ऐकले. सुरूवातीला त्या काँग्रेस पक्षात होत्या. नंतर राष्ट्रवादी पक्षात आल्या.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . .

पण सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील म्हणाले तसे कॉलेज जीवनात खांद्यावर घेतलेला लाल बावटा त्यांनी मनातून नष्ट होऊ दिला नाही. म्हणूनच त्या हिंमतीने, कष्टकऱ्यांच्या बाजूने येथे बोलत राहिल्या. सन्माननीय सदस्या सर्वश्री शोभाताई फडणवीस, विद्या चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, अलका देसाई, दिप्ती चवधरी आणि महाराष्ट्रामध्ये लढणाऱ्या सर्व स्त्रियांना या सदनामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे नाहीत याची खंत नेहमी वाटत राहील. त्या परत याव्यात किंवा राज्यसभेमध्ये जाण्याची संधी त्यांना मिळावी अशी आशा करतो.

सभापती महोदय, खाणीतील कामगारांचे हिऱ्यासारखे नेतृत्व कोण करीत असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा साहेब करतात. सन्माननीय सदस्य श्री.जमा साहेब आल्यानंतर मला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते म्हणाले की, हा कोणी तिकीट दिले म्हणून याठिकाणी आलेला माणूस नाही. हा सगळ्यात मोठा कामगार नेता आहे. पण ते कधीही असे दाखवत नाहीत की, मी एवढ्या कामगारांचे नेतृत्व करतो. ते अतिशय साधेपणाने रहतात. स्वत:च्या हातामध्ये सगळी ओझी वागवत फिरतात. तसेच ते सत्ताधारी पक्षामध्ये असले तरी कष्टकऱ्यांच्या बाजूने कोणतीही तडजोड न करता ते ठामपणे उभे रहातात हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे आमच्या कोकणातील म्हणजे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आहेत. ते कोकणातील खाजासारखे असून कोकणच्या मेव्यासारखे त्यांचे हृदय आहे. दादांचे ते सहकारी असले तरी कै.मधु दंडवते यांचे संस्कार ते विसरलेले नाहीत हे मी अनेक वेळा सदनामध्ये पाहिले आहे. लहानपणी ते कै.मधु दंडवते यांच्या घरामध्ये वाढलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर म्हणजे कोकणातील वाघ असून ते पुन्हा या सदनामध्ये यावेत यासाठी आम्ही जरुर प्रतिक्षा करु आणि तसे ते येतील. कारण त्यांनी त्यांच्या जिल्ह्याचे अनेक प्रश्न तेवढ्याच दमदारपणे सदनामध्ये मांडले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर हे पक्षनिष्ठेने काम करणारे आहेत. बहुजन वर्गातून जी माणसे पुढे आली आणि ज्यांनी आपल्या पक्षाशी कायम निष्ठा राखल्या त्यापैकी श्री.केशवराव मानकर हे एक आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल म्हणजे एक योध्दा शेतकरी. जेव्हा या राज्यातील मराठवाड्यातील पहिली आत्महत्या झाली. तेव्हा तेथे धावत गेलेला पहिला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकरी नेता म्हणजे श्री.सय्यद पाशा पटेल हे होय. मी त्यादिवशी त्यांच्या सोबत होतो. मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत त्यांनी कधीही कोणतीही तडजोड केली नाही. पण लढणाऱ्यांना नेहमी लढावेच लागते. नेहमी खस्ताच खाव्या लागतात. मोठ्या पक्षांच्या राजकारणामध्ये तर पुन्हा-पुन्हा लढून सिध्द करावे लागते आणि त्याला इलाज नाही. खरे म्हणजे दुसऱ्या पक्षात असलेला हा आपला माणूस आहे. मी नेहमी त्यांना सांगतो की, तुम्ही तिकडे बसत असलात तरी डाव्या विचाराचे आहात, पुरोगामी विचाराचे आहात. ते मनाने इकडे असून शरीराने तेथे आहेत. आता थोडे मोकळे झाले. ते आज ना उद्या येथे पुन्हा येतील. येथील लढाई संपली म्हणून सगळे काही संपले असे समजण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी रस्त्यावरील लढाई पुन्हा जोरात लढावी आणि मग खालच्या सभागृहाचा सुध्दा मार्ग उघडू शकतो. मी याठिकाणी निवृत्त होणाऱ्या सर्व सन्माननीय सदस्यांना प्रेमाच्या शुभेच्छा देतो आणि थांबतो. धन्यवाद.

-----

. . . .3 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, विधान परिषदेच्या सभागृहात असे मोजके दिवस असतात की जी संध्याकाळ आपल्याला थोडीशी हुरहुर लावून जाते.

कोणीतरी आपला निरोप घेणार असल्याने पुढील अधिवेशनाच्या वेळी ते आपल्या शेजारी उपस्थित नसतील अशा प्रकारची भावना मनामध्ये येते. आज आपण या प्रवासातून बाहेर पडणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना निरोप देण्यासाठी एकत्र जमलेलो आहोत.

सभापती महोदय, या निरोपाची सुध्दा मोठी गंमत आहे. आज निवृत्त झालेल्यांपैकी आमचे मित्र कै.प्रितमकुमार शेगांवकर यांच्या नशिबात तर हा निरोप समारंभ सुध्दा नव्हता. आम्ही निरोप देण्यापूर्वीच त्यांनी आपला निरोप घेतला आणि तेच आपल्याला अलविदा म्हणाले.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

सभापती महोदय, काही सदस्य भाग्यवंत आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आहेत तसेच सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आहेत. नियुक्ती आणि पुनर्नियुक्ती याच्यामधील अंतर त्यांनी सहज कापून काढले. त्यामुळे पुन्हा ते आमच्या बरोबर आहेत.

सभापती महोदय, विधान परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्याची एक सवय झालेली आहे. मला नेहमी वाटते की, केव्हा तरी वेळ मिळाला तर केसरी ट्रॅव्हल्स असेल किंवा राजाराणी ट्रॅव्हल्स असेल, कोणाकडे तरी बुकींग करावे आणि ग्रूपने कोठे तरी लांब प्रवासाला निघावे. या विधान परिषदेच्या सदस्यांची जर तशा प्रकारची टूर असेल तर कोणकोण सदस्य आपल्या बरोबर सहभागी होतील आणि ते आपल्या बरोबर काय काय घेऊन आले असतील ? कदाचित सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी बहिणाबाईची वही आणली असेल. सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांनी संतवाणीची कॅसेट आणली असेल. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी शेतकरी संघटनेत गाजविलेल्या मोर्चाची छायाचित्रे आणली असतील. सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर ज्या भागातून येतात तेथील धानाची काय परिस्थिती आहे त्याचे फोटो त्यांनी आणले असतील आणि ते फोटो सगळ्यांना दाखवून त्याबद्दल काही तरी केले पाहिजे असा आग्रह धरत असतील. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा हे आपल्याला कोळसा खाणीत घेऊन गेले असतील. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी बहुधा कोकणातून फणस आणला असता. सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांना चळवळीच्या वेळेला ज्या व्यथा अनुभवाव्या लागल्या आणि स्थिरावलेपण आल्यानंतर राज्याच्या राष्ट्रवादी महिला आघाडीचे अध्यक्षपद असेल किंवा या सभागृहात येऊन शांतपणे तेच विषय मांडण्याची अवस्था असेल पण त्या निमित्ताने त्यांनी एक वेगळे विश्व आपल्या बरोबर आणले असेल. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे दरवर्षी आम्हाला आंबे देतात आणि पुढेही देतील याची आम्हाला खात्री आहे.

आपण असा एकत्र प्रवास करीत असताना मला जाणवले की, या महाराष्ट्रातील खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ आणि कोकण अशा वेगवेगळ्या भागातून आलेले आपले सहकारी आपल्या बरोबरीने वाटचाल करताना सर्वांचे अनुभव आपण एकमेकांमध्ये मिसळत होतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले ....

सन्माननीय सदस्य श्री. एस. क्यू. जमा हे ज्या तडफेने बोलतात त्यावरुन नेहमी असे वाटावयाचे ते कामगार पुढारी आहेत. पण आम्ही इतर जे कामगार पुढारी बघतो त्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री. एस. क्यू. जमा यांचे सभागृहातील व्यक्तिमत्व पाहिल्यानंतर हा कोणी तरी वेगळाच माणूस असावा असे मला नेहमीच वाटत राहिले. मला एक गोष्ट आठवते. सगीना महातो नावाचा एक सिनेमा होता. त्यातील नायक कामगारांचे नेतृत्व करणारा होता. शेवटी मॅनेजमेंट ठरविते की, त्याला कामकाज कसे चालवावयाचे हे समजू द्या. म्हणून ते त्याला डायरेक्टर करतात. त्यांचे ऑफीस हिलवर असते आणि सगळ्यांना नेण्यासाठी एक ट्रॉली असते. हा नायक एक-दोन दिवस ट्रॉलीने वर जातो पण त्याला त्या सभेत डायरेक्टर म्हणून काही बोलता येत नाही. तिसऱ्या दिवशी कामगार असताना जसा तो चढून वर जात असे त्याप्रमाणे चढत वर येतो आणि खुर्चीत बसतो. मग त्याला कळते की, आता आपल्याला यामध्ये सहभागी होता येईल. कष्टकऱ्यांची जीवन जगण्याची ही प्रवृत्ती घेऊन आपण या ठिकाणी आलेला आहात. त्या माध्यमातून आपण सभागृहाला निश्चितपणे समृध्द केलेले आहे, हे मी या ठिकाणी निश्चितपणे सांगू शकतो.

सभापती महोदय, माझ्या आठवणीतले सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे लोकसभेचे उमेदवार होते. त्यावेळी ते वजनाने आजच्या पेक्षा निम्मे होते आणि आवाजाने मात्र दुप्पट होते. आपण ज्याला एक बंधिलकी म्हणतो त्या चळवळीशी स्वत:ला घट्ट धरुन ठेवणे, मग त्यासाठी काही राजकीय तडजोडी कराव्या लागल्या असतील पण आपल्या पक्षाच्या किंवा दुसऱ्या पक्षाच्या माध्यमातून संधी मिळत असेल तर त्याचाही उपयोग करुन घ्यावयास पाहिजे. ही सगळी आयुधे आहेत. जसे आपण विधान परिषदेमध्ये लक्षवेधी विचारता आली तर लक्षवेधी, प्रश्न विचारता आला तर प्रश्न, अशी विविध आयुधे वापरतो त्याप्रमाण् जर आज हा पक्ष आपल्याला संधी देत आहे तर मग तिकडे जाण्यास काय हरकत आहे, बाकीचे सोडून द्या पण मला प्रश्न तर मांडता येतील ही जी तळमळ आहे ती सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्या माध्यमातून निश्चितपणे आम्हाला बघावयास मिळाली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर आणि सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांच्या संदर्भात आम्ही नेहमी म्हणतो की, काही तरी गणिते चुकत आहेत. गणिते

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. हेमंत टकले .....

अशासाठी चुकत आहेत की, नेहमी सिंधुदुर्गचा कोटा वाजवीपेक्षा जास्तच भरलेला असतो. आम्ही इकडच्या बाकांवरुन नेहमी ऐकतो की, आरोग्य सेवेच्या बाबतीत असो किंवा पर्यटनाच्या बाबतीत असो, आम्ही सर्वात जास्त सिंधुदुर्ग जिल्ह्यालाच देणार आहोत. हे सगळे देतो देतो असे म्हणतात पण तुम्ही सहा सहा वर्षे मागे लागून सुध्दा ते मिळत नाही, मिळत नाही हा जो धंटानाद आहे तो घंटानाद परशुरामा तुला पुढेही सातत्याने चालूच ठेवावा लागणार आहे, याबद्दल मला तीळमात्र शंका नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी चवळवळीत काम केलेले आहे. सभागृहातील सदस्यांकडे वैयक्तिकरित्या पाहत असताना एक दृष्टी तयार होत असते. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे नागपूरच्या अधिवेशनात शेतकऱ्यांना विधानमंडळापर्यंत चालत घेऊन आले होते. त्यावेळी काय घडले ते माहीत नाही. परंतु ते पेटवलेल्या गवताच्या गंजीजवळ उभे होते. तेवढ्या कारणावरुन त्यांना निलंबित करण्यात आले होते. योगायोगाने तेथे उभे राहिल्यामुळे निलंबन वाट्याला येते. ही मूव्हमेंट त्यांनी नेली होती ती डोळ्यासमोर येत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांच्याबद्दल मला नेहमी असे वाटत आले आहे की, इतका समृध्द विचारांचा माणूस की ज्याचा इतरांनाही हेवा वाटावा. आज निरोप समारंभाचा कार्यक्रम असताना त्यांनी सकाळी फोन करुन सांगितले की, पुण्यातील एका पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमामुळे कदाचित मला सभागृहात पोहोचण्यास उशीर होईल. ज्ञानाने समृध्द असलेला हा माणूस आयुष्यातील 12-15 वर्षे प्राध्यापक म्हणून काम करीत असताना प्राध्यापकांच्या वेतनाचे, अनुदानाचे प्रश्न त्यांना मांडावेसे वाटले नाही. त्यांनी अध्यापनाचे काम प्रामाणिकपणे केले. त्यानंतर सातत्याने ते विधानसभेवर निवडून आले होते. राज्याचे मंत्री झाले होते, त्यानंतर विधानसभेचे अध्यक्षही झाले होते. राजकारणात माणूस मोठ्या पदावर गेल्यानंतर पुन्हा दोन पायऱ्या खाली उतरुन काम करावे लागले तर त्याला खंत वाटत असते. पण सन्माननीय सदस्य श्री.अरुण भाई गुजराथी हे या सदनाचे सदस्य झाल्यानंतर त्यांना जे जे काम करणे शक्य होते ते त्यांनी केलेले आहे. समाज प्रबोधनाचे ज्ञानपीठ म्हणून संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्याकडे बघत आहे. ते या सभागृहात यापुढे असणार नाहीत. जनतेची या सभागृहाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी आहे. त्यामुळे त्यांनाही सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी या सभागृहात असावयास पाहिजेत असे वाटत असेल.

या सर्वांचे आयुष्य, कर्तृत्व, चळवळ व जनमानसातील स्थान पाहिले तर या सर्वांमध्ये एक समान धागा आहे. या सर्वांना सामाजिक जाण जबरदस्त आहे, त्यांना वास्तवतेचे भानही आहे. सामाजिक जाणीव व वास्तवतेचे भान याची उत्तम सांगड घालावयाची असेल तर या सर्वांनी केलेले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हेमंत टकले...

काम मग ते या सभागृहात केलेले असेल, सभागृहाच्या बाहेरचे असेल ते पहावे. या सर्वांच्या निवृत्तीमुळे सभागृहाची समृध्दी थोडीशी कमी झाली आहे. एखाद्या वर्षी पाऊस कमी पडल्यामुळे जशी अवस्था निर्माण होते तशी या सर्वांच्या निवृत्तीमुळे या तलावाची पातळी थोडीशी कमी होणार आहे हे मात्र निश्चित आहे.

यानंतर मला सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार यांच्याबद्दल बोलावयाचे आहे. हा माणूस म्हणजे समर्पित व्यक्तिमत्व आहे. ते राजकारणामध्ये आहेत पण ते एक निमित्त आहे. त्यापेक्षाही मूल्यांचे जपणूक करण्यासाठी आपल्या आयुष्यातील जास्तीत जास्त वेळ देणारा हा माणूस आहे. त्यांना कोणत्याही विषयाबाबत विचारले तर ते सर्व संदर्भासहित सांगत असत. फार पूर्वीच्या काळातील वि.स.पागे किंवा त्यापूर्वीच्या काळातील महात्मा गांधी, मोठे संत यांच्याबद्दलची आठवण व साठवण आपल्या ज्ञानात भर घालत असते. असे म्हणतात की, आपल्याला केवळ वर्गातच शिकावयास मिळते असे नाही तर वर्गाच्या बाहेरही शिकावयास मिळते. सभागृहात जेवढे शिकावयास मिळते त्याच्यापेक्षा किती तरी अधिक लॉबीत शिकावयास मिळते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार यांना आजपर्यंत मोठमोठ्या विभूतींचा सहवास लाभलेला आहे. त्या मधूनच त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण झालेली आहे. एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून आपल्याला त्यांच्याकडे पाहता येईल. मी त्यांना एवढेच सांगेन की, आपण अधूनमधून लॉबीमध्ये अवश्य यावे. आपल्या सहवासाचा आनंद आम्हाला कायम मिळावा.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

आपल्या बोलण्यामध्ये नेहमी संत तुकाराम, ज्ञानेश्वर माऊली हे विषय निश्चितच असतात.

मला संत तुकाराम यांच्या एका अभंगांची सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्यामुळे सतत आठवण होते. अभंग असा आहे. "बोले तैसा चाले त्यांची वंदीन पाऊले." मी शाळेपासून बरीच वर्षे जी घोकंपट्टी केली होती त्या प्रमाणे "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" असा अभंग मला पाठ झालेला होता. परंतु सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या सारख्याच कोणी तरी एका माणसाने मला तो अभंग सुधारुन सांगितला. "बोले तैसा चाले त्याची वंदीन पाऊले." वंदावी आणि वंदीन या शब्दांमध्ये खूप मोठा फरक आहे. हा फरक व्यक्तिमत्वाचा आहे. अशी पाऊले जेव्हा दिसतात, तेव्हा आपल्याला वंदन करावे लागते. पुढे अभंग या प्रमाणे आहे.

अंगे झाडीन अंगण, त्याचे दास्यत्व करीन
त्याचा होईन किंकर उभा ठाकेन जोडुनी कर
तुका म्हणे देव त्याच्या चरणी माझा भाव

मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या व्यक्तिमत्वाचे संपूर्ण दर्शन तुकारामाच्या गाथेतील एका अभंगामध्ये केलेल्या वर्णना प्रमाणे आहे. त्यांचे तसे चित्र आपल्या डोळयापुढे उभे रहाते. आपल्या सारखी ही नररत्ने, आपल्या सारखे चळवळीतून आलेले, तावून सुलाखून मोठे झालेले, एकेक विचार भक्कमपणे मांडणारे आणि तसाच लोकमानसाचा आधार असलेली व्यक्तिमत्वे आमच्या सभागृहातून जात आहेत याची आम्हाला निश्चितपणे हूरहूर लागलेली आहे. म्हणून मी जाताना एवढेच म्हणेन की तुम्हाला वारंवार भेटण्याची, तुमच्या सहवासाची आमची इच्छा अजून पुरी झालेली नाही. त्यामुळे "कभी अलविदा ना कहना, हम से फिर मिलते रहना" एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2..

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : आदरणीय सभापती महोदय, आपण अपवाद म्हणून माझ्या गहिवरुन आलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, जे सदस्य निवृत्त होणार आहेत ते तेथेही नव्या दमाने, नव्या जोमाने काम करणार आहेत या विषयी मी कोणत्याही प्रकारे साशंक नाही. निरोप या शब्दाची फोड केली तर निरोपामध्ये रोप आहे. रोपाचा आधार घेऊन पुन्हा हे सन्माननीय सदस्य या सभागृहामध्ये येतील अशी आशा व्यक्त केली तर ती अप्रस्तु, अनाठायी ठरु नये. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली हे माझ्या पुढे बसून बोलत असतात. हक्काचा श्रोता म्हणून मी त्यांच्या मागे बसलेला असतो. ते आणि मी परस्परांच्या भाषणांना टाळ्या देत असतो.भाषण उत्तम झाले असे म्हणून प्रतिसादही देत असतो. माझी आणि त्यांची ओळख ही सिंधुदुर्गमध्ये माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब यांची पोटनिवडणुक असताना झाली. असंख्य कार्यकर्ते अनेकविध समस्या त्यांच्याकडे घेऊन आलेले असताना त्या समस्यांचे निराकरण करणारा आणि तरीही तोंडावर हास्य ठेवणारा असा हा कार्यकर्ता या सभागृहातून निवृत्त होत असताना मला मनस्वी दुःख होत आहे. परंतु आमचे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब हे निश्चितपणे त्यांना पुन्हा सन्मान बहाल करतील आशी अशा मी व्यक्त करतो. परवाचे त्यांचे ग्रामविकास खात्यावरचे भाषण अप्रतिम होते. अतिशय सुंदर, आखीव, रेखीव अशा प्रकारचे ते भाषण होते. ताजवेतोल बोलावे ते सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनीच. ज्यांच्या सहवासामध्ये ते राहिले आणि ज्यांचा संस्कार त्यांच्यावर घडला तो स्तुत्य आहे असे मानावे लागेल.

आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल हे देखील निवृत्त होत आहेत. त्यांना पाहिल्यानंतर मी मनामध्ये विचार करतो की, श्री. सय्यद पाशा पटेल यांना महाराष्ट्रातील सर्वदूर राजकीय कार्यकर्ते हे "पाशा पटेल" या नावाने ओळखतात. पण "पाशा पटेल" ऐवजी ते "पाटील" असते तर महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये किंवा महाराष्ट्राच्या राजकीय नभांगणावर हा तारा सदोदित चमकत राहिला असता. परंतु त्यांचे दुर्दैव हे की ते "पाटील" ऐवजी "पटेल" आहेत. गृहितावर आधारित प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सापडू शकत नाही आणि गृहितावर आधारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधून देखील सापडत नसतात. त्यांचे भाषण हा जणू काही एकपात्री प्रयोग असतो.

..2..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:55

प्रा. सुरेश नवले...

ज्याप्रमाणे देशपांडे "व-हाड निघालय लंडनला" हा एकपात्री प्रयोग करीत होते त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांचे भाषण असते. त्यांचा अभिनिवेश आणि त्यांची शब्दफेक ही फक्त शेतक-यांसाठीच असते. निधीध्यास हा शेतक-यांसाठी असतो. जगेन तर शेतक-यांसाठी आणि मरेन तर शेतक-यांसाठी या अभिनिवेशात ते जगतात. मला असे वाटते भारतीय जनता पार्टीचा असा हा एकमेव कार्यकर्ता असावा. या सभागृहामध्ये भारतीय जनता पार्टी ही अशा कार्यकर्त्याला मुकली आहे हे दुर्दैवाने सांगावे लागेल.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..

ते ज्यावेळी आपला अंगठा आणि तर्जनी हनुवटीवर ठेवतात त्यावेळी ते मला एखाद्या नव्या नवरीसारखे दिसतात आणि नवी नवरी बोहल्यावर चढल्याचा आनंद माझ्या सारख्याला होतो. रात्रंदिवस ते शेतकऱ्यांचा विचार करीत असतात. तेव्हा अशा शेतकऱ्याच्या नेतृत्वाला मी मनस्वी शुभेच्छा देतो. त्यांनी पुन्हा या सभागृहात यावे अशी मी आशा व्यक्त करतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी आणि माझा परिचय 1990 मध्ये झाला. मी 1990 मध्ये पहिल्यांदा विधानसभेमध्ये निवडून आलो होतो. त्यावेळी ते मंत्री होते. मंत्री असताना त्यांची मी अनेक भाषणे ऐकली आहेत. ते आपल्या भाषणातून इंग्रजीचे उतारे देतात ते पाहिल्यानंतर असे वाटते की, या सभागृहात खरोखर अरुणोदय झाला आहे. आता या सूर्याचा अस्त अरुणभाई निवृत्त झाल्यामुळे होतो की काय अशा प्रकारची शंका निर्माण व्हावी असे उत्तम प्रकारचे विवेचन ते करीत असत. अनेकविध विषयांवर विशेषत: कायद्याच्या विषयावर स्वल्पविरामाच्या महत्वाबद्दल ते एक तास बोलू शकतील इतका त्यांचा अभ्यास आहे. वाक्यात स्वल्पविराम नसेल किंवा पूर्ण विराम नसेल तर वाक्याचा अन्वयार्थ कसा बदलू शकतो किंवा त्याचा अनर्थ कसा घडू शकतो याचे उत्तम विवेचन श्री.अरुणभाई करायचे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे गांधीवादी आहेत. गांधींसारखी सौम्य प्रकृती, गांधींसारखे सौम्य व्यक्तीमत्व या सभागृहात दुसरे नाही. त्यांना साने गुरुजींचा सहवास लाभला की नाही मला माहीत नाही. परंतु आमच्या सहवासामध्ये असणारे हे साने गुरुजी आज आमच्या मधून निवृत्त होत आहेत. अधिकारवाणीने पाठीवरुन हात फिरणारा किंवा शाबासकीची थाप देणारा हात आता सभागृहात नसणार याची खंत आम्हाला जाणवणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्याकडे पाहिल्यानंतर ते कोणत्याही तरी साहित्य संघाचे सदस्य असावेत किंवा नक्कीच साहित्यिक असावेत. साहित्यिक नसतील तर कवी तरी असावेत असे वाटते. साहित्यिक आणि कवींकडे पाहिल्यानंतर त्यांच्या एकूण पेहरावावरुन आपल्या मनामध्ये एक छबी निर्माण झालेली असते की हा नक्कीच कवी, साहित्यिक किंवा लेखक असावा. आमच्या दादांकडे पाहिल्यानंतर ते नक्कीच साहित्यिक वाटतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..

सभापती महोदय, दादा जेव्हा हसतात तेव्हा ते नखशिखांत किंवा आपादमस्तक हसतात. दादांना हसताना पाहणे हा एक वेगळ्या प्रकारचा आनंद आहे आणि आम्ही तो आनंद अनुभवला आहे.

सभापती महोदय, दादांना भीमसेन जोशी पासून पु.ल.देशपांडे सारख्या थोर व महान व्यक्तींचा सहवास लाभला. साहित्याचे पंढरपूर म्हणजे पुण्यामध्ये ते राहिले. पुण्यासारख्या शहरांमध्ये राहून आमच्या सारख्या सदस्यांना ते सहजगत्या उपदेश करीत असत. उपदेशामध्ये त्यांचा फार आग्रह नसे, पटले तर सांगतो अन्यथा ते सोडून द्या इतके ते निराग्रही असत. परंतु ते उत्तम प्रकारे मार्गदर्शन करतात. आमच्या अगोदरपासून ते या सभागृहाचे सदस्य आहेत. त्यांनी अनेक भाषणे केली. परंतु ते फार कमी विषयावर बोलत.. ज्यावेळी दादा आणि अरुणभाई सभागृहात बोलणार असतील त्यावेळी आम्ही लॉबीमधून सभागृहात येत असू. आता ते या सभागृहातून निवृत्त झाल्यानंतर माझ्यासारख्या नवख्या सदस्याला त्यांची उणीव नेहमीच जाणवत राहील. सन्माननीय सदस्य पाशा पटेल हे निवृत्त झाल्यानंतरही लॉबीमध्ये भेटणार आहेत. तेव्हा त्यांच्या उणिवाची कसर लॉबीमध्ये भरुन निघणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा साहेब हे हिंदी भाषेत उत्तम विवेचन करणारे आणि भाषण करणारे सदस्य. या सभागृहामध्ये सभागृहाचे कामकाज पूर्णहोईपर्यंत बसणारे जे सदस्य आहेत त्यामध्ये श्री.एस.क्यू.जमा साहेब आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री एस.क्यू.जमा, सुभाष चव्हाण ,राजन तेली आणि मी सभागृहाचे कामकाज पूर्ण होईपर्यत उपस्थित असतो. आम्ही अनेक मान्यवरांची भाषणे शेवटपर्यंत एकत असतो. श्री.एस.क्यू.जमा यांची सर्व भाषणे हिंदी भाषेतून झाली. राष्ट्रीय पातळीवर कामगारांचे अनेक प्रश्न सोडवित असताना मराठीचा संदर्भ देण्याची त्यांना गरज वाटली नसावी म्हणून ते हिंदी भाषेत बोलत असावेत. पॉईन्ट ऑफ प्रोसिजर किंवा हरकतीचा मुद्दा ही त्यांची फार मोठी आयुधे आहेत. या आयुधांचा त्यांनी उत्तमप्रकारे वापर केलेला आहे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांची भाषणे मी हाफपॅन्टमध्ये असल्यापासून ऐकत आहे. दहावीत असताना हिरालाल चौकामध्ये त्यांची भाषणे ऐकली आहेत. त्यांच्याकडे रणदुदुंभी किंवा रणरागिणी म्हणून पाहिले जात होते, अशा आमच्या कॉम्रेड उषाताई होत्या. कॉम्रेडबाई म्हणून त्या बीड शहरात आणि अवती भोवतीच्या परिसरात ओळखल्या जात होत्या.

सभापती महोदय, ॲड.उषाताई दराडे यांची आक्रमक भाषा शैली आणि तुफानी शब्दफेक हे त्यांच्या त्या काळातील व्यक्तीमत्वाचे वैशिष्टये होती. आता कालपरत्वे त्यांच्यामध्ये थोडा सौम्यपणा आलेला आहे.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

त्यांचे परवा महिला विधेयकावरील भाषण अप्रतिम झाले. त्यांचे थोडेसे भाषण वाढले. त्याचे कारण त्या महिला असल्याचा परिणाम, महिला असल्याचा अधिकार त्यांनी भाषणाच्या अनुषंगाने वटविला. पूर्वीच्या काळात मी त्यांची अनेक भाषणे ऐकलेली आहेत. ॲड.दराडे हया उत्तम लेखिका आहेत. या सिध्दहस्त लेखिकेची म्हणून अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यापैकी काही पुस्तके माझ्या वाचनात आली. उरलेली जी पुस्तके आहेत, ती नागपूरच्या अधिवेशनाच्या दरम्यान निश्चितपणे वाचणार आहे. मी तुम्हाला मनापासून शुभेच्छा देतो. विधानपरिषद अथवा विधानसभा सभागृहात आपण पुन्हा यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर, श्री. परशुराम उपरकर हे माझे मित्र आहेत. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर साहेब, सभागृहात ज्यावेळेस बोलण्यासाठी उभे रहावयाचे त्यावेळी आम्हाला सभागृहात बसून रहावे लागत असे. कारण ते कुठल्या क्षणी कोणता आरोप करतील हे सांगता येत नव्हते. ते आरोप करीत असताना आम्ही हजर नसलो तर मग आमचे काय होईल अशी चिंता आम्हाला वाटावयाची. त्यामुळे त्यांच्या भाषणाच्या वेळी आम्ही आवर्जून उपस्थित रहावयाचो. त्यांची देखील सभागृहात उत्तम भाषणे झाली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मानकर यांची देखील भाषण उत्तम असावयाची. निवृत्त सदस्यांना मी मनापासून धन्यवाद व शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंतराव जाधव यांना निरोप देण्याची वेळ बहुधा 15 ते 20 वर्षानंतर येईल की नाही अशी शंका आहे. ज्यावेळी मला निरोप देत असतील त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव हे या सभागृहाचे सदस्य नक्कीच असतील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या संपूर्ण भविष्याला आणि त्यांच्या आयुष्याला मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो. धन्यवाद.

----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्री.पांडुरंग फुंडकर व इतर सदस्यांनी निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या बाबतीत अतिशय चांगले विचार व्यक्त केले.

सभापती महोदय, प्रत्येक सदस्यांचे एक ऐतिहासिक स्वरुपाचे योगदान गेल्या सहा वर्षाच्या काळात झालेले आहे. माननीय श्री.उल्हासदादा पवार यांना मी गेल्या 25 ते 30 वर्षापासून ओळखते. पुणे शहरात कॉग्रेसची प्रतिमा ही सुसंस्कृत, सौम्य, सभ्य, समजूतदार असण्याबाबत फार मोठे योगदान श्री.उल्हासदादाचे पुणे शहरात आणि पश्चिम महाराष्ट्रात आहे, ही गोष्ट मला या ठिकाणी नमूद केली पाहिजे. मतभेद असले तरी संवाद तुटता कामा नये हे पुण्यातील राजकारणातील वैशिष्टय आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास दादांच्या विचारांचा पाया आध्यात्मिक असा आहे. पंढरपुरच्या वारीला निघाल्यावर एकमेकास माऊली म्हणतात. तशाच पध्दतीने त्यांनी स्वत: सर्व आध्यात्मीक विचार आत्मसात केलेले आहेत. परंतु जेव्हा मतभेदाची वेळ येते, तेव्हा ते अतिशय ठणकावून भूमिका मांडतात. वसंत व्याख्यानमाला असेल, वेगवेगळे कार्यक्रम असतील, वाहिन्यांवरचे कार्यक्रम असतील तेथे ते कोणालाही न दुखावता बोलतात. बाळासाहेब भारदे नेहमी म्हणावयाचे की, कार्यकत्याच्या डोक्यावर बर्फाचा खडा आणि जिभेवर साखर असली पाहिजे. ते त्यांनी आत्मसात केलेले आहे. त्यांच्या संपूर्ण राजकीय प्रवासामध्ये मतभेद झालेले असले तरी त्यांनी वेगळी प्रतिक्रिया दिलेली मला आठवत नाही. त्यामुळे माननीय श्री.उल्हास दादांची निवृत्ती ही खरे तर आम्हाला आश्चर्यकारक वाटते. राजकारणात अशा गोष्टी घडत असतात. परंतु त्यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात सातत्याने राहील. विशेषत: तीर्थक्षेत्रांच्या विकासासंदर्भात जे मुद्दे मांडले आहेत, ते मुद्दे आम्ही पुढे नेण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. या कामासाठी तुमचे सहकार्य आम्हाला यापुढे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांच्यामध्ये शालीनता, नर्मविनोद, प्रसन्नता फार मोठया प्रमाणात आहे. त्याच बरोबर प्रहार करावयाचा, मतभेद व्यक्त करावयाचे, परंतु ते व्यक्त करीत असताना समोरच्या माणसाला छिन्नविछिन्न न करता कसे मांडावयाचे हे श्री. अरुणभाई गुजराथी यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. आम्ही भाषण करतो, त्यावेळी समोरच्या सभासदांचे चेहरे बघितल्यावर कोणाच्या कपाळावर आठी दिसली तर आपण

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

बोलण्याचा सूर बदलला पाहिजे यासंबंधी आम्ही जजमेंट घेत असतो. श्री. अरुणभाईच्या चेहऱ्यावर काय भाव दिसत आहेत. मतभेद असले तरी त्यांची गाडी रुळावर आहे काय, यासंबंधीची भावना त्यांच्या चेहरा बघितल्यानंतर दिसून येत होत्या. त्यांचा स्वभाव हा अतिशय मनमिळाऊ असा आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, श्री. सय्यद पाशा पटेल, श्री.एस.क्यू.जमा, ॲड. ऊषा दराडे, श्री. केशवराव मानकर हे खास करुन एकेका प्रश्नावर लढणारे आमदार आहेत. सभापती महोदय, या सन्माननीय सदस्यांनी हात वर केलेला नसला तरी आपण त्यांच्याकडे नजर फिरविल्यानंतर त्यांना देखील वाटत होते की, माननीय सभापती महोदय हे आपल्याकडे पहात आहेत. त्यामुळे आपणाला बोलण्याची संधी नक्कीच मिळेल...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री. गिते 18:10

डॉ. नीलम गोऱ्हे....

अनेक विषयांमध्ये या सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. याठिकाणी विशेषत: माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांचा उल्लेख करावा लागेल. पूर्वविदर्भाच्या प्रश्नावर आणि महिलांवर होणाऱ्या अत्याचारांबाबत सभागृहाला आणि मला स्वत:ला त्यांच्या भाषणांचा खूप उपयोग झाला. सदनात आल्यानंतर पहिली 1/2 वर्षे ते अस्वस्थ वाटत होते. परंतु नागपूर अधिवेशनात धानाच्या प्रश्नावर आणि पूर्वविदर्भाच्या प्रश्नावर आम्ही त्यांची भाषणे ऐकली आहेत. महाराष्ट्रातील वेगवेगळया भागातील जे वेगवेगळे प्रश्न आहेत तसेच छोटया मुलांच्यावर झालेल्या अत्याचारांच्या प्रश्नावर श्री. मानकर हे पोटतिडीकीने बोलले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर हे प्रत्येक विषयावर आमच्याबरोबर चर्चा करीत होते. विधानसभेच्या 2005 च्या पोटनिवडणुकीत ते श्री. नारायण राणे यांच्याविरोधात उभे राहिले होते. त्यानंतर त्यांचा आजपर्यंतचा प्रवास हा सिंधुदुर्गमधील देव-देवतांच्या आशीर्वादामुळे झालेला आहे असे मला वाटते. त्यांनी विधानपरिषदेत अतिशय चांगले काम केले आहे. सक्षमपणाने काम केले आहे. त्यांना निरोप देताना मला वाईट वाटत आहे. त्यांच्या कामाचे योगदान लक्षात घेऊन शिवसेनाप्रमुख आणि कार्याध्यक्ष त्यांना नक्कीच न्याय देतील अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली सदनात काँग्रेस पक्षाचे आमदार म्हणून बसलेले असले तरी ते सिंधुदुर्ग जिल्हयाचे आमच्या पक्षाचे प्रमुख होते. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जेव्हा आम्ही जात होतो तेव्हा पहिल्यांदा तेली यांना कळवीत होतो. प्रश्न मांडत असताना त्यांना कधी वाटले तर ते आम्हांला हाक मारु शकतात आम्ही त्यांना जेवढे शक्य असेल तेवढे सहाय्य निश्चितच करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या आणि माझी मैत्रीण श्रीमती उषाताई दराडे वेगवेगळया भाषेत बोलतात. मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेत त्या बोलतात. परंतु मैत्रिणींची भाषा वेगळी असते. सभागृहाला मोठयाने बोलून कळलीच पाहिजे असे नाही. सभागृहात पक्षीय आणि वैचारिक मतभेद असू शकतात. परंतु उषाताई या सदनात असल्याचा एक आधार समाजातील तळागाळातील लोकांना होता. एखादी गोष्ट मानवी अधिकाराच्या आणि स्त्रियांच्या हिताविरुध्द बोलली गेली तर कुणाचाही मुलाहिजा न ठेवता उषाताई तो विषय सदनात मांडत होत्या आणि तो त्यांचा चळवळीतील संस्कार आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

जे लोक पीडितांच्या चळवळीतून सदनात आले ते आमदार होतील असे कधी वाटले नाही. आम्ही जेव्हा 75-80 च्या दरम्यान काम करण्यास सुरुवात केली तेव्हा आम्हांला देखील स्वप्नात वाटले नव्हते की आम्ही आमदार होऊ. हे डोक्यात नव्हते. परंतु ही वाटचाल करीत उषाताई येथपर्यंत आल्या. अनेक प्रश्न त्यांनी सभागृहात मांडले आहेत. आपण निवृत्त होत असला तरी राजकारणात आपल्यासारख्या महिलांचे कायम स्वरुपी मार्गदर्शन राहील आणि कार्यकर्ता म्हणून आपले काम सुरुच राहील. त्यामुळे श्रीमती दराडें यांना निरोप देताना वाईट वाटत असले तरी मैत्रीण म्हणून मन:पूर्वक शुभेच्छा देते आणि राजकारणात आमचे जेवढे काही ऐकले जाईल त्याबाबतीत मी नेहमीच सहकार्य देणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी अनेक वर्षे ओळखते. सभागृहात शेतकऱ्यांचे प्रश्न मांडताना आपण खूप अस्वस्थ होता त्यामुळे काळजी वाटते. काळजी याची वाटते की संतापाच्या भरात माणूस रस्ता चुकल्यासारखा होतो. त्यामुळे ज्या प्रश्नांसाठी लढत लढत येथपर्यंत आलात आणि ज्याप्रकाराने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मुद्दे मांडले त्यांचा विचार केला तर स्पष्ट दिसते की, अशा प्रकारे मुद्दे मांडणारा कार्यकर्ता म्हणून परिषदेत आम्हांला त्यांची नेहमीच आठवण येत राहणार आहे. नंतरही आमचे सहकार्य आपल्याला राहणार आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जामाजी यांना मी खाण कामगारांच्या प्रश्नावरुन खूप वर्षापासून ओळखत आहे. परंतु खाण कामगारांच्या प्रश्नावर जेवढा न्याय मिळावयास हवा होता तेवढा न्याय आपण देऊ शकलो नाही. ते अपुरे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आपल्याला मन:पूर्वक शुभेच्छा देते.
यावेळची निवडणूक बिनविरोध होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले त्यांचे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे खास आभार मानते.

जयहिंद, जयमहाराष्ट्र.

------

नंतर श्री. भोगले

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या माननीय सदस्यांना निरोप देण्यासाठी व त्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.एस.क्यू.ज़मा हे विदर्भातील अल्पसंख्याक समाजाचे प्रभावी नेते आहेत. त्यांच्या सभागृहातील टेबलावर कायम कागदपत्रांचे भांडार दिसून येत असे. ते नेहमी आसनस्थ असायचे. कामगार चळवळीतील एक मातब्बर, अभ्यासू आणि सभागृहात अत्यंत आक्रमकपणे बोलणारा नेता आज निवृत्त होत आहे. त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी मी यश चिंतीतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे आमच्या पक्षाचे प्रांताध्यक्ष आहेत. त्यांना पुन्हा उमेदवारी मिळणार होती आणि ती मिळाली व ते बिनविरोध निवडून आले आहेत. त्यांनी युवक काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले आहे. राज्य शासनामध्ये गृह राज्यमंत्री, ग्रामविकास राज्यमंत्री, कृषी व फलोद्यान आणि संसदीय कार्यमंत्री म्हणून काम केले आहे. पुन्हा निवडून आल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.राजन तेली हे आमच्या सिंधुदुर्ग जिल्हयातील माझे सहकारी आहेत. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, प्रशासनामध्ये मातब्बर आहेत. कोकण सिंचन महामंडळाचे ते उपाध्यक्ष होते. तडफदार, तरुण आणि कुशल संघटक असलेले ते आमचे मित्र आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांना त्यांनी साथ द्यावी, त्यांची साथ सोडू नये, प्रामाणिकपणे त्यांच्याबरोबर रहावे एवढे बोलून त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय,माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे सदा बहारदार व धाडसी व्यक्तिमत्व आहे. महाराष्ट्र युवक काँग्रेसचे ते वर्षानुवर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात प्रथमच लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी माननीय श्री.विलासराव देशमुख यांची नेमणूक केली होती. ती जाण माननीय श्री.विलासराव देशमुख यांनी ठेवली आणि अनंतकाळपर्यंत त्यांच्याबरोबर मित्रत्व ठेवले. दलित समाजाच्या विविध संस्थांचे ते अध्यक्ष आहेत. पुण्यासारख्या शहरात राहून सुध्दा सर्व क्षेत्रात त्यांनी भाग घेतला. काँग्रेस पक्षामध्ये नव्हे तर युवक काँग्रेस, सेवादल, प्रदेश काँग्रेसमधील प्रांताध्यक्ष पद वगळता इतर सर्व पदे त्यांनी भूषविली आहेत. काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष पद त्यांना मिळावे अशी मी या प्रसंगी इच्छा प्रदर्शित करतो.

..2..

श्री.सुभाष चव्हाण.............

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे अतिशय अभ्यासू आहेत. मी त्यांना खूप जवळून पाहिले आहे. ते संसदपटू आहेत. त्यांची भाषणे ऐकण्यासाठी आम्ही प्रामाणिकपणे सभागृहात बसत असू. माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्यासोबत त्यांनी नगरविकास, माहिती व जनसंपर्क, नागरी कमाल जमीन धारणा, अर्थ विभागाचे राज्यमंत्री पद भूषविले होते. त्यांनाही मी उर्वरित आयुष्यासाठी शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांचे नाव माझ्या कायम लक्षात राहणार आहे. मी 2008 साली प्रथम या सभागृहात प्रवेश केला, त्यावेळी त्या तालिका सभापती होत्या. दुसऱ्याच दिवशी अर्थसंकल्पावर मी भाषण केले होते. मी अतिशय सुंदर भाषण केल्याचे त्यांनी ताबडतोब चिठ्ठी लिहून कळविले. 'अतिशय चांगले मुद्दे मांडले, क्रांतीकारी भाषण केले, दलितांसाठी विचार मांडल्याबद्दल मनापासून हार्दिक अभिनंदन.' त्यांनी मला दिलेल्या हा दस्तऐवज मी आयुष्यभर सांभाळून ठेवणार आहे. आज त्या निवृत्त होत आहेत. त्यांना मनापासून शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधीत्व करतात. ते भाषण करण्यास उभे राहिले की आम्हाला उत्साह येत असे. आम्हाला एक प्रकारे शक्ती मिळत होती. ते सभागृहात बोलायला लागल्यानंतर आम्ही थकलेलो असलो तरी आमचा थकवा दूर होत असे. यापुढे त्यांचे भाषण ऐकण्याची आम्हाला संधी मिळणार नाही. मी त्यांच्या उर्वरित आयुष्याबद्दल सदिच्छा व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर हे अतिशय नम्र स्वभावाचे आहेत. त्यांच्यासोबत रोजगार हमी योजना समितीवर काम करीत असताना माझा अगदी जवळून संबंध आला. अतिशय आक्रमक, अभ्यासू, कर्तबगार आणि वेळप्रसंगी अधिकाऱ्यांना सडेतोड बोलायचे, त्यामुळे अधिकारी वर्ग त्यांना वचकून असायचा. ते आता निवृत्त होत आहेत. त्यांच्या माझ्या हार्दिक शुभेच्छा.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करीत असले तरी त्यांचा जन्म बोरीबंदर येथे झालेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा ही त्यांची कर्मभूमी आहे. बाबासाहेब पुरंदरे यांचा जाणता राजा हा कार्यक्रम अतिशय लोकप्रिय आहे. माननीय

..3..



SGB/ 18:15

श्री.सुभाष चव्हाण.........

सदस्य श्री.परशुराम उपरकर हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे जाणते राजे आहेत. मागील आठवड्यात ते धामापूर येथील कासारटाका येथे आले होते. त्यांची पक्ष कार्यकर्त्यांसोबत बैठक होती. कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी ते कासारटाका येथे आले होते. मी त्यांच्यासोबत अनेकदा कोकण कन्या एक्स्प्रेस गाडीने कणकवली-मुंबई प्रवास केलेला आहे. आमच्यावर मनापासून प्रेम करणारे ते आमचे मित्र आहेत. गाडीमध्ये चविष्ट जेवणाचा डबा ते आणायचे. आज ते निवृत्त होत आहेत, याचे आम्हाला दु:ख होते. त्यांनी पुन्हा सभागृहात यावे आणि त्यांच्याच पक्षाचे प्रामाणिकपणे काम करावे, पक्षाची साथ सोडू नये एवढी मी या प्रसंगी अपेक्षा व्यक्त करतो.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ........

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील हे भाग्यवान आमदार आहेत, कारण त्यांची पुन्हा निवड होऊन ते या सदनात सदस्य म्हणून आले आहेत, त्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री. एस.क्यू.जमा यांचे भाषण .....

( श्री. देव दत्त यांचेकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा ( विधान सभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, लगभग 42 साल पहले सन् 1969 में अपने जन्म स्थान बिहार राज्य से, एक निजी कोयला खदान में काम करने के लिए नागपुर के पास कामठी नाम की जगह पर मैं आया था और सन् 1973 में हमारी नेता श्रीमती इंदिरा गांधी जी ने कोयला खदानों का जब राष्ट्रीयकरण किया तो मैं इंटक यूनियन में शामिल हो गया और सन् 1973 से लेकर अब तक मैं इंटक यूनियन और अपनी कांग्रेस पार्टी में लगातार काम कर रहा हूं.

सभापति महोदय, मेरी जन्मभूमि बिहार राज्य जरुर है, लेकिन मेरी कर्म भूमि महाराष्ट्र है. मैं अपने आप को बहुत भाग्यशाली मानता हूं, क्योंकि महाराष्ट्र राज्य सचमुच ही महा-राष्ट्र है. यहां पर आने के बाद महाराष्ट्र की जो संस्कृति है, यहां की जो अस्मिता है, यहां की जो पहचान है, उसके बारे में मुझे बहुत गर्व है. मैं अपने आपको इस लिए भी भाग्यशाली मानता हूं, क्योंकि मुझे महाराष्ट्र राज्य जैसे प्रगतिशील राज्य की विधान परिषद में काम करने का अवसर मिला. यह मेरा लाइफ-टाइम एचीवमेंट है. इसके लिए अपनी नेता श्रीमती सोनिया गांधी जी, राहूल गांधी जी, उस समय महाराष्ट्र कांग्रेस पार्टी की अध्यक्षा श्रीमती प्रभा राव जी, उस समय महाराष्ट्र कांग्रेस पार्टी की इंचार्ज श्रीमती मार्गरेट अल्वा जी, उस समय के माननीय मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख जी जैसे सभी माननीय नेताओं का मैं आभारी हूं. उन सब मान्यवर नेताओं की वजह से ही मैं यहां पर चुनकर आया और यहां पर काम करने का मौका मुझे मिला.

सभापति महोदय, मैं एक बात यहां यह भी कहना चाहता हूं कि जब मुझे पता लगा कि विधान परिषद के सदस्य के रुप में चुने जाने के लिए मेरा नाम है तो मुझे बड़ा आश्चर्य हुआ और मुझे लगा कि यह मेरे वश की बात नहीं है. पहले मैंने सुना था कि चुनाव लड़ने के लिए बहुत पैसों की जरुरत होती है और चुनाव लड़ने के लिए पैसे तो मेरे पास थे ही नहीं. लेकिन मैंने चुनाव लड़ने के लिए फार्म भरा और चुनाव लड़ने के लिए मुझे एक भी पैसा खर्च नहीं करना पड़ा. इसलिए मैं अपने आप को बहुत ही भाग्यशाली समझता हूं.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/DD/ पूर्वी श्री. भोगले.......

श्री एस. क्यू. ज़मा .....

सभापति महोदय, विधान परिषद एक संवैधानकि मंदिर है. मैंने इस मंदिर में विद्याथी के रुप में बहुत कुछ सीखने की कोशिश की है. मैं यहां पर बहुत कुछ सीखा भी हूं मैंने यहां पर जो भी काम किया है, वह मेरी संवैधानिक जवाबदारी थी, उसी जवाबदारी को मैंने यहां पर निभाया है. मैंने किसी पर कोई एहसान नहीं किया है. विधान परिषद नाम के इस महान स्थान पर आने का मुझे मौका मिला और मैंने इस महान स्थान के माध्यम से लोगों की सेवा करने की पूरी कोशिश की है. लोगों की सेवा करने का काम मैं आगे भी करता रहूंगा.

सभापति महोदय, मैं आपका आभारी हूं कि आपने मुझे बहुत आशीर्वाद दिया और आपने मेरी बहुत हिम्मत अफजाई की. हमारे माननीय उप सभापति श्री वसंत डावखरे साहब तथा हमारे जो बाकी सहयोगी हैं, उन्होंने भी मुझे यहां पर काफी सहयोग दिया. इसलिए सभी के प्रति मैं आभार व्यक्त करता हूं.

सभागृह में मेरे जो सहयोगी माननीय सदस्य आज मेरे साथ सेवा निवृत्त हो रहे हैं उनके प्रति मैं शुभकामना व्यक्त करता हूं. हमारे साथी श्री प्रितमकुमार शेगावकर जी तो पहले ही अलविदा कह गए हैं, कुछ समय पहले ही उनका स्वर्गवास हो गया है. आज के इस मौके पर मैं उनको भावभिनी श्रद्धांजलि देता हूं.

हमारे दूसरे साथी श्री माणिकराव ठाकरे जी और जयंत पाटील जी तो सभागृह में दुबारा चुनकर आ गए हैं. मैं उनको भी शुभकामना देता हूं. मैं अपना सौभाग्य समझता हूं कि माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी साहब के बगल में बैठने का मौका मुझे इस सभागृह में मिला. माननीय सदस्य श्री उल्हास दादा पवार तथा श्री गुजराथी साहब जैसे वरिष्ठ माननीय सदस्य भी आज सेवा निवृत्त हो रहे हैं. इन दोनों माननीय सदस्यों को देखकर लगता है कि गांधीवाद का अनुसरण करने वाले माननीय सदस्यों में इन दोनों माननीय सदस्यों का नाम काफी ऊपर है. मैं इन दोनों माननीय सदस्यों का अभिनन्दन करता हूं.

सभापति महोदय, हमारी माननीय सदस्या श्रीमती उषा ताई दराडे जी भी आज सेवा निवृत्त हो रही हैं. उनका भाषण बहुत ही अच्छा रहता था. माननीय सदस्या का भाषण सुनने के बाद ऐसा लगता था कि "She is an encyclopedia of Law". माननीय उषा ताई बिना रुके लगातार अपना भाषण यहां पर करती थीं. माननीय सदस्या श्रीमती उषा ताई के प्रति मैं आदर व्यक्त करता हूं.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. ज़मा .....

माननीय सदस्य श्री राजन तेली, श्री परशुराम उपरकर जी, श्री केशवराव मानकर जी, तथा श्री सय्य्द पाशा पटेल साहब का भी मैं इस बात के लिए अभिनन्दन करता हूं कि इस सभागृह के माध्यम से इन सभी माननीय सदस्यों ने आम लोगों की बहुत सेवा की है.

सभापति महोदय, अपनी बात समाप्त करने से पहले मैं अपने मन की कुछ बातें यहां पर कहना चाहता हूं. मेरा कहना है कि मैं कामगार क्षेत्र में काम करने वाला एक कार्यकर्ता हूं. किसानों की समस्याओं की ज्यादा जानकारी पहले मुझे नहीं थी. यहां पर आने के बाद जब मुझे महाराष्ट्र और हमारे विदर्भ में किसानों की हालत मालूम पड़ी तो मुझे बहुत बुरा लगा. लेकिन उस बारे में ज्यादा जानकारी न होने की वजह से मैं उस बारे में बोलना उचित नहीं समझता था परन्तु उनकी हालत जानने के बाद उनके बारे में बोले बिना मुझ से रहा नहीं गया. इसलिए मैंने किसानों के बारे में अपने विचार यहां पर रखे. अब मैं इस सभागृह का सदस्य तो नहीं रहूंगा. लेकिन किसानों की आत्महत्या और कुपोषण से होने वाली बाल-मृत्यु से संबंधित महाराष्ट्र के माथे पर लगे इस कलंक को दूरे करने का प्रयास मैं हमेशा करता रहूंगा. इस तरह की घटना हमारे प्रगतिशील राज्य के लिए एक बड़ा कलंक हैं. महाराष्ट्र पर लगे इस धब्बे को हटाना हम सभी महाराष्ट्र वासियों का धर्म और कर्तव्य है.

सभापति महोदय, एक बात मैं हिन्दुस्तान में होने वाले राष्ट्रपति चुनाव के बारे में कहना चाहता हूं. हमारे यहां पर पिछले हफ्ते 19 जुलाई को राष्ट्रपति चुनाव के लिए मतदान हुआ था. एक बात मेरे मन में हमेशा उठती है और अपनी इस बात को मैं आपके सामने और माननीय मुख्यमंत्री महोदय के सामने यहां पर रखना चाहता हूं. मैं जानना चाहता हूं कि राष्ट्रपति चुनाव में विधान परिषद के माननीय सदस्यों को मत देने का अधिकार क्यों नहीं है ? जब राज्य सभा के माननीय सदस्यों को राष्ट्रपति चुनाव में मत देने का अधिकार है तो फिर राज्यों की विधान परिषद के माननीय सदस्यों को राष्ट्रपति चुनाव में अपना मत देने का अधिकार क्यों नहीं है, यह बात मेरी समझ में नहीं आती है. मुझे लगता है कि विधान परिषद के माननीय सदस्यों को भी राष्ट्रपति चुनाव में अपना मत देने का अधिकार होना चाहिए......

.....5



PFK/ पूर्वी श्री. भोगले....... 18:20

श्री एस. क्यू. ज़मा .....

सभापति महोदय, इस बारे में माननीय मुख्यमंत्री जी तथा आपके द्वारा कुछ विचार होना चाहिए तथा इस बात का पता लगाना चाहिए कि यह अधिकार विधान परिषद के माननीय सदस्यों को प्राप्त क्यों नहीं है. विधान परिषद के माननीय सदस्यों को यह अधिकार प्राप्त कराने के लिए यदि संसद द्वारा संविधान में कुछ संशोधन करना पड़े तो वह संशोधन कराने का प्रयास भी आपके द्वारा किए जाने की विनती मैं आपसे करता हूं.

अंतिम बात मैं यह कहना चाहता हूं कि एमएलसीज के जो चुनाव होते हैं, उस संबंध में मेरा कहना है कि विधान परिषद के जो माननीय सदस्य विधान सभा के द्वारा चुने जाते हैं, उन चुनावों के लिए गुप्त मतदान नहीं होना चाहिए. विधान परिषद के लिए जो चुनाव अभी हुए हैं, वे चुनाव बहुत ही क्लीन चुनाव हुए हैं तथा निर्विरोध चुनाव हुए हैं. निर्विरोध चुनाव कराने के लिए जिन-जिन लोगों ने प्रयत्न किया है, उन सभी को मैं धन्यवाद देता हूं. परन्तु जब ये चुनाव गुप्त मतदान के द्वारा होते हैं तो उस समय कभी-कभी कुछ व्यवहार अच्छे नहीं होते हैं. इसलिए मेरा विचार है कि यह मतदान गुप्त मतदान पद्धति से नहीं होना चाहिए. ये चुनाव हेंड रेजिंग सिस्टम से होने चाहिए.

सभापति महोदय, मैं आपके मार्फत सभागृह के सभी माननीय सदस्यों के प्रति इस बात के लिए आभार प्रकट करना चाहता हूं कि यहां पर 6 साल काम करते समय सभी माननीय सदस्यों का पूरा सहयोग मुझे मिला. इस महाराष्ट्र को आगे ले जाने के लिए, मराठी भाषा और महाराष्ट्र राज्य की अस्मिता के लिए, किसानों की उन्नति के लिए तथा हमारे यहां कुपोषण से होने वाली बाल-मृत्यु को रोकने के लिए मैं हमेशा लड़ता रहूंगा. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं पर समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

(इसके बाद श्री जुन्नेर...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मागच्या वेळेस या सभागृहात एकंदर 11 सन्माननीय सदस्य निवडून आले होते परंतु त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री. प्रितमकुमार शेगांवकर यांचे देहावसान झाल्यामुळे 10 सन्माननीय सदस्यांना आज आपल्याला निरोप द्यावयाचा आहे परंतु या 10 सन्माननीय सदस्यांमधून सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील व मला पुन्हा या सभागृहात काम करण्याची संधी मिळालेली आहे. मी गेल्या 20 वर्षापासून विधानसभा सदस्य म्हणून विधानसभेमध्ये काम केलेले आहे. त्यानंतर विधान परिषदेच्या बाय इलेक्शनमध्ये मला अविरोध निवडून येण्याची संधी मिळाली. त्यावेळी सर्व पक्षाने आपले उमेदवार मागे घेतल्यामुळे मी अविरोध निवडून आलो. काँग्रेस पक्षाच्या संघटनेची जबाबदारी सांभाळून जेवढा वेळ या सदनाला देता येईल तेवढा वेळ या सदनाच्या वेगवेगळया कामकाजाच्या निमित्ताने दिलेला आहे. माझ्या मागील 3 वर्षाच्या कालावधीत या सदनातील सन्माननीय सदस्यांनी कामकाजाच्या निमित्ताने मोलाची कामगिरी केलेली आहे.

यानंतर श्री. भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

आपल्या भाषणातून राज्यातील समस्या सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी राज्य सरकारला अनेक सूचना केल्या आहेत. आज आठ सन्माननीय सदस्यांचा निरोप समारंभ होत आहे. त्यांची वेगवेगळ्या विषयावरील सर्व भाषणे मी सदनामध्ये जवळून ऐकली आहेत. त्यांनी केलेल्या भाषणातून ते राज्याच्या निरनिराळ्या निर्णयामध्ये सहभागी झाले आहेत. राज्याच्या हिताचे अनेक प्रश्न त्यांनी येथे प्रखरतेने मांडले आहेत. त्या आठ सन्माननीय सदस्यांना आम्हाला निरोप द्यावा लागत आहे. या सन्माननीय सदस्यांचे कामकाज लक्षात घेता त्यांचे भवितव्य उज्ज्वल आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो. सर्वांनाच वेगवेगळ्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळत असते. सदनामध्ये देखील जेवढा वेळ मिळतो त्या वेळेत काम करण्याची संधी घेतली पाहिजे. सदनामध्ये मिळालेल्या संधीचे चीज केले पाहिजे. सदनामध्ये कामगिरी कशा प्रकारे पार पाडली याचे मूल्यमापन होत असते.

सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार म्हणजे चालते बोलते संतपीठ असे वर्णन येथे करण्यात आले. त्यांना सर्वच विषयाचे ज्ञान आहे. ते सदनामध्ये ज्यावेळी साहित्य किंवा राजकीय विषयाची मांडणी करतात त्यावेळी त्यांचे भाषण ऐकण्यास सर्वजण उत्सुक असतात. त्यांना मागच्या 50 वर्षाचा इतिहास विचारला तर तो देखील सांगण्यास ते तयार असतात. एवढा त्यांचा इतिहास मुखपाठ आहे. अशा रितीने वेगवेगळ्या प्रकारे त्यांनी आपल्या भाषणाची चुणूक सभागृहामध्ये दाखवून दिली आहे. कुठल्याही विषयावरील त्यांचे भाषण ऐकले पाहिजे असे मला वाटते. आज सदनामध्ये चांगल्या प्रकारे भाषण करणारे काही मोजकेच सदस्य असतील. त्यापैकी एक सदस्य श्री.उल्हासदादा पवार आहेत. त्यांचे भाषण सुरू झाल्यानंतर आपण ऐकले पाहिजे, नवीन काही तरी ऐकायला मिळेल अशा प्रकारची भावना सन्माननीय सदस्यांच्या मनात यायची. अशा प्रकारे त्याचे वक्तृत्व रहायचे. त्यांच्या भाषणातून सदनामध्ये कशा पद्धतीने बोलले पाहिजे याचे सतत मार्गदर्शन व्हायचे. अशा या सन्माननीय सदस्याला आज आपल्यामधून निरोप द्यावा लागत आहे. भविष्यामध्ये त्यांना चांगल्या प्रकारची जबाबदारी पार पाडायला संधी मिळेल, चांगले नेतृत्व करण्याची संधी मिळेल अशा प्रकारची अपेक्षा देखील मी व्यक्त करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा हे कामगार क्षेत्रातील काम करणारे, इंटकमध्ये काम करणारे नेतृत्व आहे. ते अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस होते. ज्यावेळी ते निवडून आले त्यावेळी श्री.एस.क्यू.जमा कुठले असे सर्वजण विचाराचे. गेल्या सहा वर्षातील मी त्यांची भाषणे ऐकली आहेत. त्यावरून त्यांना सर्व विषयाचे ज्ञान होते हे लक्षात येते. ते कोणत्याही विषयावर मांडणी करूनच बोलायचे. अनेक सन्माननीय सदस्य बिलावर बोलण्यासाठी अजून देखील कचरतात. आपण बिलावर काय बोलावे याचा विचार करतात. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा प्रत्येक बिलावर बोलले पाहिजे, आपले मत व्यक्त केले पाहिजे असे मानायचे. बिल पास करणे ही आपली जबाबदारी आहे असे समजून संपूर्ण कामकाज संपेपर्यंत बसून रहायचे. ते प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करायचे. प्रत्येक विचार कृतीमध्ये अंमलात आणणारे असे हे चांगले नेतृत्त्व विदर्भातून लाभले होते. त्यांना सुद्धा आज आपण निरोप देत आहोत.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे . . ..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे कोकणातील सिंधुदुर्ग भागातील आहेत. त्यांनी सिंधुदुर्ग मध्ये आपल्या कौशल्याने संघटनात्मक बांधणी केली असून त्यामध्ये खऱ्या अर्थाने त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे सदनामध्ये सुध्दा ते त्या भागातील प्रश्नांच्या बाबतीत मांडणी करावयाचे. अशा वेळी आपल्या भागातील समस्या सदनामध्ये मांडत असताना राज्यभरातील जे विषय असतील त्यामध्ये सुध्दा आपण सहभागी झाले पाहिजे, विविध विषयांची अत्यंत चांगल्या प्रकारे मांडणी केली पाहिजे अशा प्रकारचा विचार घेऊन आलेला एक कार्यकर्ता असून त्यांचे भविष्य निश्चितच उज्वल आहे. तसेच या सदनामध्ये देखील सातत्याने काम करणारे असे त्यांचे नेतृत्व आहे. अशा नेतृत्वाच्या प्रगतीला कधीही खंड पडू शकत नाही. आज आपल्याला त्यांना सुध्दा निरोप द्यावा लागत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांच्याबद्दल जेवढे बोलावे तेवढे कमी आहे. 1985 मध्ये मी आणि सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी सोबतच विधानसभेमध्ये आलो. त्यावेळी आम्ही सातत्याने विधानसभेमध्ये कार्यरत होतो. मी त्यांना आमदार म्हणून काम करताना पाहिलेले आहे तसेच नगरविकास विभागाचे मंत्री म्हणून काम करताना पाहिले, तसेच विरोधी पक्षनेता म्हणून त्यांचे वक्तव्यही मी ऐकलेले आहे. आम्ही एकाच टेबलावर बसत होतो. त्यानंतर विधान सभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांना काम करताना पाहिले आणि आज विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य म्हणून काम करतानाही पहात आहे.त्यांचे मृदू भाषी व्यक्तिमत्व आहे.मघाशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी उल्लेख केला आहे की, आदर्श सन्माननीय सदस्य कसा असावा तर सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांच्या सारखा असावा आणि हा उल्लेख अत्यंत योग्य आहे. मी अधिक काही सांगणार नाही कारण त्यांच्याविषयी बोलण्यासारखे बरेच आहे. परंतु जेवढे सांगावे तेवढे कमी आहे. पण नगरविकास विभागाचे मंत्री म्हणून काम करीत असताना तेथे श्री.अरुणभाई गुजराथी यांची खूर्ची असावयाची आणि कोणतेही सन्माननीय सदस्य आले तर त्यांच्यासाठीही तेवढ्याच ऊंचीची खूर्ची बाजूला तयार करुन ठेवली होती आणि त्या खूर्चीवर संबंधितांना बसवून "तुझे काम काय आहे" ते सांग असे ते म्हणत असत. अशा प्रकारे त्यांनी सन्माननीय सदस्यांचा सन्मान करण्याची प्रथा सुरु केली. अशा त्यांच्या अनेक गोष्टी सांगता येतील.

. . . .4 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

सभापती महोदय, ते विरोधी पक्षनेता तसेच विधानसभेचे अध्यक्ष होते तेव्हा त्यांच्या खानपाना पासूनचे सर्व बारीक-सारीक बारकावे मी पाहिले आहेत. येथे कपड्याच्या बाबतीत देखील उल्लेख झ ाला की, घरी विणलेली खादी आपल्याला घालावयाची आहे याची त्यांनी कुठेही वाच्यता केली नसेल. त्यांनी कधीही बडेजाव केला नाही. ज्यांना कोणाला महिती झाली असेल त्यांनी विचारल्यानंतर माहिती दिली असेल आणि मग ती आपल्यापर्यंत पोहोचली. त्यांचे व्यक्तिमत्व हे अत्यंत साधे आहे. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणी ही व्याख्या जर कोणाला लागू होत असेल तर ती सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांना लागू होते.त्यामुळे या सदनातील सन्माननीय सदस्यांना त्यांची रोज उणीव भासणार आहे. कदाचित ते राज्य सभेमध्ये जातील किंवा लोकसभेमध्ये जातील. मात्र काही जणांच्या बाबतीत आपल्याला असे वाटते की, या व्यक्तींनी सतत आपल्या सदनामध्ये असावे, त्यांच्याकडून सातत्याने काही ऐकावयास मिळावे, त्यांच्याकडून ज्ञान घ्यावे अशा प्रकारचे सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांचे नेतृत्व आहे आणि मला त्यांच्या बरोबर या सदनामध्ये तीनच वर्षे बसता आले. जर अधिक काळ त्यांच्या बरोबर काम करता आले असते तर मला अधिक आनंद झाला असता.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी काँग्रेस पक्षामध्ये सुध्दा बरेच वर्षे काम केले. तसेच त्यांनी काँग्रेसमध्ये, समाजवादी पक्षामध्ये काम केले. त्यांनी सामाजिक दृष्टीकोनातून अनेक भूमिका वठविल्या आहेत. परंतु 1992 ते 1999 पर्यंत प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सेक्रेटरी होत्या. त्यावेळी देखील त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने काम केले. तसेच विधान परिषदेमध्ये ॲड.उषाताई दराडे या महिलांचे प्रश्न कशा प्रकारे धडाडीने मांडत असत हे आपण सर्वांनीच पाहिले आहे.त्यावेळी ज्या तीव्रतेने त्या आपल्या भावना व्यक्त करावयाच्या ते पाहून सर्व सन्माननीय सदस्यांना असे वाटत असे की, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे या खऱ्या अर्थाने महिलांचे प्रश्न मांडत आहेत आणि त्यांचे सगळयांकडून कौतुक होत असे आणि समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य बाके वाजवावयाचे.

यानंतर श्री.बरवड . ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

पण महिलांचे नेतृत्व करण्याची संधी ज्यावेळी आपण देतो त्यावेळी महिलांचे प्रश्न अधिक गांभीर्याने आणि तेवढ्याच प्रभावीपणे मांडले गेले पाहिजेत याची आज खऱ्या अर्थाने या राज्याच्या आणि राज्यातील जनतेच्या दृष्टीने गरजेचे आहे. ती जबाबदारी सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी त्यांच्या कालावधीमध्ये पार पाडली. आज निरोप देण्याच्या प्रसंगी मी त्यांना शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी वेगवेगळ्या संदर्भात केला. परंतु सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या सदनामध्ये सर्वसामान्यांचा प्रतिनिधी अशी आपली प्रतिमा निर्माण केली. खऱ्या अर्थाने जो असा वर्ग राज्यात मोठ्या प्रमाणावर आहे, ज्यांचे प्रश्न खऱ्या अर्थाने मांडले जात नाहीत, ज्याच्या व्यथा तन्मयतेने, प्रभावीपणे मांडल्या जात नाही, त्या वर्गाच्या व्यथा पोटतिडिकीने मांडणारा सदस्य म्हणून जर कोणाकडे पाहिले जात असेल तर ते सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आहेत. त्या दृष्टीकोनातून एक चांगला संदस्य, दुर्बल वर्गाकरिता मागणी करणारा सदस्य, शेतकऱ्यांच्या संदर्भामध्ये जिव्हाळा असणारा सदस्य असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. राज्यभर त्यांनी आमच्या शासनाच्या विरोधात आवाज उठविला की, हे होत नाही, ते होत नाही पण त्यांच्याविषयी आमच्या मनामध्ये सन्मान आहे. संपूर्ण राज्य माझे आहे आणि या राज्यातील शेतकऱ्यांना, दुर्बल माणसांना न्याय देण्याचा प्रयत्न माझ्याकडून झाला पाहिजे ही भूमिका सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी या सभागृहात घेतली. त्यांना सुध्दा आज आपल्याला निरोप द्यावा लागत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांच्या सोबत या सभागृहात बसण्याचा योग आला. विदर्भातील धानाचा प्रश्न असो किंवा त्या भागातील इतर प्रश्न असतील, ते मांडण्याचे काम त्यांनी केले. विदर्भामध्ये अनेक समस्या आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी समस्या कमी नाहीत. विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न आहे, कुपोषणाचा प्रश्न आहे, नक्षलवादाचा प्रश्न आहे, अनेक विषयांनी घेरलेला तो परिसर आहे. पण लोकप्रतिनिधी या नात्याने सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी त्या भागातील प्रश्न प्रभावीपणे मांडण्याचे काम केले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विद्यार्थी सेनेपासून फार चांगले काम केले आहे. पक्ष कोणताही असो पण एक लोकप्रतिनिधी म्हणून जी जबाबदारी आपल्यावर आहे ती पार पाडत असताना, त्या पक्षामध्ये काम करीत असताना आपण कोणाकरिता भांडत आहोत, कोणत्या वर्गाकरिता भांडत आहोत, या राज्यातील सर्व जनता पुढे येण्याच्या दृष्टीकोनातून आपले काही योगदान आहे की नाही, या सामाजिक दृष्टीकोनातून आपले नेतृत्व कशा प्रकारे पुढे जात आहे, हा महत्वाचा भाग आहे. पदे सर्वजण उपभोगतात. पक्षामध्ये सर्वजण वेगवेगळ्या पदावर असतात. परंतु सर्वांची भावना एकच असते की, माझ्या राज्यातील, माझ्या परिसरातील जो गोरगरीब वर्ग आहे, जो दुर्बल वर्ग आहे, त्यांच्याकरिता मला जे काही करणे गरजेचे आहे ते मी करतो की नाही ? जर ते करीत असलो तर खऱ्या अर्थाने या ठिकाणी राज्यातील जनतेचे प्रतिनिधित्व करीत आहोत. तीच भूमिका घेऊन सर्व आठही सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये अत्यंत प्रभावीपणे काम केले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना निरोप देत असताना स्वाभाविकपणे इतक्या वर्षापासून आपल्याबरोबर काम करणारा आपला सोबतचा सहकारी काही दिवसानंतर आपल्याला या सदनामध्ये दिसणार नाही. ते मोठ्या पदावर जातील, त्यांना आणखी मोठी पदे मिळतील. सातत्याने काम करणारा कार्यकर्ता कधीही खाली राहू शकत नाही. जो सातत्याने काम करतो त्याला अमुकच पद पाहिजे असे मागण्याची गरज नसते. मी ज्या ठिकाणी काम करीत आहे त्या ठिकाणी प्रामाणिकपणे आणि सर्वांकरिता काम करीत आहे याबद्दल त्यांना मनापासून समाधान असले पाहिजे. ही भूमिका घेऊन ज्यावेळी काम करतो त्यावेळी मनामध्ये निश्चितपणे समाधान असते. तशा प्रकारचे काम करणारे नेतृत्व या सभागृहातून बाहेर जात आहे. भविष्यामध्ये त्यांच्याकडून चांगली कर्तबगारी घडेल याची मला पूर्ण टक्के खात्री आहे. पुढच्या काळामध्ये या सदनामध्ये काही दिवस ते असणार नाहीत त्याबद्दल आम्हाला दुःख सुध्दा होत आहे. त्यांना निरोप देत असताना मी सांगेन की, या सदनामधून जात असताना त्यांनी सदनातील सन्माननीय सदस्यांच्या आठवणी मनामध्ये सोबत न्याव्यात. ते निश्चितपणे या सदनामध्ये परत येऊ शकतात. आणखी चांगल्या पदावर सुध्दा जाऊ शकतात. भावी आयुष्यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो.

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आता उपस्थित नाहीत. पण मी त्यांचेही कौतुक करतो. केवळ पाच सदस्य असताना या सदनामध्ये आमदार म्हणून येण्याचा दोनदा जर कोणी पराक्रम केला असेल तर तो श्री. जयंत प्र. पाटील यांनी केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

त्यांच्या पक्षाचे चार सदस्य असताना दोन वेळा ते या सदनाचे सदस्य झालेले आहेत. हे सर्व आश्चर्यकारक आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी त्याचा अभ्यास केला पाहिजे असे मला वाटते. ज्येष्ठ सदनामध्ये निवडून येत असताना सभागृहात कशाप्रकारे सदस्य आले पाहिजेत व त्यावर कशा प्रकारे बंधन असले पाहिजे यासंबंधी संसदेमध्ये चर्चा झाली पाहिजे अशी तेथेही मागणी करण्यात आली आहे. भविष्यात या सदनाची गरिमा कमी होणार नाही. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालून तशा प्रकारची नियमावली तयार करावी. जेणे करुन या गोष्टीची कोणीही चर्चा करु शकणार नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे कौतुक करीन. यावेळी जर काँग्रेस पक्षाकडून चौथा उमेदवार निवडणुकीसाठी उभा राहिला असता तर काय झाले असते ते सगळ्यांना माहीत आहे. परंतु त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांनी या गोष्टीला चालना द्यावयाची नाही, खतपाणी घालावयाचे नाही, यादृष्टीकोनातून निर्णय घेतल्यामुळे यावेळी 11 सदस्य बिनविरोध निवडून आले. त्याबद्दल मी मनापासून आभार मानतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना ते पुन्हा निवडून आल्याबद्दल हार्दिक शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या महान सभागृहाचा सदस्य होईन असे मला कधीही वाटले नव्हते. माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद, परमेश्वराचे आशीर्वाद याच्या पाठीमागे आहेत असे मी मानतो. 2006 साली निवडणूक झाली त्यावेळी कॉंग्रेस पक्षाकडे 74 संख्याबळ होते. त्यावेळी पक्षाकडून 3 अधिकृत उमेदवारांची नावे जाहीर झाली होती. चौथी उमेदवारी मला मिळेल की नाही हे मला माहीत नव्हते परंतु माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेबांचा आग्रह पक्षाच्या नेतृत्वाने मान्य केला आणि त्या दिवशी आदरणीय प्रभाताई राव यांनी मला 12.30 वाजता फोन करुन पक्षाने तुला उमेदवारी दिली असून तू फॉर्म भर असे सांगितले होते. दुपारी 2.55 मिनिटांनी म्हणजे सर्वात शेवटी मी फॉर्म भरला होता आणि सर्वात जास्त मते सुध्दा मलाच मिळाली होती. मी चौथा उमेदवार असतानाही 29 मते मिळाली होती आणि तिसावे मत बाद झाले होते. आदरणीय श्रीमती सोनिया गांधी, आदरणीय श्री.राहुल गांधी, आदरणीय श्री.अहमद पटेल, आदरणीय श्रीमती मार्गारेट अल्वा, आदरणीय कै.श्रीमती प्रभा राव, आदरणीय श्री.नारायण राणे साहेब, आदरणीय श्री.विलासराव देशमुख, आदरणीय श्री.अशोक चव्हाण, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण या सर्वांना मी मनापासून धन्यवाद देतो.

मी या सभागृहात निवडून आल्यानंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवर चर्चा चालू होती. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेबांनी मला स्वत:च्या हातातील मुद्दे दिले आणि मला पहिल्याच दिवशी भाषण करण्यास प्रवृत्त केले. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. सभागृहात असे अनेक प्रसंग अनुभवले आहेत. सभागृहात पर्यटन या विषयावर चर्चा सुरु होती. या सदनाचे तत्कालीन सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनाही मला आजच्या प्रसंगी विसरता येणार नाही. मी पर्यटन या विषयावर 11 मिनिटे भाषण केल्यानंतर माननीय सभपतींनी वेळ संपत असल्याची घंटा वाजविली होती. पण त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि कै.गुरुनाथ कुलकर्णी या दोघांनी उभे राहून मी नवीन सदस्य असल्यामुळे मला बोलू देण्याचा आग्रह धरला होता. त्यामुळे मला माझे सर्व मुद्दे मांडता आले.

3...

श्री.राजन तेली....

सभापती महोदय, या सभागृहात एकदा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून फलोत्पादनावर चर्चा सुरु होती. काही सन्माननीय सदस्यांनी कोकणातील सर्व फळांबाबत आपले विचार व्यक्त केले होते. त्यावेळी सुध्दा सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत पाटील यांनी आणि अनेक सन्माननीय सदस्यांनी मला पाठिंबा दिला होता. त्यामुळे त्या लक्षवेधी सूचनेवर 45 मिनिटे प्रश्नोत्तरे झाली होती. पण त्यानंतर ती लक्षवेधी सूचना माननीय सभापतींनी राखून ठेवली होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

सभागृहाचे नेते आदरणीय श्री. अजितदादा पवार साहेबांनी हस्तक्षेप करुन सकारात्मक उत्तर दिले. हा देखील प्रसंग मला चांगला स्मरतो. आमच्या भागातील ठाकर समाजाला आदिवासीप्रमाणे सवलती मिळाव्यात, त्यांना आदिवासी म्हणून समजण्यात यावे यासाठी मी या सभागृहामध्ये सातत्याने विविध आयुधांच्या माध्यमातून मागणी करीत आलो. या विषयावरील लक्षवेधी सूचना दोन वेळा राखून ठेवावी लागली. त्यावेळी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी मला सहकार्य केले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर, मला सर्वच सन्माननीय सदस्यांची नावे घेता येणार नाही, परंतु सर्वांनी मला या सभागृहामध्ये फार मोलाचे सहकार्य केले. मी या ठिकाणी वैयक्तिकरित्या कोणावरही टीका केली नाही. परंतु एक खंत माझ्या मनामध्ये आहे. माझ्यावर 2002मध्ये खुनाचा आरोप झाला होता. डिस्ट्रिक्ट कोर्ट आणि हायकोर्टामध्ये खटला चालला. माझ्यावरील त्या आरोपाचे राजकारणही झाले. ती एक खंत माझ्या मनामध्ये आहे.

सभापती महोदय, मी माझ्या मामाच्या घरी लहानाचा मोठा झालो. माझे मामा हे समाजवादी विचारसरणीचे कार्यकर्ते होते. त्यामुळे नानासाहेब गोरे, एस.एम.जोशी, बॅ. नाथ पै, मधु दंडवते यासारखी थोर मंडळी माझ्या मामाच्या घरी येत होती. त्यांच्या सहवासाचे आणि त्यांच्या कपबशा उचलण्याचे भाग्य मला लाभले. मी विद्यार्थीदशेपासून सामाजिक चळवळीमध्ये काम करण्यास सुरुवात गेली. तेव्हापासून आतापर्यन्त 29 वर्षे मी सर्वसामान्य माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आलो आहे. मी शिवसेना पक्षामध्ये शाखा प्रमुख होतो, नंतर जिल्हा परिषदेचा अध्यक्ष झालो. त्यानंतर सन्माननीय मंत्री महोदय, श्री. नारायण राणे साहेबांच्या सहवासात आलो आणि सातत्याने त्यांच्या बरोबर राहिलो. मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. मी सर्वसामान्य कुटुंबातील, जेथे गाडी देखील जात नव्हती अशा भागातील एक कार्यकर्ता. माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला या पदापर्यन्त आणण्यामध्ये माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांचा मोठा वाटा आहे. म्हणून मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी यापुढे या सदनामध्ये चळवळीतील कार्यकर्ता येईल की नाही अशी चिंता व्यक्त केली. त्यांनी व्यक्त केलेली चिंता रास्त आहे. आजच्या बदलत जाणा-या राजकारणाचे चित्र पाहिले तर यापुढे चळवळीतील कार्यकर्ता या सभागृहामध्ये येईल की नाही हा संशोधनाचा विषय आहे. सभापती महोदय, जिल्ह्यामध्ये जी जी आंदोलने झाली त्यामध्ये माझा सातत्याने सक्रीय सहभाग राहिलेला आहे. सामाजिक चळवळीमध्ये, आंदोलनामध्ये भाग घेतल्यामुळे माझ्यावर अनेक केसेस झाल्या. परंतु वैयक्तिक कारणासाठी माझ्यावर कोणतीही केस दाखल झालेली नाही. सर्व सामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा मी सातत्याने प्रयत्न केला. गेली 20-25 वर्षे जिल्ह्याच्या राजकारणामध्ये माझा सातत्याने आणि प्रामाणिकपणे सहभाग राहिला. मी शिवसेना पक्षात असताना प्रामाणिकपणे काम केले आणि नंतर काँग्रेस पक्षात असतानाही प्रामाणिकपणे काम करीत आहे. मी आपला जास्त वेळ घेत नाही.

या सभागृहातून निवृत्त होताना मला जरुर वाईट वाटते. कारण या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे प्रेम मला लाभले. मी विशेष करुन आदरणीय सभापती महोदय श्री. शिवाजीराव देशमुख आणि  आदरणीय उप सभापती महोदय श्री. वसंतराव डावखरे यांना मनापासून धन्यवाद देतो. मी या सभागृहामध्ये कोकणाच्या संदर्भात मांडलेल्या सर्वच प्रश्नांना माननीय मंत्री महोदयांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी  न्याय दिला त्याबद्दल मी सर्व माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. अशाच प्रकारचे प्रेम, अशाच प्रकारचा जिव्हाळा, अशाच प्रकारचे सहकार्य मला या पुढेही त्यांच्याकडून लाभात राहील अशी अपेक्षा व्यक्त करतो. या निमित्ताने मी माझ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तमाम जनतेचे आभार मानतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनतेने माझ्यासारख्या एका सर्वसामान्य कार्यकर्त्याला येथे येण्याची संधी दिली, त्यांच्यामुळे मला येथे येण्याचे भाग्य लाभले. मला माझ्या आईवडिलांचे आशीर्वाद होते. त्याचप्रमाणे मी ज्यांच्याकडे लहानाचा मोठा झालो त्या मामा-मामींचेही आशीर्वाद मला होते. या सगळयांची मला आठवण येते. मी जेव्हा आमदार झालो त्यावेळी ज्यांच्याकडे मी लहानाचा मोठा झालो ते माझे मामा-मामी, माझे आईवडिल यापैकी कोणीही नव्हते.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली..

माझ्यावर सन 2002 मध्ये मर्डर केस लागली तेव्हा त्यांनी राजकारणाचा बराच शॉक घेतला होता. मी त्या खोलात जात नाही. मी या ठिकाणी सर्वांना धन्यवाद देतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्या सर्वांचे आभार मानून सभागृहाचा निरोप घेतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी सन्माननीय सदस्यांच्या निरोपाचा प्रस्ताव येथे मांडला. या निरोपाच्या प्रस्तावावर अनेक मान्यवर सन्माननीय सदस्यांनी आमच्या सर्वांबद्दल भावना व्यक्त केलेल्या आहेत. माझी अशी इच्छा होती की, निवृत्त होणाऱ्या सदस्यांपैकी फक्त श्री.अरुणभाई गुजराथी यांनी बोलावे. कारण खूप वेळ झालेला आहे म्हणून मी ती सूचना केली होती. परंतु निवृत्त होणारे प्रत्येक सन्माननीय सदस्य आपल्या भावना व्यक्त करीत आहेत व आपल्या आदेशावरुन मी भाषण करण्यास उभा आहे.

सभापती महोदय, आज माझ्या मनामध्ये संमिश्र भावना आहेत. या सदनाचा निरोप घेतो म्हणून नव्हे तर यामध्ये दोन गोष्टी आहेत. ज्या काळात महिला अशा आंदोलनात धैर्याने उतरत नव्हत्या त्या काळात कॅप्टन लक्ष्मी या नेताजींबरोबर खांद्याला खांदा लावून काम करीत होत्या. त्यांचे आज वयाच्या 94 वर्षी निधन झाले आहे. ही बातमी मी दूरदर्शनवर पाहिली. आम्ही काही स्वातंत्र्याची आंदोलने पाहिली नाहीत. परंतु माझे मामा स्वातंत्र्य सैनिक होते. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या सांगितलेल्या आठवणी आम्ही ऐकत होतो. स्वातंत्र्य चळवळीत काम केलेल्या अनेक मान्यवरांचा मला नंतरच्या काळात सहवास लाभला असल्यामुळे त्या सर्व गोष्टी आणि भावना अतिशय दाटून आल्या. कॅप्टन लक्ष्मींची प्रतिमा दूरदर्शनवर पाहत असताना त्यांनी त्या काळात केवढ्या धैर्याने नेताजींबरोबर काम केले ही एक भावना आहे.

सभापती महोदय, संसदीय लोकशाहीच्या सर्वोच्च पदावर अत्यंत प्रदीर्घ अनुभव असलेले विद्वान, प्रकांड पंडित, कायद्याचे अभ्यासक आणि ज्यांना संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे असे सन्माननीय श्री.प्रणव मुखर्जी हे राष्ट्रपतीसारख्या सर्वोच्च पदावर आज विराजमान होत आहेत त्याचा एक वेगळा आनंद मला या सर्व पार्श्वभूमीवर आहे. हे सदन म्हणजे संसदीय लोकशाहीचे एक मंदिर आहे. आपण सर्वांनी आमच्या बद्दल इतक्या भावना व्यक्त केलेल्या आहेत, इतकी स्तुतीसुमने उधळली आहेत, इतकी विशेषणे लावली आहेत की, त्यामुळे मला आमच्या शिक्षकांची आठवण झाली. बासुंदी चांगली झाली, खूप आवडली तरी एक वाटी, दोन वाटी खूप झाली ती फार खाल्ली की अजीर्ण होते असे मला शिक्षकांनी सांगितले होते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी माझ्याबद्दल ज्या भावना व्यक्त केल्या त्यावरुन मला प्रा.ग.प्र.प्रधान सरांची आठवण झाली. प्रा.ग.प्र.प्रधान सरांचा एके ठिकाणी सत्कार होता. त्यांच्या हस्ते एका पुस्तकाचे प्रकाशन होते. प्रधान त्या पात्रतेचे आणि उंचीचे होते. अतिशय स्वच्छ चारित्र्याचे नेते होते. त्यांच्या बद्दल खूप गौरवोद्‌गार काढले. सर जेव्हा भाषण करण्यास उठले तेव्हा ते अत्यंत नम्रपणे म्हणाले की, माझ्याबद्दल येथे एवढ्या भावना व्यक्त करण्यात आल्या. परंतु मी आपणास सांगू इच्छितो की, "मी तसा नाही आहे. पण मी तसा व्हावा अशी त्यांची इच्छा आहे." सरांनी जी इच्छा व्यक्त केली ती इच्छा मी येथे व्यक्त करीत आहे. आपण माझ्या बद्दल जे बोलला तसे व्हावे अशी आपल्या सर्वांची इच्छा आहे. मी तसा आहे किंवा नाही हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, संसदीय लोकशाहीच्या या सदनामध्ये मला भरपूर शिकायला मिळाले. माननीय बाळासाहेब भारदे यांनी एका पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "हे लोकशाहीचे पवित्र मंदिर आहे. या लोकशाहीच्या पवित्र मंदिरातील देवता जनता जर्नादन आहे."

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

आपण आमदार त्या जनता जनार्दनाचे साधक आणि उपासक आहोत. बाळासाहेब भारदे यांनी जे वर्णन केले आहे त्या भावनाने मी या ठिकाणी बसलो आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरु आहे.

सभापती महोदय, मी 25 वर्षापूर्वीची एक जुनी गोष्ट या सभागृहास सांगू इच्छितो. मला कोणतीही सभा ऐकण्याची सवय होती. निवडून आलेल्या आपल्या आमदारांचा सत्कार आणि सन्मान करीत असताना स्व.यशवंतराव चव्हाण जे म्हणाले होते ते मी स्वत: ऐकले आहे. मी कराडच्या शुक्रवार पेठेत रहात होतो. माझ्या घराभोवती मुस्लीम बांधव रहात होते. रमजानचा महिना सुरु झाला. सायंकाळी रोजा म्हणजे इफ्तार सोडायचा आणि पहाटे फेरी का टाईम म्हणजे पहाटे फकीर उठवायला यायचे. "जागो भाई जागो, रोजा खोलने का समय हो गया". काही लोक त्या फकिरास दान द्यायचे, काही लोक देत नसत, तो फकीर तसाच पुढे निघून जायचा. पहाटे तो फकीर म्हणत असे की, "जो देगा उसका की भला, जो नही देगा उसका भी भला". ही गोष्ट लोकप्रतिनिधींनी लक्षात ठेवली पाहिजे असे स्व.यशवंतराव चव्हाण त्यावेळी म्हणाले होते. लोकप्रतिनिधींचा सत्कार करताना स्व.यशवंतराव चव्हाण यांनी उदगार काढले होते. "आपण निवडणूक होईपर्यंत त्या पक्षाचे आहोत, नंतरही आहोत. परंतु निवडून आल्यानंतर मात्र आपल्याला ज्यांनी निवडून दिले त्या सर्वांचे आहोत. ज्यांनी आपल्याला मते दिली त्यांचेही आहोत, ज्यांनी आपल्याला मते दिली नाहीत त्यांचे देखील आहोत" असे त्यांनी त्या समारंभात सांगितले होते. त्यांनी त्या समारंभात अतिशय अप्रतिम विचार मांडले होते. मतभेद कसे व्यक्त करावेत, मतभेदांची लक्षणे काय आहेत, लोकशाहीमध्ये जिवंत मतभेद असले पाहिजे असेही त्यावेळी त्यांनी सांगितले होते. मी अनेक वेळेला सांगितले की, मतभेदाला मनभेदाचे रुप आणि मनभेदाला व्यक्तीभेदाचे रुप प्राप्त होता कामा नये.

सभापती महोदय, अलीकडच्या या वाटचालीमध्ये दोन्ही बाजूकडून काही प्रसंगी, काही मोजक्या लोकांकडून एकमेकांवर वार होतात की काय, शाब्दिक प्रहार होतात की काय असे वाटते. बाळासाहेब भारदे म्हणायचे की, "तोल न सोडता बोल कसा लावावा" याचा अभ्यास केला पाहिजे. या सभागृहाचे आपल्याला संरक्षण आहे. आरोप केल्यानंतर कोणाला आपल्याविरुध्द कोर्टात जाता येत नाही. तरी देखील या सभागृहाच्या वैचारिक संघर्षाची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

एक ऊंची मला उत्तमप्रकारे पहावयास व अनुभवावयास मिळाली. या सभागृहातील सर्व सदस्यांनी विचार करण्यासारखी एक गोष्ट अशी आहे की, संसदीय लोकशाही खिळखिळी करण्याचे काम आज काही शक्ती करीत आहेत. मला क्षमा करा. मी त्या गोष्टीचा काही मोठा विवेचक अथवा विश्लेषक नाही. परंतु या बाबतीत बाहय शक्ती खतपाणी घालत आहेत असे मला वाटते. खंडप्राय देशामध्ये अनेक धर्म, अनेक जाती, अनेक पंथ, अनेक भाषा, अनेक संस्कृती एकत्र नांदत असताना भारतीय लोकशाहीकडून सुदृढपणे जगाला मार्गदर्शन होत आहे हे काही लोकाना बघवत नाही. अशा बाह्य शक्ती येनकेन प्रकारे न संसदीय लोकशाहीला नख लावण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सभापती महोदय, आमच्या सारख्या कॉग्रेस सेवा दलाच्या सैनिकांवर महात्मा गांधी यांच्या विचारांचे संस्कार झालेले आहेत, दानव शिखरे, दादाभाई आपटे, बाळासाहेब भारदे, वि.स.पागे इत्यादी नामवंताकडून महात्मा गांधींच्या कथा ऐकता आल्या. महात्मा गांधीचे उपोषण कसे होते ते देखील पाहता आले. माननीय श्री. दिवाकर रावते साहेब, उपोषणाच्या बाबतीतील एक गंमत या ठिकाणी सांगणार आहे. माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे हे उत्तम वक्ते आणि उत्तम व्यंगचित्रकार आहेत. त्यांच्या मार्मिक साप्ताहिकाचा दिवाळी अंक आम्ही नेहमीच वाचत होतो. 22 वर्षापूर्वी त्यांनी मार्मिकच्या दिवाळी अंकामध्ये एक व्यंगचित्र काढले होते. व्यंगचित्र असे होते की, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक मंडप टाकण्यात आला होता आणि त्या मंडपाखाली दोन व्यक्ती उपोषणाला बसल्या होत्या. समोरुन एक लहान मुलगा आपल्या वडिलांसमवेत चालला होता आणि त्याने विचारले की, बाबा हे काय आहे? त्याच्या वडिलांनी सांगितले की, हे प्राणांतिक उपोषण आहे. मुलगा म्हणाला तुमचे म्हणणे बरोबर आहे, पण मंडप का घातला आहे? त्या संदर्भात वडिलांनी मुलास सांगितले की, प्राणांतिक उपोषण म्हणजे काहीच खायचे नाही. मुलाने पुन्हा विचारले की, मांडव कशासाठी? त्याच्या वडिलांनी सांगितले की, एवढे कडक उपोषण केले आहे की, ऊन देखील खायचे नाही. 22 वर्षापूर्वी माननीय शिवसेना प्रमुखांनी काढलेले ते व्यंगचित्र होते. आताची उपोषणे अतिशय वैभवशाली होत आहेत, मला माफ करा. मी कोणाची टिंगल करु इच्छित नाही. संसदीय लोकशाहीचे विचारमंथन या सभागृहात होते. 22 वर्षापूर्वी माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांना कसे काय कळले असेल की, भविष्यात वैभवशाली उपोषणे होणार आहेत. तेथे बसून भाषण करणाऱ्या ज्या व्यक्ती असतात, त्यांनी दंड भरलेला आहे.....

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

हा गंमतीचा भाग आहे. त्याठिकाणी मांडवामध्ये दारुच्या नशेमध्ये एखादा अभिनेता येतो आणि निवडून आलेल्या माणसांना चोर,डाकू असे म्हणतो तेव्हा माझ्या मनात कालवा-कालव होते आणि वाटते की संसदीय लोकशाहीमध्ये आज हे काय चालले आहे. सभापती महोदय, प्रशासकीय सेवेतील एक अधिकारी ज्यांनी त्याच्या चुकामुळे 9.5 लाख रुपये दंड भरलेला आहे तो अधिकारी येऊन सांगतो की हे बरोबर नाही. प्रवणदा निवडून आलेले आहे त्यांच्या निवडणुकीला आम्ही चॅलेंज करणार हे एक प्रशासकीय अधिकारी सांगत आहे. नांव घेण्याची आवश्यकता नाही. पोलीस सेवेतील एक उच्च अधिकारी महिला जिने आपल्या मुलाला एमबीबीएसची ॲडमिशन मिळण्याकरिता एका आदिवासी मुलीची जागा हिसकावून घेतली होती. त्यासाठी मणिपूरमध्ये आंदोलन झाले होते.ती महिला त्याठिकाणी तिरंगा नाचवून दाखवते हे पाहून वाईट वाटते. या सगळया संसदीय लोकशाहीचे जे चार खांब आहेत त्याचे विचारमंथन सर्वांनी करणे आवश्यक आहे. मी कुणालाही बोल लावत नाही. कोणी व्यक्ती डोळयासमोर नाही. या सगळया गोष्टीचे साधक-बाधक चिंतन व्हावे असे वाटते. इतक्या शब्दांचा छल चालतो. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतानाची गोष्ट सांगतो. आजकाल डावे-उजवे,प्रतिगामी-पुरोगामी असे शब्द वापरले जातात. डान्सबार बंदीच्या वेळी मी सहज गृहमंत्र्यांशी बोललो आणि म्हटले की कोण कुणाची बाजू घेत आहे ते कळतच नाही. प्रतिगामी-पुरोगामी म्हणत आहेत. काय समजत नाही. बाळासाहेब भारदे अंथरुणावर पडले होते आणि मला म्हणाले अरे तुला काही कळत नाही. प्रतिगामी-पुरोगामी नाही तर सगळे बेलगामी झाले आहेत. शब्दांचा खल करण्यापेक्षा बोललेले बरे.

वसंतराव नाईक यांची जन्मशताब्दी साजरी होत आहे. ते मुख्यमंत्री असताना पत्रकार परिषद चालू होती आणि मी युवक काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून त्यांच्या शेजारीच बसलो होतो. एका इंग्रजी दैनिकाच्या पत्रकाराने विचारले की, Mr. Naik, would you be right or left? वसंतराव नाईक यांनी एका क्षणात उत्तर दिले की, I shall not be right or left, I shall be correct. आता करेक्ट हे कुणी पाहते काय अशी अवस्था आहे. सदनामध्ये आणि सदनाच्या बाहेर काम करीत असताना प्रचंड अशा थोरांचा-मोठयांचा सहवास आणि सत्संग मला लाभला. माझ्या आई-वडिलांचे संस्कार माझ्यावर चांगल्या प्रकारे झाले. माझे मामा स्वातंत्र्यसैनिक होते.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार....

ही सर्व देशभक्ती आणि सामाजिक भान पाहिल्यावर मला असे वाटते की, आमच्या भागवत संप्रदायाने जाती विसरल्या, गांधीजींनी जाती मोडून टाकायला सांगितल्या, चक्रधर स्वामींपासून, महानुभाव पंथापर्यंत आणि डॉ. बाबासाहेबांनी जातीअंत सांगितला. मला असे वाटते की, बाबासाहेबांच्या जातीअंतापासून आपण निघालो आणि आता जातपडताळणी झालीच पाहिजे येथपर्यंत आलो आहोत. आपण नेमके कुठे गेलो हेच समजत नाही. माझ्या मनात फार गोंधळ आहे.त्यामुळे आपल्या सारख्यांकडून मला सदनात आणि सदनाच्या बाहेर मागदर्शन व्हावे असे मला वाटते. असे आत्मचिंतन करावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय सभापतींचा आशिर्वाद आम्हांला लाभलेला आहे. आपण सर्वात ज्येष्ठ आहात. इतक्या थोरा-मोठयाचा सहवास मला लाभला आहे. इतक्या सत्संगातून तात्विक सांप्रदायाच्या माध्यमातून विचारमंथनातून एक गोष्ट माझ्या लक्षात आलेली आहे. मिर्झा गालीबचा शेर मला आठवला आणि तो मी नेहमी लक्षात ठेवला आहे. एखाद्याला विरोध करायचा असेल तरी बाळासाहेब भारदे असे म्हणत असत फार जोरात बोलू नका, माझा नम्र दावा आहे असे ते म्हणत असत. ही त्यांची सांगण्याची पध्दत होती. जेव्हा एखादा प्रश्न फार किचकट येईल आणि उत्तर सुचत नसेल तेव्हा ते एकच वाक्य वापरायचे. This question dosent not arise. प्रश्न उद्‌भवत नाही. हे सर्व करीत असताना आपण दुसऱ्याकडे बोट दाखवतो तेव्हा काय लक्षात घेतले पाहिजे हे मिर्झा गालीबचा एक शेर मी सांगणार आहे. मिझा गालीब म्हणतो " जिंदगीभर गालीब यूँ ही गलती करता रहा, धूल चेहरे पे थी, आईना साफ करता रहा.".

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.........

समाजामध्ये राजकारणात वावरत असताना संदर्भ ठेवले आहेत ते इतरांना देत जावेत. त्या दृष्टीने जीवनाची वाटचाल या सगळ्या विचारांप्रमाणे करीत रहावी. आपण सर्व मंडळींनी माझ्याबद्दल खूप चांगले विचार या ठिकाणी मांडले. माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, कपिल पाटील, हेमंत टकले, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले हे प्रा.शिवाजीराव भोसले यांची आठवण यावी इतक्या सुंदरतेने बोलत होते. ज्यांनी ज्यांनी आमच्याबद्दल चांगले विचार मांडले तसे होण्याचा मी प्रयत्न करेन. त्याबद्दल आपल्या सर्वांचे मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

.....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, निरोप समारंभाच्या या कार्यक्रमात माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जे आज निवृत्त होत आहेत त्यांची निवृत्तीची प्रवृत्ती नाही. त्यांचे कार्यस्थळ बदलले असेल, कार्य बदलले असेल, कामाचे स्वरुप बदलले असेल, पण ज्याने सार्वजनिक जीवनात काम केले तो माणूस निवृत्त होऊ शकत नाही. डॉक्टर असेल तर रुग्णाशी संबंध येतो. वकील असेल तर अशिलाशी संबंध येतो. सनदी लेखापाल असेल तर इन्कम टॅक्स पेयरशी संबंध येतो. परंतु सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या माणसाचा सर्वसामान्यांशी संबंध येतो. त्यामुळे त्याच्या जीवनातील जो आनंद आहे तो कोणाच्याच जीवनात नाही. अशा प्रकारे आपण सर्वजण आनंद लुटणारे आहोत.

सभापती महोदय, मी विधानसभेचा अध्यक्ष होण्यापूर्वी विधानसभेचा सदस्य होतो. मला राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून लंडनला जायची आणि तेथे भाषण करण्याची संधी मिळाली. चर्चेचा विषय होता The need for Second Chamber. वरिष्ठ सभागृह असण्याची गरज आहे का? माझा वरिष्ठ सभागृहाशी तोपर्यंत काहीही संबंध आलेला नव्हता. पण मुख्यमंत्री महोदय, माझे भाषण खूप गाजले. ती थिअरी होती. या सभागृहातील सहा वर्षाच्या काळात मी प्रॅक्टिकल शिकलो. वरिष्ठ सभागृह का असले पाहिजे हे मला स्पष्टपणे कळले. मला माझ्या मित्रांनी प्रश्न विचारला की, विधानसभेचे अध्यक्षपद भूषविल्यानंतर देखील तुम्ही विधानपरिषदेत येऊन बसता, सहा-सहा तास सातत्याने सभागृहात बसता, तुम्हाला काय शिकायला मिळते? त्यांना मी एक दाखला दिला. लंडनला एके दिवशी सिटी बसेस विलंबाने धावत होत्या. दोन व्यक्ती बस स्थानकावर बसची वाट पहात उभ्या होत्या. त्यातील एक तरुण व्यक्तिमत्व अत्यंत देखणे, कोणीही पाहिल्यानंतर आकर्षित होईल असे होते. दुसरी व्यक्ती वयस्कर, डोक्यावर ऊंच काळी टोपी घातलेली होती. त्या वयस्कर माणसाने तरुणाला प्रश्न विचारला की, Who are you? त्या तरुणाने उत्तर दिले, I am a Master of Science. मी गोल्ड मेडलिस्ट आहे. 10 मिनिटांनंतर त्या तरुणाने त्या वयस्कर माणसाला प्रश्न विचारला, Who are you? तो जगातील एक मोठा शास्त्रज्ञ होता. तो वयस्कर शास्त्रज्ञ म्हणतो, I am a student of Science आणि तरुण म्हणतो I am a Master of Science. Everybody of us is a student of Democracy.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

सभापती महोदय, या सभागृहात आल्यानंतर देखील मला बरेच काही शिकायला मिळाले. पक्ष अनेक पण परिवार एक अशा पध्दतीचे वातावरण गेल्या सहा वर्षात मी या सभागृहात पाहिले. पक्ष अभिनिवेश असणे हे लोकशाहीमध्ये गरजेचे आहे. प्रत्येकाचे विचार वेगळे असणे याची देखील गरज आहे. सर्वजण एकाच पध्दतीने विचार करायला लागले तर या सभागृहाची गरज भासणार नाही. वेगवेगळे विचार असतात त्याला आपण अनेकांतवाद म्हणतो.

सभापती महोदय, मी माझ्या स्थानावरुन माझा हात आपल्यासमोर धरला आणि आपण मला विचारले की माझा आंगठा कोणत्या दिशेला आहे? तर मी सांगेन डावीकडे. हाच प्रश्न मी आपल्याला विचारला तर आपल्याकडून उत्तर येईल उजवीकडे. We both are right and that is a democracy. सत्ताधारी पक्षाचे विचार जितके महत्वाचे आहेत, तितकेच विरोधी पक्षाचे विचार देखील महत्वाचे असतात.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले....... 19:15

श्री. अरुण गुजराथी .......

सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा आपण सांगितले की माझ्या संमिश्र भावना आहेत. पण मी सांगतो की माझ्याही संमिश्र भावना आहेत व या वेगवेगळ्या संमिश्र भावना आहेत. चार प्रवासी वाळवंटाच्या प्रवासाला निघाले होते. खजुराच्या झाडाखाली ते रात्री झोपले होते. तेवढ्यात आकाशवाणी झाली की, आपल्या मुठीत मावेल तितकी वाळू मुठीत धरा आणि सकाळी सुर्योदयाला मूठ उघडा. त्याप्रमाणे त्यांनी मुठीत वाळू घेतली आणि सुर्योदयाला मूठ उघडली तर त्यांना मुठीत सोने मिळाले. सोने मिळाले म्हणून आनंद झाला पण मुठीत कमी मावले याचे दु:ख झाले. त्याप्रमाणे मी 26 वर्षे विधान भवनात होतो. या काळात अनेकांचे अनेक प्रश्न वेगवेगळ्या माध्यमातून सोडविण्याचे प्रयत्न झाले, काहींचे प्रश्न सोडविले त्याचा आनंद आहे पण सर्वांचे सर्व प्रश्न सोडवू शकलो नाही त्यांची व्यथा, त्यांचे दु:ख मला आहे. मंत्री पदावर होतो, विधानसभेचा अध्यक्ष होतो, पक्षाचा अध्यक्ष होतो पण कुठे तरी मला भीती वाटते. तसेच सन्माननीय सदस्य श्री. उल्हास दादांनी उच्चारल्याप्रमाणे लोकशाहीत कामाच्या पध्दतीत बदल झाला पाहिजे. जर विधानसभा आणि विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना असे वाटू लागले की प्रश्न विचारल्यानंतर उत्तरे मिळतात पण प्रश्न सुटत नाहीत. "एक सवाल आप पुछिए, एक सवाल हम पुछेंगे, लेकिन सवाल का जबाब ही एक सवाल है", अशा प्रकारे जी उत्तरे दिली जातात तीच एक प्रश्न निर्माण करुन जातात. म्हणून ही लोकशाही अधिक संपन्न करण्याच्या संदर्भात कुठे तरी विचार करावा लागेल. मी याबाबत एक विचार मांडणार आहे. तो म्हणजे देशातील फक्त पाचच राज्यांमध्ये विधान परिषद सभागृहे आहेत. काही वेळा असे म्हटले जाते की, विधान परिषद सभागृहाची काहीच गरज नाही. विशेष म्हणजे विधानसभेत देखील काही वेळा असा विचार मांडला जातो. पण विधान परिषदेची गरज आहे कारण विधानसभा ही कपातील चहा आहे तर विधान परिषद ही बशीतील चहा आहे. विधानसभेत गरमागरम चर्चा होते तर या सभागृहात विचार करुन शांतपणे चर्चा होत असते, म्हणूनच विधान परिषदेची आत्यंतिक गरज आहे. याच माध्यमातून राज्याला आणि शासनाला दिशा देण्याचा प्रयत्न सभागृहाने केला पाहिजे.

महोदय, या सभागृहात अनेक प्रश्न मांडले जातात. कधी अर्थसंकल्पावर चर्चा होते तर कधी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होत असते, कधी विधेयकावर चर्चा होते आणि त्या चर्चेच्या

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

माध्यमातून सामाजिक न्याय हा एक गाभा आहे. त्याला आपण सामाजिक न्याय देऊ शकलो नाही तर एकाने असे म्हटले आहे की, This democracy is not best. However, it is better than the rest. ही सर्वोत्तम अशी पध्दत आहे अशातला भाग नाही. परंतु इतर कुठल्याही शासकीय पध्दतीपेक्षा मग ती राजेशाही पध्दती असेल किंवा बादशाही पध्दती असेल त्यापेक्षा ही लोकशाही चांगली आहे म्हणूनच आपणा सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. ज्या पध्दतीने काम केले आहे, सार्वजनिक जीवनात काम केले त्यामुळे अधिक अपेक्षा वाढल्या आणि त्या पूर्ण करण्यासाठी हे इलेक्ट्रॉल कॉलेज तर लहान आहेच पण लोकसभा व विधानसभेच्या लोकांनाही हाच प्रश्न पडतो म्हणून यादृष्टीने विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. पण इतरांना आम्ही म्हणतो समुद्रामध्ये बर्फाचा प्रवास सुरु असतो तो सरफेसवर 1/8 दिसतो तर 7/8 खाली असतो. लोक प्रतिनिधींचे प्रयत्न सर्व सामान्य माणसांना कळत नाहीत, त्याला फक्त वर दिसते की कुठेही प्रयत्न केल्यानंतर काम होऊ शकते यासंदर्भात हे जे म्हणणे आहे ते अत्यंत महत्वाचे आहे.

मिर्झा गालिब फार हुशार होते. त्यांचा एक दुसरा शेर मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ते म्हणतात "तू इस जमानें मे वफा की तलाश न कर, वह दिन जब थे, तब मकान कच्चे थे और आदमी सच्चे थे" म्हणून कुठे तरी लक्ष्मण रेषेची गरज आहे. आज राजकारणी माणसांबद्दल चांगले बोलले जात नाही याचाही विचार आपण वेगळेपणाने केला पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी........

माझ्यासकट सर्वांनी केला पाहिजे. The longest journey is the journey within. अंतराळाच्या प्रवासापेक्षा अंतःकरणाचा प्रवास हा मोठा असतो. या माध्यमातून राजकारणी माणसाची, लोकप्रतिनिधींची, लोकशाहीची प्रतिमा कशी सुधारणार याबाबत विचार करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मला सहा वर्षे विधान परिषदेचे काम करण्याची संधी मिळाली, येथे बसण्याची संधी मिळाल्यामुळे मला अत्यानंद होत आहे. माझे नेते आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांनी मला येथपर्यंत आणलेले आहे. माझ्या गावाला नॅशनल हायवे नाही, स्टेट हायवे नाही, मेजर डिस्ट्रीक्ट रोड नाही तर माझे शहर फक्त अदर डिस्ट्रीक्ट रोडने जोडलेले आहे. आता माझे शहर वाढावयास लागले असून माझ्या गावात कदाचित नॅशनल हायवे येण्याची शक्यता आहे. कोपऱ्यातील गावातील, लहानशा कुटुंबातील, छोटयाशा माणसाला माझ्या नेत्यांनी मोठे केले असून त्यांच्याबद्दलचा आदर या प्रसंगी व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रत्येकाने प्रत्येक पक्षाच्या नेत्यांचा आदर ठेवला पाहिजे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आपण सर्वांना सांभाळून काम करीत असतात. मी आपल्याला कधीही रागावलेले पाहिलेले नाही. मी गेल्या सहा वर्षात तरी आपल्याला रागावल्याचे पाहिलेले नाही. न रागावता प्रश्न सोडवायचे असतील तर माननीय शिवाजीराव देशमुख साहेबांकडे जा, सभापती साहेबांकडे जाऊन आपले प्रश्न सोडवून घ्यावेत असे मला सांगावेसे वाटते. आपण आम्हाला फार चांगली वागणूक दिली आहे.

सभापती महोदय, माननीय उप सभापती साहेब या ठिकाणी बसलेले आहेत. ते कधी मधुर, कधी चतुर, कधी कठीण तर कधी कठोर असतात. आपल्या बद्दलचे प्रेम सर्वांना कायम राहील. प्रेमाने कसे जिंकावे हे माननीय वसंतरावांकडून शिकावे. प्रेम म्हणजे, प्रेम असते आणि त्याला लव्ह म्हटले तरी सेम असते.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांबद्दलही मी आदराची भावना व्यक्त करतो.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी........

माननीय उप मुख्यमंत्री, या सभागृहाचे नेते आदरणीय श्री. अजित पवार यांचेही मी आभार मानतो. ते काही कारणानिमित्त या सभागृहात उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या बद्दलची आदराची, कृतज्ञतेची भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, संसदीय कामकाज मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील साहेबांना या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी फारसा त्रास दिलेला नाही. पाच सहा वर्षात, दोन चार वेळा ते येथे आले असतील. तुमच्यामध्ये काय कला आहे हे मला माहिती नाही. तुम्ही चिमटा घेता परंतु रक्त निघणार नाही याचीही काळजी घेता.

सभापती महोदय, सर्व सन्माननीय मंत्री गण, पीठासीन अधिकारी, विरोधी पक्ष नेते आदरणीय श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाऊसाहेब फुंडकर, दिवाकरजी रावते, हेमंत टकले तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचे मी या प्रसंगी आभार मानतो.

सभापती महोदय, माझा मुद्दा तुम्ही चोरला की, काय असे मला वाटावयास लागले होते. ज्यावेळेस निवृत्तीची भाषणे होतात त्यामध्ये खर किती आणि खोट किती हे हंसनीर न्यायाने तपासून घेतले पाहिजे. खरे म्हणजे What I am not but what I ought to be. मी कसा आहे यापेक्षा मी कसा असलो पाहिजे याचे हे वर्णन असते. परंतु आपण जे प्रेम दिले जी आत्मीयता आम्हाला दिली, जी आस्था आपण आम्हाला दिली, जी माया आम्हाला दिली तसेच शब्दांच्या माध्यमातून पुढच्या जीवनामध्ये नवीन प्रेरणा, नवीन चेतना, नवीन उत्साह वाढेल अशा पध्दतीची भाषणे आपण सर्वांनी केली त्याबद्दल मी कृतज्ञतेची भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, काही लोक मला म्हणायला लागले की, तुम्ही सम दुःखी आहात काय ? त्यावेळी मी त्यांना सांगितले की, समदुःखी नसून सम विचारी आहे. खरे म्हणजे कोणीही पर्मनंट नसते. लोकप्रतिनिधींसाठी पर्मनंट हा शब्दच नाही. एक टेम्पररी आदमी पर्मनंट आदमी को डाटता है असे एक वाक्य आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्या बरोबर मला येथे बसण्याची संधी मिळाली. उल्हासदादा आपण संत विचाराचे आहात मी संथ विचाराचा आहे. तुमच्या माझ्यात फार फरक आहे अशातला भाग नाही. परंतु वेगवेगळे विचार असले पाहिजेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी........

सन्माननीय सदस्य राजन तेली, माझ्या भगिनी उषाताई दराडे. मी ज्यावेळेस राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष होतो तेव्हा उषाताई महिला अध्यक्ष होत्या. मला उषाताई दराडे यांची फार मदत झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा साहेबांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला आता फार वेळ मिळणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेब इतके पक्के आहेत की, ते माझ्याही मतदार संघात फिरतात. मी त्यांना सांगितले की, "तू कोठेही फिर परंतु माझ्या भागात फिरू नकोस, मला डिस्टर्ब करु नकोस."

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरूण गुजराथी...

तेव्हा ते म्हणाले की, मी कोणाला हात लावत नाही. मी फक्त शेतकऱ्यांची मागणी मांडतो. या वर्षी केंद्र सरकारने 25 टक्क्याने स्कीम वाढवून दिली आहे. ते फार उत्तम झाले. आज राज्यात कठीण परिस्थिती आहे. आज राज्यात आणि देशात पाऊस नाही. अमेरिकेत आणि चायनामध्ये देखील दुष्काळ आहे. या सर्व परिस्थितीला लोकप्रतिनिधींना तोंड द्यावे लागणार आहे.

माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. त्यांनी तीन शब्दांची व्याख्या आम्हाला करून द्यावी. एक टंचाई म्हणजे काय, दोन दुष्काळ सदृश्य परिस्थिती म्हणजे काय आणि तीन दुष्काळ म्हणजे काय ? या शब्दांची व्याख्या आपण केली तर महाराष्ट्रातील जनता आपल्याला खूप खूप आशीर्वाद देईल, दुवा देईल. कारण अशा शब्दांवरूनच प्रश्न सुटत नाही. आज टंचाई परिस्थिती आहे, दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे असे शासनातर्फे सांगितले जाते. सरकार कोणाचेही असले तरी त्याच पद्धतीने विचार करावा लागतो. शेवटी तिजोरीही महत्त्वाची आहे आणि पैसेही महत्त्वाचे आहेत. एकाने फार चांगल्या शब्दात सांगितले आहे की, ए पैसा तू खुदा तो नहीं. लेकिन खुदा की कसम तू खुदा से कम नहीं शेवटी पैसा सांभाळणे देखील फार महत्त्वाचे आहे. आपण सर्वांनी आम्हाला सांभाळले.

आता सन्माननीय सदस्य ॲड्.प्रीतमकुमारजी शेगावकर आपल्यात नाहीत. विद्यमान सदस्यांपैकी दोन सन्माननीय सदस्य निवडून आले आहेत. त्यांचे देखील अभिनंदन केले पाहिजे. मी व सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी किती तरी वर्षे सातत्याने काम केले आहे. आपल्या दोघांची जोडी काय होती ? आपण काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष होता. मी राष्ट्रवादी पक्षाचा प्रदेशाध्यक्ष होतो. तेथे आम्ही दोघे सोबत फिरलो. आमच्या वेळी वातावरण फारच चांगले होते. आपण विचारावे श्री.माणिकरावांना. तसे वातावरण पुन्हा व्हावे अशी आपणास देखील विनंती करतो. आपणा सर्वांचे खूप खूप आभार. आपणा सर्वांची कृतज्ञता... शब्दांपेक्षा... ॲक्शनला जास्त महत्व असल्यामुळे... कृतज्ञता दोन्ही हात जोडून व्यक्त करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

...............



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, निरोप देण्यासाठी सर्वांनी येथे भाषणे केली आहेत. मी आपणा सर्वांचा निरोप घेण्यासाठी उभी आहे. त्यामुळे मनामध्ये तशी गोंधळाची परिस्थिती आहे. येथे बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी आरशाचा उल्लेख केला आहे. मला देखील आरशावरील चार ओळी आठवल्या.

आरशात मी, आरशा पुढे
झाले गेले विसरावयाचे
घर वाळूचे बांधायाचे
स्वप्न नव्हे हे दिवाण्याचे

महिलांच्या जीवनामध्ये सर्व घरे वाळूची बांधायची अशा प्रकारचा आदेश देणाऱ्या माझ्या संस्कृती मध्ये या पुरूष प्रधान संस्कृती मध्ये या ठिकाणा पर्यंत मी येऊ शकेन याचे स्वप्न मी खरेच पाहिले नव्हते. मी एक दिवस या विधान परिषदेची सदस्य होईल असे मला वाटलेच नव्हते. हे उच्च सभागृह आहे. आताच सन्माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार आणि अरूणभाई गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे हे सभागृह लोकशाहीची गरिमा जपणारे आहे. कायदे करणारे मंडळ आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील प्रश्न सोडविणारे मंडळ आहे. या मंडळामध्ये येऊन मला चार शब्द कधी बोलायला मिळतील याच विचार कधी मी केला नव्हता. आमदार होण्याची इच्छा होती. चौसाळा मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवावी अशी इच्छा मनात असतानाही शेवटी चौसाळा मतदार संघच राहिला नाही. त्यामुळे ते स्वप्न पूर्ण झाले नाही. तो मतदार संघ आरक्षित झाला. पण मला या विधान परिषदेत येण्याची संधी मिळाली. मागे वळून बघत असताना मनामध्ये खूप गोंधळ उडतो.

माझिया मना जरा थांबना
पाऊली तुझ्या माझिया खुणा
तुझे धावणे अन मला वेदना
एकटी न मी सोबतीस तू
चिंरजीव आहे तुझी वेदना
माझिया मना जरा थांबना

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

सर्व महिलांना स्वत:शीच बोलण्याची सवय असते. मला 12 तारखेलाच समजले की, मी आमदार पदी राहणार नाही. सभापती महोदय, त्या दिवसांपासून मी आज पर्यंत स्वत:शीच बोलण्याचा प्रयत्न करीत आहे.

माझे वडील अडीच वर्षाचे असताना माझे आजोबा वारले. माझ्या आजीने त्यांना खुरपून मोठे केले. ते तिसरीला नापास झाले. पुढे चार आणे महिन्यावर गुरे राखण्यास सुरूवात केली. जरा मोठे झाल्यानंतर त्यांनी तमाशामध्ये ढोलकी वाजविण्यास सुरूवात केली. त्यानंतर श्री भगवान बाबा गावात आले. त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन त्यांच्या कीर्तनामध्ये, प्रवचनामध्ये मृदुंग वाजवायला लागले. त्याच काळामध्ये मराठवाडामध्ये हैद्राबाद मुक्तीसंग्राम सुरू झाला होता.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे. . . .

कॉम्रेड काशीनाथराव मुकादम यांनी गावागावामध्ये फिरुन तरुण मुले जमा करण्यास सुरुवात केली आणि त्यांना दगडू नावाचा तरुण भेटला. लेकरे मरत होती आणि 11 मुलांपैकी आमचे वडील वाचले म्हणून त्यांचे नाव दगडू ठेवले. तेथे धोंड्या, कोंड्या, दगड्या अशीच नावे असणार. दुसरी कोणती नावे असणार आहेत ? श्री.काशीनाथराव मुकादम हे कॉम्रेड होते आणि कम्युनिस्ट पक्षाच्या विचारसरणीचे होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सशस्त्र तुकडीमध्ये ज्या 11 लोकांनी काम केले, त्या मध्ये माझे वडील होते. हैद्राबाद मुक्ती संग्राम संपला आणि आता काय करावयाचे असा प्रश्न समोर आला. माझे वडील आणि मी कधीही नियोजनबध्द पध्दतीने अजिबात जगलो नाही. जे घडत होते त्याला स्विकारत गेलो आणि जगत राहिलो आणि त्या जगण्याचा आनंद घेत राहिलो. त्यावेळेला गावा-गावामध्ये दवंड्या झाल्या आणि वडील पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. त्याचा परिणाम असा की,कॉम्रेड काशिनाथराव मुकादम यांच्या विचारांची शिदोरी माझ्या वडिलांकडे होती आणि कॉन्स्टेबलची नोकरी करीत असल्याने शाळेमध्ये घालण्यासाठी त्यांना 10 रुपये मिळत होते. म्हणून मी याठिकाणी येऊ शकले नाहीतर मी देखील कोणाच्या तरी शेतामध्ये लेकरु कडेवर घेऊन, डोक्यावर भाकरी घेऊन खुरपायला गेले असते आणि यापेक्षा कोणतेही वेगळे चित्र दिसले नसते.

सभापती महोदय, मला जी संधी मिळाली ती घेण्याचा प्रयत्न केला. मी शाळेमध्ये जात असताना माझ्या खांद्यावरील झंपर, त्यावेळी आमच्या काळामध्ये त्याला ब्लाऊज म्हणत नव्हतो तर झंपर असे म्हणत असत आणि ते हमखास फाटलेले असावयाचे आणि फाटलेला झंपर झाकण्यासाठी दोन्ही कडून पदर घ्यावा तर साडी खाली फाटलेली असावयाची आणि ती पायामध्ये अडकत असे. पण वर्गामध्ये मी पहिला किंवा दुसरा सोडून तिसरा क्रमांक मिळविला नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना सांगू इच्छिते की, सातवीपासून माझे लग्न जमविण्या साठी प्रयत्न सुरु झाला. मला आज आनंद होतो की, मला ज्या मुलांनी हुंड्यासाठी नाकारले होते, त्या मुलांनी मला त्यांच्या गावामध्ये नेऊन सार्वजनिक सत्कार घडवून आणले आणि ही माझ्या आयुष्यातील मिळकत आहे, संपत्ती आहे. ज्यांनी मला नाकारले त्यांनी मला फक्त स्वीकारलेच नाही तर माझ्या विचारांचा तो विजय होता, माझ्या कृतीचा विजय होता आणि मुख्य म्हणजे तो विजय माझा नव्हता तर तो श्री.दगडोपंत माधवराव ठोमरे आणि श्रीमती गयाबाई माधवराव ठोमरे यांचा होता आणि माझी आजी श्रीमती रेणामाई ही 18 वर्षाचा मुलगा मुक्ती संग्रामामध्ये गेल्यानंतर धावत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्याच्यामागे गेली आणि 200 तरुणांसाठी भटारखान्याचे काम तिने हैद्राबाद मुक्ती संग्राम संपेपर्यंत केले. त्या रेणामाईचा तो विजय होता आणि त्यांच्यामुळे मी आज येथे तुमच्यापर्यंत पोहोचू शकले याचा मला आनंद वाटतो.

सभापती महोदय, खरे म्हणजे मी वयाच्या 17 व्या वर्षापासून राजकारणामध्ये आहे. जेव्हा एस.एफ.आय.स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेमध्ये काम करण्यास मी सुरुवात केली. त्यानंतर सतत 1974 पर्यंत आम्हाला डिटेन केल्याशिवाय किंवा नोटीस दिल्याशिवाय एकही मुख्यमंत्री बीड जिल्ह्यामध्ये येऊ शकले नाहीत. त्यावेळी आम्ही कोणाकोणाच्या विरोधात आंदोलने केली हे मला सांगण्याची गरज नाही. कारण तेही वंदनीय आहेत. परंतु त्या वयामध्ये मला असे वाटावयाचे की, हे सगळे चोर आणि दरोडेखोर आहेत. पांढरा कडक कपड्यातील माणूस पाहिला की हा चोर किंवा दरोडेखोर आहे असे वाटावयाचे आणि या लोकांशी बोलता कामा नये इतकी तीव्रता आमच्या मनामध्ये होती. त्यावेळी बीड येथील अध्यक्ष श्री.शेख रझाक होते. ते वडिलांना असे म्हणावयाचे की,"तुम उसको इधर भेजो, मैं अध्यक्ष बना दूंगा" त्यावर माझे वडील त्यांना सांगावयाचे की, ती तुमची देखील मुलगीच आहे ना, मग जे काही करावयाचे असेल ते करा.

सभापती महोदय, मी जेव्हा 17 व्या वर्षी राजकारणामध्ये पाऊल टाकले.त्यानंतर एस.एफ.आय.चे काम करीत असताना ज्या चळवळी झाल्या त्याचा परिणाम म्हणून मला 4 जुलै 1975 मध्ये आणीबाणीच्या काळामध्ये मिसाखाली अटक झाली. माझ्या आयुष्यातील जे सुवर्ण क्षण आहेत आणि मला आजही ते आठवतात. मी सहावी-सातवीमध्ये असताना माझ्या माहेरी असलेल्या ढग्या नावाच्या डोंगरावर मैत्रिणींबरोबर हौसेने मोळी आणावयास गेले होते आणि तेव्हा मला चप्पल घालण्याची लाज वाटत असे. तेथून परत यत असताना आडव्या नदीवर बसून आम्ही एक झरा तयार केला होता आणि आम्ही त्याला हिरा असे म्हणावयाचो आणि त्या झऱ्यातील पाणी घेऊन भाकरी खाल्या आहेत आणि त्या भाकरीची जी चव आहे ती मला आयुष्यामध्ये पुन्हा कोणत्याही जेवणामध्ये मिळाली नाही असा माझा जो आनंदाचा क्षण आहे, त्याची मला आजही आठवण येते.

सभापती महोदय,माझी आई माझ्या हाताला पानांची ओली मेंदी लावावयाची.मग ती हाताला लावल्यानंतर रात्रभर कपडा बांधल्यावर दुसऱ्या दिवशी रंग चढत असे. पण एवढा लाल रंग पुन्हा माझ्या आयुष्यात कधी आला नाही. ते मेंदीचे हिरवे पान, मेंदीच्या पानावर मन माझे ......हे गाणे तंतोतंत लागू पडते. त्या मेंदीच्या पानाचा हिरवाकंच रंग आयुष्यभर माझ्या आठवणीमध्ये राहिला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिरवा रंग म्हणजे ज्याला आपण बॉटल ग्रीन असे म्हणतो. पण मी त्या रंगाला कायम हिरवाच असे म्हणते कारण बॉटल ग्रीन म्हटल्यानंतर त्यामध्ये ती भावना निर्माण होत नाही. त्या हिरव्या रंगाची कोणतीही वस्तू, कोणताही कपडा, कोणतेही झाड मग ते उन्हाळीचे झाड असेल, तरवडाचे झाड असेल, सलाट्याचे झाड असेल परंतु मला हिरव्या रंगाविषयी जे प्रेम निर्माण झाले त्याच्या पाठीमागे माझी आई आहे. माझे वडील जेव्हा माझा तळहात हातात घेत असत आणि आईला सांगत असत की, अग, तिला भांडी घासावयास लावू नको. मी मोलकरीण लावणार आहे, तिच्या हातावर फोड येता कामा नये. पण लग्न झाल्यानंतर असा प्रसंग आला.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

राजकारणामध्ये माझ्या 25-25 हजाराच्या सभा होत होत्या आणि कॅसेट्स विकल्या जात होत्या त्यानंतर मी लग्न केले पण लग्न झाल्यानंतर असा प्रसंग आला की, वडील सेवानिवृत्त झाले, पैशाचा आधार नव्हता. त्यावेळी आम्हा नवरा बायकोला शेतामध्ये जाऊन दगड उचलावे लागले. त्यावेळी हातावर फोड आले. मला त्यावेळी माझ्या वडिलांची आठवण आली. कारण त्यांच्या मनात नव्हते. त्यांच्या इच्छेखातर माझ्या तळहातावर फोड आले नसते तरी चालले असते.

परंतु या सगळ्या परिस्थितीमध्ये मला आणीबाणीमध्ये अटक झाली. पुन्हा माझ्या आयुष्यात एक सुवर्णक्षण आला. तो म्हणजे अहिल्याताई रांगणेकर, मृणाल गोरे, प्रमिलाताई, छबूताई, हंसाबेन राजदा, सुमतीताई सुकळीकर, इंदूमती केळकर, शांती नाईक, मंगला कुलकर्णी, सुंदर नवलकर या आणि अशा महाराष्ट्रातील अनेक मोठ्या नेत्यांबरोबर मला 19 महिने राहण्याचा योग आला. मी एकटी कॉलेजची विद्यार्थीनी त्यांच्या बरोबर होते. कार्यकर्त्यांशी कसे वागावे हे मला त्या ठिकाणी कळले. मला माझ्या आईची आठवण अहिल्याताईंनी कधी येऊ दिली नाही. कारागृहामध्ये मला दुसरा दर्जा दिला गेला होता. मोहन पुंगलिया हे वकील मला देऊन रिटपिटीशन करावयास लावले आणि मला 'अ' दर्जा मिळवून दिला. माझा बी.एस्सी. फायनलचा एक विषय राहिला होता. अहिल्याताईंनी रिटपिटीशन करावयास लावले आणि मला परीक्षेची परवानगी मिळवून दिली. औरंगाबाद येथील हर्सूलला पाठवून परीक्षा देण्याची परवानगी दिली. त्यामुळे मी बी.एस्सी. पास होऊ शकले. माझ्या आयुष्यामध्ये जर मी अहिल्याताई रांगणेकर, मृणालताई गोरे, प्रमिलाताईं, हंसाबेन राजदा यांची आठवण ठेवली नाही तर मी कृतघ्न ठरेन. समाजाच्या या संपूर्ण वाटचालीमध्ये मला ज्यांनी ज्यांनी घडविले आहे त्या सगळ्यांचा हात आहे. म्हणून आज या ठिकाणी मला त्यांची आठवण होते. त्याचबरोबर माजी खासदार कै. गंगाधरअप्पा बोरांडे हे जनता दलाच्या काळामध्ये 1977 ला निवडणुकीला उभे राहिले आणि 55 हजार मतांनी निवडून येऊन बीड जिल्ह्याचे खासदार झाले होते तसेच परळीचे रंगरावमामा देशपांडे या सर्वांनी माझ्यावर केलेले उपकार, त्यांनी दिलेले विचार आणि वडिलांनी दिलेली विचारांची शिदोरी माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे मी वेगळ्या संघटनेमध्ये गेले होते आणि सहा महिने काम

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

ॲड. उषा दराडे ....

करीत होते. त्याचा उल्लेख मी या ठिकाणी करणार नाही. पण वडिलांनी मला सांगितले की, मी सागतो त्या संघटनेत तू सहा महिने काम करुन बघ. तुला आवडले तर ठीक, नाही आवडले तर सोडून दे. भीमराव सातभाई नावाच्या एका एसएफआयच्या कार्यकर्त्याशी माझी ओळख करुन दिली. मी कामात गुंतत गेले. रंगरावमामा देशपांडे मला मार्गदर्शन करीत गेले. तेव्हापासून 1987 पर्यंत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे काम, सीआयटीयूचे काम, एसएफआयचे काम, डीआरडब्ल्यूडीएचे काम, ही सर्व कामे करत करत 1987 पर्यंत माझा प्रवास झाला. काही कारणामुळे मी सीपीएमचा राजीनामा दिला. मला आजही सीपीएमचा राजीनामा दिल्याची खंत वाटते. मी तो राजीनामा कोणत्या परिस्थितीत दिला हे मी या ठिकाणी व्यक्त करणार नाही. कारण काही गोष्टी अशा आहेत की जे माझे धन आहे, माझी संपत्ती आहे. माझ्या आयुष्यात घडलेल्या चुका असतील किंवा चांगल्या गोष्टी असतील त्या सगळ्याच गोष्टी जगजाहीर करण्याचे काही कारण नाही. जे काही कारण असेल ते माझ्या जीवाला माहीत आहे. पण मला खंत वाटते.

यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की, मार्क्सवादी विचारसरणी वाचल्यामुळे मला दृष्टी आली म्हणून या महाराष्ट्राचा पुरोगामी चेहरा आम्ही समोर आणू शकलो आणि नियोजन करु शकलो. त्या मार्क्सवादी विचारसरणीने मला एक वेगळा चेहरा देण्याचा प्रयत्न केला, एक विचार देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मी या ठिकाणी हे सर्व व्यक्त करु शकले. मी या सभागृहामध्ये जेव्हा आले त्यावेळी ॲड. प्रितमकुमार शेगावकर सभागृहात होते. मला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नामांतर चळवळीची आठवण झाली. त्या चळवळीचे ते खंदे समर्थक होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये मी सुध्दा कारावास भोगलेला आहे. मी पाहिले की, माझा आंबेडकरी विचार मला या ठिकाणी मांडण्याचा आणि त्याच्या मार्फत समाज प्रबोधन करण्याचा लोकशाहीने मला जो अधिकार दिलेला आहे तो हक्क बजावण्याची संधी आलेली आहे म्हणून फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मी या ठिकाणी मांडला पाहिजे. मला कर्ण आवडतो. मला एकलव्य आवडतो. मला सुभाषचंद्र बोस आवडतात. ही जी आवडणारी माणसे आहेत त्यांचे कौतुक या सभागृहात झाले पाहिजे. त्या दृष्टीने मला या ठिकाणी विचार मांडण्याची संधी मिळाली. त्यामुळे मी या सभागृहाचे ऋण कधीही फेडू शकणार नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ॲड. उषा दराडे .....

सभापती महोदय, खरे म्हणजे मी या ठिकाणी सगळ्या भावना व्यक्त करु शकत नाही. पण 1992 ला आदरणीय श्री. शरद्‌चंद्रजी पवार यांनी मला जिल्हा परिषदेची उमेदवारी दिली. वसंतदादा असताना 1987 मध्ये मला श्री. पंडितराव दौंड घेऊन गेले आणि मी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला पण 1987 ते 1992 या काळात मला कॉंग्रेस समजायला थोडा वेळ लागल्यामुळे मी डॉरमंटच होते. 1992 ला जिल्हा परिषदेची सदस्या झाले. जिल्हा परिषदेची अध्यक्षा झाले. तसेच राज्य महिला आयोगाची सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. महिला आघाडीची अध्यक्षा म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली. आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली. यामध्ये माझे एकटीचे काही नाही. समाजाने मला पाठिंबा दिला, माझ्या विचारांना पाठिंबा दिला आणि जे काही विचार मला पटतात ते जगण्याचा मी प्रयत्न केला. त्यामध्ये माझ्याकडून प्रचंड चुका झालेल्या आहेत हे मला माहीत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

परंतु मी त्या दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व परिस्थितीबाबत मी स्वत:शीच खूप संवाद साधण्याचा प्रयत्न करीत असते. या गोष्टीचा मला त्रासही होतो. पण त्यातून सावरण्याचा मी निश्चित प्रयत्न करीत असते.

सभापती महोदय, मी या सभागृहात आल्यानंतर आपण माझा आत्मविश्वास वाढविला, माननीय उप सभापतींनी सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात काम करण्यास शिकविले. खरे म्हणजे प्रत्येक गोष्ट शिकवावयाची नसते. तुम्ही कसे वागता त्यातून आम्ही बरेचसे शिकत असतो. शेवटी प्रत्येक माणूस हा आयुष्यभर विद्यार्थीच असतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांची चिकाटी, शेतकऱ्यांविषयीची तुमची तळमळ, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांची तळमळ, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताईंचे काम, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादा पवार यांचे आनंदी राहणे, सन्माननीय सदस्य श्री.अरुण भाई गुजराथी यांना तर काय म्हणावे ? तत्ववेत्ता म्हणावे, राजकारणी म्हणावे, मितभाषी म्हणावे, काय म्हणावे ते मला समजत नाही. मी महिला प्रदेशाध्यक्षा म्हणून काम करीत असताना त्यांनी मला एका वाक्याने सुध्दा दुखावलेले नाही. तुम्ही हे का करता असे विचारले नाही आणि तुम्ही हे करावे असेही सांगितले नाही. याला पक्षांतर्गत लोकशाही म्हणतात. महिलांवर दडपण न आणता काम करु देण्याची संधी त्यांनी मला दिली.

सभापती महोदय, मला उत्कृष्ट वक्ता म्हणून पुरस्कार देण्यात आला होता. मी त्या विषयी आनंदी आहेच. पण या ठिकाणाहून जात असताना मला दु:ख वाटत नाही असे मी 12 तारखेपासून दाखवित आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना माधुरी दीक्षितची का गरज भासली ते कोणाला माहीत ? जे सन्माननीय सदस्य या सभागृहातून निवृत्त होत आहेत ते सर्वच्या सर्वजण हसत आहेत. यापेक्षा वेगळा अभिनय कोणता असू शकतो ? पण त्या दु:खाने आम्ही खचून जाणार नाही. आम्ही पुन्हा त्या समाजात जात आहोत. मी 10 वर्षे महिला प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करीत असताना, आमदार असताना माझ्याकडून खरेच माझ्या बचत गटावर अन्याय झालेला आहे. मला पुन्हा एकदा माझ्या भगिनींमध्ये जाण्याची संधी पक्षाने उपलब्ध करुन

2...

ॲड.उषा दराडे....

दिली आहे, त्याबद्दल मी पक्षाची आभारी आहे. वनराई बंधारे करणे, सेंद्रिय खतांची प्रात्यक्षिके करणे किंवा स्त्री-भ्रूण हत्येचा प्रचार करणे इतकी महत्वाची कामे बाहेर असताना मला या सभागृहात पुन्हा न येण्याचे दुःख वाटून घेण्याचे काहीच कारण नाही. शेवटी लोकांची कामे करण्यासाठी सत्ताच पाहिजे असे नाही. सत्ता हे साधन आहे, सत्ता ही संपत्ती नाही. हे सर्व करीत असताना मला विधिमंडळाच्या ग्रंथालयाचा खूप उपयोग झाला. तत्कालीन ग्रंथपाल श्री.चव्हाण किंवा विद्यमान ग्रंथपाल श्री.वाघमारे यांनी योग्य दिशेने मार्गदर्शन दिले व पाहिजे असलेली पुस्तके उपलब्ध करुन दिली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जमा, राजन तेली आणि सय्यद पाशा पटेल हे देखील माझ्याबरोबर निवृत्त होत आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना सांगू इच्छिते की, तुम्ही पुन्हा आमदार होणार नाही याची मला खंत वाटली. तुम्हाला काय वाटले आहे ते मला माहीत नाही. सच्चर समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी तुम्ही ज्या पोटतिडीकीने महाराष्ट्रभर फिरला होता. तुम्हाला अंतर्गत विरोध कसा होता, कोणाकडून होता हे तुम्हाला माहीत आहे आणि मलाही माहीत आहे. पण तरीही तुम्ही तुमच्या समाजासाठी महाराष्ट्रभर फिरलात. तुम्ही पुन्हा या सभागृहात यावयास पाहिजे होते. मी पुन्हा आले नाही तरी बेहत्तर. मी नसल्याने काही फरक पडणार नाही. पण तुमच्यावर अन्याय झाला आहे असे आम्ही म्हणू शकत नाही. तो तुमच्या पक्षाचा निर्णय आहे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, परशुराम उपकर यांच्याकडूनही मला काही ना काही शिकावयास मिळाले आहे. सभापती महोदय, मला येथे आल्यानंतर आणखी एक चांगली गोष्ट शिकावयास मिळाली आहे. सभागृहातील वेलमध्ये आल्यानंतर ब्लड प्रेशर वाढेपर्यंत आरडाओरडा केल्यानंतर सभागृह स्थगित झाल्यानंतर हेच आरडाओरडा करणारे सदस्य एकमेकांच्या हातात हात घालून बोलत असल्याचे मी अनेकदा पाहिलेले आहे. मला ते खूप सुंदर प्रसंग वाटले. 'आनंदाची डोही, आनंद तरंग.' ज्याला आनंद म्हणतात, जगणे म्हणतात, जीवंतपणा म्हणतात तो मला येथे अनुभवयास मिळाला.

3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

सन्माननीय सदस्या सर्व श्रीमती शोभाताई फडणवीस, नीलमताई गोऱ्हे, विद्याताई चव्हाण, दिप्ती चवधरी यांच्यासारख्या मैत्रिणी मिळाल्या आहेत. मला या सर्वांशी संवाद साधता आला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मघाशी एका गाण्याच्या दोन ओळींची आठवण म्हणून सांगितल्या होत्या. त्यांनी असे म्हटले होते की,

"सुहाना सफर और ये मौसम हँसी,
हमें डर है कि हम खो न जाए कहीं."

पण माझ्या बाबतीत असे होणार नाही.

आम्ही जेथे जातो त्याचे वर्णन याच गाण्याच्या पुढील ओळींमध्ये केलेले आहे.

"वह कौन हँसता है तारों में छुपकर
बहार बेचैन हैं जिसकी धुन पर
मेरे सपने, मेरे अरमाँ, मिलेंगे शायद यहीं.

वहीं, जहाँ मैं वापस जा रही हूं.

आपल्या सर्वांच्या कामाची पध्दत, सर्वांचे विचार, माननीय सभापती, माननीय उप सभापती आणि सर्व तालिका सभापतींचे विचार मी येथून घेऊन जात आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:45

ॲड. उषा दराडे...

या ठिकाणी मला स्व. गुरुनाथ कुलकर्णी यांची आठवण होते. स्व. गुरुनाथ कुलकर्णी आणि सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मला पक्षाचे प्रमुख म्हणून सभागृहामध्ये येण्याची जी संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी पुनश्च सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानते, सर्वांना शुभेच्छा देते आणि सर्वांचे ऋण व्यक्त करुन रजा घेते. धन्यवाद.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, निवृत्त होणा-या सन्माननीय सदस्यांना आपण निरोप देत आहात.

सभापती महोदय, विधानसभा असो की विधानपरिषद असो, शेतक-याचे प्रश्न सोडवून घेण्याचे हे एक माध्यम आहे असे मला वाटत होते. मी जवळपास 30-35 वर्षे शेतकरी चळवळीमध्ये काम केले. आमदार कशासाठी व्हायचे ? तर पहाटे 5.00 वाजता उठून रात्री 12.00 वाजता झ ाोपल्यानंतर सुध्दा पाडव्याच्या पुढे धोतरातून ज्या शेतकरी समाजाचे ढोपर दिसते, ते असे का होते, याचे कारण शोधायला मी आमदार व्हायचे ठरविले. माझे गाव असे होते की, मी आयुष्यात कधी सरपंच होऊ शकलो नसतो. माझा तालुका असा होता की मी कधी आमदार होऊ शकलो नसतो. मी निवडून येण्याची कधी शक्यता नव्हती. तरी पण मी जबरदस्त प्रयत्न केले. हे प्रयत्न कशासाठी होते ? मला एक गोष्ट समजली होती, ती म्हणजे एवढे कष्ट करुन एवढी सगळीं शेतक-यांची आडनावे असलेली माणसे इथे येतात तरी शेतक-यांचे प्रश्न मिटत नाहीत. शेतकरी मेळावे होतात. मी कुणावर आरोप करीत नाही. शेतकरी मेळावे कधी होतात ? तर ज्या ज्या वेळी नेत्याची नाव बुडायला लागते त्यावेळी शेतकरी मेळावे घेतले जातात. परंतु शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कधी कुणी शेतकरी मेळावे घेतल्याचे मी बघितले नाही. मला एका गोष्टीचा आनंद होतो, तो म्हणजे मी जातीने मुसलमान आहे. शेतकरी समाजातील लोक खाजगीमध्ये असे बोलतात की, "मला आपले सुध्दा कोणी म्हणत नाही रे" पण पाशा पटेल मात्र आम्हाला आपले मानतो.

सभापती महोदय, मी मुसलमान असूनही शेतक-यांमध्ये काम करतो, कारण माझे वडील शेतकरी होते. सगळे नेते अशा पध्दतीने वागतात. पण आपण तसे वागायचे नाही. मी मुसलमान आहे आणि शेतकरी सुध्दा आहे. त्यामुळे आपण वेगळे वागायला पाहिजे. असा विश्वास मी माझ्या मनात बाळगला. हा विश्वास कसा असला पाहिजे ? क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या संदर्भात आम्ही एक घटना ऐकली. ती अशी की, क्रांतिसिंह नाना पाटील यांना पकडण्यासाठी पोलीस येतात. त्यावेळी एका म्हाता-याची सून घरात झोपलेली असते. म्हातारा बाहेर झोपलेला असतो. जेव्हा क्रांतिसिंह नाना पाटील येतात, त्यांच्या पाठीमागे पोलीस असतात अशा वेळी ते पोलिसांना सापडू नयेत म्हणून त्या म्हाता-याने क्रांतिसिंह नाना पाटील यांना आपल्या सूनेच्या बाजूला झ ाोपण्यास सांगितले आणि म्हातारा बाहेर झोपला. असे तो का वागला ? कारण क्रांतिसिंह नाना

..2..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:45

पाटील हे आपल्यासाठी लढत आहे, त्यांना पोलिसांपासून वाचविले पाहिजे अशी त्याची भावना होती. त्या म्हाता-याला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबद्दल तेवढा विश्वास होता. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या बाबतीत जसा समाज वागला तशा प्रकारचा विश्वास आपण शेतक-यांमध्ये निर्माण करायला पाहिजे.

सभापती महोदय, माझा रोल मॉडेल, हिरो कोण असेल तर ते सर छोटू राम हे आहेत. आता तो भाग पाकिस्तानामध्ये येतो. त्यावेळी आपला हिंदुस्थान देश होता. त्यावेळी मुस्लिम बहुल भागामध्ये सर छोटू राम नावाचा एक जाट कार्यकर्ता काम करीत होता. जोपर्यन्त सर छोटू राम जिवंत होते तोपर्यंत महमद अली जिना यांना देखील तेथे त्यांची शाखा उघडायला संधी मिळाली नाही. जनता मुसलमान आणि नेता जाट अशी त्यावेळी परिस्थिती होती. म्हणून मला त्यांच्या सारखे व्हावेसे वाटले. ते माझे आदर्श आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी गौरवोद्‌गार काढले. त्यांना संतांची उपमा दिली. मला एका गोष्टीचा आनंद झाला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जयंती निमित्ताने जी समिती नेमण्यात आली त्यामध्ये विदर्भ वगळता पश्चिम महाराष्ट्रातील श्री. उल्हासदादा पवार आणि मराठवाड्यातून पाशा पटेल हे दोन आमदार होते. मी अनेक ग्रंथ वाचले. परंतु राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांच्या ग्रंथामध्ये शेतक-यांच्या दारिद्र्याबद्दल जेवढे लिहिलेले आहे तेवढे कोणत्याही ग्रंथात लिहिलेले नाही. म्हणून अजूनही वर्षातून एकदा तरी मला राष्ट्रसंत तुकडोजी महारांच्या आश्रमामध्ये जाऊन रहावेसे वाटते, एवढाच तुकडोजी महाराज आणि माझा संबंध आहे.

...नंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

सभापती महोदय, या सभागृहाने मला भरपूर दिले. मी खूप समाधानी आहे. खूप पत्रकार आणि अनेक शेतकरी माझे कौतुक करतात. माझ्या गावातील लोकांच्या माझ्याबद्दल ज्या भावना आहेत त्याबद्दल मी स्वत:ला धन्य धन्य मानतो. या सर्वाला हे सभागृह कारणीभूत आहे.

सभापती महोदय, माझे सभागृहातील दु:ख सोडविण्यासाठी कृषी राज्यमंत्री श्री.गुलाबराव देवकर यांनी मला मदत केली आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांना माझी भावना कळली. एकदा त्यांनी मला त्यांच्या दालनात बोलावून घेतले आणि विचारले की, "आपण दरवेळी वेगवेगळी आकडेवारी कोठून आणता ?" मी त्यांना सांगितले की," आम्ही ही सर्व माहिती विभागाकडून घेतो." माननीय श्री.गुलाबराव देवकर यांनी चार कृषी विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांबरोबर माझी बैठक लावली. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी मला फार मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी देखील माझे प्रश्न समजून घेऊन मला मदत केली.

माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांचा उपयोग कोणाला होवो किंवा न होवो परंतु मला त्यांचा उपयोग झाला. नागपूरच्या अधिवेशनात कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न आम्ही लावून धरला होता. मी त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांजवळ गेलो. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब माझ्यावर रागावले. मी त्यांना म्हणालो," शेतकऱ्यांची जाण असणारे मुख्यमंत्री आहेत." मी माननीय मुख्यमंत्री महोदयांजवळ गेलो आणि त्यांना सांगितले की, "शेतकऱ्यांना दहा हजार कोटी, वीस हजार कोटी रुपये देऊ नका. थुंक चाटण्याने शेतकऱ्यांची भूक जाणार नाही. आपण कायम स्वरुपी धोरण राबवा." ते मला म्हणाले, "मी काय करु. ?" मी त्यांना म्हणालो, "आपण राज्य शेती माल समितीची पुनर्रचना करण्याची घोषणा करावी." माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मला समजून घेतले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. हे काम किती मोठे आहे ते आता आपणास कळणार नाही. ते काम जसजसे पुढे जाईल तसतसे आपणास कळून येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मला एके दिवशी सांगितले की, केंद्रीय कृषी मूल्य आयोगाच्या अध्यक्षांसोबत आपली एक बैठक घेतो. त्यांनी मला हे सांगितल्या बरोबर मी पळत गेलो आणि त्यांच्या सोबत इतकी दोस्ती केली की, परवा त्यांनी मला घरी नेऊन माझ्याशी अडीच तास गप्पा मारल्या.

सभापती महोदय,गाईमध्ये 33 कोटी देव आहेत असे आपण मानतो. खरे म्हणजे सर्व हिंदूनी आपल्या घरासमोर गाय बांधली पाहिजे. पण कोणीच घरासमोर गाय बांधत नाही कारण ती दीडशे रुपयांचा कडबा खाते आणि तीस रुपयांचे दूध देते. तेव्हा आपल्या घरासमोर कोण गाय ठेवणार आहे?. गोवंश कमी होऊ लागले आहेत. केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री.गुलाटी साहेब यांना मी सांगितले की, "जनावरे संपली तर शेती संपेल"

सभापती महोदय, आता पंजाब मधून दिल्लीला कॅन्सर एक्सप्रेस सुरु झाली आहे. महिन्यातून एक दिवस पूर्ण रेल्वे कॅन्सरच्या रुग्णांनी भरुन दिल्लीला जाते. याचे कारण म्हणजे पंजाबमध्ये शेतीला अधिक पाणी, अधिक रासायनिक खते, अधिक औषधे मारली जातात आणि हे सर्व जमिनीत जातात, जमिनीतून धान्यात येतात आणि धान्यातून आपल्या पोटात जातात. आपण वर्षभर जेवढे विष खातो तेवढे विष एका वेळी खाल्ले तर आपण लगेच मरु. एवढे विष माणसाच्या पोटात जात आहे. आपली धोरणे चुकल्यामुळे हे सर्व होत आहे.

सभापती महोदय, मी गमतीने असे म्हणत होतो की, गावातील लोक येथे येऊन सुध्दा प्रश्न सुटलेले नाहीत. आता तर ठाणे, पुणे, नाशिक शहरातून सदस्य निवडून येत आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांनी कृष्णाकाठ पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "सोने नेसून चिंध्या विकावयास बसलो, गर्दी हटेचना आणि चिंध्या नेसून सोने विकावयास बसलो, परंतु कोणीच फिरकेचना."



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे मराठा महासंघाची चळवळ चालवितात. सर्व मराठ्यांचा व्यवसाय शेती आहे. आपण शेतकऱ्यांची चळवळ उचलून त्यांच्या शेतीमालाला भाव दिला तर कोणाही मराठ्याला आरक्षण मागण्याची गरज पडणार नाही. घरात दहा-दहा नोकर ठेवणारी माणसे आता त्यांनाच कोणीतरी चपराशी ठेवा असे म्हणू लागली आहेत.

यानंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ श्री.अजित 19:55

श्री.सय्यद पाशा पटेल...

माननीय मुख्यमंत्री महोदय, मी तुमचे गाव बघितले, तुमचे घर बघितले. मला सभागृहात एकच मित्र मिळाला. त्यांचे गावात एकाच खोलीचे घर आहे आणि माझे घरही एकाच खोलीचे आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, माननीय पंतप्रधानाच्या भेटीसाठी दिल्ली येथे चला म्हणून मी आठ दिवस तुमच्या पाठीमागे फिरत होतो. मला श्री.गुलाटी यांनी सांगितले होते की, आताचे सरकार ज्वारीला 53 टक्के भाव देण्यासाठी ऐकत नाहीत. ज्वारीचे भाव वाढवून मिळावेत म्हणून मी तुमच्या मागे फिरत होतो. परंतु लोक मला म्हणू लागले की, पाशा पटेल हे कॉंग्रेस पक्षात जात आहेत. माननीय श्री.रावते साहेब म्हणाले होते की, श्री.सय्यद पाशा साहेब आपण कॉंगेस पक्षात चाललात काय? सभागृहातील सर्व पक्षाच्या सदस्यांनी मला अतिशय प्रेम दिले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. मी ज्या ज्या वेळी सभागृहात शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला, त्या त्या वेळी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांनी मला साथ दिली आहे. सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचे सदस्य आपणास सांगत होते की, आमचा एक-एक मिनिटांचा वेळ कमी करा आणि तो वेळ पाशा पटेल यांना द्यावा. आपण सर्वजण आपली सभागृहात बोलण्याचा वेळ देखील मला उपलब्ध करुन देत होता, त्याबद्दलही मी आपले सर्वांचे आभार मानतो.

सभापती महोदय, माननीय श्री. शरद जोशी हे माझ्या वडिलांसारखे आहेत. मी त्यांना वेगळया स्थानी मानतो. त्यांनी माझी दृष्टी साफ केली आहे. मी राजकारण करीत होतो. 1999 मध्ये एन.सी.पी.तयार झाल्यानंतर दोन आमदारांनी मला उचलून मुंबईला आणले. त्यावेळी माननीय श्री.शरद पवार यांनी सांगितले की, सय्यद पाशा तुला लोकसभा निवडणूक लढवावयाची आहे. मी त्यांना सांगितले की, माननीय शरद जोशी हे माझे वडील आहे, त्यांना मी सोडू शकत नाही. त्यांनी सांगितले की, श्री.शरद जोशी सकट ये. मी आणि श्री. शरद जोशी माननीय श्री. शरद पवार यांच्या भेटीसाठी आलो. त्या भेटीत श्री.शरद जोशी आणि श्री.शरद पवार यांचे जमले नाही, परंतु माझा बळी गेला. त्यानंतर मला आदरणीय श्री.गोपीनाथ मुंडे यांनी ओटीत घेतले. मी बिल्ल्याशिवाय येणार नाही. बिल्ला धेतल्यानंतर मी आलो. आता येथे देखील तेच झाले, आता काय करु, फार अवघड काम झाले आहे. परंतु मी अतिशय समाधानी आहे. गावातील माणूस जगल्याशिवाय देश जगणार नाही. आज गावातील माणसांकडे प्रचंड दुर्लक्ष होऊ लागले आहे. मी यापुढे या सदनाचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल..

सदस्य रहाणार नाही. तरी देखील मला आनंद आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयाचे आभार व्यक्त करतो, मी माननीय श्री.राधाकृष्ण विखे-पाटील आणि श्री.गुलाबराव देवकर यांचे आभार व्यक्त करतो. ते आभार यासाठी व्यक्त करतो आहे की, यापुढे राज्य शेतमाल समितीत तज्ज्ञ शेतकरी म्हणून मला घेतले आहे. या सभागृहात मी यापुढे राहणार नाही, तुमच्यातून मी मुक्त होणार आहे. परंतु तिकडे मी पूर्णवेळ काम करणार आहे. त्यामुळे मला कशाचीही काळजी नाही. या सभागृहाला शब्द देतो की, जोपर्यंत श्वास चालू आहे, तोपर्यंत शेतकऱ्यांसाठी लढणार आहे. मी कधी नाराज नव्हतो, कधी नाराज राहणारही नाही. मी या देशाचा नागरिक आहे. शेती शिवाय हा देश वाचू शकत नाही.

सभापती महोदय, मला या लोकांनी भरपूर काम लावले, मी माननीय श्री.राजेश टोपे यांचे आभार मानतो. या महाराष्ट्रामध्ये अग्रिकल्चरल डिप्लोमा ॲन्ड इंजिनिअरींग महाविद्यालय नाही. मी आंध्रपदेश, गुजरात मध्ये अशी महाविद्यालये बघितली. आपल्याकडे देखील ते शिक्षण सुरु करावे म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली. या बाबतीत फक्त माझा एकटयाचाच अर्ज नेहमी असावयाचा. शेती ही यांत्रिकीकरणाकडे चाललेली आहे. परंतु यंत्र चालविण्याचे शिक्षण मात्र शासनाकडून दिले जात नाही. अग्रिकल्चरल डिप्लोमा ॲन्ड इंजिनिअरींग महाविद्यालय सुरु करावे अशा प्रकारची विनंती मी माननीय श्री. राजेश टोपे यांच्याकडे केली. त्यांनी माझ्या फाईलचा सात दिवस पाठपुरावा केला आणि तशा पध्दतीचे कॉलेज या राज्यात सुरु केले. म्हणून श्री. टोपे साहेबांचा मी खूप आभारी आहे.

सभापती महोदय, मला भविष्यात एकच काम करावयाचे आहे. माझा मुलगा आजारी पडला तर त्याला औषधाने अंघोळ घालत नाही. त्याला औषधाचे ड्रॉप पाजतो. तसाच पिकाला सुध्दा जीव आहे. त्यावर एवढे औषध का वापरले जात आहे, याची कारणे शासनाला शोधावी लागणार आहेत.

सभापती महोदय, माती परीक्षणाचे काम खूप मोठे आहे याची मला जाणीव आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये कोणत्याही बाबीचा खरा अहवाल कोणीच देत नाही. मातीमध्ये एकूण 17 घटक असतात, त्यातील घटक कमी झालेले आहेत. माती परीक्षणाचे काम तुम्ही करा अथवा करु नका, परंतु ते काम मी निश्चितपणे करणार आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल..

सभापती महोदय, धान्याचे हमी भाव केंद्र सरकार जाहीर करते. माझे एक स्वप्न आहे की, एका बाजूला केंद्र सरकारचा हमी भाव जाहीर होईल आणि दुसऱ्या बाजूला पाशा पटेल यांचा हमी भाव जाहीर होईल. एवढे मोठे काम मला करावयाचे आहे. मला या कामात सर्वांनी सहकार्य करावे.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

सभागृहातील सदस्यांनी मला प्रेम दिले. रस्त्यावरील प्रश्न सोडविण्याची सुरुवात या सदनापासून झाली याचा मला अभिमान आहे. मी काँग्रेसचा सदस्य राहिलो नाही, व्हायची शक्यता बिलकुल नाही. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने आणि सदस्यांनी जे सहकार्य केले ते मी आयुष्यभर विसरणार नाही. माझे कोणत्याही पक्षाशी अथवा व्यक्तीशी भांडण नाही. एक गोष्ट सोडविण्यासाठी आपण सर्वांनी काम करावे तीच गोष्ट मला सोडवून घ्यायची आहे आणि ती म्हणजे शेतकऱ्यांचे प्रश्न मला सोडवायचे आहेत. या कामामध्ये आपण सर्वांनी मला सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. सगळया देशामध्ये महत्वाचे काम सुरु आहे. राज्य सरकारकडून शेतमालाला भाव काय द्यावा याचे आकडे दिल्लीला गेले तर तेथून शेतीमालाला चांगला भाव जाहीर होणार आहे. म्हणून भविष्यामध्ये देशातील 15-20 राज्यांमध्ये जाऊन महाराष्ट्र शासनाने जे केले ते करुन घेण्याचे काम करावे लागणार आहे.

सभापती महोदय, आपण कधी कधी माझ्यावर रागावलात, परंतु आपण मला वडिलांच्या स्थानी आहात. आपण न्याय दिला आहे. उपसभापतींना तर एवढी सवय झाली होती की, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा चालू असताना तीनवेळा हात वर न करताच त्यांनी मला बोलण्याची संधी दिली होती. आपणा सर्वांचे आभार मानतो. माझ्याबरोबर निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे आभार मानतो. माझी एक विनंती आहे की, मी ज्या रस्त्याने जातो त्या रस्त्यावरुन एकटा कधीच जात नाही आणि आवाज दिल्याशिवाय जात नाही. म्हणून आवाज दिल्यानंतर माजी सदस्य आहे म्हणून नाकारु नका एवढीच विनंती करतो आणि येथेच थांबतो.

जयहिंद.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर( विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या निरोप समारंभानिमित्त सभागृहाच्या माध्यमातून मला निरोप देण्यात आला त्याबद्दल मी मनापासून सर्वांचा आभारी आहे.

या सदनाचा सदस्य होण्याचा मान मला मिळाला. खरे पाहता 2004 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये मला आमगाव विधानसभा क्षेत्रातून तिकीट मिळाले होते. परंतु त्यावेळी पक्षाच्या अंतर्गत बाबीमध्ये स्वर्गीय प्रमोद महाजन यांनी मध्यस्थी करुन माझे बालपणापासून ते कॉलेजपर्यंतचे जिवलग मित्र श्री. नागपुरे यांना तिकीट देण्यात आले. त्यावेळी मला प्रमोदजी यांनी अभिवचन दिले होते की, दीड वर्षानंतर तुला आमदार केले जाणार आहे. मध्यंतरीच्या काळात प्रमोद महाजन यांचे निधन झाले.मध्यंतरी चर्चा झाली की आता प्रमोदजी गेल्यामुळे तिकीट मिळणार नाही. पण आदरणीय लोकनेते श्री. गोपीनाथ मुंडे यांनी अभिवचन दिले होते. प्रमोदजी म्हणाले होते की तुला जे बोलायचे आहे ते फोनवर बोलत. शेवटची 30 मिनिटे माझ्याशी बोलल्याचे मला आठवते.ती त्यांची आणि माझी शेवटची भेट होती. ती आठवण आणि स्मरण मी जीवनात कधी विसरु शकत नाही. त्यांनी दिलेला शब्द गोपीनाथ मुंडे यांनी पाळला. तत्कालीन अध्यक्ष श्री. नितीनजी गडकरी होते या तिघांचे ऋण मी फेडू शकत नाही. त्यांनी दिलेला शब्द पाळला आणि 2006 साली विधानसभेच्या आमदारांमधून माझी परिषदेवर निवड झाली.

गेल्या सहा वर्षात सभागृहातून बरेच काही शिकलो. माझ्या वडिलांच्या पुण्याईने मी सदनात 6 वर्षे काम केले याचे मला समाधान आहे. माझे वडील विधानसभेचे सदस्य होते. 1975 साली विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले होते. दरम्यानच्या काळात आपत्कालीन परिस्थितीत 18 महिने ते नागपूरच्या सेंट्रल जेलमध्ये होते.अगदी अल्पकाळ ते या सदनाचे सदस्य होते. परंतु त्यांचा पुत्र म्हणून या सदनामध्ये मी कार्यकाळ पूर्ण केलेला आहे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. माझे वडील 1977 साली लोकसभेवर निवडून गेले होते. त्यावेळी अडीच वर्षे केंद्रामध्ये आमच्या पक्षाचे सरकार होते. स्वर्गीय मानकर गुरुजी यांनी कधीही स्वत:साठी पक्षाकडे तिकीट मागितले नाही. स्वर्गीय प्रमोद महाजन, वेदप्रकाश गोयल असतील या सर्व कार्यकर्त्यांना पुढे नेण्याचा त्यांचा मानस होता.

नंतर श्री. भोगले

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 20:05

श्री.केशवराव मानकर.......

त्या अनुषंगाने आम्हाला अभिमान वाटतो. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.नितीनजी गडकरी, स्व.प्रमोद महाजन, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे हे माझ्या वडिलांचे शिष्य आहेत. ते पुढे जात आहेत हे पाहून आम्हाला आनंद होत आहे. माझ्या वडिलांची पुण्याई आजही कायम आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून मी त्यांचे कार्य पुढे नेण्याचे ठरविले आहे.

सभापती महोदय, या वेळच्या द्वैवार्षिक विधानपरिषद निवडणुकीसाठी मी तिकिट मागितले नव्हते. माझ्या वडिलांनी मला सांगितले होते की, काम करीत रहायचे, पक्षाने तिकिट दिले तरच निवडणूक लढवायची अन्यथा निवडणुकीत भाग घ्यायचा नाही. मी ते तत्व मान्य केले आहे. मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक आहे, मी संघ प्रशिक्षित आहे. माझा कोणताही स्वार्थ नाही. 1977 साली जनता पक्षाचे सरकार पडले तेव्हा हलधर कृषी केंद्र नावाचे केंद्र मी उघडले. त्याच्या भरवशावर माझी उपजीविका आजही सुरु असून प्रामाणिकपणे समाजाची सेवा करण्याचे व्रत मी स्वीकारले आहे. 7 जून, 1995 रोजी स्व.मानकर गुरुजींचे निधन झाले. त्यांची जबाबदारी माझ्या शिरावर आली. ती पुढे नेण्याचा प्रयत्न मी करीत असून भौगोलिक शिक्षण संस्था गुरुजींनी स्थापन केली, त्या शिक्षण संस्थेला वैभव प्राप्त करुन देण्याचे काम मी केले. त्या संस्थेच्या इमारती बांधून मी पूर्ण केल्या. जवळजवळ 4 ते 5 कोटी रुपयांच्या इमारती मी बांधल्या आहेत. के.जी. ते पी.जी.पर्यंत शिक्षण उपलब्ध करुन दिले. पॉलिटेक्नीक महाविद्यालय सुरु होऊन चार वर्षे झाली. बी.एड, डी.एड शिक्षण ग्रामीण भागामध्ये उपलब्ध नव्हते, त्या शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली.

सभापती महोदय, आपल्या आशीर्वादाने सभागृहाच्या विविध आयुधांचा वापर करण्याची संधी मला प्राप्त झाली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. आपल्यामुळेच मला राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने युरोपच्या अभ्यास दौऱ्यावर जाण्याची संधी प्राप्त झाली. सभागृहात काम करीत असताना दोन वेळा माझी आपण तालिका सभापती म्हणून निवड केली त्याबद्दल मी आपले पुनश्च आभार मानतो. माननीय उप सभापती श्री.वसंतराव डावखरे यांनी अनेकदा मला सहकार्य केले आहे. आम्ही नव्याने सदस्य झालो त्यावेळी विचार मांडण्याची संधी कमी प्रमाणात मिळत होती. ती आमची तळमळ पाहून आपण स्वत:च्या पुत्राप्रमाणे पित्याचे प्रेम आम्हाला प्राप्त करुन दिले, त्याचा आम्हाला विशेष आनंद वाटतो. वरिष्ठ सभागृहात सभागृहाची बैठक सुरु झाल्यापासून संपेपर्यंत प्रामाणिकपणे उपस्थित राहून प्रत्येकाचे विचार ऐकून घेण्याचे काम मी केले. आपलेही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.......

उपदेश आम्ही ऐकून घेतले. मला या सभागृहात विद्यार्थी या नात्याने जेवढे काही शिकता येईल तेवढे विद्याग्रहण करण्याचा मी खऱ्या अर्थाने प्रयत्न केला. ते ज्ञान समाजाला देण्याचा मी यापुढे प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे दु:ख वाटते. गेल्या हिवाळी अधिवेशनात नागपूरच्या विधानभवन प्रांगणामध्ये शेतकऱ्यांची मागणी धसास लावण्यासाठी आम्ही धानाच्या पेंढ्या आणल्या होत्या. त्या मी जाळल्या नव्हत्या. सभागृहात मी धानाच्या प्रश्नासंबंधी 30 मिनिटे भाषण केले होते. परंतु विधानभवन परिसरात धानाच्या पेंढ्या जाळल्याच्या कारणावरुन मला निलंबित केले गेले. ती घटना माझ्या दृष्टीने अविस्मरणीय आहे, म्हणून या ठिकाणी मी ती नमूद करीत आहे.

सभापती महोदय, माझ्यासोबत माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार, एस.क्यू.ज़मा, राजन तेली, अरुण गुजराथी, परशुराम उपरकर, पाशा पटेल, ॲड.उषा दराडे आज निवृत्त होत आहेत. आपण निरोप समारंभाचा जो कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. आपले आशीर्वाद घेण्यासाठी आम्ही आतुर झालो आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी निरोप समारंभाचा प्रस्ताव मांडून आम्हाला जे आशीर्वाद दिले त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. मी कामकाजानिमित्त अनेक मंत्रीमहोदयांच्या कार्यालयात गेलो. आमच्या आईवडिलांची कार्यप्रणाली वेगळी होती. कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते असोत, आपल्याकडे काम घेऊन आल्यानंतर त्याचे काम करायचे. त्यामुळे माझे काम पाहून अनेकदा मंत्री महोदय बुचकळ्यात पडायचे. मी केवळ भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता म्हणून कधी काम घेऊन मंत्री महोदयांकडे जात नव्हतो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ......

राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्ते असोत, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते असोत अथवा आरपीआयचे कार्यकर्ते असोत, जे माझ्याकडे येतील त्यांचे काम करण्यासाठी मी प्रयत्न करीत होतो. तसेच या कामात मला सर्व सहकाऱ्यांनी मदत केली त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो. त्यात सचिव, उप सचिव, इतर अधिकारी तसेच मंत्रालयातील अधिकारी, विधान भवनातील सर्वच अधिकारी व कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले त्यांचा मी ऋणी आहे. तसेच सर्वच लोकांनी मला विशेष प्रेम दिले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा माननीय सभापतींचे आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

भारत माता की जय. जय महाराष्ट्र, जय विदर्भ.

-------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, निरोप समारंभाच्या निमित्ताने माझे विचार व्यक्त करताना मी प्रामुख्याने सांगू इच्छितो की, माझे संपूर्ण शिक्षण व आतापर्यंतचे आयुष्य हे मुंबईतच व्यतित झाले आहे. मुंबईत नोकरी करीत असताना सन 1983 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली येथे गेलो आणि राजकारणाला सुरुवात केली. प्रथम शाखा प्रमुख, तालुका प्रमुख, जिल्हा प्रमुख त्याचप्रमाणे विद्यार्थी क्षेत्रात तालुका प्रमुख व जिल्हाध्यक्ष, राज्याचा उपाध्यक्ष अशी अनेक पदे भूषविली आहेत. हे काम करीत असताना लोक प्रतिनिधी या नात्याने ग्राम पंचायतीपासून सुरुवात केली. सन 1988 मध्ये पहिली पोट निवडणूक लढविली ती निवडणूक जनता दल आणि काँग्रेस पक्षाच्या युतीला उमेदवाराच्या विरोधात लढविली. त्याची दखल घेत माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी व्यंगचित्रातून दाखवून दिले की, शिवसेनेचा उमेदवार जनता दल आणि काँग्रेस पक्षाच्या अभद्र युतीत पाडून आला. तसा प्रकार जिल्हा परिषदेला दोन वेळा झाला. नंतर जिल्हा परिषदेचा सभापती होण्याचा मान मिळाला.

महोदय, सन 2005 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातून माननीय श्री. नारायण राणे शिवसेना सोडून गेले असता अशा परिस्थितीत शिवसेना टिकते की नाही अशी सर्वत्र चर्चा होती. तरी देखील शिवसेनाचा कडवा सैनिक म्हणून मी उभा राहिलो, त्यावेळी माझ्या सर्वच सहकाऱ्यांनी मला साथ दिली होती व माननीय शिवसेना प्रमुखांनी देखील मला निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी बळ दिले होते. त्यांच्या आशीर्वादाने निर्भीडपणे निवडणूक लढवित असताना अनेकांचे फोन येत होते व टी.व्ही. वरुन सुध्दा लोक बघत होते. मला लोक विचारत होते की, "उपरकर, तू ठीक आहेस ना, ठीकच असशील" अशी आमची अपेक्षा आहे. अशा प्रकारची परिस्थिती होती. ती पोट निवडणूक मी हरलो पण तरी देखील मला अभिमान आहे की, कडवा शिवसैनिक म्हणून निवडणूक लढलो तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यात शिवसेना पूर्ववत करण्याचा मी प्रयत्न केला. हे करीत असताना माननीय शिवसेना प्रमुखांनी विधान परिषदेत येण्याची संधी मला दिली होती. कोकणातील अनेक प्रश्न मांडण्याचा मी प्रयत्न केला, काहींना न्याय मिळाला तर काहींना मिळाला नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे मंत्र्यांचे उत्तर एका ढाच्यातीलच असल्याचे ऐकायला मिळाले. ती उत्तरे ऐकल्यानंतर जिल्हा परिषदेमध्ये काम करण्याचा अनुभव आला की, जिल्हा परिषदेच्या कामकाजात तातडीने निर्णय घेऊन त्याची तत्काळ अंमल बजावणी होत होती.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ........

महोदय, विधानसभा किंवा विधान परिषदेच्या कामकाजाचा विचार करता येथे मात्र 40 दिवस अगोदर प्रश्न टाकावे लागतात, अशा प्रकारे अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले तर वेगवेगळ्या माध्यमातून त्यांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला जातो. कोकणातील बरेच प्रश्न अनुत्तरित राहिले असताना एक प्रश्न मात्र सातत्याने मी मांडत आलो आहे. तो म्हणजे पोट निवडणुकीतून गायब झालेले रमेश गोवेकर, ज्याचा शोध अद्याप शासन लावू शकलेले नाही, तो जिवंत आहे की कसे हे देखील समजले नाही. शासनाकडून त्यासाठी कोणत्याही प्रकारचे उत्तर अद्याप मिळालेले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, आपण अनेक वेळा त्या खुर्चीवरून न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. जगात कोठेही नाही असे शिवाजी महाराजांचे मंदिर सिंधुदुर्ग किल्ल्यात आहे. या मंदिराचे सुशोभिकरण करा, या मदिराला निधी द्या, पुरातत्व खाते आणि शासनाने एकत्र बसून छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर सिंधुदुर्ग किल्ल्यात उभारावे व त्यासाठी पुढकार घ्यावा व मंदिर सुशोभिकरणासाठी प्रयत्न करावा अशी माझी या निमित्ताने कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, आपण या स्थानावरुन आम्हाला अनेक वेळा न्याय दिलेला आहे, विविध आयुधे मांडण्याची संधी दिलेली आहे. माननीय उप सभापतींनीही आम्हाला सर्व कामकाजाच्या संदर्भात संधी दिलेली आहे तसेच सर्व मंत्रीमहोदयांनीही प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यामुळे मी सर्व मंत्री महोदयांचे आभार मानतो. विधी मंडळाचे सर्व सचिव,उप सचिव यांनी मला आयुधे कशा प्रकारे मांडावेत ते शिकवले त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो व थांबतो.

जयं हिंद, जय महाराष्ट्र.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहातील 10 सन्माननीय सदस्यांना निरोप देण्यासाठी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी जो प्रस्ताव मांडला त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे व सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे दोन सदस्य यावेळच्या निवडणूकीतही बिनविरोध निवडून आलेले असल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी विधानसभेत जवळ जवळ 20 वर्षे आमदार म्हणून काम केलेले आहे. युवक काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जवळ जवळ 5 वर्षे काम केलेले आहे. दरम्यानच्या काळात गृह राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम केले होते तसेच त्यांनी अनेक विभागात मंत्री म्हणूनही काम केलेले आहे. सध्या ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. काँग्रेस पक्षाचे ते धडाडीने नेतृत्व करीत आहेत. विदर्भातील धडाडीचा नेता या दृष्टीने ते काँग्रेस चळवळ उभी करण्याच्या दृष्टीने प्रयत्नाची पराकाष्ठा करीत आहेत.

माझे बंडखोर मित्र सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना या सभागृहात अचूकपणे रोखणे काही वेळेला अडचणीचे होते. परंतु नंतर ते सभागृहाच्या पध्दती प्रमाणे शांतपणे काम करतात. ते ज्या ज्या वेळी प्रभावीपणे विचार मांडतात त्यावेळी त्यांच्या समोर सर्वसामान्य गरीब शेतकरी, कष्टकरी असतो. गरिबांवर अन्याय होता कामा नये, त्याला न्याय मिळावा अशी त्यांची सातत्याने भूमिका असते.

सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. ज़मा यांनी आपल्या सहा वर्षाच्या काळात स्वत:ला कुशाग्र बुध्दीचा कार्यकर्ता म्हणून सिध्द केलेले आहे. त्यांनी हिंदी प्रमाणे मराठीवरही त्यांचे वर्चस्व असल्याचे सिध्द केलेले केलेले आहे. माणसाने प्रयत्न केले तर तो काहीही करु शकतो हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. त्यांनी कामगारांच्या संदर्भात अनेक प्रश्न सभागृहात मांडलेले असून समाजातील दुर्बल घटकांचेही अनेक प्रश्न खंबीरपणे मांडलेले आहेत. या सर्वांचे आगळे वेगळे उदाहरण म्हणून सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. ज़मा यांच्याकडे पहावे लागेल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

मी सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जामा यांच्या बाबतीत एवढेच म्हणेन की, माझा आणि त्यांचा गेल्या 15-20 वर्षापासून व्यक्तिगत संबंध आहे. कोल मायनिंगमधील कामगार संघटनेचे नेतृत्त्व ते सातत्याने करीत आहेत. त्यामुळे आज त्यांच्याकडे राष्ट्रीय पातळीवरचा कामगार नेता या दृष्टीने पाहिले पाहिजे. माननीय श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी कामगार नेत्याकडे लक्ष दिले तर इंटक सारखी कामगार संघटना मजबूत होईल अशी माझी स्वत:ची अपेक्षा आहे. कामगार चळवळीमध्ये आपले संपूर्ण जीवन झोकून देण्याचा त्यांचा पिंड आहे. मला असे वाटते की, आपण येथून गेलात तरी अन्य क्षेत्रामध्ये आपणास उज्ज्वल भवितव्य आहे. त्या पद्धतीने आपण काम करावे अशी माझी अपेक्षा आहे.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांच्याकडे मी एक मुरब्बी राजकारणी म्हणून पाहतो. त्यांनी ग्रामीण भागात काम केले असून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून पद भूषविले आहे. अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, जिल्हा परिषदेच्या कामकाजात अत्यंत तरबेज असणारे ते सन्माननीय सदस्य आहेत. कोकण विभागाचे अनेक प्रश्न मार्गी लावणाऱ्या सदस्यांपैकी ते एक आहेत.

मी येथे एक वैशिष्ट्य बघितले आहे. दोन मित्र दुर्दैवाने आज अलग असले तरी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली ज्या प्रश्नावर तुटून पडतात त्यावेळी दुसरा प्रश्न हा सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांचा नक्की येतो. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर ज्यावेळी प्रश्न विचारतात त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांचा देखील प्रश्न येतो. लोकशाहीमधील अलग कॉम्बीनेशन या दृष्टीने मी याकडे बघत आहे.

सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांची कोकण विभागामध्ये अत्यंत कणखरपणाने काम करण्याची क्षमता आहे. वय देखील आपल्या बाजूने आहे. राज्यातील ग्रामविकासा संबंधातील अनेक कामे अपूर्ण आहेत. ती पूर्ण करण्याकरिता आपणा सारख्या अनेक खंबीर नेत्यांची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

सभापती .....

सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या बाबतीत मी एवढेच म्हणेन की, समर्पित व्यक्तिमत्व म्हणून आपण त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार या सदनाचे सदस्य असावेत हे सर्वांनाच सातत्याने वाटत होते. शेवटी राजकीय जीवनामध्ये ज्या पक्षाने आपल्याला संधी दिली आहे त्या पक्षाचे, त्या संघटनेचे काही नीती नियम असतात. अशा वेळी थांबणे गरजेचे असते. त्या दृष्टीने पक्षाने सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना अन्य काम देण्याचा निर्णय घेतला असावा असे वाटते. या पुढच्या काळात संपूर्ण राज्यामध्ये संघटना मजबूत बांधण्याकरिता काँग्रेस पक्ष सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांचा जरूर उपयोग करून घेईल याची मला खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी आणि मी गेल्या 30 वर्षांपासूनचे मित्र आहोत. आम्ही दोघेही एकत्रित राहत होतो. आम्ही दोघेही एकाच मंत्रिमंडळामध्ये मंत्री होतो. त्यांचा व माझा व्यक्तिगत जीवनामध्ये एक वेगळा संबध आहे. त्यांच्याच घरातील एक लाडका मुलगा म्हणून त्यांच्या आईवडिलांनी माझ्यावर खूप प्रेम केले आहे. मी अपघाताने त्यांच्या गावी गेलो होतो. विदर्भातून मी कारने आलो. रस्ता माहीत नसल्यामुळे मी फसलो. संध्याकाळी 7.00 वाजता त्यांच्या घरी आलो. माझ्या अंदाजाप्रमाणे दीपावलीच्या आदल्या दिवशी मी आलो होतो. मी सहज चौकशी केली होती. तेव्हा माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी यांनी सांगितले की, यांना आपण घरी घेऊन यावे. एखाद्या मुलाचा ज्याप्रमाणे वडील सत्कार करतात त्याप्रमाणे त्यांच्या आई-वडिलांनी माझ ा सत्कार केला. एवढेच नव्हे तर आपल्या मुलाप्रमाणेच त्यांनी माझ्यावर देखील प्रेम केले. त्यांच्या वडील भगिनींनी देखील माझ्यावर प्रेम केले. तसेच, त्यांच्या चारही भावांनी प्रेम केले. अशा प्रकारे आमचे आगळे वेगळे नाते आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी बुध्दीमत्तेचा एक जबरदस्त मोठा ठेवा आहे. खरे म्हटले तर अशा पध्दतीचा ठेवा असेल तर तो गरिबातील गरिबांपर्यंत द्यावा, त्यांचे हित करावे, त्यांचे कल्याण करावे, त्यांचा विकास करावा, पाठपुरावा करावा यादृष्टीने सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी आतापर्यंतचे आपले आयुष्य वेचलेले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून त्यांना विधान सभेमध्ये अध्यक्ष या नात्याने काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे राज्याचे मंत्री महोदय म्हणूनही काम करण्याची संधी मिळाली आहे आणि आज याठिकाणी विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य म्हणून सहा वर्षे काम करण्याची देखील संधी मिळाली. एक अत्यंत कुशाग्र बुध्दीचा नेता या दृष्टीकोनातून आज संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्याकडे पहात आहे.त्यांनी आपल्या भाषणामध्ये केलेली सूचना अत्यंत मौलिक आहे आणि सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी विनंती करीन की, राष्ट्रीय पातळीवर केंद्र सरकारकडे सदरहू सूचनेचा पाठपुरावा करावा. ज्या-ज्या कॉन्फरन्स मध्ये मला सांगणे शक्य आहे. त्याठिकाणी मी देखील पाठपुरावा करीत आहे की, देशाच्या घटनेनुसार राज्यामध्ये बहुमताने ठराव केला तरच विधान परिषद अस्तित्वात येते. यानुसार आतापर्यंत पाच राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे. मध्यंतरी तामिळनाडू येथेही विधान परिषद अस्तित्वात आल्याने आता ही संख्या 6 झाली आहे. मला असे वाटते की, घटनाकारांकडून एक गोष्ट राहून गेलेली आहे. राज्यामध्ये ज्याप्रमाणे विधानसभा आहे त्याप्रमाणे सेकंड चेंबर या दृष्टीकोनातून विधान परिषद देखील असलीच पाहिजे यादृष्टीने आपण एक ठराव करु या आणि आम्ही तो ठराव आमच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे पाठवितो. तसेच सन्माननीय मुख्यमंत्र्यांनाही माझी विनंती आहे की, त्यांनी देखील या ठरावाचा पाठपुरावा करावा. देशातील लोकशाही कणखर ठेवावयाची असेल आणि त्यासाठी सेकंड चेंबर जर देशात कणखर स्वरुपाचे असेल तरच लोकशाहीच्या दृष्टीने आपल्याला जास्त सुकर काम करता येईल असे मला वाटते.

सभापती महोदय, श्रीमती उषाताई दराडे म्हणजे एक क्रांतीकारक कन्या असे म्हटले तरी चालेल. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांचा जो संपूर्ण जीवनपट आहे, त्याचे टाचण आमच्याकडे देण्यात यावे. जेणेकरुन आदर्श व्यक्तिमत्व कसे असू शकते, समाजामध्ये वावरताना स्त्री किती कठीण प्रसंगांना तोंड देऊ शकते हे आपल्या लक्षात येते. जर आपण त्यांची भाषणे पाहिली तर त्या डाव्या विचारसरणीच्या असून अत्यंत परखडपणे भाष्य करतात असे आपल्याला दिसून येईल. कोणाचाही मुलाहिजा न ठेवता समाजातील गरिबांतल्या गरिबांना न्याय मिळाला पाहिजे असा त्यांचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

आग्रह आहे. या पुढच्या काळामध्ये देखील आपण अनेक क्षेत्रामध्ये काम करु शकाल यासाठी आपल्या पाठीशी आम्हा सर्वांची शक्ती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून आपण पुष्कळ मोठे काम केलेले आहे. या पुढच्या काळामध्ये सुध्दा आपण तशाच पध्दतीचे कामकाज जरुर करावे.

सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांच्या बाबतीत सांगावयाचे तर ते असे म्हणाले की, माझे आणि त्यांचे पटत नाही. एका बाबीमध्ये माझे आणि त्यांचे पटत नाही. त्यांना असे वाटते की, शेतीतील सर्वकाही त्यांनाच माहिती आहे आणि शेतीतील मलाही काहीतरी माहिती आहे. या बाबतीत आम्ही कालच दोघेजण वाद घालत होतो. तो वाद म्हणजे त्यांनी सांगितले की, 27 तारखेच्या पूर्वी आणेवारीबाबत एक महत्वाचा प्रश्न आहे आणि त्या अनुषंगाने मला सभागृहामध्ये न्याय मिळाला तर माझ्या आयुष्यातील फार मोठे काम होईल. मी त्यांना म्हणालो की, तुम्ही आणेवारी असे का म्हणता ? पैसेवारी का म्हणत नाही? आता आणेवारी गेली. यासंदर्भात आमचा 15-20 मिनिटे वाद झाला. मी त्यांना शेतीतील काही गोष्टी सांगितल्या, तशा त्यांनीही मला सांगितल्या. मी त्यांना सांगितले की, 27 तारखेच्या अगोदर तुमच्या मनामध्ये जी खदखद आहे ती मी पूर्ण करण्याचा जरुर प्रयत्न करतो.

यानंतर श्री.बरवड . . ..

सभापती . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सभापती** .....

सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी विविध पध्दतीने अभ्यास करुन शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा पाठपुरावा करणे, त्याकरिता चिकाटीने प्रयत्न करणे, जे जे शक्य आहेत ते सर्व मार्ग अवलंबिणे, अशा पध्दतीने या सदनामध्ये गेल्या सहा वर्षामध्ये जे काम केले आहे त्याला तोड नाही. आपण सर्वांनी या पध्दतीने काम केले पाहिजे.

माझी सदनाला विनंती आहे. काही वेळा एखादा कृषी विषयक विशिष्ट विषय चर्चेला आला की, 80 टक्के सन्माननीय सदस्य आपण शेतकरी आहोत असे सांगतात. तसेच काही वेळा सदनामध्ये शेतीच्या प्रश्नावर दहा सदस्यांना सुध्दा बोलण्याची संधी मिळत नाही. या दृष्टीनेही आपण विचार करणे जरुरीचे आहे. त्या दृष्टीने जर विचार केला तर शेती क्षेत्रामध्ये उपेक्षित असणारा जो गरीब आहे, ज्याला आपण फाटका शेतकरी असल्याचे मानतो, त्याला अनेक पध्दतीने न्याय देण्याकरिता आपण प्रयत्नांची पराकाष्टा करणे आणि त्या दृष्टीने चिकाटी दाखविणे यातच खऱ्या अर्थाने आपले शेती विषयक प्रेम आहे आणि खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांवर असणारा विश्वासही आहे. आपण सर्वांनी शेतकऱ्यांशी इमान राखणे, शेतीच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्टा करणे गरजेचे आहे. शेतीचा प्रश्न हा राजकीय होऊ शकत नाही या दृष्टीने त्याकडे पाहणे गरजेचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर हे एक अभ्यासू कार्यकर्ते आहेत. विदर्भातील हे कार्यकर्ते धान किंवा त्याच्याशी संबंधित जे प्रश्न आहेत त्यावर या सभागृहामध्ये सातत्याने अनेक माध्यमातून प्रश्न विचारतात, त्याचा पाठपुरावा करतात. काही वेळा हट्टही करतात. कार्यकर्त्यांनी हट्ट करण्यात काय हरकत आहे ? सभापती किंवा उप सभापतींकडे जर एखाद्या गोष्टीसाठी हट्ट केला तर तो कार्यकर्त्याचा हक्क आहे असे मी मानतो.

मघाशी मी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांच्या बाबतीत सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी सुध्दा कोकण विभागातील जे अनेक प्रश्न आहेत त्या बाबतीत अत्यंत प्रामाणिकपणे या ठिकाणी प्रयत्न केलेले आहेत. एक चळवळ या दृष्टीने मी आपल्याकडे बघतो. पहिल्या वर्षी सभागृहात आल्यानंतर व आज सहाव्या वर्षी परत जात असताना एक अत्यंत संयमी आणि शांत पध्दतीचा कार्यकर्ता या सहा वर्षात विधान परिषदेने तयार केला असे म्हटले तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

ते वावगे होणार नाही. या पुढच्या काळात सुध्दा कोकण विभागात आणि महाराष्ट्रात आपण जे काम करणार आहात ते काम अत्यंत उमेदीने करावे. आपल्याला उज्ज्वल भवितव्य आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्याबद्दल मघाशी बोललो आहे. आज ज्या सदस्यांना आपण निरोप देत आहोत त्यांना भावी आयुष्यामध्ये अत्यंत यशस्वी पध्दतीने काम करण्याची संधी मिळो. जरी या सभागृहातून आपल्याला जावे लागले तरी बाहेर आपण समाजकारण, राजकारण या क्षेत्रामध्ये चळवळीतूनच पुढे आलेला आहात आणि पुन्हा त्याच पध्दतीने समाजाच्या अनेक प्रश्नांमध्ये लक्ष घालून आपण अत्यंत चांगले काम करावे या दृष्टीने सर्वांना माझ्या शुभेच्छा आहेत. जय हिंद, जय महाराष्ट्र.

निवृत्त होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना निरोप देण्याच्या निमित्ताने आता विधान भवनाच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या पोर्चमध्ये एकत्रित छायाचित्र काढण्याचा व त्यानंतर विधान भवनातील दुसऱ्या मजल्यावरील विधान परिषद सभागृहाच्या लॉबीमध्ये चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कृपया सर्वांनी उपस्थित राहावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या मंगळवार, दिनांक 24 जुलै, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 34 मिनिटांनी, बुधवार, दिनांक
24 जुलै, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही